# एम.ए.इतिहास

## सत्र - II (CBCS)

## इतिहास अभ्यासपत्रिका क्र. V

# इतिहासाचे तत्वज्ञान

## विषय कोड : 93313

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. कृष्णा गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
एल.जे.एन.जे. महिला महाविद्यालय,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई

**लेखक** : **डॉ. विन्सेन्ट डीमेलो**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
इतिहास विभाग, सेंट जोसेफ कॉलेज,
विरार, जि. पालघर.

: **डॉ. प्रदिप वाघमारे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
रामनिरजंन रूईया महाविद्यालय (स्वायत्त),
माटुंगा, मुंबई.

: **डॉ. अजयकुमार लोखंडे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
के.व्ही.पेंढारकर महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे.

: **प्रा.सिध्दार्थ राघो दवणे**
सहाय्यक प्राध्यापक (पदव्युत्तर इतिहास विभाग)
एल.डी. सोनावणे महाविद्यालय, कल्याण.

**मार्च २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई - ४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई विद्यापिठ मुद्राणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

## अनुक्रमणिका


| क्रमांक शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| १. इतिहासाचे तत्वज्ञान : अर्थ व समर्पकता | १ |
| २. प्राचीन भारतातील इतिहासाचे तत्वज्ञान | १२ |
| ३. ईश्वरवादी दृष्टिकोण आणि आदर्शवादी दृष्टिकोण | २६ |
| ४. बुध्दिवादी आणि प्रत्यक्षवादी दृष्टिकोण | ६५ |
| ५. इतिहासाचा मार्क्सवादी विचार - मार्क्स व एंजल्स | ८९ |
| ६. इतिहासाचा नव - मार्क्सवदी दृष्टिकोन - एरिक हॉब्सवन व इ.पी. थॉमसन | १०६ |
| ७. सबाल्टर्न स्टडीज : संकल्पना आणि सबाल्टर्न स्टडीजचे योगदान | १२२ |
| ८. इतिहासवाद, नव - इतिहासवाद आणि सांस्कृतिक भौतिकवाद | १३३ |
| ९. ॲनल्स इतिहासप्रणाली : संकल्पना, पध्दती आणि योगदान | १४४ |
| १०. उत्तर आधुनिकवाद आणि इतिहास | १५१ |
| ११. पौर्वत्यवादी इतिहासलेखन | १५९ |
| १२. साम्राज्यवादी इतिहासलेखन | १६६ |
| १३. केंब्रिज इतिहासलेखन | १७३ |
| १४. राष्ट्रवादी इतिहासलेखन प्रवाह | १८० |
| १५. मार्क्सवादी इतिहासलेखन | १८९ |
| १६. अपारंपरिक साधने आणि अलीकडील पध्दती | १९५ |


❖❖❖❖

## MA HISTORY, SEMESTER–II

### Paper V: Philosophy of History

Objectives: To equip students with the trends of the comprehension of the past and to make them understand the relationship between Philosophy and History.

**Module**

**1. Philosophy of History**

a. Meaning and Relevance

b. Philosophy of History in Early India

c. Theological School, Idealistic School, Rationalist School and Positivist School

**2. Materialist Schools**

a. Marxist view of History–Marx & Engels

b. Neo-Marxist view of History–Eric Hobsbawm & E.P. Thompson

c. Subaltern Studies – Main Concepts, and Contribution of Subaltern Studies

**3. Post-Marxist Concepts and Approaches**

a. Historicism, New Historicism and Cultural Materialism

b. Annales School: Ideas, Methods and Contribution

c. Postmodernism and History

**4. Perceptions of Indian History**

a. Orientalists, Imperialists and Cambridge Schools

b. Nationalist and Marxist Schools

c. Unconventional Sources and Recent Methods

**References:**


- Acton, H. B. '*Comte's Positivism and the Science of Society' in Philosophy*, Vol. 26, Macmillan & Co. Ltd., London, 1951.
- Acton, Lord, *Historical Essays and Studies*, Mac Millan, London,1907.
- Acton, R. *Introduction to the Philosophy of History,* Trans. G.J. Irwin, Weidenfeld and Nicolson, London,1961.
- Arnold David and Guha Ramchandra (ed.), *Nature, Culture and Imperialism*, Essays on the Environmental History of south Asia, Delhi, 1996.
- Ayer, A.J. *Foundations of Empirical Knowledge*, Macmillan Co., London, 1961.

- *Language, Truth and Logic*, Dover Publications, Inc., New York, 1949.
- Beck, R.M.(Ed.) *Perspectives in Philosophy,* (Holt, Rinehart and Winston, Inc., New York, 1961.
- Berlin, Isiah, Vico and Herder: *Two Studies in the History of Ideas* (Hogarth Press, London, 1961.
- Bloch, Marc *The Historian's Craft, Trans. Peter* Putnam (Manchester University Press, Manchester, 1954.
- Cairns, G.E. *Philosophies of History* (Philosophical Library, New York, 1962.
- Collingwood, R. G. *The Idea of History.* Ed. T. M. Knox (Oxford University Press, London, 1973.
- Croce, B., *Theory and History of Historiography,* Trans. Douglas Ainslie, London,1921.
- Danto, A.C., *Analytical Philosophy of History, Cambridge* University Press, Cambridge,1965.
- Flint, R., *History of the Philosophy of History*, William Black wood and Sons, Edinburgh & London,1983.
- Fritz Stern, ed., Varieties of History: from Voltaire to the Present ,2ndedn., New York, Vintage, 1973.
- Fuller, B.A.G.*, A History of Philosophy* (revised by S. M. Mc Murrin, 3rded., Henry Halt & Co., New York,1952.
- Gallie, W.B*, Philosophy and Philosophical Understanding* (Chatto and Windus, New York, 1964.
- Gardiner, Peter*: The Nature of Historical Explanation* (Oxford University Press, London,1974.
- GeylP., *From Ranke to Toynbee,* Smith College Press, London,1952.
- GoelD., *Philosophy of History: A Critical study of Recent Philosophies of History,* Sterling Publishers Pvt. Ltd., Delhi,1967.
- Goel, D. *Philosophy of History: A Critical Study of Recent Philosophies of History*, Sterling Publishers (P) Ltd., Delhi, 1967
- Gotschalk L. R., Alfred A. Knopf (ed), *Generalizations in the Writing of History*, NewYork,1963.
- Guha R., *Subaltern Studies* I, Oxford University Press,1982.
- Hegel G.W.F., *The Philosophy of History*, Trans. J. Sibree, American Home Library Company, New York,1902.
- Herder G. J., *Ideas Towards the Philosophy of History of Man,* Vol-IV, Chicago University Press, Chicago,1963

- Herder, G.J., *Ideas Towards the Philosophy of History of Man*, Vol.I-IV, Chicago University Press, Chicago,1963.
- Hook S., *From Hegal to Marx, Studies in the Intellectual Development of Karl Marx,* The Humanities Press, New York,1950.
- HookS., *Towardsan Understanding of Karl Marx, A Revolutionary Interpretation*, Victor Gollancz Ltd., London,1933.
- *Itihaslekhan Mimansa*, Samaj Prabodhan Patrika Aani Centre for Study in Culture and Society, Lokvagmaya Gruha, Mumbai
- KhaldunIbn, *The Muqaddimah, An Introduction to History,*3Vols, Trans. R. Franz, London, 1958.
- Lowith, K.: *Meaning in History; The Theological Implications of the Philosophy of History,* Chicago University Press, Chicago, 1948.
- Moritz Schlick, *The Future of Philosophy, The* College of the Pacific Publications in Philosophy, 1932.
- Radhakrishnan, *History of Philosophy: Eastern and Western:* Vol. I, Allen and Unwin Ltd., London,1953.
- Ranjit Guha (ed.), Subaltern Studies Reader, 1986-1995, Univ of Minnesota, 1st edition,1997.
- Rosenthal M and Yudin, *P. A, Dictionary of Philosophy,* Progress Publishers, Moscow,1967.
- Roy, Tirthankar, The economic history of India1857-1947,3rd , Oxford University Press India, Delhi,India,2011.
- Roy, Tirthankar, An economic history of early modern India, Routledge, Abingdon, UK,2013.
- Sardesai B.N., I*tihas Lekanshastra*, Phadke Prakashan, Kolhapur, 2002 (Marathi)
- Sheedharan S., *A Textbook of Historiography 500BC–2000AD*, Orient Black Swan, New Delhi,2004.
- Sheikh Ali, *History: Its Theory and Method, (*Macmillan India Ltd., Madras,1978. Stokes Eric, The *English Utilitarian sand India, Oxford, Clarendon Press,1959.*
- Walach Scott, Joan, Gender and the Politics of History, Columbia, New York, 1988, Parts I-II.
- Wilkins, Maurice H., *Synthesis of Science and Religion,* Bhakti Vedanta, Mumbai, 1988.Will Durant, *Story of Philosophy*, Garden City Publishing Co., New York, 1933.


❖❖❖❖

# १

## इतिहासाचे तत्वज्ञान: अर्थ व समर्पकता

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ इतिहासाचे तत्त्वज्ञान अर्थ: (Philosophy of History)

१.२.१ तत्त्वज्ञान विषयक पद्धती

१.२.२ तत्त्वज्ञानात्मक कृती ( Philosophical Activity )

१.२.३ तत्त्वज्ञानात्मक समस्या - ( Philosophical Problems )

१.२.४ समस्यांचे वर्गीकरण

१.२.५ तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन

१.२.६ तत्त्वज्ञानात्मक निष्कर्ष

१.३ इतिहासाचे तत्वज्ञान, समर्पकता (Relevance)

१.४ सारांश

१.५ प्रश्न

१.६ संदर्भ

### १.० उद्दीष्टे

हे युनिट पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होऊ शकेल.

- इतिहासाचे तत्वज्ञान म्हणजे काय हे समजेल.
- इतिहासाच्या तत्वज्ञानाच्या विविध व्याख्या समजून घेतील.
- तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या पद्धतीची माहिती होईल.
- इतिहासाच्या तत्वज्ञानाच्या समर्पकतेचे ज्ञान होईल.

### १.१ प्रस्तावना

इतिहास व तत्त्वज्ञान यांचा निकटचा संबंध सर्वमान्य आहे. मात्र इतिहासाचे तत्त्वज्ञान याहून काही वेगळे आहे का?, असा प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडण्याची शक्यता आहे. म्हणून याचे उत्तर शोधणे प्रस्तुत ठरते. सर्व ज्ञानशाखा बुद्धिनिष्ठ असल्याने त्या सर्वांमागे तात्त्विक, सैद्धांतिक भूमिका असते, काही मूलभूत विचार असतात. कोणत्याही विषयासंबंधी केवळ

निरीक्षणाने मिळणाऱ्या वरवरच्या माहिती व्यतिरिक्त, त्या विषयाच्या खोलात शिरून, त्या विषयाचा सूक्ष्म अभ्यास करून त्यातून काही मूलतत्त्वे, काही मौलिक तर्कसंगत विचार शोधून काढण्याचे काम तत्त्वज्ञान करते. सागराच्या तळाशी बुडी मारून मौल्यवान रत्ने हस्तगत करावीत. त्याप्रमाणे मानवी जीवनाच्या अध्ययनातून काही जीवनमूल्ये, सत्य, शिव, सुंदर यासारखी चिरकालीन तत्त्वे शोधून काढणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. इतिहास हा गतकालीन माणसाच्या जीवनाचा अर्थपूर्ण आलेख असल्यामुळे इतिहास हे देखील तत्त्वज्ञानाचे कार्यक्षेत्र ठरते.

## १.२ इतिहासाचे तत्त्वज्ञान: अर्थ (Philosophy of History)

मानवी जीवन स्थिर नसून परिवर्तनशील आहे. माणसाच्या जीवनातील स्थित्यंतरे कधी जलद गतीने तर कधी धिम्या गतीने घडत असतात. सामाजिक स्थित्यंतरांचे स्वरूपही असेच आहे. जिज्ञासू माणूस अशा स्थित्यंतरांचे स्वरूप, त्यामागील कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. सकृद्दर्शनी ती सुटी दिसतात. खोलात शिरून पाहिल्यावर त्यांची संगती लागते. उदाहरणार्थ, आपल्या देशात जे नैसर्गिक ऋतुचक्र आढळते, तसेच ते जगाच्या पाठीवर इतरत्रही आढळते का? की इतरत्र त्याचे स्वरूप भिन्न आहे? भिन्न असेल तर ते तसे कां? त्या बदलांचा इतर कोणत्या घटकांशी संबंध आहे का? असे शेकडो प्रश्न जिज्ञासू व्यक्तीच्या मनात उद्भवतात आणि तो आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार व मानसिक प्रगल्भतेनुसार, कधी पूर्वसूरींचा आधार घेत त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयास करतो. ती उत्तरे अमूर्त सैद्धांतिक स्वरूपाची असतात. मानवी जीवनातील, अगर निसर्गातील परिवर्तनामागील कारणे ते सिद्धांत उलगडून दाखवतात. नैसर्गिक परिवर्तनामागील कारकांची माहिती विज्ञान करून देते, मानवी जीवनासंबंधीचा मूलभूत विचार तत्त्वज्ञान मांडते, त्याचप्रमाणे इतिहासासंबंधी मूलभूत सिद्धांत इतिहासाचे तत्त्वज्ञान मांडते. याचाच अर्थ इतिहासाचे, सैद्धांतिक सार म्हणजे इतिहासाचे तत्त्वज्ञान होय.

इतिहास म्हणजे काय? त्याची कार्यपद्धती कोणती? त्याच्या प्रक्रियेचे स्वरूप काय? त्याचा विषय कोणता? त्याची सामुग्री कोणती? त्याच्या विषयाच्या स्वरूपाचे काही नियम आहेत का? ऐतिहासिक घटिते म्हणजे काय? ही घटिते पूर्णतः सत्यावर आधारित असतात का? ऐतिहासिक सत्याचे स्वरूप कसे असते? घटितांतून काही तर्कसंगत अर्थ काढता येतो का? घटितांचा वर्तमानकाळाशी काही संबंध असतो का? गतकाळातील मानवी जीवनाचे दर्शन घडविणारा इतिहास मानवाला काही शिकवण देतो का? - इतिहासाबाबत असे नानाविध प्रश्न इतिहासाच्या अभ्यासकांच्या मनात निर्माण होतात, त्यांच्या उत्तरांचा शोध म्हणजे इतिहासाचे तत्त्वज्ञान होय.

ऐतिहासिक घटना घडतात त्याच्या मुलाशी काहीतरी ध्येय किंवा तत्व असते व हे तत्वच अभ्यासकाला फार उपयोगाचे ठरते. परंतु एखादा करार हे काळाच्या ओघात गडप होतात, इतिहासामध्ये झालेल्या लढाया, तत्व किंवा त्या तत्वानुसार वागणारी व्यक्ती ही नंतरच्या काळातसुद्धा मार्गदर्शक ठरते. प्राचीन काळापासून जगाचा इतिहास वाचल्यानंतर सुप्रसिद्ध फ्रेंच तत्वज्ञ व्हॉल्टेअर याला असे जाणवले की या घटनांच्या मध्येही काही सूत्रबद्धता, आहे. तसेच या घटनांच्यामागे काही तत्वज्ञानाची कल्पना आली व त्याने इतिहासाचे तत्त्वज्ञान (Philosophy of History) हा शब्दप्रयोग रूढ केला.

फ्रेंच तत्वज्ञ व्हाल्टेअर याने Philosophy of History म्हणजे इतिहासाचे तत्वज्ञान असा शब्दप्रयोग पहिल्यांदा रूढ केला. त्यामुळे स्वाभाविकच ऐतिहासिक प्रक्रियेकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टीकोन अस्तित्वात आले. इतिहासाचे तत्वज्ञान याचा साधा अर्थ म्हणजे शहाणपणाबद्दल किंवा शिस्तप्रियतेबद्दल वाटणारी आपुलकी (Its simpliest meaning is love of Wisdom). परंतु इतिहासाचे तत्वज्ञान म्हणजे नुसतीच नव्हे तर यामध्ये एखाद्या घटनेकडे पाहताना किंवा त्या घटनेचे स्पस्तीकरण करीत असताना आपण आपल्या विचारांना दिलेले शिस्तबद्ध रूप म्हणजे इतिहासाचे तत्वज्ञान होय.

इतिहासाच्या ज्ञानाचे स्वरूप हे अप्रत्यक्ष स्वरूपाचे असते. म्हणून इतर भौतिक शास्त्रामध्ये ज्याप्रमाणे प्रत्यक्ष निरीक्षण केले जाते तसा प्रकार इथे नसतो. तत्वज्ञान हे प्रामुख्याने अज्ञात गोष्टी शोधून काढण्यासाठी अस्तित्वात आलेली विद्याशाखा होय. म्हणून तत्ववेत्ता हा काही गृहीत कृत्ये धरून बुद्धीप्रामाण्य व तार्किकपणा यांच्या आधारे एखादे विशिष्ट तत्व शोधून काढत असतो. इतिहास संशोधकसुद्धा अशाच तर्हेचे कार्य करीत असतो. म्हणून मी ज्या मार्गाने ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावतो त्यांना इतिहासाचे तत्वज्ञान असे म्हणतात. तत्वज्ञान प्रामुख्याने विविध संकल्पनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असते. अशा प्रयत्नांमध्ये संकल्पनांची स्पष्ट जाणीव व प्रश्नांची मर्यादा त्याला स्पष्टपणे अवगत असणे आवश्यक आहे. इतिहासाच्या तत्त्वज्ञानापासून मानव व त्यांच्या समस्या यांची उकल होत असते.

व्हिको व क्रोसे यांच्या दृष्टीने गोष्टींच्या अंतिम कारणांचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान. इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हणजे इतिहासाच्या घटनांच्या अंतिम कारणांचे ज्ञान होय. वास्तवतेच्या क्षेत्राशी या घटनांचा संबंध असतो. एकूण ऐतिहासिक प्रक्रियेचा अर्थ यावर भाष्य करण्याकरता समाजशास्त्रज्ञ व इतिहासकार यांनी केलेले प्रयत्न म्हणजे इतिहासाचे तत्त्वज्ञान होय.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा साकल्याने विचार केल्यास ते प्रामुख्याने तीन मुद्यांवर केंद्रित झालेले आढळते.

१) ऐतिहासिक घटिते, ऐतिहासिक सत्य वगैरे.

२) ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ किंवा त्यांचे स्पष्टीकरण.

३) मानवी जीवनातील स्थित्यंतरांसंबंधी सर्वसामान्य नियम, त्यामागील काही लयबद्ध योजना शोधण्याचा उच्च बौद्धिक स्तरावरील प्रयत्न; हे इतिहासविषयक तत्त्वज्ञानाचे तीन केंद्रबिंदू आहेत.

### आपली प्रगती तपासा

१. इतिहासाच्या तत्वज्ञानाचा अर्थ स्पष्ट करून त्याच्या विविध व्याख्या लिहा.

### १.२.१ तत्त्वज्ञान विषयक पद्धती

तत्त्वज्ञानाचा अर्थ कळण्यासाठी तत्त्वज्ञानाशी संबंधित असणाऱ्या समस्या, दृष्टिकोन, पद्धती, प्रक्रिया व निष्कर्ष यांची चर्चा करणे आवश्यक आहे. तत्त्वज्ञान विषयक पद्धती समजल्याशिवाय तत्त्वज्ञानाचे ज्ञान होणार नाही. तत्त्वज्ञाच्या अभ्यासाच्या विगमन व निगमन

पद्धती (Inductive and Deductive Method) तत्त्वज्ञान समस्या सोडविण्याकरता वापरल्या जातात.

### १. विगमन पद्धती :

विविध शास्त्रांचे तत्त्वज्ञान हे विगमन पद्धतीने शास्त्रज्ञ साध्य करतो. पण तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ यांच्या दृष्टिकोनात फरक आहे. शास्त्रज्ञ हा वस्तुनिष्ठ घटकांवर जास्त भर देतो. पण तत्त्वज्ञ अमूर्त कल्पनांवर भर देतो. तत्त्वज्ञ प्रयोग शाळेचा वापर न करता संकल्पना वापरात आणतो व सिद्धांत तयार करतो व या सिद्धांतांच्या आधारावर तो त्याच्या अनुभूतीचे स्पष्टीकरण करतो. जर एक सिद्धांत अपयशी ठरला तर तो दुसरा सिद्धांत पर्यायी म्हणून तयार करतो. अधिक अनुकूल पर्यायी सिद्धांत तयार करण्याची प्रक्रिया चालत राहते. अशाप्रकारे अनेक विशिष्ट विधानातून तत्त्वज्ञानाचे सर्वसामान्य विधान काढण्याचा प्रयत्न म्हणजे विगमन प्रक्रिया होय.

### २. निगमन पद्धती :

विगमनाच्या उलट प्रक्रिया म्हणजे निगमन (Deductive) होय. सर्वसामान्य विधानाकडून विशिष्ट विधानांकडे जाण्याची ही प्रक्रिया आहे. उदा. सर्व माणसे मर्त्य आहेत. -सर्व सामान्य विधान, रमेश माणूस आहे म्हणून तो मर्त्य आहे. तत्त्वज्ञाच्या विचारात व युक्तीवादात अशा विधानांचा प्रासंगिक उपयोग केला जातो. विरोध विकासवाद (Diale ctical Materialism) सुरूवातीला एखादी कल्पना तयार होते. काळाच्या ओघात त्या कल्पनेला विरोधी असे वस्तुनिष्ठ घटक मिळतात व त्यातून प्रतिकल्पना (Thesis ) तयार होते. दोन्ही कल्पना दीर्घकाळ सहयोग करू शकत नाहीत म्हणून दोन्ही कल्पनांच्या मिलनांतून संयोगीकरण (Synthesis) तयार होते. यामुळे प्रतिकल्पना सिद्धांतापेक्षा संयोगीकरणाचा सिद्धांत अधिक बरोबर व सर्वसमावेशक होतो. अशाप्रकारे तत्त्वज्ञानाची विचारसरणी विचारांच्या तिन्ही अवस्थातून जाते. यालाच विरोध विकास पद्धती (Dialectical Method) म्हणतात. पण विश्लेषणाच्या व संयोगीकरणाच्या महत्त्वाच्या प्रक्रियासुद्धा विचारात घेतल्याशिवाय आपणास विरोध विकासवाद पद्धती स्पष्ट करता येत नाही.

### १. विश्लेषण - ( Analysis )

विशिष्ट अनुभवाच्या स्थितीत येणाऱ्या वेगवेगळ्या मूल तत्वात फरक करण्याची प्रक्रिया म्हणजे विश्लेषण होय. वास्तववादी तत्त्ववेत्यांना ही प्रक्रिया फार उपयुक्त वाटली.

### २) संयोगीकरण –

विखुरलेल्या घटकात अथवा मूलतत्वात संबंध प्रस्थापित करण्याची ही प्रक्रिया आहे. यातून नवीन आकृतिबंध (Patterns) असणारे घटक मिळतात. तर्कशास्त्रीय निश्चितवादात (Logical Positivism) केवळ संयोगीकरणाची प्रक्रिया उपयुक्त नसते.

### आपली प्रगती तपासा

१. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या पद्धतीची माहिती द्या.

### १.२.२ तत्त्वज्ञानात्मक कृती (Philosophical Activity)

तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्ववेत्ते जे काही करतात ते. तत्त्वीकरण करणे म्हणजे तत्त्वज्ञानात्मक कृती होय. या कृतीत विचारप्रक्रिया, टीका व वेगवेगळ्या पद्धतींनी तत्त्वज्ञानात्मक समस्या सोडविणे या कृतीचा अंतर्भाव होतो.

ज्या वेळेस आश्चर्याची, असमाधानाची अगर संशयाची अवस्था असते तेव्हा ही कृती सुरू होते. ही विचारप्रक्रिया समीक्षक व बौद्धिक दृष्टिकोनाची असते.

### १. तत्त्वज्ञानात्मक कृतीची लक्षणे

ज्ञान व अनुभव यांच्या वाढीबरोबर हळूहळू परिपक्वता (Maturity) येणे, तत्त्वज्ञान पद्धती व दृष्टिकोन यांचा वापर करणे, व्यक्ति व गट पातळीवर विचार करणे व तसेच इतरांच्या संबंधात विचार करणे आणि सर्वव्यापक विचारसरणी अंगीकारणे.

### १.२.३ तत्त्वज्ञानात्मक समस्या - ( Philosophical Problems )

माणसाला पृथ्वीतलावरील त्याच्या अस्तित्वाची जाण आली तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. त्याला जेव्हा गुतांगुतीच्या व संघर्षात्मक समस्यांना तोंड द्यावे लागले तेव्हा त्याला निर्सगातील प्रचलित व्यवस्थेबद्दल अस्वस्थता निर्माण झाली. या अवस्थेतन प्राथमिक स्वरूपात तत्त्वज्ञानाचा प्रारंभ झाला.

आधुनिक काळात मात्र तत्त्वज्ञानाचा आरंभ संशयी अवस्थेतून झाला. आश्चर्य व संशय यामुळेच तत्त्वज्ञानाशी संबंधित समस्या निर्माण झाल्या. उदा. जग काय आहे? ते कसे निर्माण झाले? जर ते निर्माण झाले तर त्याचा निर्माता कोण? परमेश्वर म्हणजे काय? त्याचे खरोखरच अस्त्वित्व आहे काय? ज्ञान म्हणजे काय? ते कसे संपादन केले जाते? इत्यादी.

### १.२.४ समस्यांचे वर्गीकरण

### १. मूल्यांशी संबंधित समस्या

राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, तत्त्वज्ञानाच्या मूल्याशी या समस्या निगडीत असतात.

### २. वास्तवतेशी संबंधित समस्या

या समस्या अधिभौतिक शास्त्र, बौद्धिकवाद, व वेदांत यांच्याशी संबंधित असतात.

### ३. ज्ञान व अनुभव यांच्याशी संबंधित समस्या

या समस्या शास्त्राचे तत्त्वज्ञान इत्यादीशी संबंधित असतात. टीकात्मक व संयोगात्मक छष्टीने तत्त्वज्ञानाच्या समस्यांकडे पाहिले जाते.

### १.२.५ तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन

आश्चर्य व संशय यातून तत्त्वज्ञान विषयक दृष्टिकोन निर्माण झाला. अनुभव व विचार यातून हा दृष्टिकोन प्रगत होत जातो.

### १.२.६ तत्त्वज्ञानात्मक निष्कर्ष

तत्त्वज्ञ त्याच्या विशिष्ट प्रश्नांबाबत वेगवेगळे व परस्पर -विसंगत असे निष्कर्ष तयार करतात असे Ohemay म्हणतो. तत्त्वज्ञानात्मक व बिगरतत्त्वज्ञानात्मक प्रश्नांना एकमेकांपासून विलग करण्यातच तत्त्वज्ञाचे श्रम खर्ची पडतात. तत्त्वज्ञानाचे प्रश्न इतक्या वेगवेगळ्या मार्गांनी सोडविले जातात. की त्याबाबत निष्कर्ष निश्चितपणे काढणे अवघड जाते. एक तत्त्वज्ञ विशिष्ट प्रश्नावर दुसऱ्या तत्त्वज्ञाहून वेगळा निष्कर्ष काढतो. "लोक जे त्यांचे तत्त्वज्ञान नसते त्या तत्त्वज्ञानात गुंततात. कारण ते दुसऱ्या कोणाकडून तरी तत्त्वज्ञानाची उसनवारी करतात." असे विल्यम हॉकिंग हा तत्त्वज्ञ म्हणतो.

विषयानुसारं तत्त्वज्ञानाचे वर्गीकरण केले जाते. त्याचा संबंध परमेश्वर, माणसाचा स्वभाव, निर्सग, मानववंशशास्त्र, यांच्याशी असतो,

वुल्फ, हेगेल, वुन्ड्ट, हर्बट, इत्यादींनी तत्त्वज्ञानाचे वर्गीकरण वेगवेगळ्या प्रकारे केले आहे.

सर्व शास्त्रांचे मूळ तत्त्वज्ञान आहे. अनेक शास्त्रांवर प्राचीन तत्त्वज्ञ प्लेटो, ॲरिस्टॉटल, व सॉक्रेटिस यांचा प्रभाव पडला आहे. मूलतः माणसाची नैर्सगिक घटनांबाबत असणारी जिज्ञासा व आश्चर्य यातूनच तत्त्वज्ञान व शास्त्र यांचा जन्म झाला आहे.

संस्कृतीच्या प्रारंभी घटना या तत्त्वज्ञानात्मक व शास्त्रीय असल्याने ज्ञान या दोहोंशी निश्चित होते. नंतर हळूहळू होत गेलेले विशेषीकरण व सूक्ष्म अभ्यास यामुळे वेगवेगळी शास्त्रे ही तत्त्वज्ञानापासून वेगळी झाली. या शास्त्रांचे पुन्हा उपशाखात विभाग पडले. व प्रत्येक शाखा स्वतंत्र शास्त्र झाली.शास्त्रीय प्रक्रियेत तत्त्वज्ञान महत्त्वाचे कार्य करते. शास्त्राचा मुकुटमणी म्हणजे तत्त्वज्ञान होय. तत्त्वज्ञान नेहमीच शास्त्राच्या पलीकडे असते. म्हणूनच आजची तत्त्वज्ञानाची समस्या ही उद्या शास्त्रीय समस्या होते. माणसाचे बौद्धिक क्षितीज असेच विस्तारत जाईल आणि त्यामुळे तत्त्वज्ञानाची समस्या कधी तरी संपुष्टात येऊ शकेल.

इतिहासाचे तत्त्वज्ञान ऐतिहासिक हेतूचे स्वरूप, त्याचा उद्देश, व त्याचा वैश्विक प्रक्रियेशी असलेला संबंध यांचा अभ्यास करते.

**आपली प्रगती तपासा**

१. तत्त्वज्ञानात्मक समस्या स्पष्ट करा.

## १.३ इतिहासाचे तत्वज्ञान - समर्पकता (Relevance)

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या दोन शाखा आहेत. १)टीकात्मक तत्त्वज्ञान (Critical Philosophy). २) चिंतनावर अधिष्ठित तत्त्वज्ञान (Speculative Philosophy). या दोन शाखा भिन्न भिन्न प्रकारे कार्य करीत असतात. सम्यक तत्त्वज्ञान हे ऐतिहासिक घटनाकडे टीकात्मक दृष्टिकोणातून व आराखडयाच्या स्वरूपात कार्य करीत असते. तर चिंतनावर अधिष्ठित तत्त्वज्ञान ऐतिहासिक घटनांना विशिष्ट आकार (Form) देण्याचा प्रयत्न करीत असते. सम्यक् तत्त्वज्ञान हे तर्क, संकल्पना यावर आधारित असते. मननावर आधारित

तत्त्वज्ञान हे ऐतिहासिक घटनेचा अर्थ लावणे किंवा त्याचे महत्त्व समजावून देणे याच्याशी निगडित असते.

**१. टीकात्मक तत्वज्ञान (Critical Philosophy) :** एकोणिसाव्या शतकापासून टिकात्मक तत्वज्ञानाची शाखा उदयास आली. त्यांच्यापूर्वी नेतिहास ही तत्वज्ञानाची किंवा वाङ्मयाची शाखा म्हणून ओळखली जात असे. प्राचीन काळी ॲरिस्टॉटलचे इतिहासाच्या स्वरूपाबद्दल अतिशय प्रतिकूल मत होते. काव्यापेक्षा इतिहास हा कमी प्रतीचा आहे असा त्याचा विश्वास होता. ज्या व्हॉल्टेअरने इतिहासाचे तत्वज्ञान हा शब्दप्रयोग रूढ केला त्याचेसुद्धा इतिहासाबद्दल फारसे चांगले मत नव्हते. त्याल असे वाटत असे की इतिहासकाराने मृत घटनावर लादलेली आपली स्वत:ची मते म्हणजे इतिहास होय. अशा रीतीने इतिहास किंवा इतिहासाचे तत्वज्ञान यांना अतिशय कमी प्रतीचे लेखले जात असताना व्हिको हा पहिला तत्वज्ञ की, ज्याने इतिहासाचा तात्विक बैठक देऊन मान्यवर दर्जा प्राप्त करून दिला. नेबूर व रँके यांनी ऐतिहासिक घटनांना तात्विक अधिष्ठान देऊन इतिहासाचा दर्जा उंचावला.

रुसो, कार्लईल, हेगेल, कॉम्त, मिल, मार्क्स, बकाल यासारख्या भिन्न भिन्न विचारसरणीच्या विचारवंतांनी इतिहासाचा अभ्यास करून असे सामान्यीकरण करता येते. हेगेलने टीकात्मक तत्वज्ञानाच्या शाखेला श्रेष्ठ दर्जा प्राप्त करून दिला व निसर्ग आणि इतिहास यातील फरक चांगल्या पद्धतीने दाखवून दिला. विलहेम डिलधी (Wilhelm Dilthey) ने इतिहासाच्या तत्वज्ञानाला श्रेष्ठ दर्जा प्राप्त करून दिला. कांटचे तत्वज्ञानाच्या क्षेत्रात जे स्थान आहे तेच स्थान डिलधीचे इतिहासाच्या तत्वज्ञानाच्या क्षेत्रात आहे. टीकात्मक तत्वज्ञानाला ऐतिहसिक घटनांचे स्पष्टीकरण, ऐतिहासिक घटनेमधील व्यक्तीचे स्थान व ऐतिहासिक वस्तूनिष्ठता या तीन समस्यांना तोंड द्यावे लागते.

**आपली प्रगती तपासा**

१. टीकात्मक तत्त्वज्ञानाविषयी माहिती द्या.

**१. चिंतनात्मक तत्वज्ञान (Speculative Philosophy)**

चिंतनात्मक तत्वज्ञान प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी राज्य शासनाबद्दल वेगवेगळे विचार मांडून चिंतनाला सुरुवात केली. मध्ययुगात धर्मगुरूंनी ऐतिहासिक प्रक्रियेचा विचार केला व त्याला धार्मिक दृष्टीकोनातून महत्व देण्याचा प्रयत्न केला. आधुनिक काळात कॉडरसेट सारख्या तत्ववेत्यांनी ऐतिहासिक प्रक्रियेकडे शास्त्रीय दृष्टीकोनातून पाहण्यास सुरुवात केली. मानवी जीवन म्हणजे प्रगती आहे व त्या दृष्टीनेच जीवनातील घटनांकडे पहिले पाहिजे. असा विचारत त्याने मांडला. हर्डरने संपूर्ण मानव जात एकाच आहे. अशा दृष्टीकोनातून ऐतिहासिक घटनाकडे पहिले पाहिजे असा विचार त्याने मानाडला. कांटने विश्वात्मक इतिहासाची (Universal History) कल्पना मांडली.

चिंतनात्मक तत्त्वज्ञान हे कोणत्याही प्रकारचे सिद्धांत मांडत नाही, तर ते फक्त ऐतिहासिक घटनांच्याकडे चिंतनात्मक दृष्टिकोणातून पाहावयास शिकवितात.

आता आपण वरील दोन्ही शाखांमधील काही तत्त्ववेत्त्यांचे विचार पाहू.

प्रो. विल्यम ड्रे (William Dray) आपल्या 'Philosophy of History' या ग्रंथात म्हणतात की, "कोणत्याही इतिहासाचे तत्त्वज्ञान त्यामधील टीकात्मक तत्त्वज्ञान व चिंतनात्मक तत्त्वज्ञान यांच्या तुलनेने सुरू झाले पाहिजे. इतिहासकाराने घटनाक्रमाचा अभ्यास करीत असताना सत्य शोधले पाहिजे व असे सत्य शोधत असताना चौकशी (Inquiry) करण्याची प्रवृत्ती दाखविली पाहिजे. ज्यावेळेला एखाद्या घटनेसंबंधी विशिष्ट दृष्टिकोण समोर ठेवून कारणपरंपरा शोधली जाते तेव्हा इतिहासाचे तत्त्वज्ञान तयार होते."

इतिहासाचे तत्वज्ञान हा शब्दप्रयोग अठराव्या शतकातील फ्रेंच तत्ववेत्ता व्हॉल्टेअर याने प्रथमतः केला. त्यावेळी ऐतिहासिक घटनांचा चिकित्सक अभ्यास व त्याबाबतचे इतिहासकाराने मांडलेले मत, एवढाच त्या शब्दप्रयोगाचा त्याला अभिप्रेत असलेला अर्थ होता, असे कोलिंगवूड ह्या ब्रिटीश तज्ज्ञांचे मत आहे. अठरावे शतक हे प्रबुद्ध (Enlightnment) शतक मानले जाते. त्या अवधीत व त्यानंतर झालेल्या बौद्धिक, वैज्ञानिक विकासाबरोबर मानवी जीवनाकडे पाहण्याचे भिन्न दृष्टीकोन प्रचलित होऊ लागले. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र अशा मानवी जीवनाची संलग्न असलेल्या ज्ञानशाखा स्वतंत्रपणे विकसित झाला. त्या क्षेत्रात मांडल्या जाऊ लागलेल्या नव्यानव्या प्रमेयांचा व कार्यपद्धतींचा प्रभाव इतिहासाच्या अध्ययनावर पडू लागला. यामुळे भिन्न वैचारिक भूमिकांतून ऐतिहासिक सत्यशोधनाचे, इतिहासाचा भिन्न भूमिकातून अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न विचारवंत करू लागले. इतिहासाच्या स्वरूपाबाबत नवेनवे सिद्धांत मांडले जाऊ लागले. या प्रक्रियेतून इतिहासाचे तत्वज्ञान फुलात गेले. विकसित होत गेले. त्यातूनच वाद – प्रतिवाद निर्माण झाले व इतिहासाच्या तत्वज्ञानाची कथा व्यापक होत गेली.

अठराव्या शतकापासून इतिहासविषयक तत्वज्ञानाचा धावता आढावा घेतल्यास काही पाश्चात्य विचारवंतांची नवे विशेष लक्षणीय ठरत. अठराव्या शतकापर्यंत इतिहासाची गणना साहित्याच्या क्षेत्रात होत असे. बुद्धीनिष्ठेच्या युगाचा प्रारंभ झाल्यानंतर नीबूर, रांके, हेगेल, स्पेंगलर, कार्लाईल, क्रोसे, कालिंगवूड, टॉयन्बी, कार, बरी, ट्रिव्हेलीयन, फिशर अशा अनेकांनी आपआपल्या दृष्टीकोनातून इतिहासाबाबत भिन्न प्रमेये मंडळी. इतिहासलेखनाची प्रक्रिया ही शास्त्रीय आहे असे ठासून प्रतिपादन करीत, इतिहास ही साहित्याची शाखा आहे ह्या तत्कालीन भुमिकेविरुद्ध निबुर व रांके यांनी प्रखर प्रतिक्रिया व्यक्त केली व इतिहासलेखनाला शास्त्रीय अधिष्ठान देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. रांकेने ऐतिहासिक साधनांच्या परीक्षणाची शास्त्रीय पद्धत विकसित करून ऐतिहासिक साधनांच्या विश्वसनीयतेचे महत्व अधोरेखित केले; त्यातून वस्तुनिष्ठ प्रत्यक्षवादी इतिहासाचा सिद्धांत उदयाला आला. ह्या सिद्धांताचा अतिरेक झाल्यास इतिहासलेखनाला केवळ छायाचित्राचे रूप येते. कल्पनेला त्यात स्थान न राहिल्यास इतिहासातील रोचकता नष्ट होते. इतिहासाचा आत्मा दडपला जातो अशी भूमिका प्रत्यक्षवादी इतिहासाच्या विरोधकांनी घेतली आणि विश्वासार्ह ऐतिहासिक घटीतांची मांडणी कल्पनेच्या सहाय्यानेच करण्यावर भर दिला. कार्लाईलचा फ्रेंच राज्यक्रांतीवरील ग्रंथ या भूमिकेचे उत्तम उदाहरण आहे. रांकेच्या वस्तुनिष्ठ इतिहासलेखनाला लॉर्ड ॲक्टन ह्या ब्रिटीश विचारवंताने छेद दिला आणि इतिहासलेखनाने वितिहासिक घटनांचे व व्यक्तींच्या कार्याचे मूल्यांच्या आधारे मूल्यमापन करणे आवश्यक आहे असे मत मांडले.

मानवी जीवनातील स्थित्यंतरामागे काही शक्ती असते का, याचा विचार इतिहासाच्या काही प्रगाढ अभ्यासकांनी केला. इतिहासात सामान्य माणसाला स्थान नाही. त्याला स्वतंत्र इच्छाशक्तीची चालना नसते, सामान्य माणसे मेंढरांच्या कळपासारखी असतात, त्यांना क्रियाशील बनवायला लोकोत्तर नेत्याची गरज असते, असे प्रतिपादन करून कार्लाईल इतिहास म्हणजे लोकोत्तर व्यक्तींची चरित्रे असे प्रमेय मांडले; जर्मन तत्वज्ञ हेगेल याने एक चित्शक्ती विश्वाचे संचालन असते आणि मानवी जीवनातील घडामोडी म्हणजे ह्या चित्शक्तीचाच आत्मविश्वास आहे. असे भाष्य केले; तर हेगेलने प्रतिपादित केलेल्या चित्शक्तीच्या आत्मविष्काराचा सिद्धांत नाकारून परंतु त्याच्या द्वंद्वात्मक विकासाच्या सिद्धांताचा वापर मानवी समाजाच्या वाटचालीकडे विश्लेषण करण्यासाठी करून कार्ल मार्क्स व एंजल्स यांनी सर्व मानवी व्यवहारांची घडण आर्थिक व्यवहार निर्धारित करतात असे ठाम मत मांडून आर्थिक हेतूमुलकतेचा सिद्धांत प्रतिपादित केला.

स्पेंगलर व टॉयन्बी यांनी एखाद्या मोठ्या ऐतिहासिक घटनेचा अगर देशाच्या इतिहासाचा नव्हे तर मानवी संस्कृतींचा अभ्यास केला. त्यात त्यांना चक्राकार गतीचे सत्र आढळले. निसर्गातील ऋतूचक्राप्रमाणे मानवी संस्कृतीची गतीही चक्राकार प्रतिपादित चित्शक्तीच्या आत्मविश्वासाचा सिद्धांत नाकारून परंतु त्यांच्या द्वंद्वात्मक विकासाच्या सिद्धांताचा वापर मानवी समाजाच्या वाटचालीचे विश्लेषण करण्यासाठी करून कार्ल मार्क्स व एंजल्स यांनी सर्व मानवी व्यवहारांची घडण आर्थिक व्यवहार निर्धारित करतात असे ठाम मत मांडून आर्थिक हेतुमूलकतेचा सिद्धांत प्रतिपादित केला. स्पेंगलर व टॉयन्बी यांनी एखाद्या मोठ्या ऐतिहासिक घटनेचा अगर देशाच्या इतिहासाचा नव्हे तर मानवी संस्कृतीचा अभ्यास केला. त्यात त्यांना चक्राकार गतीचे सूत्र आढळले. निसर्गातील ऋतूचक्राप्रमाणे मानवी संस्कृतीची गतीही चक्राकार असते, असा सिद्धांत त्यांनी मांडला. तर हेगेल व लॉर्ड ॲक्टन यांना मानवाचा विकास एका सरळ रेषेत होतो असे सूत्र गवसले.

इतिहासाच्या घटितासंबंधी व ऐतिहासिक सत्यासंबंधी देखील अशीच भिन्न प्रमेये इतिहासाच्या तज्ज्ञांनी मांडलेली आढळतात. ऐतिहासिक सामुग्रीच्या सत्यासत्यतेचे परिक्षण केल्यानंतर ऐतिहासिक घटितांच्या आधारे लिहिलेल्या इतिहासात शंभर टक्के वस्तुनिष्ठ असते. ह्या प्रत्यक्षवाद्यांच्या गृहीतकृत्याला इ. एच. कार यांनी छेद दिला. घटिते स्वत: बोलत माहित. त्यांचा बोलविता धनी इतिहासकार असतो, त्यामुळे इतिहासकाराच्या विचारप्रणालीचे, व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब त्यात पडणे अपरिहार्य असते, असा युक्तिवाद करून वस्तूनिष्ठतेच्या सिद्धांताला आव्हान दिले. तसेच ऐतिहासिक सत्य हे शंभर टक्के सत्य नसते तर इतिहासकाराला जे आणि जेवढे सत्य आढळते त्या आधारेच तो लिहितो असही विचार त्यांनी आग्रहाने प्रतिपादित करतो.

ऐतिहासिक घटितांची मांडणी करताना, त्याचे स्पष्टीकरण देताना मध्ययुगीन इतिहासलेखकांनी घटितांचे ईश्वरनिष्ठ भाष्य केले. माणूस परमेश्वराच्या हातातील बाहुले असून मानवी जीवनातील सर्व घटना ईश्वरी इच्छेनुरूप घडत असतात. असा अन्वयार्थ लावला, तर अठराव्या शतकापासून साधारणपणे माणसाला कृतीस्वातंत्र्य असल्याचे मत मांडले गेले. कार्लाईलच्या युगपुरुषाच्या सिद्धांताला अनेकांनी आव्हान दिले आणि माणूस कितीही लोकोत्तर असला, तरी तो परिस्थितीच्या मुशीतूनच घडत असतो असे म्हणून काहींनी इतिहासात परिस्थितीला अग्रक्रम दिला. तसेच केवळ भूतकाळाशी निगडीत नसून

सर्व इतिहास समकालीन असतो, वर्तमानकाळ व भूतकाळात अखंड चालणारा संवाद म्हणजे इतिहास असा नवा सिद्धांत क्रोसे व कोलिंगवूड यांनी मांडला. आजवरचा इतिहास हा अभिजनांचा, अभिजनांनी लिहिलेला इतिहास आहे, त्यात सामन्यांचा कर्तुत्वाचा आलेख सापडत नाही. असा आरोप करून अलीकडच्या काही इतिहासकारांनी अभिजनांच्या इतिहासविषयक दृष्टीकोनाविरुद्ध रणशिंग फुंकले आणि वंचित वर्गाच्या इतिहासावर लक्ष केंद्रित केले. ऐतिहासिक घडामोडींमध्ये एक विशिष्ट लय, विशिष्ट योजना आढळते ह्या टॉयन्बी सारख्यांच्या मताचे एच. ए. एल. फिशर यांनी खंडन केले, व आपल्याला ऐतिहासिक घटितात कोठेच ठराविक लय अगर योजना आढळली नसून प्रत्येक घटना ही अपूर्व असते, पूर्वी घडलेल्या घटनांहून भिन्न असते आणि म्हणून त्या आधारे सर्वसामान्य सिद्धांत काढणे चुकीचे ठरेल, असे ठाम मत त्यांनी मांडलेले आढळते.

इतिहासाच्या स्वरूपाबाबत अतिशय महत्वाचा सिद्धांत १९०३ साली ब्रिटीश इतिहासकर प्रा. जे.बी. बरी यांनी मांडून इतिहासाच्या विश्वात मोठीच खळबळ माजविली. अठराव्या शतकापासून इतिहासाला शास्त्रीय ज्ञानशाखांच्या नजिक नेऊन बसविण्याचा प्रयत्न काही इतिहासकार करीत होते. बरींनी त्यापुढची पायरी गाठली आणि इतिहास हे केवळ शास्त्रच अक्हे. असे ठाम मत मांडले, तर त्याचे खंडन करून इतिहास हे शास्त्र तसेच कलाही आहे, असे प्रमेय जी. एम. ट्रीव्हेलीयन यांनी मांडले.

व्हिकोने इतिहासाचा vico चक्रीय सिद्धांत मांडला. (Cyclical Theory of History) यानुसार राष्ट्र विशिष्ट अवस्थातून विकासाच्या मार्गाला जातात. व्हिकोने सुसंस्कृत जगाची विचारपूर्ण रचना निवेदित केली. व्हिकोने केवळ कागदोपत्रांच्या इतिहासाला महत्त्व न देता सांस्कृतिक संस्थांना विकासात महत्व दिले. त्याच्या मते आजचा नागरी समाज माणसाने निर्माण केला व म्हणून त्याची मूळतत्त्वेही आपल्या मानवी मनाच्या सुधारणेतच सांपडतात. म्हणून इतिहास हा काही वेगळ्या कल्पनेचा विस्तार नव्हे. तर प्रसंग, घटना आणि मानव यांच्या परस्पर अपरिहार्य संबंधाचा तो पीरपाक आहे. त्याने पूर्ण ऐतिहासिक पद्धती व मानवी समाजशास्त्र यांचे अनुकरण केले. माणसे जे प्रत्यक्ष जीवन जगतात त्याचे शास्त्रीय विश्लेषण व्हिकोने केले. धर्म व विचारशीलता यावर भर देणाऱ्या प्रचलित दृष्टिकोनापेक्षा व्हिकोचा इतिहासविषयक दृष्टिकोन वेगळा होता. पण व्हिको धार्मिक माणूस असल्याने त्याने देवाचा (Providence) घटक ऐतिहासिक जगाच्या घडणीत आणला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. चिंतनात्मक तत्त्वज्ञानाविषयी माहिती द्या.

## १.४ सारांश

अठराव्या शतकापासून आजपावेतो इतिहासाच्या व्यासंगी अभ्यासकांनी इतिहासाबाबत नानाविध सिद्धांत मांडले. ते सर्व इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचाच भाग आहेत. एकूण इतिहासाबाबतचे मूलभूत विचार म्हणजे इतिहासाचे तत्त्वज्ञान होय. इतिहासाच्या क्षेत्रातील विचारवंतांनी आपआपल्या वैचारिक धारणानुसार इतिहासाचे स्वरूप, इतिहासाची सामुग्री, इतिहासलेखनाची प्रक्रिया, इतिहासाची मांडणी इत्यादी इतिहास क्षेत्रातील विभिन्न अंगभूत घटकांविषयी अभिव्यक्त केलेले मूलगामी विचार म्हणजे इतिहासाचे तत्त्वज्ञान होय.

## १.५. प्रश्न

१) इतिहासाचे तत्वज्ञान म्हणजे काय?

२) इतिहासाच्या तत्वज्ञानाच्या विविध व्याख्या स्पष्ट करा.

३) तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या पद्धतीची माहिती द्या.

४) इतिहासाच्या तत्वज्ञानाच्या समर्पकतेचे वर्णन करा.

## १.६ संदर्भ


१) गायकवाड आर. डी., सरदेसाई बी.म., इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.

२) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३) शेख गफूर, इतिहास लेखनशास्त्र, प्रितम पब्लिकेशन्स, जळगाव, २००७.

४) गाठाळ एस.एस., इतिहासाचे तत्त्वज्ञान, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५.

५) कोठेकर शांता, इतिहास: तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

६) सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्वज्ञान, प्रज्ञा पाठशाला मंडळ, वाई, १९६०

७) वा. सी. बेंद्रे, साधनचिकित्सा, १९७६

८) ग. ह. खरे, संशोधकाचा मित्र

९) कोमेजर अनु कृ. ना. वळसंगकर, इतिहास स्वरूप व अभ्यास, १९६९.

१०) वी. का. राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना, १९२८.

११) ई. एच. कार. अनुवादक प्रा.वि.गो. लेले, इतिहास म्हणजे काय ?, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१२) डॉ. गोविंदचंद्र पांडे, इतिहास : स्वरूप एवं सिद्धांत राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९८.

१३) डी. डी. कोसांबी, पुराणकथा व वास्तवता.

१४) द. वि. केतकर, इतिहासातील अंतःप्रवाह.

१५) ग. ह. खरे, साधना चिकित्सा ,लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७६.

१६) वि. द. घाटे, इतिहासशास्त्र आणि कला, देशमुख प्रकाशन, पुणे.

१७) प्रभाकर देव, इतिहास : एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड


❖❖❖❖

# २

# प्राचीन भारतातील इतिहासाचे तत्वज्ञान

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ इतिहास ग्रंथांचा अभाव

२.३ प्राचीन भारतीयांना ऐतिहासिक दृष्टी होती काय?

२.४ प्राचीन भारतीय इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये

२.५ सारांश

२.६ प्रश्न

२.७ संदर्भ

## २ .० उद्दिष्टे

- प्राचीन भारतातील इतिहासाचे तत्वज्ञान समजून घेतील.
- प्राचीन भारतात इतिहास ग्रंथांचा अभाव होता याविषयी आपले मत व्यक्त करतील.
- वैदिक साहित्य, पुराणग्रंथ व महाकाव्य यांचे महत्त्व विशद करतील.
- बुद्ध व जैन लेखन, ऐतिहासिक नाटके, ऐतिहासिक काव्ये व शास्त्रीय ग्रंथ यातील प्राचीन भारतीयांचे ज्ञान समजेल.
- प्राचीन भारतीयांच्या राजनीतीवरील ग्रंथांची माहिती होईल .
- परकीय लेखक व चिनी प्रवाशांच्या प्राचीन भारतीय इतिहासासंबंधीच्या नोंदी याविषयी ज्ञान होईल.
- प्राचीन भारतीयांच्या राजनीतीवरील ग्रंथांची माहिती होईल .
- कल्हणच्या राजतरंगिणीचे महत्त्व विशद करतील.

## २ .१ प्रस्तावना

पाश्चिमात्य जगात ज्या कालावधीत ग्रीक व रोमन संस्कृती पल्लवित झाल्या, त्यापूर्वी अनेक वर्षे आशिया खंडात दोन संस्कृती उदयाला आल्या व विकसित झाल्या. त्यापैकी पहिली चिनी संस्कृती आणि दुसरी भारतीय संस्कृती ह्या होत. भारतीय संस्कृतीचा फुलोरा नानाविध क्षेत्रात आविष्कृत झाला. तत्त्वज्ञान, धर्म, कला, गणित आयुर्विज्ञान, निसर्गविज्ञान

अशा भिन्न ज्ञानशाखांत प्रज्ञावंतांनी मूलगामी लिखाण करून मोलाचे योगदान केले. ह्याची परकीय प्राच्यविद्या विशारदांनी देखील मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. आजही योगसाधने सारख्या विषयावरील प्राचीन भारतीय लेखनाचा वापर आधुनिक पाश्चात्य शास्त्रज्ञ अवकाश संशोधन क्षेत्रात करीत आहेत. भारताच्या प्राचीन ग्रंथांचे अध्ययन करण्यासाठी जर्मनी व रशियासारख्या देशांत स्वतंत्र अध्ययन विभाग स्थापन झालेले आहेत. मात्र चमत्कारिक स्थिती अशी की अनेक गहन विषयावर ज्या भारतीयांनी अभिजात वाङ्मयाची निर्मिती केली, मानवी जीवनाच्या भिन्न पैलूंचा सखोल व प्रगाढ व्यासंग दर्शविणारे दर्जेदार ग्रंथ निर्माण केले, त्या भारतीयांनी ज्याला खऱ्या अर्थाने इतिहास म्हणता येईल असा एकही ग्रंथ निर्माण केल्याचे आढळून येत नाही. यथार्थ रूपाने इतिहास म्हणता येईल असा एकही ग्रंथ उपलब्ध नसावा ही बाब निश्चितच आश्चर्यजनक व संभ्रमात टाकणारी आहे. गोंधळात टाकणाऱ्या ह्या परिस्थितीमुळे प्राचीन भारतीय प्रज्ञेबाबत काहींनी प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत, तर काहींनी हे गूढ आपआपल्या परीने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

प्राचीन काळात ग्रीस, रोम या देशांत ज्याप्रमाणे शास्त्रशुद्ध इतिहासलेखनाचे प्रयत्न झाले तसे प्रयत्न प्राचीन काळात भारतात झाले नाहीत. प्राचीन भारतीय विचार, तत्वज्ञान याची प्रगल्भता व व्याप्ती ही आश्चर्यकारक करणारी असली तरी पाश्चात्त्यांच्या पद्धतीचे इतिहासलेखन प्राचीन काळी भारतात झाले नाही. इतिहास म्हणजे क्रमवार कालबद्ध अशी इतिहासाची मांडणी हे सूत्र आपण मान्य केले तर क्रमवार कालबद्ध अशी घटनांची मांडणी करणारा एकही ग्रंथ प्राचीन काळी भारतात लिहिला गेला नाही.

## २.२ इतिहास ग्रंथांचा अभाव

आधुनिक काळातील भारतीय राष्ट्रवादाचे प्रणेते सुरेंद्रनाथ बॅनर्जी प्राचीन भारतात इतिहासलेखन झाले नाही यावर विश्वास ठेवीत नाहीत. ज्या भारतीयांनी गहन विषयावर लिखाण केले ते इतिहास ग्रंथ लिहू शकले नाहीत असे मानणे अन्यायकारक होईल; असे लिखाण योग्यरीत्या जतन करण्याचे प्रयत्न झाले नसावेत अथवा काळांच्या प्रवाहात आक्रमणे, नैसर्गिक आपत्ती इत्यादींमुळे ते नष्ट झाले असावे असे त्यांचे मत आहे. या बाबत असाही एक युक्तिवाद केला जातो की भारतीयांची प्रवृत्ती मूलतः आध्यात्मिक विषयात व पारलौकिक जीवनाच्या विचारात रममाण होणारी असल्यामुळे मानवाच्या लौकिक जीवनाच्या वर्णनात त्यांना रुची नव्हती आणि म्हणून व्यवहारी जीवनातील युद्ध, शेती, व्यापार अशा लौकिक बाबींच्या नोंदी करण्यात त्यांना रस नव्हता. तिसरे स्पष्टीकरण असे दिलेले आढळते की धर्मप्रसार किंवा साम्राज्यविस्तारासाठी झालेल्या संघर्षांनी प्राचीन ग्रीक व रोमन इतिहासलेखनाला प्रेरणा दिली; तसे भारतात न घडल्यामुळे प्रेरक विषयांच्या अभावी इतिहासलेखनाकडे भारतीय वळले नाहीत. याबाबतच्या कारणमीमांसेतील आणखी एक मुद्दा असा की भारतीय मुळात आत्मसंतुष्ट होते, बाहेरच्या जगात काय चालले आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा त्यांच्यात नव्हती, त्यामुळे बाहेरच्या जगाशी वैचारिक आदानप्रदान न झाल्यामुळे भारतीयांच्या आत्मसंतुष्टतेला हादरे बसले नाहीत, आत्मसंतुष्टतेच्या कोषातून ते बाहेर पडले नाहीत व त्यामुळे इतिहासलेखनाला स्फूर्ती मिळाली नाही. काही इतिहास समीक्षकांनी यासंबंधी वेगळा युक्तिवाद केला आहे. ते म्हणतात की पाश्चात्य जगाने आधुनिक काळात जी इतिहासाची व्याख्या केली आहे तीच प्रमाण मानून प्राचीन भारतीय लिखाणाचे मूल्यमापन करणे गैर आहे. ऐतिहासिक नोंदी

करण्याची तत्कालीन पद्धत आजच्या पद्धतीहून भिन्न असावी, यामुळे प्राचीन भारतीय लिखाणात ऐतिहासिक माहिती वेगळ्या पद्धतीने मांडली गेली. भारतीय इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी प्राचीन भारतीयांत पांडित्य होते, मौलिक विद्वत्ता होती, परंतु ऐतिहासिक दृष्टीचा अभाव होता; गतकालीन घटनांची लेखी नोंद पुढील पिढ्यांसाठी करून ठेवणे त्यांना आवश्यक वाटले नाही, अशा गतकालीन घटनांच्या स्मृती मौखिक परंपरेने कायम टिकविण्यात आल्या; इतिहासलेखनशास्त्र भारतातील हिंदूलिखाणात एकोणिसाव्या शतकापर्यंत अस्तित्वात असलेले आढळून येत नाही अशी त्यांनी ठाम विधाने केलेली आढळतात.

'कालगणनाशास्त्र हा इतिहासशास्त्राचा एक नेत्र आहे', हे विधान मान्य केल्यास प्राचीन भारतीय इतिहास नेत्रहीन होता असे म्हणावे लागेल, असे मत History of the Tamils ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पी. टी. श्रीनिवास अय्यंगार यांनी व्यक्त केलेले दिसते. एकूण, 'स्थळ व काळाच्या चौकटीत केलेले गतकालीन वास्तव घटनांचे कथन म्हणजे इतिहास ह्या इतिहासाच्या स्थूल व्याख्येच्या निकषावर उतरतील असे ग्रंथ प्राचीन भारतातील लिखाणात क्वचितच आढळतात, हे सत्य नाकारता येत नाही.

याच बरोबर, इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरेल अशी विपुल ऐतिहासिक सामुग्री प्राचीन भारतीय लिखित साहित्यात उपलब्ध आहे, याबद्दल दुमत नाही. प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ व्होल्टेअर याने, 'केवळ राजकीय घटनांचे वर्णन करणे हे इतिहासाचे उद्दिष्ट नाही, तर मानवाची जीवनपद्धती, मानवी समाजाच्या चालीरीती, परंपरा, संस्कृती यांचे यथातथ्य दर्शन घडविणे हे इतिहासाचे उद्दिष्ट असावे, असे मत व्यक्त केले आहे. ह्या संदर्भात प्राचीन भारतीय वाङ्मयाचा आढावा घेतल्यास, त्यात काळ व स्थळांचे स्पष्ट व निर्णायक निर्देश नसल्यामुळे, गतकालीन घटनांची कालक्रमानुसार मांडणी शक्य होत नाही, मात्र सामाजिक इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरेल अशी विपूल सामुग्री प्राचीन ग्रंथातून हाती येते, असे मत डॉ. मुजुमदार यांनी मांडलेले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. प्राचीन भारतात  इतिहास ग्रंथांचा अभाव होता याविषयी आपले मत लिहा.

## २.२ प्राचीन भारतीयांना ऐतिहासिक दृष्टी होती काय?

प्राचीन भारतीयांना ऐतिहासिक दृष्टीच नव्हती म्हणून शास्त्रशुद्ध स्वरूपाचे इतिहासलेखन त्यांच्याकडून झाले नाही असे मत मांडले जाते. डॉ. आर. सी. मुजुमदार म्हणतात, "हिरोडोटस किंवा थ्युसिडाजसारखा इतिहासकार प्राचीन काळात भारतात न आल्याने प्राचीन भारताचा इतिहास हा अंधकारमय आहे. अर्थात, प्राचीन भारताचा इतिहास अंधकारमय आहे." हे विधान मान्य करता येत नाही. प्राचीन काळात वैदिक वाङ्मय महाकाव्ये, पुराणग्रंथ, कथा, कादंबऱ्या, नाटके, दंतकथा, चरित्रग्रंथ, स्थानमहात्म्य पोथ्या इ. प्रकारचे लेखन विपुल प्रमाणात झाले आहे. हे लेखन शास्त्रशुद्ध स्वरूपाचे नसले तरी त्यांतून भारतीय इतिहासाचे प्रतिबिंब उमटले आहे. कधी वाङ्मयातून, कधी काव्यातून तर कधी कलात्मक अभिव्यक्तीमधून इतिहास प्रतिबिंबित झाला आहे. बी. शेख अली History: Its Theory & Method या ग्रंथात म्हणतो, "प्राचीन भारतीयांनी इतिहासाचा इमला

उभारला नाही हे खरे आहे; पण त्यांनी डोंगरकपारी खोदल्या, दगड जमवले, त्यांना आकार दिला; ते कोरले. इमला बांधण्याची योजना तयार केली, पण तो इमला (Mansions) पूर्ण करण्याच्या दृष्टीने मात्र त्यांनी वाटचाल केली नाही.

"प्राचीन भारतीयांच्या इतिहासलेखनाची अवस्था वरील वाक्यात यथार्थपणे स्पष्ट झाली आहे." प्रो. नीलकंठशास्त्री यांच्या मते, "वाङ्मय हा इतिहासाचा कणा आहे. प्राचीन काळी भारतात भरपूर वाङ्मय लिहिले गेले. इतिहासरूपी इमारतीचा पायाच या वाङ्मयाने घातला होता. प्राचीन भारतीय वाङ्मयातून तत्कालीन इतिहासाचे अप्रतिम प्रतिबिंब उमटले आहे.

### १) वैदिक साहित्य

वैदिक साहित्यात प्रामुख्याने ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद हे चार वेद व ब्राह्मणग्रंथ, अरण्यके, उपनिषदे, वेदांगे इत्यादींचा समावेश होतो. वेद हे भारतीय संस्कृती व धर्माचे मूलाधार आहेत. आर्याच्या प्रारंभीच्या काळातील राजकीय इतिहास व राजकीय संस्था, युद्धे यांची माहिती आपणास वैदिक साहित्यावरून होते. भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता, समाजजीवन, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान इ. गोष्टींचा अभ्यास हा प्रामुख्याने ब्राह्मणग्रंथाच्या आधारे केला जातो. उत्तर वैदिक काळातील समाजजीवन, सामाजिक संस्था, धार्मिक संस्था इ. चा अभ्यास हा ब्राह्मणग्रंथांच्या साहाय्याने केला जातो. उपनिषदे, षड्दर्शनेही आर्याच्या सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक जीवनाची माहिती देतात.आर्यांनी तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयात केलेल्या प्रगतीची माहिती देतात.

### २) पुराणग्रंथ

भारताची भौगोलिक स्थिती, राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवन इ. च्या अभ्यासाचा आधार म्हणजे पुराणग्रंथ होत. पुराणांची संख्या १८ आहे. त्यापैकी ब्रह्म, वायू, विष्णू, भागवत, मत्स्य, स्कंद, गरुड, वराह ही पुराणे ऐतिहासिक व धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्वाची आहेत. पुराणांतील काही भाग काल्पनिक असला तरी पुराणांच्या सखोल अभ्यासाअंती त्यातील ऐतिहासिक सत्य शोधून काढता येते. नंद, मौर्य, शुंग, कण्व, सातवाहन या राजवंशांची बरीच माहिती पुराणावरून मिळते. तसेच हिंदू देवदेवता, सृष्टीची उत्पत्ती, देव-दानव, कृषी, राजे, रूढी-परंपरा, वर्णसंस्था, जातीसंस्था, सण, उत्सव, मोक्ष, विधवांचा आचारधर्म, संस्कार, विवाहपद्धती इ. बाबतच्या अभ्यासासाठी पुराणग्रंथ ही इतिहासाच्या अभ्यासाची साधनेच आहेत.

### ३) महाकाव्ये

रामायण हे महाकाव्य वाल्मीकीने लिहिले तर व्यासाने 'महाभारत' लिहिले. रामायणात २४००० श्लोक आहेत. महाकाव्ये प्रत्यक्षात घडली की नाही असा एक वाद आहे. काही पाश्चात्त्य विद्वानांनी महाकाव्ये काल्पनिक असल्याचे मत मांडले होते व महाकाव्यातील काही काल्पनिक घटना, गोष्टींची उदाहरणेही दिली होती. डॉ. आर. सी. मुजुमदार म्हणतात, "Ramayan repressents the expansion of Aryan culture over the Deccan and south." महाभारत हा कुरू-पांचाळांचा प्राचीन इतिहासच आहे. महाकाव्यातील सर्व व्यक्तिरेखा या समाजापुढे आदर्श म्हणून ठेवलेल्या आहेत. महाकाव्यावरून इ. स. पू. ४ थे शतक ते इ. स. चे ४ थे शतक या ८०० वर्षांच्या काळातील आर्यांच्या राजकीय,

सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची आपणास माहिती मिळते. महाकाव्ये त्याकाळात रचली गेल्याने तत्कालीन राजकीय व समग्र सामाजिक जीवनाच्या अभ्यासासाठी नक्कीच उपयुक्त आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१. वैदिक साहित्य, पुराणग्रंथ व महाकाव्य यांचे महत्त्व विशद करा.

### ४) बौद्ध इतिहासलेखन

प्राचीन भारतीय इतिहासलेखनात बौद्ध इतिहासलेखन महत्त्वाचे आहे. त्रिपिटके-विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्मपिटक ही प्रामुख्याने बौद्ध भिक्खूंची दीनचर्या, बुद्धाची शिकवण व एकूण बौद्ध तत्त्वज्ञान व पंथभेद याच्याशी संबंधित आहेत. दिव्यावधान, मिलिंदपन्हा, बुद्धचरित, दीपवंश, महावंश, महावस्तू, जातककथा वगैरे ग्रंथ हे सर्व बौद्ध ग्रंथ धर्म, तत्त्वज्ञान, पंथभेद इ. ची माहिती देतात. पण या ग्रंथावरून तत्कालीन सामजिक, आर्थिक, राजकीय स्थितीची आपणास माहिती मिळते. सर्व बौद्ध साहित्य हे प्राचीन इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करण्यासाठी नक्कीच उपयुक्त आहे. इ.स.पू. ५ व्या शतकाच्या दरम्यान 'महापरिनिर्वाणसूत्र' हा बौद्ध ग्रंथ रचला गेला. तत्कालीन भारताच्या राजकीय परिस्थितीचे अत्यंत सविस्तर वर्णन या ग्रंथात आहे. या ग्रंथाचा लेखक मात्र अज्ञात आहे. अश्वघोषाने लिहिलेले 'बुद्धचरित' हे चरित्रांत्मक इतिहासाचा एक भाग आहे. चरित्रात्मक इतिहासलेखनाची परंपरा पुढे ८०० वर्षे कायम राहिली.

### ५) जैन इतिहासलेखन

जैन साहित्यात बारा अंगे, बारा उपांगे, दहा प्रकीर्ण, सहा छेद सूत्रे, नंदीसूत्र आणि मूलसूत्र महत्त्वाची आहेत. जैन भिक्खूंचे आचार-नियम, त्यांची जीवनपद्धती, उपदेश, महावीराचे जीवन व कार्य, शिकवणूक वगैरे सर्व माहिती या ग्रंथातून आली आहे. हेमचंद्रचा 'परिशिष्टपर्व' हा ग्रंथ, 'भद्रबाहुचरित्र' हा ग्रंथही अभ्यासाचे एक साधन आहे.

### ६) ऐतिहासिक नाटके

प्राचीन कालखंडात ऐतिहासिक नाटके मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. विशाखादत्त याचे 'मुद्राराक्षस' हे नाटक ऐतिहासिक प्रसंगावर आधारलेले आहे. चंद्रगुप्त मौर्याने आर्य चाणक्याच्या मदतीने नंद वंशातील शेवटचा राजा महापद्मनंद याचा खून करून मगधची गादी कशी बळकावली या घटनेवर हे नाटक आधारित आहे. 'देविचंद्रगुप्तम' या नाटकात रामगुप्त या गुप्तांच्या दुबळ्या, भित्र्या राजावर शक सम्राट रुद्रसिंह याने आक्रमण करून गुप्तांचे राज्य जिंकले तेव्हा त्याने ते राज्य परत देण्याच्या अटीवर रामगुप्ताची पत्नी ध्रुवदेवीची मागणी केली तेव्हा रामगुप्ताचा भाऊ चंद्रगुप्त दुसरा याने स्त्री वेश धारण करून रुद्रसिंहाच्या अंतःपुराणात प्रवेश केला व त्यास ठार मारले. हे नाटकही राजकीय घटनेवरच आधारित आहे व त्या नाटकाचा लेखकही विशाखादत्तच आहे. कवी कालिदास याचे 'मालविकाग्निमित्र' हे नाटक विदर्भ राजकन्या मालविका व शुंग राजा अग्निमित्र यांच्या प्रेमकथेवर अवलंबून आहे. 'विक्रमोर्यवंशीय नाटक उर्वसी व पुरुरवा यांच्या प्रेमकथांवर आधारलेले आहे. हे नाटकही कालिदासाने लिहिले आहे. कालिदासाचे आणखी एक नाटक

दुष्यंत व शकुंतला यांच्या प्रेमकथेवर आधारलेले आहे. भासाने एकूण १३ नाटके लिहिली. त्यापैकी स्वप्नवासवदत्ता, प्रतिज्ञायोगंधरायण, चारुदत्त ही विशेष महत्त्वाची आहेत. ही नाटके प्रेमकथेवर आधारित असली तरी त्यातून इतिहासाच्या खाणाखुणा स्पष्ट होतात. भवभूतीची 'महावीरचरित', 'मालतीमाधव', 'उत्तररामचरित' ही नाटकेही इतिहासाच्या खाणाखुणा स्पष्ट करतात. 'शुद्रक'चे 'चारुदत्त' हे नाटकही इतिहासाशी संबंधित आहे. सम्राट हर्षवर्धनने 'रत्नावली' 'नागानंद' व 'प्रियदर्शिका ही नाटके लिहिली होती.

### ७) ऐतिहासिक काव्ये

ऐतिहासिक नाटकांप्रमाणेच ऐतिहासिक काव्ये प्राचीन भारतीय इतिहासावर प्रकाश टाकतात. कवी कालिदासाने 'रघुवंश', 'कुमारसंभव' 'ऋतुसंहार', 'मेघदूत' ही जी महाकाव्ये लिहिली त्यातूनही राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब घडते. दण्डीचे 'दशकुमारचरित', माघ याचे 'शिशुपाल वध', प्रवरसेन या वाकाटक सम्राटाचे 'रावणहो' वगैरे काव्येही इतिहासाची किंवा समग्र जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या अंगाची माहिती देतात.

### ८) शास्त्रीय ग्रंथ

प्राचीन भारतात जे शास्त्रीय ग्रंथ लिहिले गेले तेही एका अर्थाने इतिहासाच्या पाऊलखुणाच आहेत. आर्यभट्टाचा 'आर्यभट्टीयम', वराहमिहिरचा ‘पंचसिद्धांतिका', वागभट्टाचा 'अष्टांगहृदय', बौद्ध पंडित नागार्जुनचा 'रसरत्नाकर' वराहमिहिरचा 'बृहत्संहिता' हा फलज्योतिषशास्त्रावरचा ग्रंथ हे काही प्रमुख ग्रंथ आहेत. सुश्रूताचा ‘सुश्रुतसंहिता' या ग्रंथात १ लक्ष श्लोक व १८० प्रकरणे आहेत व त्यात अनेक प्रकारच्या शस्त्रक्रिया सांगितल्या आहेत. 'अमरकोश' हा अमरसिंहाचा संस्कृत ग्रंथ, पाणिनीचा ‘अष्टाध्यायी' हे ग्रंथ भाषाशास्त्रावरील महत्त्वाचे ग्रंथ आहेत. वात्स्यायनाचा 'कामसूत्र' हा ग्रंथ कामशास्त्रावरील ग्रंथ आहे.

### आपली प्रगती तपासा

१. बुद्ध व जैन लेखन, ऐतिहासिक नाटके, ऐतिहासिक काव्ये व शास्त्रीय ग्रंथ यातील प्राचीन भारतीयांचे ज्ञान स्पष्ट करा.

### ९) प्राकृत वाङ्मय व संगम वाङ्मय

प्राकृत वाङ्मय प्रकारात प्रामुख्याने सातवाहन सम्राट हाल याने लिहिलेला 'गाथासप्तसई' हा ग्रंथ व गुप्ताची 'बृहत्कथा' या प्राकृत ग्रंथांचा उल्लेख करावा लागेल. बृहत्कथेवरूनच सोमदेवाने 'कथासारित्सागर', क्षेमेंद्रने 'बृहत्कथामंजिरी' व बुधस्वामीने 'बृहत्कथासंग्रह' हे ग्रंथ लिहिले. हे सर्व ग्रंथ तत्कालीन भारतातील रीतिरिवाज, समाजजीवन, धार्मिक जीवन इ. ची माहिती देतात. विष्णुशर्माचे 'पंचतंत्र' हा संस्कृत कथा वाङ्मयातील सर्वश्रेष्ठ कथासंग्रह आहे.

प्राचीन तामिळ वाङ्मय हे संगम वाङ्मय म्हणून प्रसिद्ध आहे. ‘संगम काल’ म्हणून तामिळ इतिहासात प्रसिद्ध असून तो तामिळ वाङ्मयाचे सुवर्णयुग मानला जातो. इ.स.पू. ५०० ते इ.स. ५०० हा १००० वर्षांचा काळ संगम साहित्याचा काळ मानला जातो. विविध, विपुल

व चिरंजीवी ग्रंथरचना या काळात झाली. या तामिळी वाङ्मयातून तत्कालीन तामिळ जीवनाचे उत्तम चित्रण आढळते. प्राचीन ग्रीक परंपरेशी नाते सांगणाऱ्या नोंदी संगम साहित्यात आहेत. तामिळ देशावरही त्या काळात आर्यसंस्कृतीचा प्रभाव किती होता हे त्यावरून स्पष्ट होते.

### १०) राजनीतीवरील ग्रंथ

### अ) अर्थशास्त्र:-

डॉ. रमेशचंद्र मुजुमदारांनी प्राचीन भारतातील एकच खरा इतिहास ग्रंथ म्हणून कल्हणाच्या राजतरंगिणीचा उल्लेख केला असला तरी अलीकडे इतिहास समीक्षक कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथही इतिहास ग्रंथ असल्याचे मत व्यक्त करू लागले आहेत. अर्थशास्त्र असे ग्रंथाचे शीर्षक असले व त्यावरून तो अर्थव्यवहारासंबंधी ग्रंथ असावा असे प्रथमदर्शनी वाटत असले, तरी त्यातील विषयाच्या मांडणीवरून व लिखाणाच्या कार्यपद्धतीवरून तो इतिहासग्रंथ ठरतो असे ठाम मत सदाशिव आठवले व्यक्त करतात. या ग्रंथात १५ भाग, १८० उपविभाग व एकूण ६००० श्लोक आहेत. कौटिल्य हा प्राचीन भारतातील पहिला राज्यशास्त्रज्ञ होय. त्यात अर्थशास्त्रापेक्षा राजा, मंत्रिपरिषद, न्यायव्यवस्था, हेरपद्धती, करपद्धती, राज्यसत्तेच्या निर्मितीचे सिद्धांत, राज्याच्या स्वरूपाचा सिद्धांत, परराष्ट्र संबंध इ. विषयांची तात्त्विक चर्चा आहे. मौर्यकाळातील समाज जीवनाच्या सर्व अंगांची लोकसंख्या, नागरिकांची जात, व्यवसाय, तरुण, वृद्ध, स्त्रिया, पुरुष, मुले यांची संख्या, घरे, जीवन पद्धती, खर्च उत्पन्न इत्यादींची माहिती पद्धतशीरपणे पाच ते दहा गावांच्या गटप्रमुखाकडून गोळा करून शासनाकडे पाठविण्याचे आदेश दिले गेले व अशा अहवालावरून हा ग्रंथ कौटिल्याने तयार केला. कौटिल्य हा राजा चंद्रगुप्त याचा गुरू व मार्गदर्शक असल्यामुळे त्याने ह्या ग्रंथात शब्दांकित केलेली माहिती निश्चितच अधिकृत वास्तव होती; इतिहासाची पद्धती व अर्थ चाणक्याला उलगडला असल्याचे त्याच्या लेखनावरून निःसंदिग्धपणे दिसते असे मत आठवले व्यक्त करतात. इतिहासाचे महत्त्व तो स्पष्ट करतो. इतिहास व पुराणातून राजाने अर्थशास्त्र शिकावे व इतिहास श्रवणासाठी राजाने वेळ काढावा असे तो म्हणतो. इतिहासाचे तत्त्वज्ञानही तो सांगतो. व्यक्ती, काळ व स्थळ यांचा परस्परांवर परिणाम होतो, सामाजिक स्थित्यंतराला दैवी शक्तीबरोबर मानवी शक्तीही कारक असतात, इतिहास अनेक कारणांनी घडतो, त्यापैकी जी प्रत्यक्ष दिसतात ती खरी कारणे मानावीत असे विश्लेषण तो करतो. इतिहासाबाबत असे जाणीवपूर्वक व वास्तव सत्याच्या आधारे लिखाण चाणक्याने केलेले असल्यामुळे तो अबुल फजलच्या ऐने अकबरी सारखाच इतिहासग्रंथ ठरतो असे ठाम मत आठवले मांडतात.

या ग्रंथात राजाने आपले मंत्री, अधिकारी कसे निवडावेत, त्यांचा प्रामाणिकपणा व स्वामीनिष्ठा यांची परीक्षा कशी घ्यावी, लष्कराची उभारणी, देशाचे अर्थनियोजन इ. ची तात्त्विक चर्चा कौटिल्याने केली आहे. या ग्रंथावरून मौर्य प्रशासन, सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्थिती इ. ची माहिती मिळते. विन्टरनिझ हा जर्मन विचारवंत म्हणतो, "Kautilya's Arthashastra is unique work on the subjects of administration, trade and commerce, war and peace in the whole range of Indian literature."

महाभारतातील शांतीपर्वातील राज्यधर्माचे स्वरूप, उपयुक्तता व अपरिहार्यता याबद्दलचे विवेचन यात आहे.

ब) **'ललितविस्तार'** या नावाच्या संस्कृत ग्रंथात तसेच बुद्धाच्या संवादातून सुमारे ३०० कथांद्वारे राज्यविचार व्यक्त करण्यात आले आहेत.

क) व्यासदास क्षेमेंद्र याने **'नीतीकल्पतरू'** ग्रंथाची रचना ११ व्या शतकात केली. या ग्रंथात १३८ विभाग असले तरी त्यातील फक्त १५-१६ विभागातच राज्य, राजा यासंबंधीची चर्चा आलेली आहे.

ड) **'कामंदकीय नीतिसार'** हा प्राचीन भारतीय राजनीतीवरचा एक महत्त्वाचा ग्रंथ असून त्याची रचना अंदाजे ५ व्या किंवा ६ व्या शतकात झाली असावी.

**इ) सोमदेवसुरीचा 'नीतिवाक्यामृतम्'** हा ग्रंथ जैन परंपरेतील राजनीतिविषयक कल्पना समजण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे; पण या ग्रंथावर वैदिक हिंदू स्मृतिग्रंथांचा तसेच महाभारतातील काही राजनीतिविषयक कल्पनांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. सोमदेवाने आपल्या ग्रंथाच्या पहिल्या सूत्रात धर्म, नीती, यश इ. मूलकारण असणाऱ्या राजाला नमन केले आहे. राजा विकृत मनोवृत्तीचा नसावा; त्याने शेती, पशुपालन याकडे लक्ष द्यावे, प्रजापालनाइतकीच आपल्या राज्याच्या अभ्युदयाची जबाबदारी त्याच्यावर आहे असे तो म्हणतो. या ग्रंथात राज्याची महत्त्वाची अंगे स्पष्ट करण्यात आली आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१. प्राचीन भारतीयांच्या राजनीतीवरील ग्रंथांची माहिती द्या .

**११) परकीय लेखक व चिनी प्रवाशांच्या प्राचीन भारतीय इतिहासासंबंधीच्या नोंदी (Accounts)** प्राचीन भारताचा इतिहास, भूगोल व संस्कृती यासंबंधी प्राचीन काळात काही परकीय लेखकांनी व चिनी प्रवाशांनीही नोंदी करून ठेवल्या आहेत.

**अ) ग्रीक इतिहासकार**

ग्रीक इतिहासकार हिरोडोटस, डायोडोरस, जस्टिन, एरियन, प्लुटार्क वगैरे इतिहासकारांनी ग्रीसचा इतिहास लिहिताना भारतीय इतिहासाचे काही महत्त्वपूर्ण संदर्भ दिले आहेत. इ.स पू.४ थ्या शतकापासून ग्रिकांचे भारतीयांशी संबंध आले होते. तसे पाहिले तर अलेक्झांडरच्या स्वारीपासूनच (इ. स. पू. ३२९) ग्रीक-भारत संबंध प्रस्थापित झाले होते. अनेक ग्रीक, इराणी, पर्शियन त्या काळात व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले होते. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीचा उपयोग तत्कालीन ग्रीक इतिहासकारांनी आपल्या ग्रंथलेखनात केला आहे. ही सर्व माहिती समकालीन असल्याने महत्त्वाची ठरते.

**ब) मॅंगेस्थेनिस** या ग्रीक वकिलाने, जो चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारी ५ वर्षे वकील म्हणून असताना त्याने जे पाहिले ते त्याने लिहून ठेवले आहे. तत्कालीन भारतातील राजकीय स्थिती, लोकस्थिती, मौर्य राजनीती, लष्करी व्यवस्था, पाटलीपुत्र शहराची रचना, सौंदर्य व प्रशासन इ. ची विस्तृत माहिती त्याने 'इंडिका' नावाच्या आपल्या ग्रंथात लिहून ठेवली आहे.

**क) फाहयान** हा चिनी प्रवासी (४००-४११) या कालखंडात भारतात आला होता. त्याचे प्रवासवर्णन गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा, त्याच्या काळातील समाजजीवन, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवन इ. माहिती उपलब्ध करून देते.

**ड) ह्यु-एन-त्संग** (६३०-६४५) या काळात भारतात आला. त्याचे प्रवासवर्णन हर्षवर्धनची कारकीर्द, नालंदा विद्यापीठ, तत्कालीन भारतातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवन इ. च्या अभ्यासासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

**इ) इत्सिंग** याने इ. स. ६७३-८८ या काळात वास्तव्य असलेल्या चिनी प्रवाशांचे प्रवासवर्णन हेही ७ व्या शतकावर व तत्कालीन विद्यापीठांवर प्रकाश टाकणारे एक महत्त्वाचे संदर्भ साधन आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. परकीय लेखक व चिनी प्रवाशांच्या प्राचीन भारतीय इतिहासासंबंधीच्या नोंदी याविषयी लिहा.

**१२) ऐतिहासिक चरित्रग्रंथ**

प्राचीन भारतात काही दरबारी लेखक व कवींनी त्यांना ज्या राजांनी आश्रय दिला होता त्या राज्यासंबंधी, त्यांच्या राज्यकारभारासंबंधी, त्या राजाच्या व राजवंशाच्या काळातील एकूण परिस्थितीविषयी विस्ताराने माहिती ही चरित्रग्रंथातून लिहून ठेवली आहे. हे चरित्रग्रंथ त्या त्या काळात लिहिले गेले असल्याने इतिहालेखनशास्त्राच्या काही कसोट्यावर उतरत असल्याने त्यास महत्त्व आहे.

**अ) बाणभट्टाचे 'हर्षचरित'**

बाणभट्ट हा हर्षवर्धनचा दरबारी कवी होता. बाणभट्टाची बुद्धिमत्ता, विद्वत्ता पाहून हर्ष प्रसन्न झाला व त्याने बाणभट्टाला आश्रय दिला. पुढे 'हर्षचरित' हा ग्रंथ लिहून बाणभट्टाने राजकृपेची अंशतः फेड केली. १७ व्या शतकातील भारताचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास कसा होता हे समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयोगाचा आहे. सम्राट हर्षवर्धनची कारकीर्द व हर्षाचे पूर्वज यासंबंधी या ग्रंथात सविस्तर माहिती आहे. बाणाने पहिल्या प्रकरणात त्याने स्वतःच्या जीवनाबद्दल, कुटुंबाबद्दल माहिती दिली आहे. प्रकरण २, ३, ४, ५ मध्ये हर्षाचे पूर्वज ठाणेश्वरच्या इतिहासाबद्दल त्याने माहिती लिहिली आहे. ६ व्या ७ व्या प्रकरणात या युद्धमोहिमांचा आढावा घेतला आहे. नंतरच्या प्रकरणात तत्कालीन भारतातील धार्मिक पंथ, हर्षाची प्रशासनव्यवस्था, तत्कालीन समाजजीवन, रूढी, परंपरा, हर्षाचा दरबार, ग्रामीण जीवन इ. ची माहिती आहे. 'हर्षचरित' हे विशुद्ध साहित्यिक शैलीत लिहिलेले रोचक प्रबंधकाव्य आहे. वीर व करुण या दोन्ही रसांचा या काव्यात उत्तम परिपोष झाला आहे. या प्रथात काही दोष आहेत. १) कालखंडानुक्रमाकडे दुर्लक्ष. २) स्थानिक भूगोलाकडे दुर्लक्ष. ३) अधिदैविक दृष्टिकोन ४) परंपरा व इतिहास यात फरक न करणे, ५) सम्राट हर्षवर्धनाची खोटी स्तुती.

### ब) बिल्हणचे 'विक्रमांकदेवचरित'

बिल्हण हा ११ व्या शतकातील एक  काश्मीर पंडित व महाकवी होता. त्याचे वडील वैदिक वाङ्मयाचे प्रकांड पंडित होते. बिल्हणने लहानपणीच वेद, व्याकरण, काव्यशास्त्र यांचे अध्ययन पूर्ण केले होते. काश्मीरमध्ये त्याचे वास्तव्य असतानाच त्याचे काही ग्रंथ ख्याती पावले होते. १०६२- ६५ या काळात त्याने काश्मीर, पंजाब, मथुरा, वृंदावन, कनोज, प्रयाग, काशी, अयोध्या, बुंदेलखंड इ. ठिकाणी प्रवास केला होता. कर्नाटकातील चालुक्यांची राजधानी कल्याणी येथे तो आला असता तेथील सम्राट विक्रमादित्य ६ वा याने त्यास आश्रय दिला. जीवनाच्या अखेरपर्यंत तो तेथेच रहिला. त्याने राजा विक्रमादित्य ६ वा यास जवळून पाहिले होते. राजाच्या सभेत तो 'विद्यापती' होता. तेथेच त्याने विक्रमांकदेवचरित हे महाकाव्य लिहिले. विक्रमांकदेवचरित हे महाकाव्य वैदर्भी शैलीत रचलेले असून कवीची वाणी प्रासादिक व रसाळ आहे. त्याने या ग्रंथात दिलेली माहिती ही शिलालेख व इतर साधनांशी जुळते. या काळात त्याने कल्याणीच्या चालुक्य वंशाचा इतिहास, चालुक्य व चोल यांचे राजकीय संबंध याबद्दलची बरीच विश्वसनीय माहिती दिली आहे. कल्याणीस वास्तव्य करण्यापूर्वी त्याने भारतभ्रमण केल्यामुळे त्याला त्या काळच्या इतिहासाचे विस्तृत ज्ञान होते. राजा विक्रमादित्य ६ वा याने दोन भावांना कैदेत टाकून राज्य बळकावले व चंद्रलेखा या राजकन्येशी विवाह केला अशी माहिती तो देतो. काश्मीरसंबंधी पुष्कळ माहिती तो देतो. काश्मिरी स्त्रिया संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषा सफाईने बोलतात अशी प्रौढी तो मिरवतो. काश्मीरमधून निर्यात होणाऱ्या वस्तू, काश्मीरने नाट्यकलेत केलेली प्रगती इ. चा उल्लेख त्याने आपल्या काव्यात केला आहे. विक्रमादित्य ६ वा याने केलेल्या लढाया याचे विस्तृत वर्णन तो करतो. पण ही माहिती काव्यात असूनही बिल्हणचा हा ग्रंथ इतिहासाशी प्रामाणिक आहे.

### क) सोमेश्वरचा 'कीर्तीकौमुदी'

सोमेश्वर हा चालुक्य राजाचा दरबारी धर्मगुरू होता. त्याने लिहिलेल्या 'कीर्तीकौमुदी' या ग्रंथात वस्तुपाल या चालुक्यवंशीय राजाचे चरित्र तर आहेच; पण त्याशिवाय चालुक्यवंशाचा इतिहास सारांशरूपाने दिला आहे.

### ड) मेरीतुंगाचार्याचा 'प्रबंध चिंतामनी'

इ. स. १३०६ मध्ये हा ग्रंथ जैन, ग्रंथकार मेरीतुंगाचार्य यांनी लिहिला आहे. या ग्रंथाचे स्वरूप ऐतिहासिक चरित्रात्मक आहे.

लेखकाच्या समकालीन जे राजे भारतात होते त्याचे वर्णन त्याने केले आहे. तत्कालीन चालीरीती व दरबारी व्यवहार यांचे स्पष्ट वर्णन यात पाहावयास मिळते.

### इ) 'जायनकचे पृथ्वीराजविजय'

जायनक हा मार्गववंशीय काश्मीरी ब्राह्मण होता. तो ज्योतिष, तर्कशास्त्र, व्याकरण, वैदिक परंपराचा अभ्यासक होता. 'पृथ्वीराजविजय' हा ग्रंथ त्याने इ.स. ११९२ मध्ये लिहिला. या ग्रंथात राजस्थानमधील चौहान शासक पृथ्वीराज तृतीय याच्या शौर्याचे वर्णन आहे. या ग्रंथात पृथ्वीराज तिसरा याला विष्णूचा अवतार व रामसारखा सूर्यवंशी मानले आहे.

सीतेसारखी गाहडवाल राजा जयचंद याची कन्या संयोगीता हिची प्राप्ती मोहम्मद घोरी राजा जयचंदचा पराभव करून करतो. ही कथा या ग्रंथात आहे. पृथ्वीराज चौहानचा मोहम्मद घोरीशी जो संघर्ष झाला. त्यावर प्रकाश टाकला आहे. आधुनिक इतिहासकारांनी या ग्रंथावर टीका केली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. प्राचीन भारतातील ऐतिहासिक चरित्रग्रंथ याविषयी माहिती लिहा.

**१३) कल्हणचा 'राजतरंगिणी'**

कल्हण हा एकमेव भारतीय इतिहासकार मानला जातो. तो कवीही होता. 'राजतरंगिणी' या प्रसिद्ध ग्रंथात त्याने काश्मीरचा इतिहास लिहिला आहे. हा ग्रंथ लिहिण्यासाठी त्याने प्राचीन ग्रंथ, शिलालेख, दानपत्रे, ताम्रपट, नाणी, शिक्के व प्राचीन स्थापत्य इ. चा अभ्यास केला होता. सर्व काश्मीरची भूमी त्याने प्रत्यक्ष पाहिली होती. प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक परंपरा त्याने जाणून घेतल्या होत्या. ऐतिहासिक घटनांचा क्रम लावून महाभारत काळापासून ते १२ व्या शतकापर्यंतचा क्रमबद्ध असा काश्मीरचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास त्याने लिहिला. हा ग्रंथ इ. स. ११४८ मध्ये त्याने लिहिला होता. त्याने लिहिलेला हा इतिहासग्रंथ ९ व्या शतकापर्यंत काहीसा अंधुक असला तरी त्यापुढच्या १२ व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा इतिहास हा अत्यंत सुसंघटित, प्रामाणिक व विवेचनात्मक आहे. त्याने पक्षपात व अभिनिवेश न दाखवता लिखाण केले आहे. कल्हणने त्याच्या काळातील काश्मीरचे अत्यंत सजीव असे चित्र रेखाटले आहे. कल्हणने प्रवरसेन, ललितादित्य, अवंतिवर्मा इ. नृपतींचे पराक्रम, त्यांचे युद्धकौशल्य, विजययात्रा इ. प्रसंगाचे रसभरीत वर्णन केले आहे. तसेच अनेक राजे व राजकुमार यांच्या भित्रेपणाचे, दुष्टपणाचेही तो वर्णन करण्यास कचरत नाही. तो जमेल तेथे चार उपदेशाचे शब्दही सांगतो. त्याचा हा ग्रंथ केवळ राजांची माहिती सांगणारी मालिका नाही तर राजनैतिक, सामाजिक व काही अंशी आर्थिक ज्ञानाची खाण आहे. कल्हणला बौद्ध धर्माविषयी आदर होता. बौद्ध मंदिरे, स्तूप, विहार यांना संरक्षण देणाऱ्या व्यक्तींविषयी त्याला आदर वाटत होता. प्रस्तुत ग्रंथ लिहिण्यापूर्वी त्याने ११ जुने इतिहासग्रंथ व नीलऋषीकृत 'काश्मीरचा इतिहास' अभ्यासल्याचे तो सांगतो.

हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून या ग्रंथाची श्लोकसंख्या ७८२६ आहे व ग्रंथ ८ विभागात आहे. कल्हण हा कोणत्याही राजाचा आश्रित नव्हता त्यामुळे त्याच्या लिखाणात नि:पक्षपातीपणा जाणवतो. कल्हणचा हा ग्रंथ कोणत्याही एका राजाचा किंवा राजवंशाचा इतिहास नाही तर संपूर्ण काश्मीरचा इतिहास आहे. इतिहासलेखन शास्त्राची तत्त्वे विचारात घेऊन लिखाण करणारा तो प्राचीन काळातील एकमेव इतिहासकार होय. R. C. Mujmadar यांच्या मते, "Kalhana is the only historian of ancient India who fully understood the fundamental principles of modern historiography."

B. Sheikh Ali यांच्या मते, "Kalhana had a good conception of the proper sources for writing history. He had a critical mind which did not accept as a true whatever was mentioned in the sources."

Prof. A. L. Basham, च्या मते "Kalhana's attitude to history was the general trend of the entire period."

रोमीला थापर हिनेही कल्हणच्या 'राजतरंगिणी' या ग्रंथाचे कौतुक करून कल्हणच्या विश्लेषणात प्रगल्भता व स्पष्टता दिसते असे म्हटले आहे. प्रस्तुत ग्रंथात त्याच्याअगोदर जे इतिहासकार होऊन गेले त्यांची नावे तो देतो.

कल्हण कल्याणकारी हुकूमशाहीचा पुरस्कर्ता होता. त्याने सरंजामशाहीचे दोषही मांडले होते. काश्मीरबाबत त्याला वाटणारा अभिमान त्या ग्रंथातून स्पष्ट होतो.

## पुरातत्वीय साधने

भारतात सापडलेले प्राचीन काळातील हजारो शिलालेख, ताम्रपट, स्तंभलेख, भारतीयांना ऐतिहासिक दृष्टी नव्हती या विधानाचे निश्चित खंडन करतात. ह्या कोरीव लेखात तत्कालीन राजांचे काळ, देशादेशात झालेले करार, त्यांचे परस्पर संबंध, सामाजिक व धार्मिक चालीरीती, आर्थिक व्यवहार यांची माहिती मिळते. ह्या लेखात संवत, शक, तिथी, वार यांच्या नोंदी असल्याने कालगणनेचे महत्त्व त्याकाळी जाणले जात होते हे स्पष्ट दिसते. राजांचे राज्यारोहण, युद्धात मिळालेला जय स्मरणात कायम राहावा म्हणून नवी नाणी काढली जात किंवा नवा शक सुरु केला जाई. हे सर्व प्राचीन भारतीयांना ऐतिहासिक दृष्टी असल्याचे पुरावे आहेत. शिलालेखावरील नोंदी त्रोटक स्वरूपाच्या असल्या तरी घटनांचा व काळाचा उल्लेख त्यात निश्चित स्वरूपाचा असतो.

## प्राचीन भारतीय इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये

१) शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ पद्धतीने इतिहासाचे लेखन करणारा कल्हण हा एकमेव इतिहासकार होय.

२) पुराणग्रंथांनी गुप्त काळापर्यंत होऊन गेलेल्या प्रमुख राजवंशाच्या वंशावळीची नोंद केलेली आहे.

३) पुराणकथांनी काही केलेल्या नोंदी एवढ्या काल्पनिक आहेत की त्यावर कोणीच विश्वास ठेवणार नाही. उदा. भारतात दुधाच्या नद्या व दह्याचे समुद्र आहेत.

४) प्राचीन भारतात जे साहित्य लिहिले गेले ते प्रामुख्याने धार्मिक तत्त्वज्ञानासंबंधी आहे. आध्यात्मिक दृष्टिकोन त्यात आहे.

५) राजे, त्यांची दीनचर्या, युद्ध दरबार यासंबंधी माहिती साहित्यातून आली आहे. सामाजिक जीवन, रूढी परंपरा इ.च्या लिखाणाकडे इतिहासकारांनी दुर्लक्ष केले आहे. जीवनातील वास्तववादापेक्षा आदर्शवादावर साहित्यिकांनी भर दिला आहे.

## आपली प्रगती तपासा

१. कल्हणच्या राजतरंगिणीचे महत्त्व विशद करा.

## २.५ सारांश

भिन्न प्रदेशात, भिन्न कालावधीत सृजनशील प्रतिभेचा आविष्कार भिन्न प्रकारांनी, भिन्न रित्या होत असतो. ग्रीस मधील काही राज्यात प्लेटो ॲरिस्टॉटल सारखे तत्वज्ञ पुढे आले.

कोठे थ्युसीडाइड सारखे इतिहासलेखक झाले तर कोठे लाक्षरी सामर्थ्याचा आदर्श निर्माण झाला. भारतातही याचप्रमाणे नानाविध क्षेत्रात प्रज्ञावंत निर्माण झाले, गहन विषयावर अमर साहित्य व कलाकृती निर्माण झाल्या. त्यात प्रचंड प्रमाणात ऐतिहासिक माहिती मिळते. ऐतिहासिक ग्रंथ लिहिण्यासाठी ते पुरावे म्हणून उपयुक्त ठरतात. परंतु ज्या दोन आयामांच्या आधारे झालेले लिखाण इतिहासाच्या स्तराला पोचले, ते आयाम स्पष्ट नसल्यामुळे ते उत्तम साधन्ग्रंथ ठरतात, त्यांना इतिहास ग्रंथ म्हणता येत नाही.

## २ .६ प्रश्न

१) प्राचीन भारतीय इतिहासाचे तत्वज्ञान स्पष्ट करा.

२) प्राचीन भारतात इतिहास ग्रंथांचा अभाव होता याविषयी आपले मत लिहा.

३) वैदिक साहित्य, पुराणग्रंथ व महाकाव्य यांचे महत्त्व विशद करा.

४) बुद्ध व जैन लेखन, ऐतिहासिक नाटके, ऐतिहासिक काव्ये व शास्त्रीय ग्रंथ यातील प्राचीन भारतीयांचे ज्ञान स्पष्ट करा.

५) प्राचीन भारतीयांच्या राजनीतीवरील ग्रंथांची माहिती द्या .

६) परकीय लेखक व चिनी प्रवाशांच्या प्राचीन भारतीय इतिहासासंबंधीच्या नोंदी याविषयी लिहा.

७) प्राचीन भारतीयांच्या राजनीतीवरील ग्रंथांची माहिती द्या .

८) कल्हणच्या राजतरंगिणीचे महत्त्व विशद करा.

## २.७ संदर्भ

१) गायकवाड आर. डी., सरदेसाई बी.म., इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.

२) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३) शेख गफूर, इतिहास लेखनशास्त्र, प्रितम पब्लिकेशन्स, जळगाव, २००७.

४) गाठाळ एस.एस., इतिहासाचे तत्त्वज्ञान, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५.

५) कोठेकर शांता, इतिहास: तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

६) सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई , १९६७.

७) वा.सी. बेंद्रे, साधनचिकित्सा, १९७६.

८) ग.ह. खरे, संशोधकाचा मित्र.

९) कोमेजर अनु कृ.ना. वळसंगकर, इतिहास स्वरूप व अभ्यास, १९६९.

१०) वि. का. राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना, १९२८.

११) ई. एच. कार. अनुवादक प्रा.वि.गो. लेले, इतिहास म्हणजे काय ?, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१२) डॉ. गोविंदचंद्र पांडे, इतिहास : स्वरूप एवं सिद्धांत राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९८.

१३) डी. डी. कोसांबी, पुराणकथा व वास्तवता.

१४) द. वि. केतकर, इतिहासातील अंतःप्रवाह.

१५) ग. ह. खरे, साधना चिकित्सा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७६.

१६) वि. द. घाटे, इतिहासशास्त्र आणि कला, देशमुख प्रकाशन, पुणे.

१७) प्रभाकर देव, इतिहास : एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड.

❖❖❖❖

# ३

# ईश्वरवादी दृष्टिकोण (Theological School) आणि आदर्शवादी दृष्टिकोण (Idealistic School)

**घटक रचना :**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ ईश्वरवादी दृष्टिकोण

३.२.१ पाश्चात्य “ईश्वरी विद्या" विषयक संकल्पनांबाबत (Theological Concepts) सर्वसामान्य दृष्टिकोन

३.२.२ अतिप्राचीन दैववाद

३.२.३ 'अतिप्राचीन दैववाद ' कल्पनेचे टीकात्मक परिक्षण

३.२.४ मध्ययुगीन चर्च इतिहासलेखनपद्धती व दृष्टिकोण

३.२.५ भारतीय धर्मशास्त्रीय (हिंदू)दृष्टिकोण

३.२.६ मुस्लिमांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण

३.३ आदर्शवादी दृष्टिकोण (चिद्वाद) (Idealistic School)

३.३.१ आदर्शवादाचा अर्थ

३.३.२ आदर्शवादाचे (चिद्वादाचे) स्वरूप

३.३.३ आदर्शवादाचे (चिद्वादाचे) मुख्य प्रकार

३.३.४ आदर्शवादी विचारवंत (Idealistic Thinker )

३.४ सारांश

३.५. प्रश्न

३.६ संदर्भ


## ३.० उद्दीष्टे:

**हे युनिट पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होऊ शकेल.**

- पाश्चात्य “ईश्वरी विद्या" विषयक संकल्पनांबाबत (Theological Concepts ) सर्वसामान्य दृष्टिकोन समजेल.
- अतिप्राचीन दैववाद ही संकल्पना लक्षात घेतील.

- मध्ययुगीन चर्च इतिहासलेखनपद्धती व दृष्टिकोण समजेल.
- ख्रिस्ती इतिहासलेखकांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण समजेल.
- भारतीयांचा धर्मशास्त्रीय (हिंदू)दृष्टिकोण समजेल.
- हिंदूंच्या धर्मविषयक कल्पना समजतील.
- मुस्लिमांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण कळेल.
- इतिहासातील इस्लामची कल्पना समजेल.
- आदर्शवादाचा अर्थ, स्वरूप व प्रकार सांगतील.
- हेगेलच्या आदर्शवादा विषयीचे विचार समजतील.
- क्रोसेच्या आदर्शवादा विषयीचे विचार कळतील.
- कॉलिंगवूडच्या आदर्शवादा विषयीचे विचार माहीत होतील.

## ३.१. प्रस्तावना

इतिहासाचा अभ्यास करीत असताना अनेक विषयांचा, विचारांचा, संकल्पनांचा विचार करावा लागतो. आधुनिक काळात भांडवलशाही, मार्क्सवाद, नवमावर्क्सवाद, उपयुक्ततावाद इत्यादी तत्त्वज्ञानांच्या आधारे इतिहासविषयक दृष्टिकोण ठरविला जातो. ही झाली समाजशास्त्रीय प्रवृत्तीचा बनल्यावरची स्थिती. परंतु ज्या वेळी समाजामध्ये विज्ञानाचा, तर्कशास्त्राचा प्रसार झाला नव्हता तेव्हा मानवी जीवनामध्ये घडणाऱ्या घटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोण आध्यात्मिक व अंधश्रद्धांवर आधारित असे. कार्यकारणभाव ही संकल्पना प्राचीन काळी अस्तित्वात नव्हती. पंचमहाभूतावर विसंबून राहणारा असा समाज होता. आज आपण ज्याला धर्म म्हणतो ती संकल्पना अनादि काळात अस्तित्वात नव्हती. परंतु समाजरचनेमध्ये बदल होत गेला व त्यामधूनच धर्म, परमेश्वर, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, न्याय, नीती या संकल्पना निर्माण झाल्या व प्रत्येक देशात त्या त्या परंपरेप्रमाणे धर्म व परमेश्वर या संकल्पनांनी आकार घेण्यास सुरुवात केली. प्रत्येक देश, समाज, संस्कृती, शिक्षणाचे स्वरूप यावर धर्म, धर्मशास्त्र यांचे स्वरूप अवलंबून राहू लागले. एखाद्या धर्माचा दुसऱ्या धर्मावर प्रभाव पडलाही असेल पण त्या धर्मातून मूळ कल्पना मात्र कोणालाच संपूर्णपणे नष्ट करता आल्या नाहीत. म्हणून आज आपणाला जगात विविध धर्म अस्तित्वात असलेले दिसतात.

आदर्शवादी संकल्पनेमुळे इतिहासाच्या कक्षा रुंदावल्या आहेत .आदर्शवादामुळे इतिहासाला नवीन कलाटणी किंवा वळण मिळाले आहे . कारण आदर्शवादी संकल्पना ही आपल्याला इतिहासाच्या साधनांपैकी इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची जास्त माहिती देते .इतिहासाचे आदर्शवादी विचारवंत हे इतिहासाचा अर्थ व इतिहासाचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून निरनिराळ्या पद्धती शोधून काढण्याचा प्रयत्न करतात .हेगेल , क्रोसे व कॉलींगवुड हया तत्त्ववेत्त्यांनी १९ व्या शतकात आपाल्याला तत्त्वज्ञानाने इतिहासाला नवीन वळण दिले

आहे. त्यांनी इतिहासाच्या आदर्शवादावर एकापेक्षा एक श्रेष्ठ असे प्रबंध लिहून इतिहासाला जास्तीत जास्त विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे . त्यांचे आदर्श वादात योगदान मोठे आहे .

## ३.२ ईश्वरवादी दृष्टिकोण

### ३.२.१ पाश्चात्य "ईश्वरी विद्या " विषयक संकल्पनांबाबत (Theological Concepts) सर्वसामान्य दृष्टिकोन

ॲरिस्टॉटल या तत्त्वज्ञाने "अध्यात्म विद्या अगर अतिन्द्रिय ज्ञान (Meta-physics) या पुस्तकात ब्रह्मज्ञान विषयक संकल्पना मांडल्या आहेत. त्यांच्या मते वस्तूचे अगर पदार्थांचे (Substances) तीन प्रकार असतात. १) इन्द्रियगम्य व नाशवंत २) इन्द्रियगम्य पण नाशवंत नसलेले ३) इन्द्रियगम्य नसलेले व नाशवंतही नसलेले. पहिल्या वर्गात वनस्पती व प्राणी येतात. दुसऱ्या वर्गात अंतराळातील प्राणी येतात व तिसऱ्या प्रकारात मानवातील विचारशील आत्मा व परमेश्वर येतो.

परमेश्वर म्हणजे शुद्ध विचार. कारण विचार म्हणजे जो सर्वोत्तम असतो तो. जीवन हे परमेश्वराच्या मालकीचेच आहे. कारण विचाराची प्रात्यक्षिकता (actuality) म्हणजे जीवन व परमेश्वर ती प्रात्यक्षिकता आहे. परमेश्वर स्वतंत्र आहे. म्हणून परमेश्वर चैतन्यशील, शाश्वत व सर्वोत्तम आहे. म्हणून जीवन व जीवनाचे सातत्य हे देवाच्या मालकीचे आहे.

यावरून हे स्पष्ट होते की शाश्वत व अविचलित व इन्द्रियगम्य वस्तूपेक्षा वेगळी असणारी वस्तू आहे. (Substance) ही वस्तू भाग नसलेली अविभाज्य आहे. ही वस्तू अभावात्मक व अपरिवर्तनीय सुद्धा आहे. (Impassive and Unalterable)

परमेश्वराला ख्रिश्चन ईश्वराचे (Christian Providence) विशेषण देता येत नाही. कारण यामुळे तो परिपूर्ण होणार नाही. परमेश्वर हा परिपूर्ण आहे. परमेश्वराबद्दलचा विचार हा विचारांचा विचार आहे. स्पियानोझ म्हणतो, मानव परमेश्वरावर प्रेम करतो. पण परमेश्वर मानवावर प्रेम करतो हे शक्य नाही. "Unmoved Mover" म्हणून परमेश्वराची व्याख्या करता येत नाही. खगोलशास्त्र ४७ अगर ५५ अविचलित विचलक मानतात. (Unmoved Mover) याचा नैसर्गिक अर्थ असा की ४७ अगर ५५ परमेश्वर आहेत. Unmoved Mover ही संकल्पना कठिण आहे. आधुनिक मनाला असे दिसेल की बदलाची कारणे ही पूर्वीच्या बदलात असली पाहिजेत व म्हणूनच विश्व अचल असेल तर ते तसेच चिरंतनपणे अचल राहील असे म्हटले पाहिजे.

ॲरिस्टॉटलच्या मते चार प्रकारची कारणे आहेत. ती म्हणजे भौतिक (Matarial) औपचारिक (Formal) कार्यक्षम व अंतिम (Final) उदा. पुतळा तयार करणारा माणूस आहे. या पुतळ्याचे भौतिक कारण संगमरवर दगड आहे. कार्यक्षम कारण म्हणजे संगमरवराबरोबर छिन्नीचा संपर्क होय. अंतिम कारण म्हणजे अंतिम जे शिल्प होय. Unmoved Mover यास अंतिम कारण म्हणून मानले जाईल. हे कारण बदलाकरता हेतु पुरविते.

ॲरिस्टॉटल स्वभावाने धार्मिक नव्हता. पण हे अंशत: सत्य आहे. कारण तो इन्द्रियगम्य जगाला अपूर्ण मानतो. पण त्यास जीवन, इच्छा, अपूर्ण प्रकारचा विचार व आकांक्षा आहे. सर्व सजीव प्राण्यांना थोड्या फार प्रमाणात परमेश्वराची जाणीव असते व  परमेश्वराच्या प्रेमाने ते कृती करतात. अशाप्रकारे परमेश्वर सर्व हालचालींचे अंतिम कारण आहे. फक्त वस्तूमानाशिवाय परमेश्वराला आकार असतो. जग प्रगतीशीलपणे परमेश्वर सद्दश होत आहे. पण ही प्रक्रिया पूर्ण होत नाही. कारण वस्तुमान पूर्णपणे जाऊ शकत नाही. परिपूर्णता जगाला केवळ प्रेमातूनच हलवू शकते की जे प्रेम जगाला परमेश्वराबद्दल वाटते.

Arerroes याने  ॲरिस्टॉटल बद्दल आदर राखूनं असे मत मांडले की, बुद्धिगामी विचाराने (Reason) परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध करता येऊ शकते. थॉमस ॲक्विनसने हेच मत मांडले. तो म्हणतो आत्मा अमर्त्य नाही. पण बुद्धि अमर्त्य आहे. (Soul is not immortal but intetlect (nous) is).

Arerroes हा नंतरच्या मुस्लिम तत्त्वज्ञांप्रमाणे कठोर सनातनी नव्हता. मुस्लिमांच्या सनातनी पंथाने सर्व तत्त्वज्ञानाच्या पुस्तकांवर आक्षेप घेतला. कारण सत्य कुराणातच आहे असे त्यांचे मत होते. Averroes याने धर्माला रूपकात्मक प्रकारात तात्त्विक सत्य असणारी बाब मानले व हे विशेषतः निर्मितीच्या बाबतीत लागू होते.

लिबनिक (Leibniz) हा तत्त्वज्ञ थॉमस ॲक्विसने यांच्याशी सहमत होताना म्हणतो की, तर्कशास्त्राच्या नियमाला विरोधी अशी कृती परमेश्वर करीत नाही. पण तर्कशास्त्र दृष्ट्या जे शक्य आहे त्याबाबत परमेश्वर कार्यवाहीचा आदेश देऊ शकतो व येथेच परमेश्वराच्या निवडीला भरपूर वाव आहे.

परमेश्वराच्या अस्तित्वाला अध्यात्मिक सिद्धतेला अंतिम आकारात लिबनिझने आणले.

मध्ययुगीन ईश्वरवाद हा ग्रीक बुद्धिवादातून उत्पन्न झाला. Old Testament चा परमेश्वर हा सामर्थ्याचा परमेश्वर आहे. God of Power. New Testament चा परमेश्वर प्रेमाचा देव आहे. पण ॲरिस्टॉटलपासून ते थेट काल्व्हिनपर्यंत (Calvin) बौद्धिक पातळीवरचा परमेश्वर आहे. असा परमेश्वर काही गोंधळांच्या समस्या सोडवितो . नाही तर विश्व जाणण्याबाबत समस्या निर्माण झाल्या असत्या. हेगेल, लॉट्झ (Lotze) व ब्रॅडले यांनी अध्यात्मिक युक्तीवादच देवाबाबत केले. काण्ट या तत्त्वज्ञाने मात्र या युक्तीवादाचे खंडन केले.

**आपली प्रगती तपासा**

१) पाश्चात्य" ईश्वरी विद्या "विषयक संकल्पनांबाबत (Theological Concepts) सर्वसामान्य दृष्टिकोन स्पष्ट करा.

## ३.२.२ अतिप्राचीन दैववाद

मानवी जीवनातील घटनांचा अर्थ देवादिकांच्या कृतीच्या संदर्भात सांगितला आहे. राजांचे उदयास्त देवाच्या मताप्रमाणे ठरत असतात. धर्मगुरूंना देव-देवीकांच्या इच्छा कळतात असे सुमेरियन इतिहासकारांना वाटत. देवतांच्या इच्छेनुसार इतिहास घडतो असे इजिप्तमधील इतिहासकार सांगतात. इजिप्तचे फारो राजे हे मानवरूपी ईश्वर आहेत अशी कल्पना

मांडण्यात आली. इतिहासाचे कालचक्र देव निर्मित आहे आणि ते नीट फिरावे म्हणून माणसाने योग्य वेळी त्या कृती करणे म्हणजे पूजा प्रार्थना करणे आवश्यक आहे.

प्राचीन चीनी साहित्यांत सुद्धा हीच कल्पना मांडली आहे. राजे आणि राज्ये यांची स्थित्यंतरे निसर्गातील स्थित्यतराप्रमाणे आणि ग्रहगोलानी दिलेला इशाऱ्यानुसार होत असतात असे चुंग - शू याने सांगितले. पार्शी - इराणी साहित्यांत पण अशीच कल्पना आहे . कालचक्राची कल्पना ही मानव आणि त्याचा समग्र इतिहास हा ईश्वरनिर्मित आहे. जगाच्या कल्याणासाठी ईश्वर झटत असतो आणि आपल्या कार्यात अडथळे आणणाऱ्या राक्षसाशी पण त्याला ' लढावे लागते. अंतीम जय परमेश्वराचा आहे. माणसाचा इतिहास हा त्याच्या मृत्यू बरोबर संपत नाही कारण देह नश्वर असला तरी आत्मा अमर आहे, आत्म्याचे जीवन चालूच आहे. पॅलेस्टाईनमधील ज्यू असोत की नंतरच्या काळातील ख्रिश्चन असोत त्यांनी पण ईश्वरीसूत्राच्या कल्पनेवरच भर दिला आहे .ग्रीक आणि रोमन लोक पण " सर्वशक्तीमान ईश्वर किंवा अनेक देवदेवता मानवी घडामोडींचे नियंत्रण करतात आणि त्यांच्या योजनेनुसार इतिहास घडतो " असेच मानतात.

### ३.२.३. 'अतिप्राचीन दैववाद ' कल्पनेचे टीकात्मक परिक्षण :

प्राचीन काळातील इतिहास विषयक या कल्पना पाहिल्यावर असे लक्षात येईल की आजच्या वैज्ञानिक प्रगतीच्या काळात या कल्पना टाकाऊ आणि निरूपयोगी ठरल्या आहेत. प्राचीन काळातील इतिहास विषयींच्या कल्पना या साहित्यिक कल्पना रम्यतेंतून निर्माण झाल्या आहेत. पृथ्वी वरील घडामोडी आणि नैसर्गिक घटनांच्या बाबतीत कार्यकारणभाव या बद्दलचे अज्ञान यातून देववादाने जन्म घेतला. आणि ऐहिक जीवनात या देव - देवताची कृपा किंवा शाप यांना महत्व आहे. देवासंबंधीच्या भीतींतून आणि भक्तींतून या प्राचीन कल्पना निघाल्या आहेत. राजा आणि धर्मगुरूनी आपल्या स्वार्थासाठी त्यांचा चांगला उपयोग करून घेतला म्हणून प्राचीन काळांतील' ईश्वरसूयाधिष्ठित 'किंवा' कालचक्राधित ' कल्पनेपेक्षा अधिक महत्व नाही. या कल्पनांच्या बाबतीत सर्व समाज जीवन या हुकुमाखाली चालत होते असे मात्र मानण्याचे कारण नाही . आर्य चाणक्य म्हणतो की, कोणत्याही प्रकारचे स्थित्यंतर हे काही प्रमाणात दैवी आणि काही प्रमाणात मानवी असते. ईश्वराचे प्रतिनिधी जे राजे त्यांना सिंहासनावरून खाली खेचण्याचे प्रकार झाले आहेत आणि ईश्वराच्या प्रेषितांना धर्मगुरूंना ठोसा मारून त्यांना खरा मानवी धर्म सांगण्याचे प्रकार पण झाले आहेत . परंतु आश्चर्य असे की, आजही काही विचारवंत परमेश्वराला सर्व कर्तृत्व देऊन अनुरोधाने इतिहास लिहिण्याची परंपरा टिकवून ठेवित आहेत. औद्योगिक क्रांतिनंतरही बायबलच्या आधारे ईश्वरनिष्ठ इतिहासभाष्य केले गेले. फक्त या विचारांचा प्रभाव आज कमी झाला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. अतिप्राचीन दैववाद ही संकल्पना स्पष्ट करा.

### ३.२.४ मध्ययुगीन चर्च इतिहासलेखनपद्धती व दृष्टिकोण

युरोपीय इतिहासातील मध्ययुग हे धर्मशास्त्रीय कल्पनांच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानले जाते. याच संधीकाळात रोमन साम्राज्याचा अस्त होत असताना ख्रिश्चन धर्माचा उदय

झाला. नवीन ख्रिश्चन धर्मात धर्मसंस्था (चर्च) महत्त्वाची मानली जाते. मध्ययुगाच्या सुरुवातीस ख्रिश्चनांचा इतिहास लिहिण्याची पद्धत धर्मगुरू, मठपती व काही विद्वानांनी सुरु केली. अशा विद्वानांच्या मते, ख्रिश्चन धर्म हाच एकमात्र धर्म असून त्यामध्ये 'चर्च' ही संस्था सर्वात महत्त्वाची आहे. नवख्रिश्चन विद्वानांपैकी काहींनी नुसता चर्चचा इतिहास लिहिला तर काहींनी आपल्या काळातील घटनांची नोंद करून ठेवण्याची पद्धत सुरू केली. काही धर्मगुरूंनी ग्रिको-रोमन काळातील दुर्मीळ हस्तलिखितांच्या नकला उतरविण्यास सुरुवात केली. त्यांच्या या सर्व प्रयत्नांचा परिणाम भावीकाळातील मध्ययुगीन चर्च इतिहासलेखनावर झाल्याचे आपणास दिसून येते. चर्च इतिहासलेखनाची सुरुवात पश्चिम आशियात पॅलेस्टाईनमध्ये झाली. सुरुवातीच्या संघर्षानंतर इ. स. ३१३ मध्ये रोमन बादशहाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला. ख्रिश्चन संपूर्ण वर्चस्वाचा कालखंड ऑगस्टीन ते मार्टिन ल्यूथर असा मानतात, ख्रिश्चनांचा बायबल हा प्रमुख ग्रंथ. त्यामध्ये इतिहासासंबंधी विचार व्यक्त केले आहेत.

बायबलमध्ये ॲडम आणि ईव्ह यांच्या पतनापासूनच्या घटना कशा घडल्या व जगाची निर्मिती कशी झाली याची माहिती आहे. 'ॲडम ईव्ह' हा भूतकाळ, 'चर्चची स्थापना' ही दुसरी अवस्था व 'देवाचे राज्य' ही तिसरी अवस्था आहे. अशी बायबलची इतिहासविषयक कल्पना आहे. नव्या करारामध्ये सेंट पॉलने तीन कालखंड मानले आहेत. (१) यामध्ये अँडमपासून मोझेसपर्यंतचा कालखंड (२) यामध्ये मोझेसपासून ख्रिस्तापर्यंतचा कालखंड (३) यामध्ये ख्रिस्तांच्या पुनरागमनाचा कालखंड अशी बायबलची इतिहासविषयक धर्मशास्त्रावर आधारित कल्पना आहे. सुरुवातीच्या कालखंडात ख्रिश्चन चर्चसंस्थेवर धर्मशास्त्राचा प्रचंड प्रभाव होता. नंतरच्या काळात ख्रिश्चन व बिगर ख्रिश्चनांच्या लढाया झाल्या. त्यामधून ख्रिश्चनांची बऱ्याच वेळा वाताहत झाली. त्याचा परिणाम ख्रिश्चनविषयक धर्मकल्पनांवर झाला. पुढे त्यांनी तीन कालखंडामध्ये वाढ करून ख्रिस्त व कालखंड या इतिहासाचे लेखन सुरू ठेवले. ईसुबस, ऑगस्टीन यांनी इतिहासाची रचना 'देव', 'परमेश्वर' या संकल्पनेभोवती गुरफटून ठेवली. देवाचे अधिराज्य मानव जातीवर चालते ही कल्पना त्यांनी प्रचलित करण्याचा प्रयत्न केला. जो चांगले कृत्य करतो तो परमेश्वराच्या स्वर्गीय महालात जातो. परमेश्वराच्या सान्निध्यात पृथ्वीवरील राव रंक एकत्र गुण्यागोविंदाने राहतात. एकमेकास मदत करतात. रोमन साम्राज्याच्या -हासानंतर मानव जातीच्या कल्याणासाठी ख्रिश्चन धर्माची स्थापना झाली आहे. जगामध्ये दोन विरुद्ध प्रवाह आहेत, एकाचे नेतृत्व ऑरमुझ (चांगले कृत्य) करते व दुसऱ्या (दुर्गुणांचे) चे नेतृत्व अँहरिमन करतो. यात शेवटी ऑरमुझचा विजय निश्चित आहे. हे प्रवाह अध्यात्मवाद व भौतिकवाद या विचारांचे प्रतिनिधित्व करतात. मध्ययुगीन धर्मविषयक संकल्पना नंतर येतात.

ख्रिस्ती तत्त्वज्ञानाचा उगम आदाम, एवा यांच्या मुळपाप हया कल्पनेशी संबंधित आहे. देवाची आज्ञा मोडल्याबद्दल मानव अंध (श्रद्धाहिन )झाला म्हणूनच तो अंधारात चाचपडत आहे व तो मानवाचा मूळ स्वभावच आहे. मूळपाप संबंधीची ख्रिस्ती धर्माची शिकवण म्हणजे मानव हा शापित आहे व त्याला तारणाची आवश्यकता आहे म्हणून इतिहास हा मानवी तरणाच्या तयारीचा इतिहास आहे. मानवी स्वभावातील पाप हे चांगल्या मार्गाने ( नीतिमत्तेने )चालून सर्व चुकांची दुरुस्त झाली पाहिजे. आणि हेच तारण आहे.

**१. त्रैक्याची शिकवण**

ऐतिहासिक ख्रिस्ती श्रद्धा ही त्रैक्यावर आधारलेली आहे. देव हा त्रैक्यातून ऐक्य असा आहे. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा - पिता जो सर्व जगा चा निर्माता असून इतिहासकार आहे. पुत्र जो इतिहासाला तारण प्राप्त करून देतो व पवित्र आत्मा जो या इतिहासाला सतत पवित्र करून स्फूर्ती देतो.

**२. ख्रिस्ती विश्वासाच्या अंतिम कल्पना**

ख्रिस्ती विश्वासाच्या अंतिम तीन कल्पना आहेत.

**अ. वैश्विक** - सर्व मानवजातीला पूर्णावस्था प्राप्त होईल .

**ब. सशर्तता** - सातत्य ठेवणाऱ्यांनाच मुक्ती मिळेल .

**क. सार्वकालिक सुख** -चांगले आत्मे स्वर्गात जातील तर वाईट आत्मे नरकात जातील.

३. **ख्रिस्तकेंद्रित इतिहासाचा दृष्टीकोण**

ख्रिस्ती इतिहास हा संपूर्णतः येशू ख्रिस्ताचा जन्म, त्यांची शिकवण, त्याचे मरण व पुनरुत्थित जीवन यावर आधारलेला आहे हे सर्व देवाचे प्रकटीकरण समजले जाते व येशु ख्रिस्ताचा पूर्वीचा सर्व इतिहास हा ख्रिस्त तारणाऱ्याच्या जन्माच्या तयारीचा इतिहास समजला जातो.

**आपली प्रगती तपासा**

१. मध्ययुगीन चर्च इतिहासलेखनपद्धती व दृष्टिकोण स्पष्ट करा.

**४. ख्रिस्ती इतिहासलेखक :**

इ.स. तिसऱ्या शतकाच्या पूर्वार्धात झालेला सेक्सटस ज्यूलियस आफ्रिकानस (Sextus) Julius Africanus) हा मध्ययुगातील पहिला ख्रिस्ती इतिहासकार मानला जातो. तोवर प्रचलीत असलेल्या भिन्न ग्रीक व रोमन कालगणना पद्धतींचा बायबल मधील घटनाक्रमाशी समन्वय साधण्याचा प्रयत्न त्याने आपल्या Chronographia ह्या ग्रंथात केलेला आढळतो.

**अ. युसीबियस (Euseblus)**

ख्रिस्ती धर्मनिष्ठ इतिहासलेखनात युसीबियस (इ. स. २६०-३४०) याचे महत्त्वाचे स्थान आहे. त्याचे वास्तव्य पॅलेस्टाईनमध्ये होते. येथे रोमन जगातील सर्वांत समृद्ध ग्रंथालय होते. येथे उपलब्ध असलेल्या मौलिक ग्रंथांचा सखोल अभ्यास करून युसीबियसने चार प्रसिद्ध ग्रंथ लिहिले. Chronographia हा चर्चचा पहिला महत्त्वाचा इतिहास असून त्यात विश्वाच्या निर्मितीपासूनचा इतिहास ग्रंथित केलेला आहे. ह्या लिखाणात तत्कालीन ज्ञात असलेल्या इजिप्शीयन, सुमेरियन, ग्रीक, रोमन व बायबलमधील अशा सर्व कालगणना पद्धतींचा समन्वय साधून कालनिर्धारण केले आहे. पुढे ह्या ग्रंथाचा जेरोम याने लॅटिन भाषेत अनुवाद केला. पाश्चात्य जगावर त्याच्या पडलेल्या प्रभावामुळे कालगणनेत एकसूत्रता निर्माण होऊन आधुनिक कालगणना पद्धती उदयाला आली. Ecclesiastical History हा त्याचा दुसरा

ग्रंथ होय. दहा भागात शब्दबद्ध केलेल्या या ग्रंथात चर्चचा चिकित्सक आढावा घेतलेला आहे. Life of Constantine हा रोमन सम्राट कॉन्स्टन्टाईनचा चरित्रपर ग्रंथ असून तो काहीसा प्रशंसापर झाला आहे. सर्व घडामोडी पूर्वनियोजित असतात, रोमन साम्राज्य हा देखील ख्रिस्त जन्मापूर्वीचा पूर्वनियोजित भाग होता असे भाष्य तो करतो. Lives of the Martyrs हा हौतात्म्य पत्करलेल्या ख्रिस्ती संताच्या कार्यावरील ग्रंथ चमत्कार कथांनी भरलेला आहे. पुढे अशाच प्रकारची संतचरित्रे ख्रिस्ती धर्मगुरूंनी लिहिली. त्यापैकी जेरोम याने लिहिलेले सेंट पॉलचे चरित्र विशेष उल्लेखनीय आहे. चर्चचा पद्धतशीर व अभ्यास पूर्ण इतिहास लिहिल्यामुळे युसीबियसला "ख्रिस्ती धर्मनिष्ठ इतिहासाचा जनक' असे संबोधण्यात येते.

### ब. सेंट ऑगस्टीन (Saint Augustine इ.स. ३५४-४३०)

सेंट ऑगस्टीन हा ख्रिस्ती इतिहासलेखन परंपरेतील अग्रगण्य इतिहासकार मानला जातो. जन्माने गैरख्रिस्ती असला तरी ख्रिस्ती धर्माचा अंगिकार केल्याने त्याला असीम मानसिक स्वास्थ्य मिळाले असे तो सांगतो. The Confessions हा त्याचा आत्मचरित्रपर ग्रंथ असून त्यात अतिशय प्रांजलपणे आपली आध्यात्मिक वाटचाल त्याने वर्णिली आहे. मात्र ऑगस्टीनला प्रसिद्धी मिळवून देणारा ग्रंथ The City of God हा होय. इ. स. ४१३ ते ४२६ ह्या तेरा वर्षांच्या कालावधीत सुमारे १२०० पृष्ठांचा हा ग्रंथ बावीस भागात लिहिलेला आहे. इ.स. ४१० साली गाँथ आक्रमकांनी रोमवर हल्ले करून त्या रोमन साम्राज्याच्या वैभवशाली केंद्रस्थानाची नासधूस केली. या दुर्दैवी घटनेसाठी ख्रिस्ती धर्मावर ह्या धर्माने प्राचीन देवदेवतांकडे पाठ फिरवली म्हणून त्या देवदेवतांनी रोमला शिक्षा केली, असा दोषारोप काही ख्रिस्ती धर्मविरोधक करू लागले. ह्या आरोपाचे खंडन करण्याची निकड धर्मनिष्ठ ऑगस्टिनला प्रतीत झाली व त्या हेतूने त्याने The City of God हा रूपकात्मक ग्रंथ लिहीला. या ग्रंथात त्याची मानवाच्या इतिहासाविषयीची तात्त्विक भूमिकाही स्पष्ट झाली आहे. ह्या विश्वात दोन महानगरे आहेत एक नगर परमेश्वराचे असून, चर्च हे त्याचे लौकिक जगातील प्रतिनिधी आहे. हे चिरंतन प्रेमाने भरलेले असून त्या प्रेमाची अनुभूती व उदात्त आत्मिक, आध्यात्मिक ज्ञानाची, परमेश्वराची प्राप्ती चर्चच्या माध्यमातून होते. दुसरे नगर म्हणजे लौकिक जग, ही सैतानाची निर्मिती आहे. त्याची निर्मिती पहिल्या पापातून, पहिल्या मानवाने आदमने ईश्वरी आशेचा भंग करून केलेल्या पापातून झालेली आहे. त्यामुळे ते नगर पापाने, अनिष्ट दुष्ट प्रवृत्तीने भरलेले आहे, नाशवंत आहे, तर दैवी शक्तीचे नगर निरामय आनंदाने, प्रेमाने भरलेले चिरकालीन स्वरूपाचे आहे. अखेरच्या न्यायनिवाडाच्या दिवशी दुष्ट लौकिक जगाचा अंत होणार आहे. असा परमेश्वराचे व चर्चचे महत्त्व प्रतिपादित करणारा विषय ऑगस्टिनने नगरांच्या रूपकाद्वारे मांडलेला आहे. मध्ययुगीन खिस्ती तत्त्वज्ञानाचा प्रभावी आविष्कार या ग्रंथात आढळतो असे मत विल ड्यूरंट यांनी व्यक्त केले आहे. राज्य म्हणजे लौकिक जगातील शासकीय यंत्रणा व चर्च यातील परस्परसंबंधाचे स्पष्टीकरण ऑगस्टीनने या ग्रंथात केलेले असून, त्याच बीजाच्या आधारे पुढील कॅथलिक धर्मगुरूंनी धर्मनिष्ठ राज्याचा सिद्धांत- धार्मिक शक्तीपुढे शासन सत्ता गौण असल्याचा सिद्धांत प्रतिपादित केला.

ऑगस्टिनने ह्या ग्रंथात केवळ परमेश्वराचा नव्हे तर मानवाचाही विचार मांडला आहे. मात्र त्याच्या मते मानव अपूर्ण आहे. त्याला बुद्धी असली तरी परमेश्वराच्या मदतीशिवाय व

कृपेशिवाय तो कोणत्याही कार्यात यश मिळवू शकत नाही. पहिल्या पापाच्या परिणामामुळे तो आपल्या इच्छेनुसार कार्य करण्यास असमर्थ बनला आहे. यामुळे पावलोपावली परमेश्वराच्या कृपेची गरज त्याला भासते. परमेश्वर मानवी जीवनाचे नियोजन व नियंत्रण करतो. परमेश्वराला अशा रीतीने मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी बसविण्याची परंपरा ऑगस्टिनने घालून दिली व तीच पुढे कायम चालविली गेली. अशा आशयाच्या लिखाणाला दैववादी (patristic) असे बिरुद लावण्यात येते. ऑगस्टिनच्या लिखाणातून मानवी जीवनातील घडामोडी चक्राकार गतीने नव्हे तर सरळ रेषेत चालतात (Linear) हे ख्रिस्ती तत्त्वज्ञानाचे प्रमेय स्पष्ट होते.

ऑगस्टीनने घालून दिलेल्या पायंड्यानुसार रूपकाच्या आधारे लेखन करणारे पाचव्या व सहाव्या शतकातील दोन प्रसिद्ध इतिहासकार म्हणजे ग्रेगरी द ग्रेट व आयसीडोर हे होत. त्यांनी ख्रिस्ती धर्मविचार रूपकांच्या माध्यमातून मांडला. त्यानी पवित्र व अपवित्र धार्मिक व लौकिक अशा दोन भागात इतिहासाची विभागणी केली. ख्रिस्ती धर्मतत्त्वांना पोषक ठरेल अशी मानवी जीवनाची मांडणी त्यांनी केली. सहाव्या शतकात झालेल्या डायोनीसीअस एक्सीगस (Dionisius Exigues) याचे ख्रिस्ती धर्मनिष्ठ लिखाणाला केलेले महत्त्वाचे योगदान म्हणजे त्याने ख्रिस्ताचा जन्म हा मानवाच्या इतिहासातील विभाजन बिंदू मानून घटनांची मांडणी ख्रिस्तपूर्व व ख्रिस्तोत्तर अशा प्रकारे केली. पुढे तीच कालगणना पद्धती रूढ झाली.

### क. बीडे (Bede- इ.स. ६७३-७३५)

इंग्लंडमध्ये होऊन गेलेला ख्यातनाम ख्रिस्ती इतिहासकार होय. तो धर्मशास्त्राचा अभ्यासक आणि गणित, विज्ञान, व्याकरण इत्यादी विषयातही प्रकांड पंडित होता. इतिहासाबरोबरच ह्या विषयांवरही त्याने विपुल लिखाण केले. त्याचा सर्वात मौलिक ग्रंथ Ecclesiastical History of the English Nation हा होय. रोम, जर्मनी, गॉल अशा विविध प्रदेशांतून मिळविलेल्या माहितीच्या आधारे त्याने हा ग्रंथ लिहिला. विषयाच्या विवेचनाच्या ओघात संबंधित कागदपत्रांतून अधिकृत अवतरणे तो देतो. प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या घटनांच्या नोंदी यात केलेल्या आहेत. यामुळे पाच भागात लॅटिन भाषेत लिहिलेला हा ग्रंथ धर्मनिष्ठेबरोबरच वास्तवावर आधारलेला दिसतो. इ.स. ५९७ पासून ७३१ पर्यंतच्या महत्त्वाच्या घटनांचा ह्या ग्रंथात आलेला तपशील विश्वासार्ह मानला जातो. शिवाय त्याची लेखनशैली नीरस व रटाळ नसून प्रभावी व आकर्षक आहे. ऐतिहासिक सत्याचे महत्त्व तो जाणतो. "असत्य लिखाण परमेश्वराला स्वीकारार्ह ठरणार नाही." आणि माझ्या लेकरांनी असत्य वाचावे हे मला खपणार नाही' ह्या त्याच्या विधानांवरून त्याचे ऐतिहासिक सत्याच्या महत्त्वाचे आकलन स्पष्ट दिसते. On the Reckoning of Time हा त्याचा व्यापक इतिहास विषयावरील ग्रंथही विषयाच्या व शैलीच्या दृष्टीने मोलाचा मानला जातो. त्याला 'इंग्लिश इतिहासलेखनाचा जनक' मानले जाते. त्याच्या लिखाणातील विषयाची खोली, व्यापकता व साहित्यिक शैली यांसाठी जे. डब्लू. थॉमसन ह्या इतिहास समीक्षकाने त्याची प्रशंसा केली आहे.

अशा धर्मनिष्ठ इतिहासलेखनाच्या प्रमुख प्रवाहाबरोबरच थोड्या प्रमाणावर का होईना, परंतु लौकिक विषयावर लेखन करणारे काही इतिहासकार सहाव्या शतकानंतर होऊन गेले.

त्यात सहाव्या शतकातील कॅसीओडोरस (Cassiodorus) याचा History of the Goths त्याच कालखंडातील प्रोकोपिअस (Procopious) याचा History of Our Own Times ह्या ग्रंथाचा उल्लेख आवश्यक ठरतो. सहाव्या शतकापासून इंग्लंडमधील काही धर्मगुरूंनी वार्षिक घटनांच्या नोंदी करण्यास (Annals) प्रारंभ केला. ह्या नोंदी कालनिर्देशासह होत असल्याने पुढील पिढ्यांना तत्कालीन घटनांच्या माहितीसाठी अशा वार्षिकी मोलाच्या ठरल्या. अशा लिखाणाचे रिचर्ड होवडेन (Richard Hoveden) याचे The Annals of English History हे उत्तम उदाहरण होय. या बरोबरच विशिष्ट प्रदेशात किंवा शहरात घडलेल्या घटनांच्या नोंदी करण्याची प्रथाही इंग्लंडमधील काही मठवासियांनी सुरू केली. मध्ययुगाच्या उत्तरार्धात अशी विशिष्ट प्रदेशातील घडामोडींची इतिवृत्ते मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली. तसेच मोठ्या नगरांची इतिवृत्तेही शब्दांकित झाली. अशा इतिवृत्तांत Chronicle of London, Chronicle of Florence ही माहितीपूर्ण म्हणून विशेष उल्लेखनीय ठरतात.

धर्मयुद्धांचा प्रारंभ झाल्यानंतर ख्रिस्ती जगाचा संबंध युरोप बाहेरील अज्ञात जगाशी आल्यामुळे ख्रिस्ती मनाचे क्षितिज विस्तारले. अरब संस्कृतीचा परिचय होऊन नव्या विचारांचे स्फुरण होऊ लागले. यामुळे अकराव्या शतकापासूनच्या लेखनात धर्मनिष्ठा व लौकिक विषयाचा काही अंशी समन्वय आढळून येतो. अशा लिखाणात बाराच्या शतकातील जर्मन लेखक ओटो (Otto) याच्या The Two Cities ह्या जागतिक इतिहासावरील ग्रंथाचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. यात त्याने विश्वाच्या निर्मितीपासून पहिल्या धर्मयुद्धापर्यंतचा लौकिक घडामोडींचा इतिहास धार्मिक दृष्टिकोणाच्या साच्यात बसविला आहे. त्याचे लिखाण चिकित्सक असून त्यात चमत्कारांना स्थान दिलेले नाही. त्याने लिहिलेले जर्मन सम्राट पहिला फ्रेडरिक याचे चरित्र प्रसिद्ध आहे. त्यात तो फ्रेडरिक बरोबरच त्याच्या काही समकालिनांची माहिती चिकित्सकपणे देतो. मुख्य म्हणजे फ्रेडरिकच्या पोपशी झालेल्या भांडणाचे विवेचन करताना काही मूळ कागदपत्रांतील व फ्रेडरिकच्या भाषणांतील उतारे तो उद्धृत करतो. यावरून इतिहासविषयीची त्याची जाण व्यक्त होते. म्हणून जे. डब्लू. थॉमसन यांनी त्याला 'इतिहासाचा पहिला चिकित्सक भाष्यकार असे संबोधले आहे.

### ड. जर्मन तत्वज्ञ योहान हेर्डर (१७४४ १८०३)

त्याच्या मते, सर्व मानवांची उत्पत्ती एकाच मुळापासून होत असल्याने धर्मतत्त्वानुसार सर्व माणसे परस्परांचे बंधू असतात; म्हणून मानवामध्ये शारीरिक व वांशिक पायावर जे भेद केले जातात त्याचा हेर्डरने धिक्कार केला आहे. त्याचे इतिहासाचे तत्वज्ञान प्रगतीच्या सिद्धांतावर आधारित आहे. त्याच्या मतानुसार जगाचा इतिहास हा साकार होणाऱ्या ईश्वराच्या संकल्पशक्तीची पूर्तता आहे आणि तिच्यात प्रत्येक राष्ट्रीय समूह मानव जातीचा इतिहास घडविण्याच्या कामात आपली वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावून भर घालीत असतो.

लेसिंग, हामीन, गोयथे, याकोबी यांनी इतिहासामध्ये धर्मशास्त्राच्या आधारे मानवी मनोव्यापार शोधण्याचा प्रयत्न केला. शिवाचे (God) ज्ञान मानवाला त्यांच्या हृदयाच्या साहाय्याने मिळते. त्याला शिवामुळेच अंतर्ज्ञानाचा मार्ग मिळतो. हे तत्त्वज्ञ इंग्लंडमधील

'रोमॅन्टिक कालखंडाच्या' (१७९८-१८३४) काळाशी संबंधित आहेत. त्या विचारसरणीचा प्रभाव त्याच्या तत्त्वज्ञानावर पडलेला दिसतो.

**इ. योहान फिश्टे (१७६२-१८१४)**

यानंतर महत्त्वाचा तत्वज्ञ म्हणजे **योहान फिश्टे (१७६२-१८१४)** यानेच जर्मनीमध्ये राष्ट्रभक्ती, स्वदेशप्रेम, राष्ट्रीयता, अस्मिता जागी करण्याचा मोठा प्रयत्न केला. या संकल्पनांमध्ये दैवी अधिष्ठान असते अशी याची प्रमुख धारणा आहे. जर्मन लोकांच्या श्रेष्ठत्वाची कल्पना त्याने मांडली. जर्मन राष्ट्रवादाचा पाया फिश्टेने घातला. फिश्टेने चिद्वादाला तर्कशास्त्राचे स्वरूप दिले. त्यांच्या मते, ईश्वर ही गतिमान नैतिक प्रक्रिया आहे. अशा ईश्वराभोवती इतिहास फिरतो. ही फिश्टेची धर्मशास्त्रवादी संकल्पना.

**फ. फ्रिडिश शेलिंग (१७८५-१८५४)** याच्या मते, इतिहासात धर्म आणि धार्मिक श्रद्धा या मूलभूत असतात. कोणतेही कार्य करण्यास तत्त्वज्ञान असमर्थ असते म्हणून धर्म हा तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ असतो.

**ग. गेओर्ग हेगेल (१७७०-१८३१)** याने इतिहासामध्ये 'परम सत्' ची संकल्पना मांडली. हेगेलची द्वंद्वविलासी पद्धत (Dialectical System) जगन्मान्य आहे. जगात जे घडते ते ईश्वरी संकेताप्रमाणे घडते असे हेगेलच्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानाचे सार आहे.

युरोपमधील ईश्वरशास्त्रीय सिद्धांताला पहिला मोठा धक्का दिला तो कार्ल मार्क्सने. धर्म ही अफूची गोळी आहे असे म्हणून मार्क्सने धर्म ही संकल्पना बाजूला सारून कर्माला प्राधान्य दिले.

आतापर्यंत आपण मध्ययुगीन युरोपीय धर्मशास्त्रीय दृष्टिकोण पाहिला. आता आपल्याला भारतीय धर्मशास्त्रीय दृष्टिकोणाची माहिती घ्यावयाची आहे. अनुक्रमाच्या दृष्टीने प्राचीन कालखंड आधी देणे आवश्यक आहे परंतु एकदा युरोपीय धर्मसंकल्पना पाहिल्यावर अनुक्रमाने प्राचीन व मध्ययुगीन भारतीय धर्मशास्त्रीय इतिहासविषयक दृष्टिकोण आपल्यापुढे मांडता यावा म्हणून अनुक्रमाशी असा समझोता केला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. ख्रिस्ती इतिहासलेखकांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण लिहा.

### ३.२.५ भारतीय धर्मशास्त्रीय (हिंदू)दृष्टिकोण

प्राचीन भारतीय विद्वानांचा इतिहासाकडे पाहण्याचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण कशा प्रकारचा होता. याविषयी खूप मोठ्या प्रमाणात संशोधन झाले आहे. विशेषतः ब्रिटिश भारतामध्ये आल्यावर या विषयावर संशोधन सुरू झाले. या क्षेत्रात ब्रिटिशांनी पहिल्यांदा संशोधन केल्यामुळे सुरुवातीस त्यांच्या भारताच्या इतिहासासंबंधी असणाऱ्या दृष्टिकोणाचा विचार करू व नंतर याच विषयावर भारतीय प्राच्य विद्या पंडितांनी (Orientalist) कसा विचार केला ते पाहू. ब्रिटिश प्राच्य विद्या पंडितांनी (Indologist) जरी स्पष्ट शब्दांत धर्मशास्त्रीय दृष्टिकोण मांडला नाही तरी त्यांनी प्राचीन भारताचे अंतरंग शोधण्याचा प्रयत्न केला ही बाबसुद्धा अतिशय महत्त्वाची आहे.

ब्रिटिशांनी भारतामध्ये प्राच्य विद्येचा अभ्यास करण्यापूर्वी दोन हेतू डोळ्यासमोर ठेवले होते. (१) ब्रिटिशांची जिज्ञासू वृत्ती (Spirit of Enquiry) (२) संस्कृत भाषेचा अभ्यास करणे हे होते. हे दोन्ही हेतू भारतामध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे या हेतूने प्रेरित होते.

रॉबटो डी नोबिली (१५७७-१६५८) हा पहिला युरोपीय संस्कृत पंडित. याला 'जेसुईट ब्राह्मण' असे म्हणत असत. नंतर जर्मन जेसुईट फादर हेन्रिच रूथ ह्याने संस्कृत भाषेवर प्रचंड प्रभुत्व मिळविले. अशाच प्रकारे जेसुईट हॉक्झलडेन, फादर पॉलिनस इत्यादींची नावे घ्यावी लागतील. मिशनरी लोकांमध्ये फिलिपी ससेटी (१५४४ ते १५८८), फ्रेंच मिशनरी जिन बेली (१७३६ ते १७९९) यांचा उल्लेख न करणे अन्यायकारक होईल. परंतु प्राच्य विद्या संशोधनाची खरी सुरुवात विलियम जोन्स याच्यापासून झाली. त्याने १७७४ साली रॉयल एशियाटिक सोसायटी'ची स्थापना केली. जोन्सला 'भारतीय प्राच्य विद्येचा जनक' मानतात. त्यांचे कार्य तीन क्षेत्रांत विद्वानांनी मान्य केले आहे.

१. इंडो-युरोपीय भाषांचे मूळ त्याने शोधून काढले.

२. सॅन्डर कोटस म्हणजेच चंद्रगुप्त मौर्य हे त्यानेच शोधले.

३. कालिदासाच्या शाकुंतलचे इंग्रजीमध्ये भाषांतर करून इंग्लिश व युरोपीय जनतेला बहाल केले. जोन्सने प्राचीनकालीन धर्म व तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून धर्मशास्त्रीय दृष्टिकोण भारतीयांना बहाल केला. त्याने गीत-गोविंद, हितोपदेश प्रसिद्ध करून भारतीयांचा दृष्टिकोण जगापुढे मांडला. चार्लस विकिन्स (जन्म १७५०) याने भगवत्गीतेचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. विकिन्सने संस्कृत भाषेचे व्याकरण प्रसिद्ध केले. रॉबर्टसन याने भारतीय तत्त्वज्ञान व साहित्य इंग्रजीमध्ये आणून प्राचीन भारतीयांची युरोपीय जनतेला तोंडओळख करून दिली. भगवत्गीतेमधून जगाला परमेश्वराचे महत्त्व पटवून द्यावयाचे आहे असा अर्थ रॉबर्टसनने लावला. परमेश्वर एकच आहे असा अर्थ रॉबर्टसनला दिसला. त्याने ब्राह्मणांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

ग. ज. वॉरेन हेस्टिंग्जने सुरुवातीच्या प्राच्य विद्या पंडितांना प्रोत्साहन दिले. त्यानंतर कोलब्रूक, विल्सन प्रिन्सेस यांनी आपापल्या परीने हिंदू धर्मात परमेश्वर व त्याचे अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न केला. जेम्स प्रिन्सेपने (१७८९ ते १८४०) अशोकाच्या शिलालेखाचे वाचन केले, नाणकशास्त्राचा पाया घातला. मॅक्स मुल्लर, मोनियर, विलियम्स यांनी संस्कृत भाषा, भारतीय तत्त्वज्ञान यांची ओळख करून घेऊन भारतीय इतिहास व धर्मशास्त्र यांचा संबंध प्रस्थापित करून दाखविला.

प्राचीन भारतीय साहित्यामध्ये असणारा धर्मशास्त्रीय विचार अनेक भारतीय विद्वानांनी जगापुढे आणला. त्यामध्ये प्रो. डी. आर. भांडारकर, प्रो. के. पी. जयस्वाल, प्रो. आर. सी. मुजुमदार, रे चौधरी, पी. सी. बागची, जे. एन. बॅनर्जी, कृष्णास्वामी अय्यंगार, के.ए. नीलकंठशास्त्री, दीक्षितार, महालिंगम्. के. के. पिल्ले, सी. एस. श्रीनिवासाचारी, पा. वा. काणे, फादर हेन्री हेरास, बा. वी. मिराशी, ए. एस. आळतेकर इ. विद्वानांची नावे घेणे आवश्यक आहे. प्राचीन भारतीय विद्वानांमध्ये शुक्राचार्य व शुक्रनीतीमध्ये राज्याच्या

निर्मितीला दैवी सिद्धांताची जोड दिली आहे. राज्य ही दैवी देणगी आहे असे शुक्राचार्य सांगतो.

राज्याची सप्तांगे ही मानवी देहाच्या सप्तांगाशी जोडून दाखविता येतात. राजा हा शरीरावर असणाऱ्या मस्तकाप्रमाणे महत्त्वाचा आहे. मंत्री हे व्यक्तीच्या डोळयासारखे आहेत. राजमित्र हे कानासारखे आहेत, खजिना म्हणजे राजाचे मुखच होय. राजाचे हात म्हणजे किल्ले होत. थोडक्यात, शुक्राचार्याने  राजाची व सप्तांगाची तुलना केली आहे. राज्य निर्मितीचा दैवी सिद्धांत मांडत असताना शुक्राचार्याने, देव व राज्य यांची तुलना केली आहे. परमेश्वराने इंद्र, वायू, अग्नी, सूर्य, वरुण, चंद्र व कुबेर यांच्यापासून एकेक गुण घेऊन राज्य निर्माण केले असे शुक्रांनी म्हटले आहे. राजामध्ये दैवी अंश असतो असे शुक्राचार्यांचे मत आहे. राजाने करावयाच्या कर्तव्याशी शुक्राने दैवी कार्यपद्धतीशी सांगड घातली आहे. राजाची निवड होत असताना काही निकष सांगितले आहेत, उदा. राजा हा सर्वांत वडील मुलगा असावा. त्याला कोणत्याही प्रकारचा रोग नसावा. ज्याप्रमाणे महारोग, मुकबधिर, आंधळा, षंढ इ. वैगुण्य त्याच्या ठिकाणी नसावेत. राजासंबंधी शुक्राचार्याने वेगळा सिद्धांत मांडला आहे. याला शुक्राचार्यांचा सार्वभौमत्वाचा सिद्धांत म्हणतात. त्याची सार्वभौमत्वाची संकल्पना राजत्वाचे मूळ, राजाचे पद आणि राजाची कर्तव्ये या तीन गोष्टीवर आधारित आहेत.

१) इंद्र, वायू इ. देवतांच्या शाश्वत अंशांनी राजाची निर्मिती होते. या जन्मातील तपश्चर्या आणि पूर्वजन्मातील पुण्य यामुळे राजा सार्वभौमत्व गाजविण्यास पात्र ठरतो.

२) राजाचे स्थानच असे असते की, त्यामुळे त्याला आपोआप सार्वभौमत्व मिळते.

३) कर्तव्य पालन ही त्याच्या सार्वभौमत्वाची कसोटी. ती सात देवतांची पृथ्वीवरील रूपे माता, पिता, गुरू, बंधू, मित्र, कुबेर यांच्याशी कसा वागतो यावर अवलंबून असतात. कारण ही सातही स्थळे देवतांची रूपे आहेत असे शुक्र मानतो. शुक्राने राज्याची तुलना "प्रकृती'शी केली आहे. मजेशीर बाब अशी की शिवाजी महाराजांनी शुक्रनीतीप्रमाणेच आपले मंत्रिमंडळ बनविले. महाभारतामध्ये राज्याच्या निर्मितीबद्दल दोन सिद्धांत मांडले आहेत. त्यानुसार राज्यांच्या निर्मितीपूर्वी जग हे स्वर्गाप्रमाणे सुखी, शांत होते. त्याला सुवर्णयुग असे म्हणतात. तेव्हा राज्य ही संकल्पना नव्हती. हळूहळू जगात दुर्गुणांचा विकास झाला व त्यामधून राज्याची निर्मिती झाली. म्हणजे राज्याची निर्मिती ही दैवी देणगी आहे. लोकांनी देवांना विनंती करून राजाची मागणी केली म्हणजे राजाची निर्मिती हीसुद्धा दैवीच मानली आहे. जनतेने राजाला इंद्र, यम, वरुण यांचे पृथ्वीवरील रूप मानून त्याच्या आज्ञांचे पालन करावे. मनुस्मृतीमध्ये ही राजाची निर्मिती दैवी मानली आहे. रंजलेली, गांजलेली प्रजा ब्रह्मदेवास भेटली व त्यांनी आपल्याला दु:खातून सोडविण्यासाठी कोणालातरी पाठवावे अशी मागणी केली व मग त्याने राजाला पाठविले म्हणून राजाची निर्मिती ही दैवी आहे. राज्याची निर्मितीसुद्धा दैवीच असते असे मनुस्मृती मानते. कौटिल्याने मात्र राजा व राज्याच्या निर्मितीबाबत व्यवहारी दृष्टिकोण स्वीकारला आहे. भगवद्गीतेमध्ये अवतारांची कल्पना मांडली आहे. विष्णूचे आठ अवतार असून ते अनुक्रमे मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम व कृष्ण, बुद्ध व कलंकी अशा क्रमाने पृथ्वीवर आले व त्यांनी भक्तांची संकटे दूर केली. गीतेमध्ये म्हटले आहे की जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते तेव्हा परमेश्वर अवतार

घेतो. या अवतार कल्पनेपैकी शेवटचा अवतार कलंकी तेवढा होण्याचे बाकी आहे. हिंदू धर्मात चार पुरुषार्थाची धर्म, अर्थ, काम, मोक्षाची कल्पना मांडली आहे. अनेकेश्वर वादाची संकल्पना हिंदू धर्मात सांगितली आहे. चार युगांची संकल्पना कृत, त्रेय, द्वापर व कली युगांची कल्पना भारतीय धर्मशास्त्राने मान्य केली आहे. सप्त चिरंजीवांची संकल्पना हिंदू धर्मशास्त्राने मान्य केली आहे. परशुराम, अश्वत्थामा, बळी, व्यास, हनुमान, विभीषण व कृप हे चिरंजीव आहेत. हे सर्व कोणत्या ना कोणत्या कारणाने धर्मशास्त्र व भारतीय इतिहासाशी जोडलेले आहेत. या चिरंजीवांपैकी काहींचा संबंध प्रत्यक्ष इंद्र पद मिळविण्याशी आहे. उदा. बळी, विभीषण व कृपाचार्य, परशुरामाचा संबंध कोकण, कोकणस्थ व पृथ्वी निःक्षत्रिय करण्याच्या प्रक्रियेशी आहे. प्रो. रोमिला थापर यांनी 'इतिहास-पुराण परंपरेसंबंधी' विवेचन केले आहे. त्यामध्ये त्यांचे प्राचीन भारतासंबंधी काही विचार पुढीलप्रमाणे -'शतपथ ब्राह्मण' मध्ये मनुसंबंधी पुराणकथा आहे. हा मत्स्य सिद्धांत भारतीय कल्पनेचा संबंध सुमेरियन पुराच्या कल्पनेशी जोडणारा आहे. मनूचा वडील मुलगा इक्ष्वांकू याने सूर्यवंशाची स्थापना केली. त्यामध्ये पुढे राम अवतार झाला. मत्स्य पुराणाचा संबंध विष्णु अवताराशी आहे, ऋग्वेदाने चार वर्षांचा उगम दिला आहे, हा तर भारतीय समाजरचनेचा १९५५ पर्यंत भाग बनून राहिला होता. पुरुषसूक्ताची निर्मिती ही प्राचीन भारतीय वर्णव्यवस्थेशी संबंधित आहे. पुराण कथानी समाजामधील विविध गटांना एकत्र बांधण्याचे कार्य केले. बौद्ध साहित्यामधून शाक्य, लिच्छवी, मल्ल व कोलीयया जमातीचा उगम समजतो. या कथांसाठी 'चक्रेनियम' ही संकल्पना मान्य केली आहे. महाकाव्यांना ऐतिहासिक दर्जा प्राप्त झालेला आहे. ते नुसतेच साहित्य मानले जात नाही. इतिहास पुराण ही परंपरा खास भारतीय आहे. पुराण परंपरा तोंडी पद्धतीने अस्तित्वात राहिली. अलीकडे "Oral Tradition" ला महत्त्व आपण देतो. वर्ण व जाती यांचे अस्तित्व प्राचीन काळी होते पण कोणत्याही वर्णाला राजघराणे आंदण दिलेले नव्हते यावरून राजेशाही संपादन करावयाची असते, वंशदायाने मिळत नाही हे भारतीय इतिहासाने दाखवून दिले आहे. वंशचरितम् ही लेखन परंपरा इतिहास दर्शन घडविते. वंशावळीवरून समाजरचना कळते. भारतीय युद्ध ही घटना प्राचीन कालखंड ठरविण्यास साहाय्य करते. काळाची अटळता (Inevitablity) ही प्राचीन वाङ्मयातील भविष्यवाणीमधून आपल्याला समजते. बौद्ध वाङ्मयात 'बदल' या संकल्पनेची प्रचिती येते. सर्वसाधारण हिंदूंची धर्मशास्त्रीय संकल्पना अशा प्रकारची असल्याचे दिसते. हाच हिंदूंचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण होय. प्रो. रामशरण शर्मा म्हणतात, 'हिंदूंनी उत्क्रांतिवाद स्वीकारला नाही तर चक्रेनियम स्वीकारला.

प्रो. अनंत सदाशिव आळतेकर यांनी 'स्टेट ॲन्ड गव्हमेंट इन एन्शंट इंडिया' या ग्रंथात व्यक्त केलेले काही विचार आपण पाहू. प्राचीन भारतामधील बऱ्याच संस्थांचा उगम दैवी शक्तीशी जोडण्यात येत असे. 'महाभारत व दिगनिकाय' हे धर्मग्रंथ जरी भिन्न भिन्न काळातील असले तरी त्यांच्या मतामध्ये साम्य दिसून येते. दोन्ही ग्रंथांमध्ये सुवर्णयुगाची कल्पना मांडली आहे. जगामध्ये मत्स्न्याय होता, तो संपविण्यासाठी ब्रह्मदेवाने कायदेसंहिता या मानवप्राण्यांना दिली. कायदेसंहितेत अयोनी संभव अशा 'विरजस' नावाच्या पुरुषाची निर्मिती केली, त्याला राजेपद बहाल केले. राज्याच्या निर्मितीचा दैवी सिद्धांत प्राचीन समाजामध्ये प्रचलित होता.

बौद्ध धर्मीयांचा परमेश्वरावर विश्वास नसल्याने त्यांनी राज्याचा उगम दैवी घटनेमध्ये मांडला नाही.

जिनसेन या जैन तत्त्ववेत्त्याच्या मते, "पूर्वी जगामध्ये नंदनवन (भोगभूमी) होते, तेव्हा कल्पवृक्ष मानवाच्या सर्व गरजा भागवित असे. कालांतराने जगात अराजक माजले, तेव्हा पहिला तीर्थंकर ऋषभनाथाने राजा, अधिकारी, जाती व व्यवसाय निर्माण करून समाजाची स्थापना केली. नारद, बृहस्पती स्मृतींनी राज्याच्या निर्मितीचा दैवी सिद्धांत मांडला आहे.

महाभारतामध्ये असे म्हटले आहे की, परमेश्वरानेच समाजाच्या रक्षणासाठी राजा पृथ्वीवर पाठविला. प्राचीनकालीन सभा व समिती या प्रजापतीच्या कन्या आहेत असे मानले जात असे. त्यांची निर्मिती समाजाच्या उद्धारासाठी झाली आहे असे प्राचीन विद्वानांचे मत होते. राजेपदाच्या निर्मितीसंबंधी असाच दैवी सिद्धांत मांडला आहे. पूर्वी देव व दानव यांच्यामध्ये युद्धे चालू असत. त्यामध्ये देवांचा पराभव होत असे, तेव्हा त्यांना नेतृत्व देण्यासाठी राजेपदाची नियुक्ती ब्रह्मदेवाने केली म्हणजेच राजेपद दैवी आहे अशी प्राचीनकाळी धारणा होती. इंद्र हा देवांचा राजा झाला, त्याने दानवांचा पराभव केला.

**आपली प्रगती तपासा**

१. भारतीयांचा धर्मशास्त्रीय (हिंदू)दृष्टिकोण लिहा.

### १. हिंदूंचा धर्मविषयक कल्पना

काही कारणास्तव हिंदू तत्वज्ञानाच्या इतिहासाची कल्पना तयार करणे कठीण आहे कारण त्यातील ऐतिहासिक घटना खूपच तुटपुंजा घडामोडी व घटना यावर आधारित आहेत .तरीपण ऋग्वेद, रामायण, महाभारत आणि पुराणे यामध्ये अनेक प्रकारची ऐतिहासिक माहिती आपणास मिळते. परंतु ती बहुता काल्पनिक कथा व गोष्टी च्या रूपात आढळते.

उपनिषदे आणि ब्राह्मणांच्या मते इतिहास म्हणजे घटनेचे मुद्दाम केलेले वर्णन होय. महाभारत म्हणजे इतिहासाचे विस्तृत रूप आहे. अर्थशास्त्राचा प्रणिता कौटिल्य यांच्या मते चार वेद, पुराणे, इतिवृत्ते, आख्यायिका, उदाहरणे आणि धर्मशास्त्र या सर्वांतून इतिहास निर्माण होतो. म्हणून इतिहासाची कल्पना फार विस्तृत अशी आहे. हिंदू ऐतिहासिक कल्पनेतून नीतीतत्वे व नीतिशास्त्र यांना महत्त्व प्राप्त झाले असून ते पुराण व वेदातून प्रकट होते .

हिंदू कल्पनेनुसार ब्रह्माने विश्व निर्माण केले असून तोच त्याचा पालन करता व नाशकर्ता आहे .' ब्रह्म 'ही कल्पना अतिउच्च मानली जाते . त्यातून गुंतागुंतीचे असे ' कल्प आणि युग', कर्म आणि पुनर्जन्, अवतार, पुरुषार्थ व वर्णाश्रमाची योजना असे सिद्धांत मांडले जातात.

### १. वैयक्तिक आस्था

हिंदू ऐतिहासिक कल्पनेनुसार प्रत्येक व्यक्तीला त्याचे कर्तव्य त्याच्या जन्मांतरानुसार पाळावी लागतात .वैयक्तिक प्रकारे निवड करून आपले भवितव्य घडवण्याची मुभा आहे. तरीसुद्धा सामाजिक मूल्यांची जोपासना करावीच लागते.

### २. अवतार या कल्पनेचा सिद्धांत

हिंदू पौराणिक कथेनुसार देवाने निरनिराळ्या वेळी दहा वेळा या पृथ्वीवर अवतार घेतला आहे आणि सत्याला संरक्षण देऊन असत्याचा नायनाट केला आहे. यातून चांगले व वाईट यामध्ये संघर्ष होऊन शेवटी चांगल्याचा विजय होतो हा सिद्धान्त मांडला आहे.

### ३. कर्म

हिंदुत्व हे फळाविना कर्म या कल्पनेवर जास्त भर देते .प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या वैयक्तिक योग्यतेप्रमाणे कर्म करावे लागते पण हे कर्म स्वार्थासाठी नसून समाजासाठी असते. कर्म करीत असताना फळाची अपेक्षा बाळगू नये हा महत्त्वाचा नियम पाळणे आवश्यक आहे. कर्म करीत असताना डोळ्यासमोर स्वार्थ नसावा. तसेच भौतिक गोष्टीचे आकर्षण नसावे तर केवळ ते देवासाठी आपण करीत आहोत ही श्रद्धा असावी.

### ४. चार आश्रम

ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम हे हे चार आश्रम आहेत. संन्यासाश्रमातून मोक्षाच्या कल्पनेला महत्त्व देण्यात आले आहे.

### ५. हिंदुत्व तारणाचे तीन मार्ग

१. ज्ञानमार्ग २. कर्ममार्ग ३. भक्तिमार्ग हे हिंदुत्व तारणाचे तीन मार्ग आहेत. यातील कोणताही एक मार्ग पत्करून व्यक्ती आपल्या मोक्ष साधू शकते .प्रार्थनेद्वारे देवाशी जवळीक साधून देव कृपा मिळवता येते.

### ६. डॉ. राधाकृष्णन हिंदुत्वाबद्दल दृष्टिकोण

डॉ. राधाकृष्णन यांच्या मते हिंदुत्व हा विचार नसून तो जीवनाचा एक मार्ग आहे. ती एक चळवळ वैयक्तिक स्वार्थाबरोबर परमार्थ साधणे व विशेषतः परिवर्तीत जीवनाद्वारे स्वतः व समाजाला परिपूर्ण बनविणे होय.

### ७. कालचक्र आणि ईश्वरीसुत्र संकल्पना

प्राचीन भारतीयांनी इतिहासलेखनाला फारसे महत्व दिले नाही तरीपण इतिहासा विषयी, कालप्रवाहाविषयी, स्थित्यंतरे आणि त्यामागील कालसूत्रे यांविषयी पुष्कळ विवेचन ऋग्वेद काळापासून पुढे अनेक शतके करण्यांत आले आहे

इतर प्राचीन संस्कृती प्रमाणे भारतांत सुध्दा दैवीशक्तीवर अढळ विश्वास होता .निसर्गात बदल घडविणाऱ्या देवता या मानवी जीवनाच्या नियंत्रक होत्या . परमेश्वर हा कर्ताकरविता असून माणसे ही त्याच्या हातांतील खेळणी ,बाहुल्या आहेत . आपण काही करतो म्हणून

काहीतरी घडत असते असे माणसांना वाटते तें भ्रामक आहे . उलट परमेश्वर अशा माणसाकडून सर्व करून घेतो हा विचार हिंदू संस्कृतीत मूळ धरून आहे . माणूस हा परमेश्वराच्या वैश्वीक जीवनाचा एक छोटासा अंश आहे . सर्व काही आहेत त्या परमेश्वराच्या लीला आहेत आणि प्रत्येक घटनेमागे परमेश्वरी सूत्र आहे अशी कल्पना प्राचीन भारतीय साहित्यात ठिकठिकाणी आढळते.

मन्वंतर, कल्प, महायुग, युगधर्म यांचा साहित्यांतून प्रदीर्घ विचार करण्यांत आला आहे . वास्तविक पाहता ' युग ' ही कल्पना पाच - सहा वर्षांची आहे परंतु पुढे ' युग ' याचा अर्थ हजारो, लाखो वर्षांचा कालखंड पुराणांनी रूढ केला. सत्य, येता, व्यापर आणि कलियुग ही कल्पना रूढ झाली आणि मानवी समुहांची जीवनाची पध्दती ज्या युगातील धर्मानुसार निश्चित झाले. या काळांत मानवी समुहाचे क्रमाक्रमाने अध: पतन होणार आहे व कलियुगांत तर सर्व वाईट गोष्टी घडून दुष्काळ, रोगराई, सुध्दे, दारिद्रय याची परिसीमा गांठली जाईल असे भाकीत वर्तवण्यात आले आहे.

बौद्ध आणि जैन या भारतीय धर्मानी ब्राहमणधर्माविरुध्द बंड करून मानवी समुहाविषयी नव्या कल्पना मांडल्या. ' युग ' या कल्पनेत बौद्ध ग्रंथकार म्हणतो, " एक चांगला शंभर हात लांब, तितकाच रुंद आणि उंच असा भरीव, कुठेही खाच - खळगा नाही आणि असा धोंडा असावा व त्याच्याजवळ एका माणसाने येऊन रेशमी कापडाने तो धोंडा पुसावा व तो धोंडा झिजण्यास जेवढा कालावधी लागेल त्याला ' युग ' म्हणावे ". कालचक्र ही कल्पना ब्राहमण, बौद्ध आणि जैन धर्माने मांडली आहे व स्वीकारली आहे. हिंदू धर्मात परमेश्वर हे चक्र चालवितो अशी कल्पना आहे आणि बौद्ध ,जैन धर्मात परमेश्वराचे अस्तित्व नाकारले आहे इतकाच फरक आहे. परंतु हे कालचक्र विशिष्ट दिशेने आणि गतीने फिरते यावर सर्वांचा विश्वास आहे. या तिघांनी या कालचक्रांतून सुटका करून घेण्यासाठी मार्ग सांगितले आहेत.

मोक्ष किंवा निर्वाण हेच ते मार्ग होत. सर्व सुखदुःखाच्या पलिकडे जाण्याची, सर्व अवस्थांतून बाहेर पडण्याची गुरुकिल्ली म्हणजे मोक्ष होय. मोक्ष मिळविलेल्या किंवा निर्वाणपद प्राप्त झालेल्या व्यक्तीला कालचक्राचे काय ? पण यामध्ये एक विचार केला आहे व तो म्हणजे ' कालचक्र ' ही कल्पना स्वीकारली आहे . फक्त वैयक्तिक पातळीवर केलेल्या प्रयत्नांतून माणूस या कालचक्रांतून स्वत: ची सुटका करून घेऊ शकतो असे म्हटले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. हिंदूंच्या धर्मविषयक कल्पना काय होत्या?

## ३.२.६ मुस्लिमांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण

### १. मुस्लीम विचारवंत

मुस्लीम इतिहास परंपरेमध्ये धर्मशास्त्राला अग्रस्थान आहे. मुस्लीम इतिहासपरंपरेमध्ये पुढील विचारवंत होऊन गेले.

### अ. फाराबी (८७० - ९५०)

**फाराबीने** राजकीय विचार मांडले. फाराबीने पितृसत्ताक राज्यपद्धतीचा सिद्धांत मांडला. सार्वभौमत्वाबद्दल त्याने बारा गुणांची मालिका सांगितली आहे. त्याने शक्ती सिद्धांत, सेंद्रिय सिद्धांत व सामाजिक फ्रंसंविदा सिद्धांत मांडले.

### ब. मावर्दी (९७४-१०५८)

**मावर्दीने** खलिफाला परमेश्वराचा पृथ्वीवरील प्रतिनिधी मानले आहे. मावर्दी हा शाफी स्मृतिसंप्रदायाचा पुराणमतवादी तत्त्वज्ञ होता. त्याच्या मते, 'इमामपद' हे जगात 'सत्य' आणि 'कल्याण' नांदावे म्हणून परमेश्वराने निर्माण केले आहे. इमामने धर्मसंरक्षण व राजकीय संबंध संरक्षण केले पाहिजे असे मावर्दीचे मत होते.

### क. निजाम उल-मुल्क तूसी (१०१७-१०९१)

**तुसीच्या** मते, परमेश्वर मानवाला राजेपद प्रदान करतो. त्याचे कार्य योग्य रीतीने व समाधानकारक रीतीने पार पाडण्यासाठी परमेश्वर त्याला आवश्यक ती सत्ता देतो असे **तुसीला** वाटते. परमेश्वराने दिलेल्या सत्तेला तुसी 'प्रतिष्ठा' (Prestige) म्हणतो.

### ड. घझाली (१०५८-११११)

**घझाली** केवळ भौतिकवादापेक्षा आध्यात्मिक आनंदाला जास्त महत्त्व देतो. राज्यातील कायद्याला इस्लामी कायद्याची मंजुरी असली पाहिजे असे घझाली मानतो.

### इ. इब्न खलदून (१३३२-१४०६)

**इब्न खलटूनने** चार सिद्धांत मांडले. यापैकी एका सिद्धांतामध्ये काही बाबतीत धर्म हा राज्याचा पाया होय असे घझाली मानतो. कुराणामध्ये राजा व राज्याच्या निर्मितीसंबंधीचे दैवी सिद्धांत मांडले आहेत. झियाउद्दीन बरानी, शमसुद्दीन सिराज आफिफ यांनी इतिहासामध्ये धर्मशास्त्र शोधण्याचा प्रयत्न केला. शमसुद्दीन आफिफने म्हटले आहे, प्रत्येक व्यक्तीने आपल्या पापाचा पाढा वाचून परमेश्वराला शरण जावे. सर्वांनी परमेश्वराला घाबरावे. परमेश्वराचे ठिकाणी न्याय व शहाणपण मानवाला मिळते. नीच माणसांना तोंड देण्याचे सामर्थ्य मानवाला परमेश्वरावरील विश्वासानेच प्राप्त होते.

### आपली प्रगती तपासा

१. मुस्लिमांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण सांगा.

## २. इतिहासातील इस्लामची कल्पना

सातव्या शतकात अरेबियामध्ये इस्लाम धर्म स्थापन झाला. शेवटचा व महान संदेष्टा महंमद ह्यांना झालेल्या प्रकटीकरणावर इस्लामचा इतिहास आधरलेला आहे. इस्लाम म्हणजे ईश्वरास पूर्णपणे शरण जाणे.

**अ. तत्वे**

१ . देव ऐक्य असून त्याची इच्छा प्रमाण आहे .

२ . निर्मितीचा इतिहास व परंपरा

३ . उपदेश नियम व त्याच्या धार्मिक पालनाचे महत्त्व

**ब. कुराण**

ईश्वर प्राप्ती देणारा ग्रंथ पवित्र असून इस्लामचा हा महत्त्वाचा ग्रंथ आहे .कुराणातील घटना खऱ्या असून त्यावर श्रद्धा असणे महत्त्वाचे आहे कारण इस्लाममध्ये श्रद्धेला महत्त्व आहे.

**क. अल्ला**

इस्लामनुसार अल्ला हा एकमेव देव आहे .तोच मध्यवर्ती असून सर्व काही त्याच्याद्वारेच आहे . कुराणातील प्रत्येक अध्याय हा अल्ला कल्याणकारी व दयाळू आहे या वचनाने सुरू होते. अल्ला सर्व समर्थ,शक्तिशाली, ज्ञानी व दयाळू आहे. आणि तो सर्वात श्रेष्ठ आहे. तोच निर्माण कर्ता व तारणकर्ता आहे.

**ड. देव मानव सबंध**

इस्लाम प्रमाणे मानव हा देवाचा प्रतिनिधी आहे .देवाशी अध्यात्मिक संबंध मानवाला जोडता येतो. देवाला मानवाविषयी आस्था व प्रेम आहे म्हणून देवाने अनेक संदेश संदेष्ट्याद्वारे मानवाचे मार्गदर्शन केले आहे. म्हणूनच देवाची इच्छा प्रमाण मानून मानवाने देवाचे सर्व नियम पाळले पाहिजेत.

**इ. गुणांचे महत्त्व**

इस्लाम मध्ये अनेक गुणांचे महत्त्व सांगितले आहे. प्रामाणिकपणा, नम्रता, क्षमा, धैर्य, आस्था, सहनशीलता व उच्च नीतिमत्ता या गुणांच्या द्वारे मानव देवाच्या इच्छेनुसार जीवन घडवू शकतो .कुराण मानवास इतर धर्मियाबरोबर समानतेने व पासा बंधुभावाने वागण्याची शिकवण देते. इस्लाम समूह जीवनाला महत्त्व देतो व मूर्तिपूजा निषिद्ध मानतो.

**३. सुफी संप्रदाय**

मुस्लीमकालीन धर्मशास्त्रीय संकल्पनांचा विचार करीत असताना आपल्याला सुफी संप्रदायाचा विचार करावा लागतो. सुफी संप्रदाय हा इस्लाममधील गूढवादाचा निर्देश करतो. हा मुसलमानी सर्वेश्वरवादी गूढवाद आहे. दयाधन परमेश्वराला पूर्णपणे शरण जाणे व परमेश्वर संपूर्ण जगात भरून राहिला आहे यावर विश्वास ठेवणे हे सुफी संप्रदायाचे मुख्य सूत्र आहे. मक्का व मदिना येथील सुरा आध्यात्मिक भावनेने व त्यागाच्या कल्पनेने भरून गेलेल्या असत. आत्मसमर्पण व त्याग या तत्त्वांचे प्रतिबिंब या सुरामधून दिसून येते. सुफी संप्रदायामध्ये ईशचिंतन, नामोच्चार व प्रार्थना यावर अधिक भर देण्यात आला आहे. ईश्वराच्या अस्तित्वावर सुफींची पूर्ण श्रद्धा आहे. त्यांना अद्वैताची कल्पना आहे. फना (निर्वाण), सलूक (अष्टांग मार्ग), मराकबा (राजयोग), करामत (अलौकिक शक्तीचा वापर) ही

चार तत्त्वे मुफी पंथाची खास वैशिष्ट्ये आहेत. मानव व परमेश्वर यांचे संबंध ईश्वरनिर्मित मानले आहेत. परमेश्वराचे प्रतिबिंब निसर्ग व मानव या दोन्हींमध्ये दिसते.

**आपली प्रगती तपासा**

१. इतिहासातील इस्लामची कल्पना सांगा.

### ४. मोगलकालीन धर्मशास्त्रीय संकल्पना

दिल्लीच्या सुलतानाच्या राजकीय परंपरा, तुर्की व पर्शियन परंपरांचा वारसा मोगलांना मिळाला होता. हिंदूंचे राजकीय विचार व पद्धती यांचाही त्यांच्यावर प्रभाव पडलेला आपल्याला दिसतो. मोगल राज्य हे धर्मसत्ताक राज्य होते. बाबराची राजपदाची कल्पना म्हणजे तैमूरलंग व चेंगीजखान यांच्या विचारांचा परिपाक होता. वंशपरंपरा राजसत्तेवर बाबराचा विश्वास होता. बाबराच्या विचारानुसार ईश्वरी अंशावर त्याचा विश्वास होता. बादशहा म्हणजे परमेश्वराची सावली मानली जात असे. अकबराने अकबरनामा व ऐने अकबरीमध्ये राजेपदाची कल्पना मांडली आहे. धर्मनिरपेक्ष तत्त्व, सूर्यापासून राजाची झालेली उत्पत्ती व राजामधील ईश्वरी अंश यावर अकबराचे राजपद अवलंबून आहे. ही सत्ता ईश्वरनिर्मित असल्याने त्याला निरंकुश सार्वभौमत्वाचा गुणधर्म असतो असे मानतात, राजा हा ईश्वरी अंश आहे ही कल्पना मोगलांना मान्य आहे. या कल्पनेवर हिंदूंचा प्रभाव दिसतो, प्रजा म्हणजे राजाकडे दिलेली अनामत आहे. राजाने त्यांना प्रेमाने व आपुलकीने वागवावे. सर्वच मोगल बादशहानी या तत्त्वांची अंमलबजावणी केली असे नव्हे तर औरंगजेबाच्या काळात धर्मांध बादशाही आपल्याला दिसते.

## ३.३ आदर्शवादी दृष्टिकोण (चिद्वाद) (Idealistic School)

### ३.३.१ आदर्शवादाचा अर्थ

आदर्शवाद हा इतर सर्व ऐतिहासिक संकल्पनेपासून वेगळा आहे . नैतिक व आध्यात्मिक प्रतिक्रिया म्हणून आदर्शवादाकडे पाहिले जाते. आदर्शवादावर पहिले स्पष्ट वक्तव्य हे ग्रीक तत्त्वज्ञानी प्लेटो या महान विचारवंताने ५ व्या शतकात केले होते .त्यांने विचारांचे महत्त्व ओळखले होते. ज्या वेळेला व्यक्तीजवळ असलेले ज्ञान हे चिकित्सावृत्तीचे असते, त्या वेळेला त्या व्यक्तींचे विचार हे शाश्वत व दीर्घकाळ टिकणारे असतात ही भावना प्लेटोने अस्तित्वात आणली. प्लेटोचेच विचार पुढे हेगेल ह्यांनी आदरणीय दृष्टिकोनातून १९ व्या शतकात मांडले. त्यांनी सांगितले की " शाश्वत व पुरोगामी विचार हे कोणत्याही काळात बदलत नसतात."

१९ व्या शतकात भूतकाळातील जास्तीत जास्त घटना प्रकाशात येऊ लागल्या .त्या सर्व घटनांचे शास्त्रीय दृष्टिकोनातून चिकित्सक वृत्तीने शुद्धीकरण करून त्यातील सत्य फक्त घेण्यात आले. तथापि भूतकाळातील घटना गाळून घेण्याचे काम १९ व्या शतकातील विचारवंतानी आपल्या पुरोगामी विचाराद्वारे केले. ह्या विचारवंताचा प्रभाव लोकांवर पडला. त्यांचा ऐतिहसिक दृष्टिकोन संशोधनात्मक बनला. त्यातूनच पुढे संशोधक निर्माण झाले व भूतकाळातील निरनिराळ्या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण होऊ लागले. चिद्वाद म्हणजे सत्य, आदर्श असाही त्याचा एक अर्थ आहे.

### ३.३.२ आदर्शवादाचे (चिद्वादाचे) स्वरूप

**चिद्वादाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल :**

विश्वाचे अंतिम मूलतत्त्व मन हे असते. या मनामध्ये चेतनागर्भ व जाणीव म्हणजे ज्ञान असते. असे जे मन असते त्या मनास Knowing Mind असे म्हणतात. मनाची अशी ही स्थिती मानणारा जो तत्त्वसंप्रदाय त्याला चिद्वाद असे म्हणतात. जड तत्त्वाला जाणीवयुक्त मनाहून स्वतंत्र अस्तित्व नाही. उदा. सफरचंद गोड आहे या विधानातील सफरचंद व त्याची रुची यांना (म्हणजे पदार्थ व त्याचा गुण) कोणी तरी चव घेणाऱ्या माणसाच्या अपेक्षेने अस्तित्व असते असे बर्कले म्हणतो. या चिद्वादाचा अनेक शास्त्रांत आपणाला प्रत्यय येत असतो. ज्ञानशास्त्रातील चिद्वाद (Epistmological Idealism) यामध्ये ज्ञान प्रक्रियेत ज्ञेय वस्तूहून ज्ञात अधिक श्रेष्ठ आहे. ज्ञेय वस्तूशिवाय ज्ञाता राहू शकतो पण ज्ञात्याशिवाय ज्ञेय वस्तूला अस्तित्व नाही. चिद्वादातील आणखी एक स्वरूप म्हणजे मूल्यवादातील चिद्वाद (Axiological Idealism) होय. या चिद्वादामध्ये विश्वातील साध्या, सोप्या रचनेच्या वस्तूपासून संकीर्ण वस्तूपर्यंत एकप्रकारचा सुसंवाद असतो.

### ३.३.३ आदर्शवादाचे (चिद्वादाचे) मुख्य प्रकार

चिद्वादाचे मुख्य दोन प्रकार आहेत.

**१. व्यक्तिनिष्ठ चिद्वाद**

यामध्ये बाहेरील विश्व व त्यातील वस्तूंचे अस्तित्व प्रत्येक जाणीवयुक्त मनातील इच्छा व प्रेरणा यावर अवलंबून असते. प्रत्येक मन हे दुसऱ्या मनाहून स्वतंत्र आहे.

**२. वस्तुनिष्ठ चिद्वाद**

या प्रकारात प्रत्येक जाणीवयुक्त मन हे एका वैश्विक मनाचा (Universal Mind) एक घटक आहे. हे वैश्विक मन हीच खरी वस्तुनिष्ठ सत्ता - इतर मने व त्यातील संकल्प, इच्छा यांना स्वतंत्र अस्तित्व नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. आदर्शवादाचा अर्थ, स्वरूप व प्रकार स्पष्ट करा.

### ३.३.४ आदर्शवादी विचारवंत (Idealistic Thinker )

आता आपण आदर्शवाद या संकल्पनेबद्दल त्या त्या विचारवंताचा सविस्तर आढावा घेणार आहोत .या विचारवंतांमध्ये मुख्यत: हेगेल , बेंनडेटो क्रोसे आणि आर. जी. कॉलींगवुड ह्यांचा समावेश होतो.

## १. जॉर्ज विल्हेल्म फ्रेडरिक हेगेल (Georg Wilhelm Fredrich Hegel) (इ. स. १७७० ते १८३१)

### अ) हेगेलचा पूर्ववृत्तांत

जॉर्ज हेगेल याचा जन्म २७ ऑगस्ट, १७७० रोजी जर्मनीतील स्टुटगार्ट या वुर्टमबर्गच्या राजधानीच्या शहरात झाला. हेगेलचा पिता एक महसूल अधिकारी होता. हेगेलचे सुरुवातीचे शिक्षण एका ग्रामर स्कूलमध्ये झाले. हेगेलच्या बालमनावर त्याच्या आईचा प्रभाव पडलेला दिसतो. त्याची आई चांगली शिकलेली व बुद्धिमान असावी. हेगेलला लुईस या नावाचा एक भाऊ व ख्रिस्तिआनी या नावाची एक बहीण होती. हेगेल व त्याची भावंडे यांचे संबंध गाढ प्रेमाचे व स्नेहाचे होते. त्याच्या घरचे वळण खानदानी स्वरूपाचे होते. त्याला लहानपणापासून प्रामाणिकपणा, काटकसरीपणा व कष्टाळूपणा यांची सवय लावण्यात आलेली होती. आपल्या शालेय जीवनात तो कोणत्याही असामान्य गुणाने चमकला नाही. वयाच्या आठव्या वर्षी 'ट्यूबीगेन' (Tubingen) विद्यापीठात तो ईश्वरशास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी गेला. त्याच विद्यापीठात त्याची शेलिंग व होल्डरलीन या भावी काळातील दोन विद्वानांशी मैत्री झाली. या तीन हुशार तरुणांच्या मैत्रीमधून अनेक विषयांवर तात्त्विक चर्चा होत असे. हेगेल वृत्तीने आनंदी व विनोदी होता. विद्यापीठातील शिक्षणक्रमात त्याच्यावर कांटच्या तत्त्वज्ञानाचा चांगला प्रभाव पडला. हेच तत्त्वज्ञान त्याने वेगळ्या भाषेत मांडावयास सुरुवात केली.

१७९५ साली त्याने 'Life of Jesus' हे येशू ख्रिस्ताच्या जीवनातील पुस्तक लिहिले व या पुस्तकात येशू खिस्तास 'दिव्य मानव' समजून त्याने वर्णन केले आहे. १७९७ साली त्याने 'Critique of Positive Religion' या नावाचा दुसरा ग्रंथ लिहिला. १८०१ साली त्याला येना विद्यापीठात नोकरी मिळाली व तेथे त्याने 'Difference between the Philosophical System of Fichte and Shelling' हा ग्रंथ लिहिला. १८०५ साली हेगेल विद्यापीठात प्राध्यापक बनला. १८०७ साली त्याने 'Phenomenology of Spirit' या नावाचा ग्रंथ लिहिला. १८०८ ते १८१६ या काळात तो न्यूरेम्बर्ग येथे रेक्टर म्हणून राहिला. न्यूरेम्बर्ग येथेच त्याने १८११ साली मारी फोन ट्यूशर या महिलेशी विवाह केला. १८१६ साली त्याने आपला सर्वांत प्रसिद्ध 'Logic' हा ग्रंथ लिहिला. १८१७ मध्ये त्याने Encylopaedia of the Philosophical Sciences in Outline' हा ग्रंथ लिहिला. १८१८ मध्ये तो, बर्लिन विद्यापीठात प्राध्यापक म्हणून आला व त्याच्या मृत्यूपर्यंत तो तेथेच राहिला. १८३१ साली कॉलऱ्याच्या साथीला तो बळी पडला. रॉइशने म्हटल्याप्रमाणे हेगेलचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार नव्हते. दुसऱ्यावर छाप पाडण्यासारखे त्याचे रूप नव्हते. त्याच्या स्वभावात उघडपणे भव्य, दिव्य दिसणारे काहीही नव्हते. हेगेलचे मोठेपण हे त्याच्या रूपात नसून त्याच्या कार्यात साठविलेले आहे. हेगेलचा चरित्रलेखक रेझेन क्रॉग म्हणतो की, हेगेल फिश्तेसारखा देशभक्त नव्हता, नोव्हालीसारखा स्वप्नरंजन करणारा नव्हता. शेलिंगप्रमाणे तात्त्विक दृष्टांत पाहणारा कवीही नव्हता. हेगेलच्या जीवनात त्याचे चित्त रोमांचित करणारे व अंतःकरण ढवळून काढणारे असे काहीही नव्हते. कल्पनेच्या गगनात तो प्रतिभेच्या जोरावर भरा-याही मारत नसे. कॉपलस्टन म्हणतो की, हेगेल हा निर्विकार व काहीसा नीरस पद्धतीने बौद्धिक आकलन करणारा होता. त्याचा सर्वात मोठा

गुण म्हणजे कष्टाळूपणा, चिकाटी व कर्तव्यबुद्धी होय. हेगेलचे तत्त्वज्ञान एका विशिष्ट पार्श्वभूमीवर उभे करण्यात आले आहे.

### ब. हेगेलच्या तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी (Hegel's Philosophical Background)

हेगेलचे तत्त्वज्ञान हे संपूर्णपणे त्याने स्वतः निर्माण केलेले नाही. त्याचे तत्वज्ञान फिश्ते व शेलिंगच्या तत्वज्ञानावर आधारित आहे. फिश्तेची विचारसरणी तार्किक पद्धतीवर अवलंबून असे. हेगेल अशा पद्धतीशी सहमत होता. शेलिंगची वैचारिक मांडणी बुद्धिवादी व वैज्ञानिक पायावर केलेली होती. हेगेलने शेलिंगचे हे तत्त्व मान्य केले आहे. फिश्ते, शेलिंग व हेगेल यांच्यातील साम्य असे की, जगातील अंतिम सत्ता जड, गतिहीन नसून ती गतिमान, विकसनशील व चैतन्यशील आहे. हेगेलच्या मते, निसर्ग, मन, बुद्धी व प्रज्ञा ही सर्व एकच आहेत. जी प्रक्रिया बुद्धीत किंवा प्रज्ञेत कार्य करते तीच निसर्गात प्रत्येक ठिकाणी कार्य करते. जगात जे जे विद्यमान आहे ते सर्व बुद्धिगम्य (Rational) आहे व जे बुद्धिगम्य आहे ते वास्तव आहे. निसर्गसुद्धा तर्कावर आधारित आहे. हेगेलच्या मते, परमसत् हे एक ज्ञातृत्त्व (Subject) आहे. ज्ञातृतत्त्व प्राणमय व जिवंत असून ते सतत विकास पावत असते. हेगेतच्या मते, घडणारी प्रत्येक हालचाल, क्रिया व विश्वातील सर्व घडामोडी या जाणीवविरहित विचारातून होत असतात. म्हणून त्याच्या मते, निसर्गामध्ये जितकी नियमबद्धता असेल तितकी ती क्रिया बुद्धिशील असेल. जेव्हा उद्दिष्टाकडे परमसत् वाटचाल करीत असते तेव्हा स्वतःची जाणीव होते. याचाच अर्थ विश्वाच्या या प्रक्रियेत माणसाला सत्याचा शोध लागतो. कुशमन म्हणतो की, फिश्तेने नीतीचा उपदेश केला. शेलिंग निसर्गप्रेमी आहे तर हेगेल बुद्धिनिष्ठ विचारसरणीचा आहे. तो पुढे म्हणतो की, हेगेलचे वैशिष्ट्य असे की, त्याच्या आधी जे चिद्वादी विचारवंत होऊन गेले त्यांचे इतस्ततः विखुरलेले धागे त्याने एकत्र आणले व त्यामधून त्याने एक स्वतंत्र विचारप्रणाली निर्माण केली. कांट त्याचाही मूलभूत आधार आहे. हेगेलचा चिद्वादी कालखंड हा त्याच्याबरोबरच संपला. चिद्वादाचा कालखंड हा १७९० ते १८३१ असा होता. ही चिद्वादी चळवळ फक्त जर्मनीपुरतीच मर्यादित राहिली. युरोपीय तत्त्वज्ञानामध्ये गूढवाद (Mysticism) अधूनमधून डोके वर काढीत असे. त्याच्या विरोधात हेगेलने आपले तत्त्वज्ञान मांडले. हेगेलने आपल्या मूळ संकल्पनेमध्ये निरपेक्ष चिद्वाद (Absolute Idea) ही कल्पना मांडली. याचा अर्थ असा की, कोणतीही वस्तू इंद्रिय वेदनेला कारणीभूत असेल तर तिचे ज्ञान हे मनोनिर्मित असते व अशा मनोनिर्मित वस्तूला निरपेक्ष चिद्वाद असे म्हणतात.

### क. हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा आधार (Basis of Hegelian Philosophy)

हेगेलच्या तत्त्वज्ञानाचे मूलभूत स्वरूप अंतिम सत्ता किंवा विश्व हे निरपेक्ष आहे. काही काळामध्ये घडणाऱ्या विविध अवस्थांमधून ते जात असते व शेवटी ते मानवाच्या प्रज्ञेत आले की ते माहीत होते. हेगेलच्या मते, हे जे परमसत् आहे ते कालनिरपेक्ष, शाश्वत, सर्वगामी व स्वयंप्रेरित आहे. एका गोष्टीचा दुसऱ्या गोष्टीशी संबंध कसा जोडला आहे हे दाखवून देण्यासाठी हेगेल जी पद्धत वापरतो तिला द्वंद्वविकासी (Dialectic) असे म्हणतात.

हेगलच्या या द्वंद्वविकासी पद्धतीबद्दल राईट म्हणतो की, हेगेलची युक्तिवादाची पद्धत डेकार्टेसारखी नाही. ज्या विधानासंबंधी संशय घेता येत नाही अशी विधाने सिद्ध करण्याचा तो प्रयत्न करीत नाही. त्याच्या पद्धतीमध्ये ज्या असंख्य विविध घटना व घटक वस्तू असतात त्या परस्परांवर अवलंबून असतात. त्याची ही जी पद्धत आहे त्या पद्धतीला प्रणाली म्हणतात. त्याच्या या प्रणालीमध्ये व्यापक, सर्वगामी, सर्वस्पर्शी, सर्वसमावेशक अशी गुणवैशिष्ट्ये आहेत व ही प्रणाली सिद्ध करता येते. त्याच्या मते, सत्य हे साकल्य (Whole) म्हणजेच पूर्ण असते व प्रत्येक युक्तिवाद हा बुद्धिनिष्ठ असतो. जे बुद्धिगम्य असते ते सत्य असते व जे सत्य असते ते बुद्धिगम्य असते.

थीली म्हणतो की, हेगेलच्या तत्त्वज्ञानाने निसर्ग व मानवी अनुभवाचे जग जाणण्याचा प्रयत्न केला जातो. तत्त्वज्ञानाच्या आधाराने या जगातील प्रत्येक वस्तूमध्ये सूप्तरूपाने जी बुद्धी किंवा प्रज्ञा असते ती शोधण्याचा प्रयत्न केला जातो. या जगातील प्रत्येक गोष्टीला व घटनेला अर्थ असतो. प्रत्येक प्राण्याच्या किंवा वस्तूच्या वागण्यात प्रयोजन, हेतू व अर्थ असतो.

## ड. हेगेलचे सिद्धांत पुढील दोन तत्त्वांवर आधारित आहेत

१. एकतेच्या दृष्टीने जग हे बुद्धिगम्य असले पाहिजे.

२. बुद्धिगम्य जग हे मुख्यत्वे व्याघातपूर्ण असते.

अशा व्याघातपूर्ण विसंगतीवर आधारलेल्या जगाकडे दुर्लक्ष करून हेगेल या विसंगतीतून सुसंगती पाहण्याचा प्रयत्न करतो. त्यालाच विसंगतीचा नियम (Law of Inconsistence) असे म्हणतात. हेगेलच्या कल्पनेप्रमाणे पूर्णांचा (Whole) अंशाशी (Part) संबंध असतो व ही गोष्ट जिवंत वस्तू, प्राण्यांची शरीरे यांच्यामध्ये दिसून येते. उदा. हात, पाय, डोळे, कान तोडले तर त्याचे कार्य बंद पडते. पूर्ण व अंश यांच्यातील संबंधावरून जिवंत समग्रता (Organic Whole) ही कल्पना त्याने मांडली.

## इ. हेगेलने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये पुढील गोष्टींचा विचार केला आहे

### १. वैश्विक एकता (Cosmic Unity)

हेगेलने परमसत् किंवा Absolute ची कल्पना मांडली आहे. ही कल्पना म्हणजे सर्वसमावेशक, सर्वस्पर्शी, सर्वगत व पूर्णत्वाची आहे. उदा. आपण आताचा क्षण घेतला तर तो इतर क्षणांपासून वेगळा करता येत नाही. तसेच, मागील क्षण घेतला नाही तर आपल्याला स्मृती होऊ शकत नाही. म्हणून भूतकाळाच्या संदर्भाशिवाय वर्तमानकाळातील घटना किंवा क्षण हे माणसाला समजू शकत नाहीत. व्यक्तीची जाणीव ही एक सातत्याची गोष्ट आहे. या गोष्टीच्या मागे व पुढे ज्या दोन गोष्टी असतात त्यांना भूतकाळ व भविष्यकाळ असे म्हणतात. या तिन्हींही काळांतील संबंध अतूट असतात. मानवाचा विद्यमान समाज त्यातील व्यक्ती, गट, समूह, संस्था, संघटना, प्रवृत्ती, शिकवण यांचा चांगला-वाईट, सौंदर्याचा, असौंदर्याचा, सत्याचा, असत्याचा, परस्पर साहाय्यक, परस्पर पोषक असा परिणाम होत असतो व या परिणामांमध्ये जी एकसूत्रता दिसते तिला वैश्विक एकता असे म्हणतात.

## २. परमसत् (Absolute)

हेगेलची परमसत्ची कल्पना ही सर्वांत महत्त्वाची संकल्पना आहे. हे परमसत् जगाच्या निर्मिती पूर्वीसुद्धा अस्तित्वात होते व या परमसत्ने जगाची उत्पत्ती केव्हा केली हे समजणे शक्य नाही. हेगेलच्या या मताला राइटने पुष्टी दिली आहे. तो म्हणतो की, हे परमसत् दिक्कालाच्या चौकटीत स्थिर बसणारी अशी वस्तू नाही. हे परमसत्इतिहासाचे अन्वयार्थ पूर्ण सकल, समग्र, सर्वस्पर्शी, सर्वगत व सर्वव्यापी असून त्याला स्वत:ची जाणीव असते. हेगेलच्या तत्त्वज्ञानात याच परमसत्चे विराट रूप आपल्याला दिसून येते. परमसतूच्या जोडीलान हेगेलने सान्त वस्तू व घटना यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. परमसत हे गतिमान असून अप्रत्यक्षपणे ते स्वतःच्या विविध आकारांत व रूपांत आविष्कृत होत असते. परमसत् अपारदर्शक व अभेद्य अशी सत्ता नसून ते विश्वातील सर्व आविष्कारांच्या वर, मागे आणि आत भरून राहिलेले आहे. हेगेलची ही परमसत्ची कल्पना ईश्वराच्या संकल्पनेसारखी वाटते.

## ३. अमूर्त आणि मूर्त (Abstract and Concrete)

**हे**गेलच्या परमसतच्या संकल्पनेनंतर विकासाच्या प्रक्रियेत अमूर्त व मूर्त या दोन संकल्पनांचा संबंध येतो. ज्यावेळी एखाद्या गोष्टीचे इतर संबंध लक्षात न घेता ती एकटीच सुटी व विभक्त आहे असे समजून पाहिली जाते तेव्हा ती अमूर्त (Abstract) असते असे मानतात आणि ज्यावेळी एखादी वस्तू इतर जिवंत वस्तूंच्या संदर्भात पाहिली जाते तेव्हा ती मूर्त (Concrete) आहे असे मानतात. राईट म्हणतो की, झाडाचे एखादे पान सूक्ष्मदर्शक यंत्राखाली ठेवून पाहिले तर जे दिसेल ते अमूर्त होय व हेच पान जर झाडावर इतर पानांच्या जोडीने पाहिले तर ते मूर्त होय. हेगेल अमूर्त सामान्य (Abstract Universal) आणि मूर्त सामान्य (Concrete Universal) यांच्यात फरक करतो. हेगेलच्या मते, एखाद्या मूर्त सामान्य घटनेमध्ये गुणात्मक परिवर्तन होऊन त्याचे रूपांतर उच्च प्रतीच्या वस्तूत होते व ती वस्तू नव्या रूपाने जिवंत राहते. अशाप्रकारे विरोधी गोष्टीत रूपांतरित होणाऱ्या वस्तूच्या या क्रियेला द्वंद्वात्मक प्रक्रिया (Dialectical Process ) असे म्हणतात. मूर्त व अमूर्त आणि परमसत् यांना एक संसक्ती (Cohesion) आणि आकार (Form) यांची आवश्यकता असते. परमसत्ची समग्रता ही आत्म्याचा विकास दाखवून देते. परमसत्च्या विकास प्रक्रियेत कोणती तरी एक मूलभूत योजना असते तिला निरपेक्ष कल्पना (Absolute Idea) असे म्हणतात.

## ४. ऐतिहासिक पद्धती (Historical Method)

हेगेलने आपल्या तात्त्विक विवेचनासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला तिला ऐतिहासिक पद्धती (Historical Method) असे म्हणतात. या पद्धतीमध्ये कोणतीही गोष्ट, वस्तू किंवा घटना, सुटी व इतरांपासून अलग करून स्वतंत्रपणे किंवा तिचे इतरांशी असलेले दृश्य व अदृश्य संबंध लक्षात न घेता विचार केला तर समजणार नाही. तसेच, तिचा अर्थही लावता येणार नाही. कारण, प्रत्येक गोष्टीला वेगळे असे प्रमाण लावता येणार नाही कारण, ती गोष्ट सभोवतालच्या परिस्थितीत व वातावरणात नेमकी कोठे बसते? तिचे कार्य व स्थान कोणते? तिचे स्वरूप व अर्थ कोणता? हे सर्व समजले पाहिजे. थोडक्यात, म्हणजे अशा गोष्टीचे समर्थन आपल्या अनुभवावरूनच स्पष्ट करता येते. रॉजर्स म्हणतो वस्तूचे व घटनांचे

मूल्यमापन करण्यासाठी आपण कृत्रिम निकष लावता कामा नये. आपल्या अनुभवातून जे सिद्ध होईल तेच निकष लावले पाहिजेच. बुद्धी व प्रज्ञा या केवळ आपल्यामध्येच अंतर्भूत नसतात तर त्या बाहय वस्तूमध्येसुद्धा असू शकतात. मानवाच्या इतिहासामधून ही गोष्ट व्यक्त होत असते. याचा अर्थ एवढाच की साकल्य, समग्रता व सर्वसमावेशकता या भूमिकेतून व दृष्टिकोणातून आपण इतिहास प्रक्रियेकडे पाहिले पाहिजे. इतिहासाचा अन्वयार्थ लावत असताना हेगेलने द्वंद्वविकास पद्धतीचा (Dialectical Method) वापर केला. ती पुढीलप्रमाणे :

### ५. द्वंद्वविकास पद्धती (Dialectical Method)

हेगेलच्या मते, सर्व जीवनाच्या व गतीच्या मुळाशी विरोध (Contradiction) हेच मुख्य तत्त्व असते. विरोधाचे तत्त्व हे जगाचे नियंत्रण करीत असते. प्रत्येक गोष्ट बदलत असते व आपल्याविरुद्ध गोष्टीमध्ये परिवर्तित होत असते. सर्वत्र स्वतःच्या विरुद्ध काहीतरी करण्याची व त्याच्या पलीकडे जाण्याची प्रवृत्ती असते. जर विरोध नसेल तर जीवन, गती, वाढ व विकास या असूच शकत नाहीत. विरोधाचा शेवट झाला तर सर्व गोष्टी निर्जीव, निष्प्राण आणि गतिविरहित होतील. दोन गोष्टी आणि त्यांचे गुणधर्म यांच्यात विरोध असतो; पण तो विरोध द्वंद्र ठरतो आणि हा विरोध त्या दोघांपेक्षा व्यापक अशा विरोधात सामावला जातो. ज्यावेळी असे विरोध सामावले जातात तेव्हा ते व्यापक एकतेचे भाग बनतात. ज्यावेळी एकतेच्या भूमिकेवरून त्यांच्याकडे पाहिले जाते तेव्हा त्यांच्यात ऐक्य (Unity) दिसून येते. अशावेळी विरोध, विसंगती, वैर आणि संघर्ष नष्ट होतात. विरोधी जोडीपैकी एक घटना किंवा गोष्ट स्वतंत्रपणे घेतली तर त्याला अर्थ राहात नाही. म्हणून सर्वसमावेशक अशा गोष्टींचाच विचार केला असता त्या वस्तूचे नेमके स्थान व कार्य कोणते हे ठरविता येते. तसेच, तिची वैशिष्ट्ये व महत्त्व हेही स्पष्ट करता येते. कांट म्हणतो की, तत्त्वज्ञान हे संकल्पनात्मक ज्ञान आहे. हेगेलने कांटचे हे मत खोडून काढले आहे. त्याच्या मते, सर्वच गोष्टींचा उलगडा संकल्पनेच्या साहाय्याने करता येत नाही. म्हणून परमसत् हे जिवंत असून चैतन्याने सळसळणारी व बदलत्या रूपाने व्यक्त होणारी अशी वस्तू आहे. हेगेल यथार्थपणे म्हणतो की, विश्व किंवा सत्ता इतकी गतिमान व प्रत्येक क्षणाला नवनवीन रूप धारण करीत असते की, क्षणाक्षणाला तिचे वेगळे रूप जाणवते. आपला मुद्दा स्पष्ट करताना हेगेल म्हणतो की, बी उगवणे, रोप होणे, रोपाचे झाड होणे, पानाफुलांनी बहरणे, प्रौढ आणि सदृढ होणे, त्याला फळ येणे, परिपक्वता येणे, कालाच्या प्रवाहात क्षीण व जीर्ण होणे व हळूहळू नष्ट होणे हा निसर्गक्रम बदलता येत नाही. थोडक्यात म्हणजे अतिशय साध्या अमूर्त आणि आशयविरहित संकल्पनांपासून अधिक संमिश्र, मूर्त व समृद्ध अशा परिकल्पना (Notions) तयार होत असतात. यालाच द्वंद्वपद्धती किंवा द्वंद्वविकास असे म्हणतात. हेगेलची ही पद्धत पुढील दोन गोष्टींवरून सहज सिद्ध करता येईल.

१. ज्या गुणधर्मामुळे एक विचार अनिवार्यपणे दुस-या विचारात प्रवेश करतो असा (विचाराचा) गुणधर्म,

२. ज्या गुणधर्मामुळे प्रत्येक वस्तू अनिवार्यपणे दुसऱ्या वस्तूशी संबंधित असते असा गुणधर्म,

अशारीतीने मानवी समाजाचा विकास होत असतो. हेगेलची ही विचारप्रणाली अंतर्विकासी आहे. कारण, ती जिवंत असून तिचा विकास आतून होत असतो. त्या घटना स्वतःच्या अंतःप्रेरणेने घडत असतात.

### फ. हेगेलच्या तत्त्वज्ञानावरील टीका (Criticism of Hegels's Philosophy)

हेगेलने इतिहासप्रक्रियेसंबंधी जे विचार मांडले आहेत ते 'इतिहासाचे तत्त्वज्ञान' या नावाने प्रसिद्ध आहेत. सामान्यतः असा समज आहे की, मानवी श्रमाबद्दल मार्क्सने पहिल्यांदा विचार मांडले; परंतु ही समजूत तितकीशी बरोबर नाही. कारण हेगेलने मानवी श्रम, त्यांना मिळणारी मजुरी याबद्दल पहिल्यांदा विचार मांडला. म्हणजे या बाबतीत विचार प्रक्रिया त्याने सुरू केली. हेगेलचे हे विचार नुसतेच मार्क्सपुरतेच मर्यादित न राहता समाज शास्त्रज्ञांनासुद्धा मार्गदर्शक ठरले. हेगेलच्या मते, सबंध मानवजातीचा इतिहास हा घडत असताना त्याच्यामागे नैतिक व आध्यात्मिक कारण असते. वेगळ्या शब्दात सांगावयाचे झाले तर इतिहासातील घटनांना काही निश्चित योजना असते व इतिहासकाराचे काम असे असले पाहिजे की, या घटनांच्या मागील अर्थ त्याला शोधून काढता आला पाहिजे. त्यांचा आणखी एक विश्वास असा की, मानवप्राणी हा देवाच्याच हेतूनुसार कार्य करीत असतो व असे कार्य करीत असताना संस्कृतीचा उदय होतो. संस्कृतीचा उदय झाल्यानंतर संस्था निर्माण होतात व त्यामधूनच कायदा व न्यायव्यवस्था ही अस्तित्वात येतात. असे जरी असले तरी ही प्रक्रिया घडत असताना या प्रक्रिया निर्वेधपणे घडत नाहीत तर बऱ्याचवेळा अडथळे निर्माण होत असतात. उदा. दोन सम्राटांतील संघर्ष हा तडजोडीने न संपता हिंसेने संपत असतो. हेगेलने हॉब्जची (Hobes) ही कल्पना मान्य केली की, ज्या कराराच्या जोडीला तलवारीचे पाठबळ नसते तो करार म्हणजे नुसते शब्दच ठरतात. हेगेलच्या या तत्त्वज्ञानात त्याने अनेक व्याघाती बाबींना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या तत्त्वज्ञानात कल्पना व वस्तुस्थिती यांचे चांगले मिश्रण दिसून येते. त्याचा डायलेक्टिक सिद्धांत म्हणजे एका अर्थाने पर्याय होय. हेगेलचे इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हणजे मानवी मनाचे विच्छेदन होय. बुद्धिवादी दृष्टिकोणातून त्याने केलेले हे विवेचन कोणत्याही स्थलकालामध्ये सुद्धा पटण्यासारखे आहे.

हेगेलने जगाच्या इतिहासाची कल्पना मांडली आहे. त्यामध्ये त्याचा शास्त्रशुद्ध दृष्टिकोण दिसून येतो. इतिहासाच्या तत्त्वज्ञानाबद्दल हेगेलचे विचार बुद्धिवादाच्या कसोटीवर घासून पाहण्यासारखे आहेत. त्याच्या पक्ष, प्रतिपक्ष व समन्वय या तीन अवस्था तर मान्य होण्यासारख्या आहेत. हेगेलच्या कार्याबद्दल प्रो. वॉल्श म्हणतात, "हेगेलने इतिहासाच्या कार्यात मोलाची भर टाकली आहे, यात वादच नाही. इतिहासाचे तत्त्वज्ञान लिहीणारा तो पहिल्या काही तत्त्ववेत्त्यांपैकी एक आहे. त्याच्या या कार्याचा त्याच्या नंतरच्या लोकांवर मोठा प्रभाव पडला. ' विशेषतः त्याच्यासंबंधी लिखाणात एक महत्त्वाची गोष्ट जाणवते आणि ती म्हणजे वर्तमानकाळ जाणण्यासाठी भूतकाळ माहीत असणे आवश्यक आहे. "

हेगेलने आपल्या तत्त्वज्ञानात युरोपीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व सांगून तिचे वर्णन केले आहे. त्याने पौर्वात्य देशांना कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु आजकाल युरोपीय संस्कृती ही अशाप्रकारच्या श्रेष्ठत्वाला पात्र राहिलेली नाही. आजच्या जगात अमेरिका, रशिया व उदयोन्मुख आशिया हे संबंध जगाचे नेतृत्व करीत आहेत. अनुभवसिद्ध विश्लेषणाच्या

आधारे असे दाखवून देता येईल की, हेगेलने जीवशास्त्रीय कल्पना घेऊन मानव प्राण्याशी जी तुलना केली आहे ती अपुरी ठरू लागली आहे. अशा या तुलनेमध्ये हेगेलला जर्मनीविषयी वाटणारे प्रेम व जर्मनीचे उदात्तीकरण हेच उद्देश दिसून येतात. पौर्वात्य लोकांच्याविषयी त्याने जे उद्गार काढलेले आहेत त्यामधून त्याचे पूर्वेकडील लोकांच्याविषयीचे अज्ञान प्रकट झाले आहे. ग्रीक लोकांच्याविषयी तो जितका मोकळेपणाने बोलतो तितका तो पौर्वात्यांच्याविषयी बोलत नाही. यामधून त्याचा पक्षपाती दृष्टिकोण दिसून येतो. हेगेलने राष्ट्राच्या प्रगतीसाठी युद्ध हे एक शस्त्र असले पाहिजे अशी कल्पना मांडून भावी काळात जणू हिटलरच्या उदयाचा पायाच घातला. हेगेलच्या तत्त्वज्ञानाविषयी आपल्याला असे म्हणता येईल की, त्याच्या स्वभावात नसले तरी तत्त्वज्ञानात मात्र स्वच्छंदतावाद (Romantic Spirit) दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा**

१. हेगेलच्या आदर्शवादा विषयीचे विचार नमूद करा.

## २ ) बेनेडीटो क्रोसे ( १८६६-१९५२ )

### अ. बेनेडीटो क्रोसेचे पूर्ववृत्तांत

बेनेडीटो हा इटालियन तत्ववेत्ता व इतिहासकार होता.१८६६ मध्ये एका श्रीमंत कुटुंबात क्रोसेचा जन्म झाला. १८८७ मध्ये वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी तो रोम विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी गेला. त्या ठिकाणी त्यांनी ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या विचारांचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या विचाराने क्रोसे प्रभावित झाला .क्रोसेने त्यांचे आयुष्य विद्वत्तापूर्ण अध्ययनात घालवले.१९१० मध्ये तो इटालियन सिनेटचा सभासद झाला. क्रोसेच्या विचारावर मार्क्सवादाचा सुद्धा परिणाम होता. १९२० मध्ये तो शिक्षण मंत्री झाला .त्याने शालेय अभ्यासक्रमात बदल केला. इटलीतील फॅसिस्ट हुकूमशाहीला त्याने विरोध केला. १९४५ मध्ये तो कॅबिनेट मंत्री राहिला. तेथून निवृत्त झाल्यावर तो पुन्हा नेपल्स या आपल्या गावी आला व त्या ठिकाणी त्याने Institue Of Historical Studies ही संस्था स्थापन केली. १९५२ रोजी तो स्वर्गवासी झाला.

### ब. क्रोसेचे इतिहासवादी विचार

क्रोसेच्या मते सर्व इतिहास हा समकालीन इतिहास आहे. कोणताही इतिहास या पुस्तकात किंवा कागदपत्रात कल्पना करून लिहिलेला नसतो. तर वर्तमानकाळात जे जे घडत असते. त्याची पाळेमुळे ही भूतकाळात दडलेली असतात. क्रोसे पुढे आपल्या तत्त्वज्ञानात असेही म्हणतात की इतिहासकाराने भूतकाळातील Authenticity documents कागदपत्रांवर इतिहास डोळे झाकून इतिहास लिहू नये. तर इतिहासकाराने त्या कागदपत्राची स्पष्टीकरण करून मग स्वतःला काही प्रश्न विचारावेत ते असे –

अ. घटना कुठे घडली ? घटनेचा त्या जागे बरोबर सबंध आहे का ?

आ. मला स्वतःला त्या घटनेत आवड आहे का ?

इ. अडचणी समजून घेण्यासाठी मी मानवी हालचालीचा कोणत्या दृष्टीने अभ्यास केला पाहिजे ?

ई. मला भूतकाळातील कोणत्या कालखंडाचा अभ्यास करायचा आहे ?

उ. जेव्हा या सर्व प्रश्नांची इतिहासकार समाधानाने उत्तर देईल तेव्हाच त्याने इतिहास लिहावा. वैज्ञानिक पद्धती, सत्य यांच्यातील साम्यभेद इतिहासकार गृहीत धरतो .या साम्यभेदाची तात्विक चर्चा इतिहासाचे तत्वज्ञ करतात.

### क. क्रोसेचा आदर्शवादी दृष्टिकोन

क्रोसेचा आदर्शवादी दृष्टिकोन पुढील शब्दातून समग्र स्पष्ट होतो.

"आकलन हा मानवी जीवनाचा मूलाधार आहे. ज्या गोष्टीचा इतिहास लिहावयाचा असेल त्याचे सर्व बारकाव्यांनिशी ज्ञान होणे आवश्यक असते. अशा ज्ञानाला क्रोसे प्रतिभावंत म्हणतो त्याचे उदाहरण देताना तो म्हणतो की समजा आपण वाळवंटात प्रवास करीत आहोत. आपल्याला थोड्या अंतरावर पाणी आहे असे दिसले, ते ज्ञान आहे. पुढे तो असेही म्हणतो की ऐतिहासिक गोष्टीचे सत्य पारखण्याचे काही निश्चित मार्ग असतात .उदा. कागदपत्रे, पुरावे त्यांची छाननी करणे आणि या पुराव्यांवरुन काही निष्कर्ष काढले जातात अशा वेळी ऐतिहासिक सत्य शोधले जाते.

### ड. मूल्यमापन

क्रोसेने ऐतिहासिक संशोधन महत्त्वाचे आहे असे म्हटले आहे. ऐतिहासिक संशोधनासाठी अभिरुची, कल्पनाशक्ती आवश्यक असते. इतिहास लेखन म्हणजे केवळ भूतकालीन घटनांना प्रकाशात आणणे एवढेच नाही तर इतिहास ललितपूर्ण व सौंदर्यात्मक करण्यासाठी सृजनशीलता महत्त्वाची आहे. क्रोसे पुढे म्हणतात की इतिहासकाराने घटनांमध्ये सुसूत्रीकरण केले पाहिजे .विज्ञानामध्ये जसे नियमांशिवाय चालत नाही .तसेच इतिहासात दृष्टिकोनाशिवाय चालत नाही प्राध्यापक मोहन म्हणतात " क्रोसेची कामगिरी अशी की त्याने इतिहासाला स्वतंत्र शाखा आहे हे पटवून दिले .इतिहास हे शास्त्र की तत्त्वज्ञान याच्यातील गैरसमज त्यांनी दूर केला."

### आपली प्रगती तपासा

१. क्रोसेच्या आदर्शवादा विषयीचे विचार नमूद करा.

### ३) कॉलिंगवूड आर. जी. (3.7 .3<<3-1 383) (Collingwood R. G.)

### अ. कॉलिंगवूडचा पूर्ववृत्तांत (Early life of Collingwood)

विसाव्या शतकातील एक तल्लख बुद्धीचा, बुद्धिमान तत्त्वज्ञ व इतिहासकार म्हणून रॉबीन जॉर्ज कालिंगवूड विद्वत जगतात प्रसिद्ध आहे. त्याचा जन्म १८८९ मध्ये इंग्लंडमधील लॅकेशायर परगण्यातील कोनिष्ठोन गावात झाला. त्याचे वडील डब्ल्यू. जी. कॉलिंगवूड हे त्या काळातील विद्वान व चरित्र लेखक म्हणून प्रसिद्ध होते. डब्ल्यू. जी. कॉलिंगवूड हे इंग्लंडमधील सुप्रसिद्ध विद्वान जॉन रस्कीन याचे मित्र होते. त्यांनी रस्कीनचे चरित्रही लिहिलेले होते. तत्कालीन विद्वत जगतामध्ये या दोन प्रसिद्ध व्यक्ती होत्या. स्वाभाविकच रॉबीन कॉलिंगवूड रग्बी हायस्कूलमध्ये दाखल झाल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. रॉबीनवर लहानपणापासून रस्कीनच्या विचाराचा प्रभाव होता आणि म्हणूनच

सुरुवातीपासूनच ज्या क्षेत्रात पदार्पण करून तेथे श्रेष्ठ प्रतीचे कौशल्य दाखवू अशी त्याची भावना होती. Oxford च्या विद्वतापूर्ण वातावरणात टीकाव धरू शकेल अशी बुद्धिमत्ता बालपणापासूनच आर. जी. कॉलिंगवूडला लाभलेली होती. ग्रीक व लॅटिन या दोन्ही भाषांमध्ये त्याची गती चांगली होती. इतकेच नव्हे तर त्याने पदवी संपादन करण्यापूर्वी 'Literae Humaniores Greek a Latin' पुस्तकावर आधारित तत्त्वज्ञान व इतिहासावर आधारित असे एक छोटेसे पुस्तक लिहिलेले होते. इ. स. १९१२ मध्ये त्याची पेंब्रुक (Pembroke) कॉलेजमध्ये फेलो म्हणून निवड झाली. काही दिवस कॉलेजमध्ये त्याने फेलो म्हणून काम केले त्याचवेळी पहिले महायुद्ध सुरू झाले. तेव्हा ब्रिटिश आरमारात तो दाखल झाला. युद्ध संपल्यानंतर पुन्हा त्याने फेलोशिपच्या पदावर कामाला सुरुवात केली. फेलोशिप यथावकाश पूर्ण केल्यानंतर त्याने वेनफ्लीट (Waynflete) प्रोफेसरशीप स्वीकारली व त्या ठिकाणीच १९४९ पर्यंत त्याने प्रोफेसर म्हणून काम केले. पुढे १९४३ मध्ये वयाच्या ५४ व्या वर्षी त्याचे निधन झाले.

**ब. कॉलिंगवूडचे लेखन (Collingwood's Writings)** कॉलिंगवूड स्वत:ला मूलतः तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी समजत असे. तत्कालीन इंग्लंडमधील पुरातत्त्वज्ञ हॅवरफील्ड (F. G. Haverfield) याचा प्रभाव कॉलिंगवूडवर पडलेला होता. एवढेच नव्हे तर काहीकाळ कॉलिंगवूड ऑक्सफर्डमध्ये त्याचा शिष्यही होता. हॅवरफील्डच्या प्रभावाने कॉलिंगवूडने Oxford History of England मध्ये Roman काळातील ब्रिटन या ग्रंथामध्ये काही प्रकरणे लिहिली. तसेच प्रो. टेनीफ्रँक याच्या 'An Economic Survey of Ancient Rome' या पाच खंडातील ग्रंथामध्ये खूप लिखाण केले. याशिवाय प्रो. हॅवरफील्ड याने सुरू केलेल्या 'Corpus In scriptionum Latinarum' या नियतकालिकामध्ये पुरातत्त्वविद्येसंबंधी काही लेख प्रसिद्ध केले. या लेखमालेमध्ये त्याने इतके तंतोतंत लिखाण केलेले आहे की, त्याचे वर्णन 'अविनाशी तंतोतंतपणा' (Imperishably Accurate) अशा शब्दामध्ये करतात. पुरातत्त्वविद्येमध्येच त्याने शिलालेखासंबंधी केलेले विवेचन हे आजसुद्धा मौलिक मानतात.

मूलत: कॉलिंगवूड तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी असल्यामुळे प्रत्यक्ष इतिहासासंबंधी फारच थोडे लेखन केलेले आहे. त्याच्या मते, तत्त्वज्ञान व इतिहास हे अविभाज्य आहेत. म्हणून त्याच्या संशोधन कार्याचे विभाजन पुढीलप्रमाणे करता येईल.

१) स. १९१२ ते १९२७ या काळात त्याने तत्त्वज्ञानातील चिद्वाद (Idealism) मान्य

२) स. १९२७ ते १९३७ या काळात त्याने आपल्या लिखाणातून असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, वैशिष्ट्यपूर्ण शास्त्रे चिद्वादावर आधारित आहेत.

३) इ. स. १९३७ ते १९४३ या काळात त्याने चिद्वाद नाकारला.

कॉलिंगवूडमध्ये वैचारिक परिवर्तन कसे होत गेले हे पाहाणे आवश्यक आहे.

१९९६ साली त्याने Religion and Philosophy हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने पुढील तीन सिद्धांत मांडले.

१) मानवी मनाचा अभ्यास करीत असताना पुरातनकालापासून त्यामध्ये घडत आलेली स्थित्यंतरे पाहात असताना इतिहासाचा आधार घ्यावा. मानसशास्त्रीय तत्त्वांचा आधार घेऊ नये.

२) ऐतिहासिक ज्ञान दुरापास्त नाही ते मिळवता येण्यासारखे आहे.

३) इतिहास व तत्त्वज्ञान यांच्यामध्ये साम्य आहे. अर्थात, इतिहास व तत्त्वज्ञान या दोन्ही विषयासंबंधी त्याच्या मतांमध्ये नंतरच्या काळात बदल होत गेला.

इ.स. १९१७ साली त्याने Truth and Contradiction नावाचा ग्रंथ लिहिला. प्रकाशकाने सुरुवातीला त्यांचा हा ग्रंथ नाकारला. यामधील वर्ण्य विषय इतिहास व तत्त्वज्ञान यांच्यातील परस्पर संबंधाबद्दलच होता.

इ. स. १९२० मध्ये त्याने Ruskin's Philosophy या विषयावर काही व्याख्याने दिली. त्यामध्ये त्याने असे दाखवून देण्याचा प्रयत्न केला की, बऱ्याचवेळा व्यक्ती जे वागत असते त्याबद्दल त्याला स्वतःलाच माहिती नसते. म्हणून त्याने असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, तत्त्वज्ञान म्हणजे एकप्रकारचे इतिहासविषयक संशोधनच असते. ज्याचा उद्देश अंतिमतः व्यक्तीला किंवा समाजाला माहीत नसणारी तत्त्वेच शोधून काढावयाची असतात.

इ. स. १९२१ मध्ये त्याने Croce चे 'Philosophy of History' या नावाचा प्रदीर्घ निबंध लिहिला. त्यामध्ये Croce ने मांडलेल्या काही संकल्पनांवर हल्ला चढविला. Croce ने असा विचार मांडला होता की, इतिहासाने तत्त्वज्ञानाला सामावून घेतले. याबद्दल तो म्हणतो की, हे दोन्हीही विषय एकमेकाला सामावून घेण्यासारखे नाहीत ते वैयक्तिकरित्या परिपूर्ण आहेत. या बाबतीत त्याचे विचार चिद्वादी तत्त्वज्ञानाशी जवळचे ठरतात. म्हणून तो म्हणतो की, हे दोन्हीही विषय हे समसमान आहेत.

**क. कॉलिंगवूडने पुढीलप्रमाणे ग्रंथलेखन केले.**

1. Religion and Philosophy : 1916.
2. Speculam Mentis : 1924.
3. Essay on Philosophical Method: 1933.
4. Principle of Art: 1938.
5. Autobiography : 1939.
6. Essay on Metaphysics : 1940.
7. The New Leavithan : 1942.
8. Idea of Nature : 1945. त्याच्या मृत्यूनंतर पुढील ग्रंथ त्याच्या मित्रांनी प्रसिद्ध केले.
9. Idea of History : 1946.
10. Essay in the philosophy of Art: 1964.
11. Essays in the philosophy of History : 1965.

वरीलप्रमाणे त्याने तत्त्वज्ञान, कला, धर्म, शास्त्र यासंबंधी विपुल लिखाण केले. १९२४ साली त्याने Speculum Mentis हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला व त्यामध्ये प्रथमच तत्त्वज्ञानाला एका विशिष्ट चौकटीमध्ये बसवण्याचा प्रयत्न केला.

## ड. कॉलिंगवूडची इतिहासासंबंधी मते (Collingwood's Views About History)

कॉलिंगवूडने ऐतिहासिक लेखन असे फारसे केलेले नाही. मात्र ऐतिहासिक प्रक्रियेबद्दल त्याने विचार व्यक्त केलेले आहेत. त्याच्या मते, इतर शास्त्रातील अमूर्तपणाच्या जंजाळातून मुक्त करण्याचे काम इतिहास करीत असतो. इतिहासामध्ये व्यक्तीला जीवनामध्ये जे अनुभव येतात त्याचे दिग्दर्शन केलेले असते. इतिहासाचे महत्त्व सांगत असताना तो म्हणतो की, सर्व शास्त्रे, भौतिकशास्त्र व जीवशास्त्र इतकेच नव्हे तर सामाजिक शास्त्राच्या मुळाशीसुद्धा इतिहासच आहे. इतिहास म्हणजे इतिहासकाराला जगाचा प्रत्यय कसा आला त्याचा आविष्कार होय. इतिहासकाराकडे एक दृष्टिकोण असतो. हा दृष्टिकोण म्हणजे इतिहास नव्हे. इतिहासाच्या व्याख्या करण्याचासुद्धा त्याने प्रयत्न केला आहे. त्याने १९३० मध्ये The Philosophy of History या नावाची एक पुस्तिका लिहिली. या पुस्तिकेमध्ये त्याने पूर्वी लिहिलेल्या Speculum Mentis या ग्रंथातील उणिवा दाखवून दिल्या.

त्याच्या मते, ऐतिहासिक घटना या इतिहासकाराच्या मनापासून अलिप्त आहेत. तो म्हणतो की, इतिहासकाराने कोणत्याही पुराव्यावर एकदम विश्वास ठेवू नये तर त्या पुराव्याबद्दल शंका उपस्थित करणारे प्रश्न विचारावेत. इतिहासकाराने फक्त इतिहासामध्ये काय घडले याचे वर्णन न करता त्या घटनांचे स्पष्टीकरण केले पाहिजे. तो म्हणतो की, इतिहासकाराला दोन कार्ये करता येतात.

१. भूतकाळात घडलेल्या घटनांचा शोध घेता येतो.

२. त्याच घटनांचा अभ्यास करून विचारांच्या स्वरूपात लोकांच्यापुढे मांडता येतात.

कॉलिंगवूडच्या इतिहासासंबंधीच्या तत्त्वचिंतनामध्ये त्याचे इटालियन तत्त्वज्ञ क्रोस (१८६६-१९५२) शी साम्य दिसते. क्रोस चिद्वादी होता. तसाच कॉलिंगवूडसुद्धा चिद्वादीच होता. क्रोसच्या मते, सर्व इतिहास हा समकालीन इतिहास असतो. (All History is Contemporary History.) क्रोसने आपल्या मताच्या पुष्ठचार्थ पुढील तीन मुद्दे मांडलेले आहेत.

१. इतिहासामध्ये आपण वर्तमान काळातून भूतकाळाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करीत असतो. इतिहासकार वर्तमानकाळात राहात असल्यामुळे जरी तो भूतकाळाबद्दल बोलत असला तरी त्याच्या मनात वर्तमान काळाचा संदर्भ असतोच.

२. ऐतिहासिक सत्य भूतकाळात का होईना व्यक्तीने अनुभव घेतलेले असते. त्या घटनांचे बरेवाईट अनुभव लोकांना आलेले असतात इतिहासकार हेच सर्व अनुभव पुन्हा स्वतःच्या कल्पनाशक्तीच्या आधारे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो.

३. सर्व इतिहास म्हणजे लेखकाची किंवा इतिहास संशोधकाची लेखन शैलीच होय. क्रोसने इतिहास व शास्त्रीय ज्ञान यांच्यामध्ये असलेल्या मूलभूत फरकासंबंधी चर्चा केली आहे.

त्या दृष्टीने इतिहासाचा वर्ण्य विषय हा मानवी मनाच्या श्रेष्ठ अशा बुद्धिजन्य अनुभवाशी जवळीक साधणारा आहे. कॉलिंगवूडलासुद्धा यापेक्षा फारसे काही वेगळे वाटत नाही. प्रो. आर्थर मार्विक म्हणतो की, कॉलिंगवूडने क्रोसचे विचार चांगल्या शब्दात व जास्त परिणामकारक भाषेत मांडलेले आहेत.

कॉलिंगवूडने आपले चिद्वादी तत्त्वज्ञान मांडत असताना रैकेने मांडलेला विचार व प्रत्यक्षार्थवादी विचारसरणी यांच्याबद्दल विरोधात्मक भूमिका स्वीकारली आहे. तो म्हणतो की, प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक युगामध्ये विशिष्ट हेतूने इतिहासाकडे पाहात असते. म्हणून इतिहास वस्तुनिष्ठ होऊ शकणार नाही. इतिहासाचा वर्ण्य विषय अशा स्वरूपाचा आहे की, ज्यामुळे इतिहासाला शास्त्रीय स्तरावर शिस्तबद्ध विषय म्हणून मान्यता मिळणे अवघड आहे. एकाच युगात, एकाच ठिकाणी काम करणारे दोन इतिहासकार एकाच घटनेचे स्पष्टीकरण वेगवेगळ्या पद्धतीने देतात. यामधूनच इतिहासाचे वेगळेपण सिद्ध होते. इतिहासकाराचा मुख्य हेतू भूतकाळ समजावून घेणे एवढाच नसतो तर वर्तमानकाळात त्या घटनेभोवती एक विशिष्ट वलय निर्माण होईल अशा पद्धतीने त्याची मांडणी करावयाची असते. कॉलिंगवूडच्या मते, भूतकाळ व वर्तमानकाळ यामध्ये तत्त्वतः फरक असत नाही. कारण भूतकाळ हा वर्तमान काळाचाच एक भाग किंवा कार्य असते. (The past is an aspect or function of the present.) त्याने पुढे असाही विचार मांडला की, वर्तमानकाळ हा भूतकाळाचा एक विस्तारित भाग आहे. (The Present is the perpetnation of the past so the present is historians starting point. )

कॉलिंगवूडने आपल्या आत्मचरित्रामध्ये इतिहास संशोधक, त्याच्या कार्यपद्धतीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. त्याच्या मते, इतिहासकार आपल्या विषयाकडे कधीही गांभीर्याने पाहात नाहीत. कोणत्याही बाबींसंबंधी नीट विचार करीत नाहीत. ज्याप्रमाणे एखादा शिंपी तांत्रिक पद्धतीने कात्रीने कापड कापतो त्याप्रमाणे ते काम करतात. त्याच्या या कार्यपद्धतीला कॉलिंगवूडने Scissor and Paste Method असे म्हटले आहे. अर्थात, त्याची ही टीका एकांगी स्वरूपाची आहे व त्यावर इतरांनी त्याच्यावर टीकाही केलेली आहे. इतिहास संशोधकांनी आपले काम करीत असताना त्याच क्षेत्रात पूर्वी ज्यांनी काम केले आहे त्या कार्याचा मागोवा घ्यावा, आपल्या कार्याला सहेतूक कार्याची बैठक निर्माण करावी व मगच इतिहास लेखन करावे.

कोलिंगवुड ने इतिहासासंबंधी मांडलेल्या विचारांचे खरे मूल्यमापन होण्यासाठी त्याने इतिहास व इतर विषय उदा. भौतिकशास्त्रे, मानसशास्त्र व तत्वज्ञान यांच्या संबंधी मांडलेले विचार लक्षात घेणे आवश्यक आहे.

कॉलिंगवूड इतिहासाला शास्त्राचा दर्जा देतो. परंतु त्याचवेळी इतिहास व इतर शास्त्रे यांच्यामधील भेद स्पष्ट करीत असताना तो असेही सांगतो की, इतिहास शास्त्र निरीक्षणावरही आधारित नाही किंवा प्रयोगक्षमही नाही. इतिहास संशोधकाला विशिष्ट चाकोरीत काम करावे लागते. कागदपत्रातून जो पुरावा मिळतो तो चाकोरीबद्ध असतो. त्यामध्ये कोणताही बदल त्याला करता येत नाही. तो म्हणतो इतिहास हे शास्त्र आहे. या शास्त्रामध्ये आपल्याला सहजासहजी उपलब्ध नसणाऱ्या घटनांचे वर्णन करावयाचे असते. तसेच काहीवेळा त्यामध्ये कल्पनाशक्तीच्या आधारे निष्कर्ष काढावयाचे असतात.

कॉलिंगवूडच्या विचारांची सखोल माहिती आपल्याला त्याच्या, 'Human Nature and Human History" या लेखामधून मिळते. तो म्हणतो की, मानवी स्वभाव इतका वैचित्र्यपूर्ण आहे की, त्याला वस्तुनिष्ठतेचे व सर्वसामान्य विश्वातील नीतीनियम लागू करता येतीलच असे नाही. सतत त्याला आलेला अनुभव लक्षात घेऊन स्वतःमध्ये परिवर्तन करीत करीत इतिहास लिहावा लागतो. मानवामध्ये परिवर्तन होत असताना अनुभवसिद्ध कौशल्य, दृष्टिकोण यांचा उपयोग होत असतो. विसाव्या शतकात ऐतिहासिक ज्ञानावर मानसशास्त्राचा खूप प्रभाव पडला आहे. असेही मत तो व्यक्त करतो. मानसशास्त्रामध्ये प्रामुख्याने मानवी भावना, शरीर व मन यांचा विचार केला जातो. इतिहासामध्येसुद्धा हीच प्रक्रिया दिसून येते.

कॉलिंगवूडच्या मते, इतिहासाची पुढील तीन वैशिष्ट्ये आहेत व त्याचाच इतिहासकार विचार करीत असतात.

१. जे काही घडते ते विशिष्ट काळ व वेळ याच्या चौकटीमध्ये घडत असते.

२. ऐतिहासिक घटना या सिमित व क्षणभंगूर असतात.

३. ऐतिहासिक घटना संशोधकांना तपासण्यासाठी प्रत्यक्ष स्वरूपात उपलब्ध असत नाहीत.

सदरच्या घटना मिळविण्यासाठी संशोधकाला कागदपत्राशिवाय आधार नसतो. कागदपत्रातील घटना वाचून त्याचा अर्थ लावून त्याला अंतिम स्वरूप देणे हेच खरे इतिहासाचे स्वरूप आहे. म्हणून इतिहासाच्या स्वरूपाबद्दल पुढील तीन सिद्धांत त्याने मांडले आहेत.

१. इतिहास खऱ्या अर्थाने मनाच्या शास्त्राशी निगडित आहे.

२. ऐतिहासिक ज्ञान मिळविता येते.

३. इतिहास व तत्त्वज्ञान हे विषय एकमेकांना पूरक आहेत.

कॉलिंगवूडने इतिहास व तत्त्वज्ञान यामधील भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. इतिहासाचा संबंध एखाद्या व्यक्तीशी असतो तर तत्त्वज्ञानाचा संदर्भ संपूर्ण मानव जातीशी असतो. अर्थात, कॉलिंगवूडचे हे स्पष्टीकरण अत्यंत तोकडे व भावी काळात टीकेस पात्र ठरले. एके ठिकाणी त्याने All history is the History of the Thought असे विधान करून वैचारिक गोंधळ निर्माण केला. त्याचा मूलभूत हेतू असा होता की, इतिहास लिहिणे हे श्रेष्ठ बुद्धिवंताचे काम आहे व ते सर्जनशील आहे. अर्थात, या विधानामुळे पुन्हा गोंधळ निर्माण झाला.

### इ. कॉलिंगवूडच्या विचारावरील टिका (Criticism of Collinwood's Thoughts)

कॉलिंगवूड हा चिद्वादी तत्त्ववेत्ता होता. त्याच्या विचारावर क्रोस व डिलथी यांच्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला होता. वस्तूतः त्याची विचारसरणी म्हणजे क्रोसच्या विचारसरणीचा दुसरा नमुनाच होता. परंतु त्याने आपल्या लिखाणात क्रोसबद्दल कृतज्ञता कोठेच व्यक्त केली नाही. बहुधा स्वतःबद्दलची प्रचंड आत्मनिष्ठा हे त्याचे कारण असावे. काही टीकाकारांच्या मते, दोन महायुद्धाच्या काळातील विचारसरणीवर क्रोसचा इतका

प्रभाव होता की, त्याचे ऋण मानणे केवळ अशक्य होते म्हणून एखाद्या वेळेस कॉलिंगवूडने त्याचे ऋण मानलेले नसावेत. अर्थात, त्याने क्रोसचे ऋण मानले नाही ही बाब सत्य आहे व त्यामुळेच तो टीकेस पात्र ठरला. इतरांच्याप्रमाणेच ओकेशहॉट व ब्रँडले यांच्या ऋणाचासुद्धा त्याने कधीच उल्लेख केला नाही. इतिहासाचे तत्त्वज्ञान मांडत असताना त्याने असा विचार मांडला की, एका विशिष्ट पद्धतीने, तांत्रिक आंतरसंबंधाने जोडलेला हा विषय आहे. इतकेच नव्हे तर तो म्हणतो की, एखाद्या अभावितपणे केलेल्या कृतीच्या मुळाशी बुद्धिनिष्ठ विचार असतो. पुढे तो एके ठिकाणी म्हणतो की, सर्व मानवी हालचाली प्रयोगात्मक (Tentative) असतात. इतिहास म्हणजे श्रेष्ठ बुद्धिवादी भावनांचा आविष्कार आहे असे म्हणणारा कॉलिंगवूड आत्मप्रेरणेवर आधारित सिद्धांताला विरोध करतो. (Intuitional Theory) वस्तूतः बुद्धिवादी व्यक्ती आत्मप्रवृत्तीच्या सिद्धांताला तार्किक आधारावर विरोध करणारच परंतु हीच तार्किक बुद्धी कॉलिंगवूडने सर्वच ठिकाणी दाखविलेली नाही.

कॉलिंगवूडच्या विचारसरणीमध्ये अनेक उणिवा आहेत. प्रो. वाल्श, प्रो. कार, प्रो. टॉयन्बी इत्यादी विद्वानांनी कॉलिंगवूडच्या विचारांची खिल्ली उडवली आहे. प्रो. वाल्श यांच्या मते, त्याचे विचार हे अतिशय असंबद्ध व मूर्खपणाचे आहेत.

प्रो. वाल्शला कॉलिंगवूडच्या तत्त्वज्ञानामध्ये पुढील दोन दोष दिसून येतात.

१. कॉलिंगवूडच्या मते, ऐतिहासिक घटनांचे ज्ञान हे त्या घटनामध्ये असणारा विचार समजावून घेतला म्हणजे होते. हा विचारसुद्धा चुकीच्या तत्त्वावर आधारित आहे. कारण त्याने भवितव्यता, आत्मप्रेरणा, व मानवी कल्पनाशक्ती यापैकी कोणत्याच मुद्याचा विचार केलेला नाही.

२. कॉलिंगवूडच्या मते, वर्तमान काळातील मानवाचे वर्तन भूतकाळातील अनुभव व निर्माण झालेल्या भावना यांना उत्तर म्हणून असते. परंतु प्रत्यक्षात असे दिसून येते की, बऱ्याचवेळा श्रेष्ठ व्यक्ती तात्कालिक परिस्थितीवर आधारित स्वयंस्फूर्तीने निर्णय घेत असतात.

प्रो. इ. एच्. कार यांच्या मते, कॉलिंगवूडच्या विचारसरणीत दोन दोष दिसून येतात.

१. कोणतीही व्यक्ती, कितीही श्रेष्ठ असली तरी समाजापासून पूर्णपणे अलिप्त राहून कार्य करू शकत नाही. कोणत्याही व्यक्तीला इतरांचा आधार घेतल्याशिवाय कार्यच करता येत नाही.

२. कॉलिंगवूडच्या मते, इतिहासकाराने एखाद्या व्यक्तीच्या कार्य करण्याच्या प्रेरणेची माहिती करून घेतली पाहिजे. प्रो. कार म्हणतात की, सर्वच बाबतीत, सर्वच वेळेला या गोष्टी शक्य नसतात. इतकेच नव्हे तर काहीवेळा व्यक्तीचे हेतू, विचार व कृती यांचा एकमेकांशी काहीही संबंध असत नाही. कॉलिंगवूडच्या तत्त्वज्ञानाचा उपयोग चरित्रे, राजकीय किंवा लष्करी इतिहास लिहिण्यासाठी होऊ शकेल. विशेषत: सामाजिक व आर्थिक इतिहास लिहिण्यासाठी कॉलिंगडच्या विचारांचा उपयोग होणार

टॉयन्बी यांनी कॉलिंगवूडच्या एकंदर विचारसरणीवरचणाने टीका केली आहे. ते म्हणतात, "The historian should never commit the error of a comic thinker who identifies himself with the personage of his study. कॉलिंगवूडने संशोधकांकडून खूप अपेक्षा केल्या आहेत. परंतु त्या पूर्ण होण्याची शक्यता फार कमी असते. कॉलिंगवूडने इतिहासकाराचा मूळ हेतू स्पष्ट करीत असताना असे म्हटले आहे की, त्याने उपलब्ध साधनांच्या आधारे व अनुभवाच्या आधारे निष्कर्ष काढावेत परंतु हे करीत असताना इतिहासकारास त्या व्यक्तीच्या मनात कोणते विचार आले हे समजावून घेतले पाहिजेत. या पद्धतीला Veridical Analysis of Past Events असे म्हणतात. पण प्रत्यक्षात ही गोष्ट कितपत शक्य होते हा वादाचा मुद्दा आहे.

कॉलिंगवूडने इतिहास प्रक्रियेला एका विशिष्ट चाकोरीमध्ये बसवत असताना इतिहासाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. तो म्हणतो, History is the reenactment of past events in the historians mind. कार्ल पॉपर व वेवेंरियन या तत्त्ववेत्त्यांनी या विचारसरणीला विरोध केला आहे. ते म्हणतात की, इतिहासकाराला गतकालातील घटना पुन्हा निर्माण करणे कठीण आहे.

पीटर मूडस् (Peter Muntz) याने तर कॉलिंगवूडच्या Reenactment of History या शब्दप्रयोगालाच विरोध केला आहे. तो म्हणतो की, ही संकल्पना कॉलिंगवूडच्या हलगर्जीपणापासून निर्माण झालेली आहे. इतिहासाचा वर्ण्य विषय मानवाची कृती व अनुभव याच्याशी निगडित आहे. अशा स्थितीत त्याच्याकडून दुसऱ्या काही अपेक्षा करणे हे मुळातच गैर आहे. इतिहाकाराने मानवी भावनांच्या आधारे वेगवेगळ्या कल्पना व विचार यांचा अभ्यास केला पाहिजे. ज्या इतिहासामध्ये मानवी भावना व विचार यांचा समावेश नसेल त्या लिखाणाला काही अर्थच राहणार नाही.

कॉलिंगवूडच्या एकंदर विचारसरणीमध्ये बरीचशी विसंगती दिसते. काहीवेळा तो चिद्वाद मानतो तर काहीवेळा शास्त्रशुद्ध संकल्पनांचा आग्रह धरतो. जरी त्यांच्या तत्त्वज्ञानामध्ये काही दोष असले तरी त्याने ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावत असताना मांडलेला Inside Outside Theory चा विचार मात्र लक्षात ठेवण्यासारखा आहे. त्याच्या मते, एखादी घटना घडत असताना त्याची जी बाह्य बाजू असते ती Outside व त्यामधील जो विचार असतो ती Inside होय. ऐतिहासिक घटना समजावून घेत असताना या दोन संकल्पना स्पष्ट झाल्या तर घटनांचा अर्थ लावणे सोयीचे जाते. असा हा बुद्धिमान विचारवंत १९४३ साली वयाच्या चौपन्नाव्या वर्षी मृत्यू पावला.

कॉलिंगवूडच्या एकंदर तत्त्वज्ञानासंबंधी प्रो. वाडेकर म्हणतात, “तो तत्त्वज्ञानाचे इतिहासाशी तादात्म्य मानतो. इतरांच्या विचारातील तुकडे गोळा करून रचलेल्या इतिहासाचा प्रकार तो तिरस्करणीय मानतो. खरा इतिहास हा मानवी विचारांचा इतिहास होय. इतिहासकार तत्त्वज्ञानी असला पाहिजे व त्यामुळे तत्त्वज्ञानाचे मुख्य कार्य ऐतिहासिक आहे. म्हणजे इतिहासाच्या एखाद्या कालखंडातील मानवी विचाराची निरुपाधिक गृहीते, तत्त्वे प्रकाशात आणण्याचे आहे. "

**आपली प्रगती तपासा**

१. कॉलिंगवूडच्या आदर्शवादा विषयीचे विचार नमूद करा.

## ३.४ सारांश

अन्न, वस्त्र आणि निवारा मिळविण्याच्या धडपडीत अनेक अडचणींना तोंड देत असताना बौद्धिक वारसा लाभलेल्या मानवाने स्वतःच्या जीवनाविषयीचा विचार करण्यास सुरुवात केली. तो नुसता जगत नव्हता, जगण्याविषयी चिंतन करीत होता. माझे जगणे कशावर अवलंबून आहे? मी कोण आहे? माझ्या जीवनाचा अर्थ काय? अशा तात्विक किंवा अध्यात्मिक प्रश्न पर्यंत शंका उपस्थित करू लागला. सूर्याचे उगवणे, दिवस रात्रीचा क्रम, पिक पाण्याची व्यवस्था हे सर्व चक्र आहे असे त्याने अनुभवले .मानवी जीवनातील घटना कालचक्रानुसार घडणारच, माणूस त्याबद्दल काही करू शकत नाही यातून मानवी इतिहासाचा अर्थ लावला जाऊ लागला.

ख्रिस्ती इतिहासकारांना इतिहासातील सर्व चांगल्या व वाईट घडामोडी या देवाचे योजना आहेत असे वाटते .इतिहास हा मानवी आकलनाच्या पलीकडे आहे .कारण मानव हा भौतिक घडामोडीतील फक्त एक साधन आहे. दैवी इच्छेनुसार सर्व घटना घडत असतात आणि त्याचा एक विशिष्ट हेतू त्यामागे असतो. त्या सर्व घटना वैश्विक आहेत. कारण त्या मानवाच्या नव्हे तर देवाच्या अनुरुपाने घडतात. सर्व घटना व्यक्तीभावरहित आहेत. त्या देवाच्या नियमानुसार घडतात. म्हणुनच त्या माणसाला उलगडून सांगता येत नाही. संत अगस्तीने ख्रिस्ती इतिहासाची कल्पना " देवाचे शहर " संबोधून मांडली आहे. ख्रिस्ती इतिहासात धार्मिक  गरजांना जास्त महत्त्व दिले गेले आहे. त्यांचा मुख्य हेतु म्हणजे दैवी शक्ती व श्रद्धा वाढवणे हे होते.

५ व्या ते  १३ व्या शतकापर्यंत ख्रिस्ती इतिहासकार हे सर्वच धर्मगुरु होते. नवीन करारातील प्रेषितांची कृत्ये हे एकच पुस्तक ख्रिस्ती धर्मप्रचाराचा इतिहास दर्शवते .बाकी सर्व शुभवर्तमाने  धार्मिकतेच्या कल्पनेतून लिहिली गेली आहेत. ख्रिस्ती इतिहासात देव व मानवाचे संबंधांना जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे व सार्वकालिक जीवन हा महत्त्वाचे हेतू केंद्रबिंदू समजला गेला.

या सर्व दृष्टिकोणातून ख्रिस्ती परंपरेचा इतिहास घडत गेला व त्या परंपरा विश्वासू व श्रद्धाळू माणसाच्या जीवनाचा भाग बनला. अशाप्रकारे ख्रिस्ती इतिहास म्हणजे देव- मानव संबंधातील घटना आहेत. त्यामध्ये मानवाला विजयी होण्यासाठी फक्त देवावर श्रद्धा असणे आवश्यक आहे व देवाच्या इच्छेशिवाय महान असे काहीच नाही.

भारतीयानी जरी फारसे इतिहासलेखन केले नसले तरी भारतीयांचाही दैवशक्तीवर विश्वास आहे. परमेश्वरच सर्व घडवून आणतो आणि माणूस हा दैवी योजनेचा भाग आहे असे भारतीय मानतात. इस्लामी संस्कृतीच्या क्षेत्रांत पण ईश्वरनिष्ठा आणि कालचक्राची कल्पना आहे. फक्त इस्लामी विचार हा सर्वशक्तिमान अल्लाच्या अनुरोधाने मांडलेला आहे . १४ व्या शतकातील इतिहासकार इब्न खाल्दून सुध्दा अल्लाच्या सामर्थ्याविषयी शंका उपस्थित करीत नाही.

## ३.५ प्रश्न

१) पाश्चात्य“ ईश्वरी विद्या " विषयक संकल्पनांबाबत (Theological Concepts) सर्वसामान्य दृष्टिकोन स्पष्ट करा.

२) अतिप्राचीन दैववाद ही संकल्पना स्पष्ट करा.

३) मध्ययुगीन चर्च इतिहासलेखनपद्धती व दृष्टिकोण स्पष्ट करा.

४) ख्रिस्ती इतिहासलेखकांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण लिहा.

५) भारतीयांचा धर्मशास्त्रीय (हिंदू)दृष्टिकोण लिहा.

६) हिंदूंच्या धर्मविषयक कल्पना काय होत्या?

७) मुस्लिमांचा धर्मशास्त्रीय दृष्टिकोण सांगा.

८) इतिहासातील इस्लामची कल्पना सांगा.

९) आदर्शवादाचा अर्थ, स्वरूप व प्रकार स्पष्ट करा.

१०) हेगेलच्या आदर्शवादा विषयीचे विचार नमूद करा.

११) क्रोसेच्या आदर्शवादा विषयीचे विचार नमूद करा.

१२) कॉलिंगवूडच्या आदर्शवादा विषयीचे विचार नमूद करा.

## ३.६. संदर्भ

१) गायकवाड आर. डी., सरदेसाई बी.म., इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.

२) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३) शेख गफूर, इतिहास लेखनशास्त्र, प्रितम पब्लिकेशन्स, जळगाव, २००७.

४) गाठाळ एस.एस., इतिहासाचे तत्त्वज्ञान, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५.

५) कोठेकर शांता, इतिहास: तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

६) सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई , १९६७.

७) वा.सी. बेंद्रे, साधनचिकित्सा, १९७६.

८) ग.ह. खरे, संशोधकाचा मित्र.

९) कोमेजर अनु कृ.ना. वळसंगकर, इतिहास स्वरूप व अभ्यास, १९६९.

१०) वि. का. राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना, १९२८.

११) एच. कार. अनुवादक प्रा.वि.गो. लेले, • इतिहास म्हणजे काय ?, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१२) डॉ. गोविंदचंद्र पांडे, इतिहास : स्वरूप एवं सिद्धांत राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९८.

१३) डी. डी. कोसांबी, पुराणकथा व वास्तवता.

१४) द. वि. केतकर, इतिहासातील अंतःप्रवाह.

१५) ग. ह. खरे, साधना चिकित्सा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७६.

१६) वि. द. घाटे, इतिहासशास्त्र आणि कला, देशमुख प्रकाशन, पुणे.

१७) प्रभाकर देव, इतिहास : एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड.

❖❖❖❖

# ४

# बुद्धिवादी (Rationalist) आणि प्रत्यक्षवादी दृष्टीकोण (Positivist School)

**घटक रचना :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ बुद्धिवादी सिद्धांत (Rationalist School)

४.२.१ प्रबोधनकालीन इतिहास लेखनाचे स्वरूप (Modern Historiography)

४.२.२ आधुनिक इतिहासवाद

४.२.३ कार्यकारणभाव सिद्धांत

४.३ इतिहासाचे प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञान (Positivist School)

४.३.१ प्रत्यक्षवादाचा अर्थ

४.३.२ प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनाचे स्वरूप

४.३.३ प्रत्यक्षार्थवादाची वैशिष्ट्ये

४.३.४ प्रत्यक्षवादी इतिहासलेखक

४.४ सारांश

४.५ प्रश्न

४.६ संदर्भ


## ४.० उद्दीष्टे

हे युनिट पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होऊ शकेल.

- प्रबोधनकालीन इतिहास लेखनाचे स्वरूप समजेल.
- जांवात्तीस्ता व्हिको ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार समजतील.
- ऑगस्त कॉम्त ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार समजतील.
- हेगेल, मार्क्स आणि रँके ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार समजतील.
- बुद्धिवादी सिद्धांतातील कार्यकारणभावाचे महत्व समजेल .
- प्रत्यक्षवादाचा अर्थ समजेल.

- प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये समजतील.
- ऑगस्ट कॉम्तच्या प्रत्यक्षज्ञानवादी इतिहासलेखनाचे ज्ञान होईल.
- हेन्री थॉमस बकलच्या प्रत्यक्षज्ञानवादी इतिहासलेखनाचे ज्ञान होईल.

## ४.१ प्रस्तावना

पंधराव्या शतकापासून युरोपात पुनरुज्जीवन (Renaissance) सुरु झाले. पुनरुज्जीवनामध्ये जुन्या अंधश्रद्धा व भोळ्या समजुती या दूर करण्यात येऊन त्यांच्याऐवजी घडलेली प्रत्येक घटना बुद्धीवादाच्या कसोटीवर घासून पाहण्याची प्रक्रिया सुरु झाली. ही प्रक्रिया पहिल्यांदा शास्त्रामध्ये लागू करण्यात आली, त्यानंतर ती इतर समाजशास्त्रात लागू करण्यात आली. बुद्धीवादावर प्रत्येक घटना पारखून पाहिल्यामुळे आध्यात्मिक व आत्मिक स्वरूपाचे ज्ञान ही कल्पना किंवा आत्मिक प्रभाव हा प्रत्येक घटनेच्या मागे असतो ही कल्पना मागे पडली. प्रत्येक घटना ही कार्यकारण प्रक्रियेमधून तपासून पाहण्याची पद्धत सुरु झाली. अठराव्या शतकात मानवी समाजात प्रेमाची भावना निर्माण झाली व या प्रेमाच्या भावनेतून सामाजिक गताकाचे संबंध वेगळ्या पायावर उभे करण्यात आले. यातूनच पुढे तर्कावर आधारित अशी विचारसरणी निर्माण झाली. प्रत्येक घटनेच्या पाठीमागे सबळ कारण असते व ते शोधण्याची पद्धत सुरु झाली.

युरोपीय इतिहासलेखन क्षेत्रात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात चार नवे लेखनप्रवाह प्रचलित झालेले आढळून येतात. रोमांटिक, नॅशनलिस्ट, पॉझिटिविस्ट व मार्क्सिस्ट हे ते चार प्रवाह होत. ऐतिहासिक सत्याशी प्रतारणा न करता कल्पनाशक्तीला वाव देऊन लेखन रसाळ करण्याचा प्रयत्न थॉमस कार्लाइल सारख्या इतिहासलेखकांनी केला. त्यांचे लेखन रोमांटिक इतिहासलेखनात मोडते. नॅशनॅलिस्ट म्हणजे राष्ट्रवादी वृत्तीने इतिहासलेखन करणाऱ्या गटाचे प्रतिनिधित्व थॉमस मेकॉले करतो. अभिजात मार्क्सवाद हे कार्ल मार्क्स व एंजल्सचे अपत्य आहे तर पॉझिटिविस्ट म्हणजे प्रत्यक्षवादी विचारप्रणाली इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित करण्याचे श्रेय जर्मन इतिहासकार लिओपाल्ड रांके व ह्या विचाराचा प्रणेता फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कॉम्त यांना जाते.

## ४.२ बुद्धिवादी सिद्धांत ( Rationalist Theory)

### ४.२.१ प्रबोधनकालीन इतिहास लेखनाचे स्वरूप (Modern Historiography)

या कालखंडातील इतिहासकारांनी पारंपारिकतेला विरोध केला. भूतकालीन घटनांचा अन्वायार्थ काढतांना बुद्धिप्रामाण्यवाद व तर्कसंगती यांच्या कसोट्यांचा वापर केला व्यक्तीवाद, व्यवहारवाद आणि विकासवाद या कल्पनांना अनुसरुन इतिहास लेखन केले. अशा प्रकारच्या इतिहास लेखनामुळे इतिहास विषय अंतर्मुख झाला. केवळ रोमन संस्कृती आणि पाश्चिमात्यांच्या कल्पना व तत्त्वज्ञान श्रेष्ठ नाही. तर युरोप बाहेरच्या जगातील संस्कृत्या आणि त्यांच्या धर्म विषयक कल्पना व तत्त्वज्ञान यांच्यापासून शिकण्यासारखे आणि घेण्यासारखे खूप काही आहे. तेव्हा त्यांचा अभ्यास केला पाहिजे. हा विचार पुढे आला. त्यामुळे युरोपबाह्य जगातील प्राचीन संस्कृत्या आणि त्यांच्या कला व साहित्य तसेच

तत्त्वज्ञान यांचा अभ्यास केला जाऊ लागला. त्यांच्या अनुषंगाने इतिहास लेखन केले जाऊ लागले. त्यामुळे धर्मसंस्था व राज्यसंस्था यांच्या जोखडातून इतिहास मुक्त झाला. इतिहासाच्या माध्यमातून पूर्वी जे घडले त्या घडामोडींचा अभ्यास केला पाहिजे. त्यांच्या अभ्यासा वरुन त्या घटनांविषयी सत्य कथन केले पाहिजे. भूतकालीन घडामोडीच्या अभ्यासातून इतिहास विषयक नव-नवीन माहिती उजेडात आणली पाहिजे. इतिहासाच्या माध्यमातून मानवाला जगाचा परिचय करून दिला पाहिजे. हे इतिहासाचे मुख्य उद्दिष्ट. आहे. या उद्दिष्टानुसारच इतिहासाचे लेखन केले पाहिजे. असा आग्रह प्रबोधन युगात इतिहासलेखनाच्या बाबतीत धरला जाऊ लागला. त्याचप्रमाणे इतिहास लेखन केले जाऊ लागले. अशा प्रकारच्या इतिहास लेखनामुळे इतिहासाचे स्वरुप अधिकाधिक व्यापक बनले. इतिहासामध्ये सखोलता, व्यापकता आणि उत्तुंगता या वैशिष्ट्यांची भर पडली. त्यामुळे इतिहासांचे तत्त्वज्ञान अधिक चांगल्या प्रकारे विकसित झाले. प्रबोधनयुगीन इतिहास लेखन प्रणालीचा व्यक्तिवाद, व्यवहारवाद, विकासवाद, बुद्धिप्रमाण्यवाद आणि तर्कनिष्ठा या घटकांवर जास्त जोर होता. त्यामुळे प्रबोधन युगात इतिहासाला वेगळे परिमाण प्राप्त झाले. इतिहास म्हणजे मानवी जीवन व मानवाने विकसित केलेल्या संस्कृतीची माहिती आहे असे ते इतिहासाचे नविन परिमाण होते. त्यामुळे ऐतिहासिक माहिती मानवतावादी स्वरुपाचीच असावी. तसेच इतिहासाचे लेखन व्यवहारिकता आणि विश्लेषणात्मकता पध्दतीने झाले पाहिजे. तरच इतिहास लेखनाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सफल होईल. अशी या कालखंडातील इतिहासतज्ञांची धारणा होती. प्रबोधन कालीन इतिहास लेखन प्रणालीचा प्रभाव इ.स. १६२७ ते १८०४ या कालावधीत पर्यंत कायम होता.

इतिहासात बुद्धिवादी दृष्टीकोन असला पाहिजे हा विचारच आधुनिक कालखंडात निर्माण झाला आहे. युरोपातील प्रबोधनाच्या चळवळीमुले मानवी ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या व पूर्वीपेक्षा बौद्धिक क्षेत्रात अधिक प्रगती झाली. धर्मसंस्थेचा सर्वच क्षेत्रातील प्रभाव कमी झाला. धर्मसंस्थेचा इतिहासावर व इतिहासकारांवर जो प्रभाव होता तो कमी झाला. इतिहासलेखनामध्ये संदर्भ साधनांचे परिक्षण करण्याची पद्धत सुरु झाली. मॅकीव्हली याने इतिहासाला वाङ्मयाच्या प्रांतातून बाजूला सारून एका स्वतंत्र विषयाचा दर्जा देण्याचा प्रयत्न केला. इतिहास संशोधनासाठी काही ताटवे व पद्धती असली पाहिजे असा विचार हा प्रामुख्याने १८ व्या शतकाच्या शेवटी निर्माण झाला. युरोपातील विविध देशांतील लॅटिन भाषेचे महत्व कमी होऊन प्रत्येक राष्ट्राने आपली भाषा राष्ट्रीय स्तरावर विकसित केल्यानंतर इतिहासलेखनशास्त्राला आणखीन गती प्राप्त झाली. मध्ययुगात प्रत्येक घटनांकडे व्यक्तिवादी दृष्टीकोनातून पाहण्याची पद्धत होती ती मागे पडली. ऐतिहासिक घटनांकडे व संकल्पनांकडे नव्या दृष्टीकोनातून पहिले जाऊ लागले. प्रत्येक घटनेचे बुद्धीवादी दृष्टीकोनातून विश्लेषण केले जाऊ लागले. भाषेचे सौंदर्य ही कल्पना मागे पडली व जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून ऐतिहासिक घटनांकडे, व्यक्तींकडे पहिले जाऊ लागले. १८ व्या शतकात भौतिकशास्त्रात फार मोठी प्रगती झाली. भौतिकशास्त्रात बुद्धिवाद, वस्तुनिष्ठता व टीकात्मक परिक्षण यास महत्व असते. याच कसोट्यावर भौतिकशास्त्रांचा विकास होत गेला. इतिहास संशोधकांना असे वाटू लागले की, भौतिकशास्त्रातील ही पद्धत इतिहासामध्ये लागू करणे आवश्यक आहे. त्याचा परिणाम म्हणून अठराच्या शतकात इतिहासाकडे शास्त्रशुध्द दृष्टीकोनातून पाहण्याची पद्धत सुरु झाली.

**आपली प्रगती तपासा**

१. प्रबोधनकालीन इतिहास लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ४.२.२ आधुनिक इतिहासवाद

प्रबोधन चळवळीमुळे सर्वच क्षेत्रात बदल झाला. व्यक्तिच्या पारंपारिक दृष्टिकोनात बदल झाला. समाजात बुद्धिप्रामाण्यवाद वाढीस लागला. इतिहासाच्या स्वरुपात बदल झाला. इतिहासाला प्रगल्भ ज्ञान शाखेचे स्वरुप प्राप्त झाले. ऐतिहासिक ज्ञान व इतिहासाचे स्वरुप तसेच इतिहासाचे उद्दिष्ट आणि इतिहास प्रामाण्याचे निकष इत्यादी विषयी चिकित्सक दृष्टीकोनातून विचार करण्यास सुरुवात झाली. १८ व्या, १९ व्या आणि २० व्या शतकात स्थित्यांतराच्या संदर्भात सर्वांगिन दृष्टिकोनातून चिकित्सा केली जाऊ लागली. त्यामुळे आधुनिक इतिहास वाद संकल्पनेचा उदय झाला. त्या विषयी अनेक विद्वानांनी चिंतन केले.

### १) जांवात्तीस्ता व्हिको

या इटालियन तटाववेत्त्याने १७२५ साली Principle of New Science नावाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये त्याने ऐतिहासिक स्थित्यंतराचे विवेचन केलेले आहे. मानवी स्थित्यंतराचे तीन टप्पे त्याने पडलेले आहेत. (१) देवयुग (२) राष्ट्रपुरुषांचे युग (३) सामान्य माणसाचे युग असे ते आहेत.

### अ) देवयुग

या युगात घडलेल्या घटना दैवी प्रेरणेने घडलेल्या आहेत. या युगात मानवाला स्वत:चे वेगळे असे विशिष्ट स्थान नव्हते. अर्थात हा काळ मानवाच्या आदिम अवस्थेचा काळ होता. मानव इतर प्राण्याप्रमाणेच जीवन जगात होता. या काळात घडलेल्या घटना व घडामोडी यामध्ये मानवी कर्तुत्वाचा सहभाग नव्हता.

### ब) राष्ट्रपुरुषाचे युग

मानव प्रगत होत गेला. परस्परांच्या सहकार्यातून समाज निर्मिती झाली. या काळात समाजाचे नेतृत्व करणाऱ्या पुरुषांचा उदय झाला. ते समाजाचे नेतृत्व करू लागले. स्वकर्तुत्वाने घटना घडवून आणू लागले. त्यमुळे अनेक घटना घडल्या परिणामी स्थित्यंतर झाले.

क) सामान्य माणसाचे युग

मध्य युगाचा अस्त झाला. प्रबोधन चळवळीमुळे समाज प्रबोधन झाले. बुद्धिप्रामाण्यवाद वाढीस लागला. सामान्य माणूस सर्व चिंतनाचा केंद्रबिंदू बनला. सामान्य माणसाला महत्व प्राप्त झाले. सामान्य माणसांची स्वकर्तृत्वाने इतिहास घडवला. त्याच्या मते इतिहास हा सर्व समाजाच्या समग्र जीवनाचा सर्वंकष आढावा आहे. सामान्य माणसात इतिहास घडविण्याची पात्रता असते. असा नवा क्रांतिकारी विचार व्हिकोने मांडला. ती पुढे असे म्हणते की, मानव निर्मित गोष्टीचेच माणसाला इतिहास लेखन शास्त्र पूर्णपणे ज्ञान होते. कारण त्यांचा कर्ता करविता माणूस एखादी गोष्ट निर्मात्याला ती चटकन समजते. इतिहास माणसाने घडवला

आहे. यामुळे तो माणसाचा चांगल्या प्रकारे समजतो. परंतु भौतिक गोष्टीचे ज्ञान माणसाला पूर्णपणे कधीच होऊ शकत नाही. कारण भौतिक गोष्टी मानव निर्मित नसतात. म्हणून भौतिक ज्ञानाच्यास इतिहासाच्या ज्ञानामुळे मानवी जिज्ञासा साफ्गल होते. व्हिकोचा हा विचार इतिहासवादास वरदान ठरला.

## आपली प्रगती तपासा

१. जांवात्तीस्ता व्हिको ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार सांगा.

## १. ऑगस्त कॉम्त

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला प्रत्येक विषयाला शास्त्रीय आधार देण्याची स्पर्धा सुरु झाली. या चढाओढीच्या स्पर्धेमुळे वैज्ञानिक क्षेत्रात विलक्षण क्रांती झाली. तिचे परिणाम इतर अनेक क्षेत्रात दिसून येऊ लागले. याच काळात इतिहासाला शास्त्रीय आधार देऊन इतिहासाचा अन्वयार्थ काढला पाहिजे असे ऑगस्त कॉम्त यास वाटू लागले. म्हणून त्याने इतिहासाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्याच्या असे निदर्शनास आले की, मानवी समाजाच्या इतिहासात वेगवेगळ्या प्रकारचे आकृतिबंध आहेत. समाजाच्या विविधतेतच मुलभूत क्रमबद्धता असते. त्यातूनच कॉम्तला मानवी मनाच्या विकासाचा मुलभूत नियम सापडला. तो म्हणजे व्यक्तिमत्वाच्या विकासात सामाजिक संस्था व सांगताना यांचे कार्य महत्वाचे असते. त्याच्या आधारे त्याने ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावण्याची शास्त्रीय पद्धत विकसित केली. या शास्त्रीय पद्धतीने घटनांचा अन्वयार्थ काढत शास्त्रशुद्ध पद्धतीने इतिहास लेखन करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे पूर्वीची स्वच्छंदतावादी इतिहास लेखन परंपरा खंडित झाली. शास्त्रीय दृष्टिकोनावर आधारलेली नवीन इतिहास लेखनाची परंपरा अस्तित्वात आली.

या अवस्थेत मानव बौद्धिक दृष्ट्या अधिकच प्रगत झाला. आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचे कारण तो शोधू लागला. निसर्गात घडणाऱ्या दोन कोणतातरी संबंध असतो. अर्थात मानवाने घटनामधील संबंधाचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरु केली. मानव पूर्वी प्रमाणे आता घटना का घडता? असा प्रश्न विचारण्याऐवजी घटना कशा घडतात? असा प्रश्न विचारून घटनांचे स्पस्तीकरण करू लागला. मानवाने घटनामधील संबंध निरीक्षण पद्धतीने शोधून काढण्यास सुरुवात केली. थोडक्यात घटना घडण्याची करणे वैज्ञानिक पद्धतीने शोधली जाऊ लागली.

बुद्धीवादामध्ये तर्कबुद्धीला पटणारे सत्य स्वीकारण्याची पद्धत सुरु झाली. या अवस्थेत घटना क्ष घडतात असा प्रश्न उपस्थित करून घटना संबंध स्पष्ट केले जातात. प्रत्येक घटनेचे कारण शोधून काढले जाते. नंतर गाताना कशी घडली. घटना घडण्याची प्रक्रिया पद्धतशीरपणे स्पष्ट केली जाते. बुद्धिवादी दृष्टिकोनामुळे इतिहासकार व संशोधक प्रभावित झाले. बुद्धिवादी दृष्टीकोनातून इतिहास संशोधन व लेखनास सुरुवात केली. बुद्धिवादी पद्धतीने भूतकालीन घटनांचा अन्वयार्थ काढून नवीन शास्त्रीय पद्धतीने इतिहास लेखन केले जाऊ लागले. यामुळे इतिहास लेखन प्रणालीत बुद्धिवाद व शास्त्रीय दृष्टीकोन यांना महत्व प्राप्त झाले. ऐतिहासिक घटना समजावून घेण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब केला जाऊ लागला. नियम व सामान्यीकरण या संकल्पना इतिहासामध्ये अस्तित्वात आल्या.

परिणामी इतिहासाला “सामाजिक भौतिक शास्त्र” असा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे इतिहास लेखनाच्या संदर्भातील अनेक समस्या सुटत गेल्या. अनेक प्रश्नांची उत्तरे मिळत गेली. भूतकाळात जे घडले त्याचे केवळ सत्य कथन इतिहासाच्या माध्यमातून केले जाऊ लागले. म्हणजेच एतीओहास लेखन जास्तीत जास्त निश्चिततेच्या जवळून केले जाऊ लागले. भूतकाळातील घटनांचा उचित अन्वयार्थ काढून त्यांचे अचूक निष्कर्ष काढले जाऊ लागले. त्यामुळे इतिहासाला त्याच्या अपेक्षेप्रमाणे सत्य आणि पारदर्शक असे वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. इतिहासातून स्वच्छंदता वादाचे उच्चाटन झाले. त्यामुळे कल्पना विश्वात रमणाऱ्या इतिहास संशोधकांना आणि इतिहासकरांना वास्तवतेची जाणीव झाली.

**आपली प्रगती तपासा**

१. ऑगस्त कॉम्त ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार सांगा.

## ३. हेगेल

कॉम्त व सायमन या तिघांनी ऐतिहासिक घटनांच्या पाठीमागे मानवी भावना असतात. या भावनांमधूनच राष्ट्राचे भवितव्य ठरविले जाते अशाप्रकारचे विचार मांडले. हेगेलने तर आपल्या चिद्वादात आत्मतत्त्व हे गृहीत धरून त्याच्यावरच संपूर्ण सिद्धांताची उभारणी केली. कॉम्तने मानवी विकासाच्या तीन अवस्थांचा सिद्धांत मांडून तिसरी अवस्था जी वैज्ञानिक प्रगती तिचे महत्त्व पटवून दिले. अर्थातच, हेगेल आणि कॉम्त या दोघांनी मानवी मन व भावना यांचा इतिहासातील कार्यकारणपरंपरेमध्ये जो प्रचंड सहभाग असतो त्याचे महत्त्व वेळोवेळी प्रस्थापित केले आहे. हेगेलने तर जुन्या संस्कृतीच्या पायावर नव्या संस्कृतीची उभारणी करणे आवश्यक आहे असा सिद्धांत मांडून इतिहास लिहिण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## ४.मार्क्स

हेगेलच्याच तत्वप्रणालीतील डाव्या विचारसरणीच्या तत्ववेत्ता म्हणजे मार्क्स होय. मार्क्सने ऐतिहासिक घटनांच्या मागे आर्थिक कारण असले असा सिद्धांत मांडला. जगाच्या इतिहासाचा अभयस करून संपूर्ण मानवजातीचा इतिहास हा वर्गसंघर्षाचाच इतिहास आहे असा विचार मांडला. मार्क्सने या कलहाच्या मागील कारणे देत असताना आहे रे व नाही रे असे जे दोन वर्ग पाडले, ते दुसरे तिसरे काही नसून Causation चा आहे. मार्क्सने ऐतिहासिक घटनांची कारणपरंपरा जोडत असताना भौतिकवादी दृष्टीकोनातून कार्यकारणबाव सिद्ध करून दिला. मार्क्सने असेही दाखवून दिले की ज्या वर्गाच्या ताब्यात उत्पादनाची साधने असतात त्याच वर्गाच्या ताब्यात समाजाचे नेतृत्व असते. हा निष्कर्ष म्हणजे Causation चा आहे. मार्क्सचे साम्यवादाचे भाष्य हा सुद्धा Causation मधील अत्युच्च बिब्दू आहे. कारण Causation वरून भावी काळासाठी काहीतरी भाष्य वर्तवता आले पाहिजे. मार्क्सने हे कार्य अतिशय उत्तमप्रकारे पार पडले आहे.

## ५. रँके

एकोणिसाव्या शतकात जर्मनीमध्ये रँकेने आधुनिक इतिहासाचा पाया घातला. इतिहासामध्ये शास्त्रशुद्ध पद्धत निर्माण करण्याची कल्पना त्यानेच मांडली. ऐतिहासिक

घटनेची सत्यासत्यता ठरवीत असताना कार्यकारणभाव, शास्त्रीय स्पष्टीकरण, अंतरंग व बहिरंग परिक्षण, वस्तुनिष्ठता इत्यादी सर्व संस्कार त्यानेच पहिल्यांदा इतिहासावर केले. इतिहासाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.

### ६. प्रो. ब्यूरी

रँकेने जर्मनीत ज्या पद्धतीचा पाया घातला ती पद्धत इतर युरोपीय राष्ट्रांनी उचलली. विशेषत: इंग्लंडमध्ये इतिहासाच्या शास्त्रशुद्धतेबद्दल उलटसुलट चर्चा सुरु झाली. त्या सर्वांचा परिपाक १९०३ साली प्रो. ब्युरीने इतिहास हे शास्त्र आहे असे बिनदिक्कत जाहीर करून विसाव्या शतकात इतिहासाला जास्तीतजास्त शास्त्रशुद्ध बनविण्यासाठी मार्ग खुला करून दिला. ब्युरोनंतर अनेक इतिहासकरांनी यात मोलाची भर घालून स्पष्टीकरण, नियम, सामान्यीकरण, तत्वज्ञान इत्यादी बाबतीत प्रचंड कामगिरी करून आज ऐतिहासिक संशोधनाला जवळजवळ भौतिकशास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी जर्मनीत ऐतिहासिक पद्धतीच्या विचारसरणीची स्थापना झाली. विल्यम डिलथी हा या विचारसरणीचा मुख्य प्रवर्तक होता. हेगेलने जागतिक इतिहासाची कल्पना मांडली होती. हीच कल्पना डिलथीने पुढे खेचली व इतिहास हा घटनांवर आधारित पण अनुभवाच्या साहाय्याने लिहावा असे मत व्यक्त केले. इतिहासातील ज्ञान हे गतकाळाशी संबंधित असते. गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद म्हणजे इतिहास असे प्रो. कार म्हणतात. अर्थातच, या विचारसरणीस भूतकाळातील घटनांचा वर्तमानकाळाच्या संदर्भात अर्थ लावणे असाच अर्थ अभिप्रेत आहे. जर एखादी घटना भूतकाळातील असूनसुद्धा जर ती वर्तमानकाळासाठी उपयुक्त ठरत असेल तरच त्या घटनेला काही अर्थ असतो. ऐतिहासिक पद्धतीमध्ये कागदपत्रांचा शोध घेणे, त्यांचा अर्थ लावणे व निष्कर्ष काढणे अशी विविध कामे केली जातात. ही ऐतिहासिक पद्धत समाजशास्त्रामध्ये वापरतात. यावरून ऐतिहासिक पद्धत ही दिवसेंदिवस एक शास्त्रीय पद्धत म्हणून मान्यता पावत आहे यात शंका नाही.

### आपली प्रगती तपासा

१. हेगेल, मार्क्स आणि रँके ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार सांगा.

### ४.२.३. कार्यकारणभाव सिद्धांत

इतिहासाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून द्यावयाचा असल्याने शास्त्रामध्ये ज्याप्रकारे कार्यकारणभाव प्रस्थापित केलेला असतो, त्याचप्रमाणे इतिहासामध्येसुद्धा अशाप्रकारचे कार्यकारणसंबंध प्रस्थापित करता येतील काय ही मुख्य समस्या आहे. इतिहासकार ज्यावेळी घटनांचा अन्वयार्थ लावत असतो तेव्हा दोन घटनांमध्ये अनुस्यूत असा कार्यकारणसंबंध अस्तित्वात असतोच; परंतु तो उघड स्वरूपात नसतो. इतिहासकार अनेक घटनांचा अर्थ लावून घटनातील संबंध जेव्हा स्पष्ट शब्दात मांडतो तेव्हा इतिहासातील कार्यकारणभाव सिद्ध झाला असे म्हणता येईल.

अनेकविध कारणांचा हा सिद्धांत कार्यकारणभाव ठरवीत असताना अतिशय महत्वाचा आहे. इतिहासामध्ये पूर्वी अशी समजूत होती की, एखादी घटना घडण्यासाठी एकाच कारण असते

आणि ते म्हणजे दैवी कारण होय. परंतु हळूहळू या कारण परंपरांच्या सिद्धांतामध्ये बदल होत गेला व आज एखादी ऐतिहासिक घटना घडत असताना राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, प्रशासकीय पक्षाचे धोरण इत्यादी अनेक करणे असू शकतात याची खात्री इतिहासकाराला झाली आहे. हा अनेक शास्त्रांचा आपली संशोधनासाठी उपयोग करुन्घेत असतो. तेव्हा ती सर्व शस्त्रे, त्या शास्त्रांमध्ये गृहीत धरलेली करणे आणि इतिहासातील अनेक कारणे या सर्वांचा समन्वय साधून एखाद्या घटनेचा कार्यकारणभाव शोधला जातो. कोणतेही एक कारण अलगही करता येत नाही किंवा त्यांचा विचार अलगपणेही करता येत नाही. प्रो. गॉसचॉक (Gottschalk) म्हणतात की इतिहासकाराने कारण किंवा कारणे हे शब्द योग्य प्रमाणात वापरले पाहिजेत. त्यांचा हा निश्चित समजावून घेऊन त्यापासून सामान्यीकरण करण्याची क्षमता ठेवली पाहिजे. ते शेवटी म्हणतात, "इतिहासकाराने कोणत्याही परिस्थितीत Causation च्या प्रशांबद्दल सतत जागृत राहिले पाहिजे व खडतर परिश्रमानंतर Causation Connectiion तंतोतंतपणावर लक्ष ठेवून जोडून दाखविले पाहिजे." (At any rate constant awareness of the problem is desirable if it leads to strenuous efforts to use words having casual connection only with special attention to precision.)"

कारणमीमांसेचा शोध इतक्या सहजासहजी पूर्ण होत नाही. आपल्याला भूतकाळाचे स्पष्टीकरण करावयाचे असेल. भविष्यकाळाचे निदान करावयाचे असेल तर तर्कशुद्ध विचारसरणी ही सर्वात महत्वाची आहे. इतिहासकार जर काही नियम प्रस्थापित करू शकला तर या घटनांचा कार्यकारणभाव प्रस्थापित करणे अवघड वाटणार नाही. अशा वेळी इतरही शास्त्रांचा उपयोग करून एक अशी चौकट तयार केली पाहिजे. हर्बर्ट स्पेन्सरने समाजशास्त्राची उभारणी करीत असताना जीवशास्त्र, मानवशास्त्र व मानसशास्त्र या शास्त्रांचा आधार घेतला. जॉन फिस्कने 'Outline of Cosmic Philosophy' या आपल्या ग्रंथात विश्वाच्या अवस्थांच्या नियमांचा शोध घेतला व या कामी त्याने संपूर्णपणे उपलब्ध असणारे सामाजिक व तत्वज्ञानविषयक विचार, विचारात घेतले व आपले नियम परास्थापित केले. सामाजिक शाखांपैकी अर्थशास्त्रसुद्धा इतर अनेक शास्त्राच्या आधाराने आपले नियम प्रस्थापित क्रेत. म्हणून इतिहासानेसुद्धा कार्यकारणभाव प्रस्थापित करीत असताना अशाच साधनांचा वापर करून इतिहासामध्ये असणारी संदिग्धता काढून टाकली पाहिजे, आणि जेव्हा अशी प्रक्रिया घडून येईल तेव्हाच इतिहासाला शास्त्राचा दर्जा प्राप्त होऊ शकेल.

बुद्धिवादाच्या युगात, पद्धतशीर ऐतिहासिक विचारांचा जन्म झाला. प्राचीन काळातील चमत्कार आणि करिष्मा टाकून दिले गेले आणि इतिहासकारांनी विविध घटनांचे तर्कशुद्ध अर्थ सांगण्यास सुरुवात केली. इतिहासाचे क्षेत्रही विस्तारले आणि इतिहासकार केवळ राजकीय आणि धार्मिक पैलूंवरच चर्चा करू लागले नाहीत तर त्यांनी लोकांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास सुरुवात केली. ते आता कारण आणि परिणाम यांच्यातील संबंध शोधू लागले. इतिहासात विचारांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. तर्कवादी इतिहासकारांनी इतिहासाच्या विषयाकडे टीकात्मक दृष्टीकोन घेतला यात शंका नाही. परंतु ऐतिहासिक स्त्रोतांच्या निवडीत त्यांनी गंभीर दृष्टिकोन स्वीकारला नाही. त्यांनी विद्यमान मुद्रित स्त्रोत जसेच्या तसे स्वीकारले आणि त्यांच्या सत्यतेला आव्हान दिले नाही.

इतिहासातील कार्यकारणभावासंबंधी अठराव्या शतकापर्यंत निश्चित अशी कल्पना नव्हती. परंतु अठराव्या शतकात मॉन्टेस्क्यूने “Considerations on the causes of the Greatness of the Romans and of their Rise and Decline.” या नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने पहिल्यांदा कार्यकारणभावासंबंधी शास्त्रीय पद्धतीतून चर्चा केली. तो म्हणतो, “रोमन साम्राज्याचा उदय व असत यामागे अनेक नैतिक कारणे व भौतिक करणे असून तीच प्रत्येक राजेशाहीच्या उदयास, टिकवून धरण्यास व उलथून टाकण्यास पुरेशी असतात. आणि जे काही सर्व घडले ते कारण परंपरेमध्ये दाखविता येते. (“There are general causes, moral or physical, which operate in every monarchy, raise it, maintain it or overthrough it and that occurs is subject to these causes.”)

मॉन्टेस्क्यूने पुढे आपल्या “Spirit of Laws” या ग्रंथात कार्यकारणभावाची ही संकल्पना विकसित केली. तो म्हंतो की, मानवाचे नियंत्रण एका वैशिष्ट्यपूर्ण अशा घटनेचे केले व या मानवी वागणुकीमध्ये काही निश्चित स्वरूपाचे नियम किंवा तत्त्व असून हे नियम निसर्गामधूनच स्वीकारलेले आहेत.

वॉल्टेअरला इतिहासकारांच्या बुद्धिवादी परंपरेचे जनक मानले जाते. त्यांचा संपूर्ण दृष्टिकोन आणि तत्त्वज्ञान विज्ञान आणि तर्कशास्त्रावर आधारित होते. त्याच्या प्रमुख कामांमध्ये स्वीडनचा चार्ल्स तेरावा, लुई चौदावाचा कालखंड इत्यादी उल्लेखनीय आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१. बुद्धिवादी सिद्धांतातील कार्यकारणभावाचे महत्व विशद करा.

## ४.३ इतिहासाचे प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञान (Positivist School)

### ४.३.१ प्रत्यक्षवादाचा अर्थ

अठराव्या शतकात युरोपमध्ये विज्ञानाचा, शास्त्रीय ज्ञानाचा विकास झपाट्याने होऊ लागला. शास्त्रीय पद्धतीचा वापर सत्याचा शोध घेण्यास लाभदायक ठरतो हा विचार बुद्धिजीवींच्या मनावर बिंबला. परिणामी सर्वच अभ्यास शाखांचे अध्ययन शास्त्रीय पद्धतीने केल्यास त्या त्या शाखेतील मूलभूत सत्याचे आकलन करून घेता येईल अशी भिन्न क्षेत्रांतील विचारवंतांची धारणा बनली. Positive knowledge म्हणजे निश्चित, निःसंदिग्ध, वादातीत स्वरूपाचे चिरंतन ज्ञान. निसर्गातील प्रक्रियामागील चिरंतन सत्याचा शोध घेण्यासाठी भौतिक शास्त्रज्ञ ज्या शास्त्रीय पद्धती वापरतात, तशाच पद्धतींचा वापर इतिहासकारांनी केल्यास गतकालीन मानवी जीवनातील सत्याचे सम्यक् आकलन होऊ शकेल ही पॉझिटिवीझमची सैद्धांतिक धारणा आहे. ह्या अनुसार गतकालीन मानवी जीवनातील वास्तवाचे शास्त्रीय पद्धतींचा वापर करून, सत्यदर्शन घडविणे हे इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील 'पॉझिटिविस्ट' तत्त्वज्ञानाचे मूलभूत प्रमेय बनले.

प्रत्यक्षज्ञानवादी तत्त्वज्ञानाचा इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील आविष्कार ही तोवर रूढ असलेल्या इतिहासलेखनपद्धती विरुद्धची प्रतिक्रिया होती. इतिहासलेखनाच्या पद्धतीत असलेल्या उणिवा दूर करण्याचा हा प्रयत्न होता. 'हिस्टरी अॅन्ड हिस्टोरिअन्स ऑफ

नाईनटीन्थ सेंचुरी' ह्या आपल्या इतिहाससमीक्षा ग्रंथात प्रा. जी. पी. गुच यांनी त्या चार उणिवांची चर्चा केली आहे. त्यांच्या मते मानवी जीवनाचे नियंत्रण करणारी दैवी शक्ती आहे ही धारणा, स्त्रोतसाधनांचा अभाव, चिकित्सक दृष्टीचा अभाव आणि इतिहासाचे अध्ययन व लिखाण याबाबतच्या निश्चित प्रशिक्षणाचा अभाव, या कारणांमुळे अठराव्या शतकापर्यंतच्या इतिहासलेखनाला सत्याचा, विश्वसनीयतेचा भक्कम आधार मिळाला नव्हता, इतिहास लेखनासंबंधीच्या कल्पना स्पष्ट झाल्या नव्हत्या व त्यामुळे इतिहासलेखनाला आकार आला नव्हता. इतिहासलेखन ही साहित्याच्या क्षेत्रातील बाब मानली जाई. आर्थर मार्विक ह्या इतिहास समीक्षकाने, अठराव्या शतकापर्यंत काळाच्या गतिमानतेचा, परिवर्तनशीलतेचा विचार होत नव्हता, तसेच घटना व व्यक्तींचा अभ्यास त्यांच्या समकालीन परिस्थितीच्या संदर्भात करण्याची गरज इतिहासकारांना प्रतीत झाली नव्हती, ह्या उणिवांकडे अंगुलीनिर्देश केलेला आढळतो. तोवरच्या लिखाणात गूढवादाचे दर्शन प्रामुख्याने होते. पंधराव्या शतकापर्यंतच्या ईश्वरनिष्ठ भाष्याची जागा गूढवादी भाष्याने घेतली होती. त्यामुळे इतिहासात भूतकाळाचे वास्तव चित्रण होत नव्हते. प्राथमिक स्त्रोत साधने अभ्यासकांना सहजपणे उपलब्ध नव्हती, यामुळे इतिहास लिहिण्यासाठी बव्हंशी दुय्यम साधनांचा वापर होत असे. तसेच विद्यापीठातून इतिहासाच्या अध्ययनाची निश्चित पद्धती शिकविण्याचा शिरस्ता नव्हता, त्या विषयाचा गंभीरपणे अभ्यास होत नव्हता. इतिहासाला गौण स्थान होते.

याविरुद्ध प्रतिक्रिया एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी दिसून येऊ लागल्या. मानवी जीवनासंबंधी प्रचलित असलेल्या रूढ विचारांना छेद देणाऱ्या जोहान हर्डर व व्हिको ह्या तत्त्वज्ञांच्या क्रांतिकारी विचारप्रणालीकडे विचारवंतांचे लक्ष आकृष्ट होऊन, इतिहासाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची गरज प्रतीत होऊ लागली. इतिहासलेखनात कल्पनेला स्थान असावे, तो केवळ गूढवादी नव्हे तर रंजक असावा हा विचार 'रोमांटिक' इतिहासलेखकांनी पुरस्कृत केला; प्राथमिक स्त्रोत साधनांचा अभ्यास करून, केवळ युद्धे अगर मोठ्या घटनांचे नव्हे तर राष्ट्रांचे इतिहास लिहिण्यावर राष्ट्रीय वृत्तीच्या गटाने भर दिला, तर मूळ स्त्रोतसाधनांची चिकित्सक छाननी करून ऐतिहासिक सत्य शोधून काढण्यावर लक्ष केंद्रित करणारा इतिहासकारांचा एक गट पुढे सरसावला. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांचा अभ्यास गंभीरपणे होऊ लागला; यामुळे इतिहासाच्या साधनांची शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा करून सत्याचा शोध घेता येतो याची जाणीव अभ्यासकांत निर्माण झाली.

**आपली प्रगती तपासा**

१. प्रत्यक्षवादाचा अर्थ स्पष्ट करा.

### ४.३.२ प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनाचे स्वरूप

प्रत्यक्षार्थी अवस्थेत तर्कबुद्धिला पटणारे सत्य स्विकारण्याची पध्दत सुरु झाली. या अवस्थेत घटना कशा घडतात असा प्रश्न उपस्थित करुन घटना मधील संबंध स्पष्ट केले जातात. प्रत्येक घटनेचे कारण शोधून काढले जाते. नंतर घटना कशी घडली. घटना घडण्याची प्रक्रिया पध्दतशीरपणे स्पष्ट केली जाते. ही प्रक्रिया म्हणजे प्रत्यक्षार्थवाद होय.

एखाद्या कॅमेऱ्या प्रमाणे प्रत्यक्षार्थवाद दृश्याचे दर्शन आपणास घडवतो. अर्थात जसेच्या तसे दृश्य सादर करतो. प्रत्यक्षार्थवादी दृष्टिकोनामुळे इतिहासकार व संशोधक प्रभावित झाले. त्यांनी प्रत्यक्षार्थवादी दृष्टीकोनातून इतिहास संशोधन व लेखनास सुरुवात केली. प्रत्यक्षार्थवादी पध्दतीने भूतकालीन घटनांचा अन्वयार्थ काढून नवीन शास्त्रीय पध्दतीने इतिहास लेखन केले जाऊ लागले. त्यामुळे इतिहास लेखन प्रणालीत बुद्धिवाद व शास्त्रीय दृष्टिकोन यांना महत्त्व प्राप्त झाले. ऐतिहासिक घटना समजावून घेण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब केला जाऊ लागला. नियम व सामान्यीकरण या संकल्पना इतिहासामध्ये अस्तित्त्वात आल्या. परिणामी इतिहासाला "सामाजिक भौतिक शास्त्र" असा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे इतिहास लेखनाच्या संदर्भातील अनेक समस्या सुटत गेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळत गेली. भूतकाळात जे घडले त्याचे केवळ सत्य कथन इतिहासाच्या माध्यमातून केले जाऊ लागले. म्हणजेच इतिहास लेखन जास्तीत जास्त निश्चिततेच्या जवळून केले जाऊ लागले. भूतकाळातील घटनांचा उचित अन्वयार्थ काढून त्यांचे अचूक निष्कर्ष काढले जाऊ लागले. त्यामुळे इतिहासाला त्याच्या अपेक्षेप्रमाणे सत्य आणि पारदर्शक असे वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. इतिहासातून स्वच्छंदता वादाचे उच्चाटन झाले. त्यामुळे कल्पना विश्वात रमणाऱ्या इतिहास संशोधकांना आणि इतिहासकारांना वास्तवतेची जाणीव झाली. प्रत्यक्षार्थवाद हा सत्याशी निगडित असतो. तो सत्यालाच महत्त्व देतो. तर इतिहास सत्याचे कथन करतो. म्हणून प्रत्यक्षार्थवाद हा इतिहासाला सर्वात जवळचा वाटतो.

### ४.३.३ प्रत्यक्षार्थवादाची वैशिष्ट्ये

प्रत्यक्षार्थवादाची प्रमुख वैशिष्ट्ये आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) प्रत्यक्षार्थवाद म्हणजे विज्ञानवाद आहे.

२) प्रत्यक्षार्थ वादात कल्पना व श्रध्दा यांना स्थान नाही.

३) प्रत्यक्षार्थवाद निरीक्षण व परीक्षण तसेच वर्गीकरण आणि विश्लेषण या घटकांना महत्त्व देतो.

४) प्रत्यक्षार्थवादाचा सत्याशी संबंध आहे. तो सत्यालाच महत्त्व देतो.

५) प्रत्यक्षार्थवादात स्थितीशिथीलता नाही. तर बदल महत्त्वाचे आहेत.

६) ऐतिहासिक बदलात बुद्धप्रमाण्यवाद आहे. हे प्रत्यक्षार्थवादाने स्पष्ट केले.

७) प्रत्यक्षार्थवाद हा सर्वसमावेशक आहे.

८) प्रत्यक्षार्थवादाने इतिहासाला वास्तववादी आणि शास्त्रीय दृष्टीकोन प्राप्त करुन दिला.

**आपली प्रगती तपासा**

१. प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये सांगा.

### ४.३.४ प्रत्यक्षवादी इतिहासलेखक

#### १. बार्थोल्ड निबूर (Barthold Niebuhr)

इतिहासाकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोण रुजविण्याचे, व इतिहासविषयाच्या पद्धतशीर अध्ययनाचे महत्त्व प्रतिपादित करण्याचे मोलाचे कार्य एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात जर्मनीतील बर्लिन विद्यापीठामधील इतिहासतज्ज्ञांनी केले. त्यांच्यापैकी पहिला महत्त्वाचा इतिहासकार बार्थोल्ड निबूर (Barthold Niebuhr) हा होय.

हा जन्माने डॅनिश, परंतु प्राचीन रोमचा इतिहास हा त्याच्या अध्ययनाचा विषय होता. १८१० साली बर्लिन विद्यापीठात रोमच्या इतिहासावर त्याने दिलेली भाषणे विशेष गाजली. त्या भाषणांनी शास्त्रीय इतिहास लेखन पद्धतीचा परिचय अभ्यासकांना करून दिला. रोमचा इतिहास अभ्यासण्यासाठी त्याने लिव्ही सारख्या प्राचीन रोमन इतिहासकारांचा मागोवा न घेता, प्राथमिक स्त्रोत साधनांचा शोध घेतला. त्या स्त्रोतांची चिकित्सक छाननी करून त्यांच्या विश्वसनीयतेची खातरजमा करून घेतली. आणि त्या साधनांच्या आधारे रोमचा इतिहास, त्यांच्या संस्था, त्यांच्या समस्या यांचा अभ्यास केला. त्याच्या अध्ययन पद्धतीचे महत्त्व बर्लिन विद्यापीठातील अभ्यासकांच्या मनावर बिंबले. अशा प्रकारे नीबूरने आधुनिक इतिहास लेखनाचा पाया तयार केला. ऐतिहासिक सत्याचा शोध घेण्याचे महत्त्व प्रतिपादन करणारे त्याचे एक विधान प्रसिद्ध आहे. तो म्हणतो, "In laying down the pen, we must be able to say in the sight of God, I have not knowingly or without earnest investigation written anything which is not true" हे त्याचे विधान प्रत्यक्षवादी इतिहास लेखनाचे मार्गदर्शक तत्त्व बनले.

### २. लिओपोल्ड रांके (Leopold)

#### अ. प्रारंभीचे जीवन

नीबूरच्या विचारप्रणालीने प्रभावित होऊन ह्या मार्गावर भक्कमपणे पावले टाकणारा, प्रत्यक्षवादी इतिहासलेखनाची मुहूर्तमेढ पद्धतशीरपणे रोवणारा जर्मन इतिहासकार लिओपोल्ड रांके हा होय. वस्तुतः त्याच्या अध्ययनाची सुरुवात अभिजात ग्रीक व रोमन वाङ्मय व धर्मशास्त्रापासून झाली. त्यानंतर तो आवड म्हणून इतिहासाच्या अभ्यासाकडे वळला. वयाच्या तेविसाव्या वर्षी, १८१८ साली इतिहासाचा शिक्षक म्हणून व्यावसायिक जीवनात त्याने पदार्पण केले, आणि १८२५ साली बर्लिन विद्यापीठात इतिहासाचा प्राध्यापक म्हणून रुजू झाला.

प्रारंभी इतिहासात रांकेला फार रुची नव्हती. नीबूरच्या रोमच्या इतिहासाने मात्र त्याचे मतपरिवर्तन झाले. नीबूरचे यादृष्टीने तो ऋण मान्य करतो. या सुमारास त्याने विविध ग्रंथांचे वाचन केले. त्यात ग्रीक व रोमन इतिहासकार, वॉल्टर स्कॉटच्या ऐतिहासिक कादंबऱ्या तसेच हर्डर, गथे यांच्या लिखाणाचे परिशीलन केले. यातून त्याची इतिहासविषयक भूमिका पक्की झाली. विविध प्रकारच्या ग्रंथांचे अध्ययन केल्यानंतर त्याने काढलेला निष्कर्ष त्याच्या पुढील विधानात स्पष्ट दिसतो; " I found by comparison that truth was more interesting and beautiful than romance, I turned away from it and resolved to avoid all inventions and imagination in my works and stick to facts."

#### ब. रांकेचे इतिहासलेखन

रांकेच्या नव्या इतिहासलेखनपद्धतीचा परिचय History of the Latin and Teutonic People ह्या त्याच्या पहिल्या ग्रंथाने करून दिला. ह्या ग्रंथातील आशयापेक्षा त्याला लिहिलेली प्रस्तावना व ग्रंथाला जोडलेली परिशिष्टे विशेष बोलकी ठरली. त्यात त्याची इतिहासाबाबतची धारणा तो स्पष्ट करतो. पूर्वी लिहिण्यात आलेल्या इतिवृत्तांपेक्षा

ऐतिहासिक व्यक्तींची कागदपत्रे अधिक विश्वसनीय मानावीत. त्यातून त्या व्यक्तीचे विचार व व्यक्तिमत्व यांचा बोध होतो; तसेच इतिहासग्रंथांचा वापर करतांना लेखकाचे व्यक्तिमत्व, त्याचे विचार, त्याने ऐतिहासिक माहिती कोठून मिळविली, याची छाननी करणे हे रांके महत्त्वाचे मानतो. त्याने आपल्या ग्रंथासाठी कोणती साधने वापरली याची यादी तर तो देतोच, त्याशिवाय त्यांची विश्वसनीयतेच्या दृष्टीने चिकित्सक तपासणी कशी केली याचीही माहिती देतो. तसेच दुय्यम साधनांची विश्वसनीयता कशी पडताळून पाहिली आणि त्यांचा वापर कोठे व कां केला तेही स्पष्ट करतो. कल्पना व गूढवाद त्याज्य मानून पुराव्यातून जे सत्य हाती आले तेच दर्शविणे हे तो इतिहासकाराचे पवित्र कर्तव्य मानतो.

रांकेच्या संकलित लिखाणाचे सुमारे ५४ खण्ड आहेत. त्यात विशेष उल्लेखनीय म्हणजे History of the Popes चे तीन खण्ड, The German History at the time of Reformation हा पाच खण्डाचा ग्रंथ, याशिवाय History of France, The Origins of the wars of Revolution आणि वयाच्या ८३ व्या वर्षी लिहायला घेतलेला Universal History ह्या प्रचंड ग्रंथाचे सहा खंड हे होत.

### क. इतिहासविषयक विचारप्रणालीचा प्रसार व प्रचार

व्यापक स्वरूपाच्या ह्या इतिहासलेखनाइतकेच त्याचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्या इतिहासविषयक विचारप्रणालीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी त्याने १८३३ पासून युरोपात अनेक ठिकाणी आयोजित केलेल्या कार्यशाळा, त्यातून नवोदित इतिहासकारांना केलेले मार्गदर्शन आणि आपल्या विचारप्रणालीच्या प्रसाराचे कायम व्यासपीठ म्हणून १८५९ साली सुरू केलेले एका इतिहासविषयक नियतकालिकाचे प्रकाशन हे होय. इतिहासलेखनाचा व संशोधनाचा उचित मार्ग दाखविणे, इतिहासाच्या अध्ययनात होणाऱ्या चुका दाखविणे आणि अचूक काटेकोर संशोधनाच्या मार्गाचा परिचय करून देणे ही त्याची उद्दिष्टे होती.

### ड. इतिहासाच्या अध्ययनाबाबत व लेखनाबाबत मूलभूत तत्त्वे

लिओपोल्ड रांके याने इतिहासाच्या अध्ययनाबाबत व लेखनाबाबत पुढील मूलभूत तत्त्वांवर भर दिला.

१) कोणत्याही ऐतिहासिक विषयावर लिखाण करताना त्याविषयी लिहिल्या गेलेल्या ग्रंथांना दुय्यम स्थान असावे. त्या ग्रंथाचे परिशीलन करताना तो कोणी, कधी व कोणत्या परिस्थितीत लिहिला याची तपासणी करूनच त्यातील विधाने, इतर पुरावे पडताळून पाहिल्यानंतर ग्राह्य मानावीत.

२) दुय्यम इतिहासग्रंथापेक्षा मूळ स्त्रोतांच्या अभ्यासावर भर द्यावा. ऐतिहासिक व्यक्तींची, ऐतिहासिक घटनेशी संबंधित असलेल्या व्यक्तींची कागदपत्रे, पत्रव्यवहार, त्यांच्या समकालीनांची कागदपत्रे हा मोलाचा पुरावा होय.

३) अशा पुराव्यातून जे सत्य अभ्यासकाच्या हाती पडेल, त्याचाच फक्त वापर इतिहासलेखकाने लिखाणात करावा. ऐतिहासिक सत्याचे चित्रण हे त्याचे एकमेव उद्दिष्ट असावे.

४) ऐतिहासिक लिखाणात संदर्भ, तळटीपा, संदर्भग्रंथसूचीना फार महत्त्व आहे. कारण त्यातून मूळ आधारांची वाचकाला माहिती होते, आणि विधानांच्या सत्यतेची तपासणी करणे सुकर होते.

५) ऐतिहासिक सत्याचे संकलन केल्यानंतर लेखकाने इतिहास लिहितांना तो वस्तुनिष्ठपणे, तटस्थ वृत्तीने लिहिणे अगत्याचे आहे. त्यात आत्मनिष्ठा येऊ देऊ नये, कारण आत्मनिष्ठा डोकावल्यास ऐतिहासिक सत्याला बाधा निर्माण होते.

६) भूतकाळाचे यथार्थ दर्शन घडविणे हे अभ्यासकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे इतिहास लिहितांना त्यातून उपदेश करण्याचा, बोध देण्याचा अगर मूल्यमापन करून योग्य अयोग्याचा निष्कर्ष लेखकाने काढू नये. असे केल्यास लिखाणात आत्मनिष्ठता येते. गतकाळातील घटना स्त्रोतसाधनातून जशा निदर्शनास आल्या, त्यांचे तसेच्या तसे निवेदन करणे या उद्दिष्टापासून विचलित होऊ नये.

### इ. रांकेच्या इतिहासलेखनाचे मूल्यमापन

लिओपोल्ड रांकेने पुरस्कृत केलेल्या ह्या प्रत्यक्षवादी इतिहासलेखन पद्धतीवर नंतरच्या काळात समीक्षकांनी काही आक्षेप घेतले. वस्तुनिष्ठेवर अवास्तव भर ही लेखनपद्धती देत असल्यामुळे लिखाणात रटाळपणा येतो; शिवाय पूर्ण वस्तुनिष्ठता इतिहासासारख्या विषयात अशक्य आहे. केवळ लिखित पुराव्याच्या आधारे इतिहास लिहायचा झाल्यास तो प्रामुख्याने राजकीय, राजनैतिक व लष्करी विषयाबाबत राहील, त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक यासारखे मानवी जीवनाचे इतर महत्त्वाचे पैलू दुर्लक्षित राहतात, असे ते आक्षेप आहेत. जे डब्लू. थॉमसन यांना रांकेने केलेला शास्त्रीय इतिहासलेखनाचा दावा समर्थनीय वाटत नाही. एडवर्ड कार यांनाही शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ऐतिहासिक पूर्ण सत्य हाती येते ही रांकेची भूमिका मान्य नाही. चार्लस् बीअर्ड, देखील "एकोणिसाव्या शतकातील एक सर्वाधिक पक्षपाती इतिहासकार" म्हणून रांकेची संभावना करतात.

गूच यांनी मात्र, इतिहासलेखनात प्राथमिक व समकालीन स्त्रोत साधनांवर रांकेने दिलेला भर, ऐतिहासिक साधनांच्या तपासणीची त्याने पुरस्कृत केलेली शास्त्रीय पद्धती, सत्याचा शोध घेण्यासाठी त्याने वापरलेले तंत्र आणि इतिहासलेखनात सत्यदर्शनाचा त्याने धरलेला आग्रह हे इतिहास लेखनपद्धतीला रांकेने केलेले मौलिक योगदान होते, असे मत मांडले आहे. ह्या दृष्टीने रांकेचा उल्लेख 'आधुनिक इतिहासलेखन शास्त्राचा जनक' असा केला जातो. इतिहास पूर्णतः भौतिक शास्त्रासारखी ज्ञानशाखा नसली तरी, त्याचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करून सत्याचा शोध घेता येतो, किंबहुना तसा घेणे हे इतिहास अभ्यासकाचे कर्तव्य आहे, इतिहास ही एक स्वायत्त ज्ञानशाखा असून तिच्या अध्ययनाची निश्चित उद्दिष्टे आहेत व विशिष्ट निर्धारित तंत्र आहे, असे आग्रहाने प्रतिपादन करून रांकेने इतिहासाला दैववादाच्या व गूढवादाच्या चौकटीतून बाहेर काढून त्याला शास्त्रीय ज्ञानशाखेचा दर्जा प्राप्त करून दिला हे नाकारता येत नाही.

### आपली प्रगती तपासा

१. प्रबोधनकालीन इतिहास लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ३. ऑगस्ट कॉम्तचा प्रत्यक्षज्ञानवाद

### अ. प्रारंभिक जीवन

जर्मनीमध्ये लिओपाल्ड रांके ज्या कालावधीत इतिहासलेखनात शास्त्रीय अध्ययन पद्धतीचे महत्व व वस्तुनिष्ठता अधोरेखित करीत होता, त्याच सुमारास जर्मनी जवळच्या फ्रान्समध्ये ऑगस्ट कॉम्त (Auguste Comte) हा विचारवंत मानवाच्या बौद्धिक विकासाबाबत महत्त्वाचे सिद्धांत प्रतिपादित होता, आणि त्या अनुषंगाने इतिहासलेखनासंबंधी काही प्रमेये मांडीत होता. त्याने मांडलेले विचार 'पॉझिटिविझम' म्हणून ओळखले जातात. Positive Philosophy of History हा शब्दप्रयोग प्रथम कॉम्त याने केला आणि इतिहासाविषयीचे प्रत्यक्षज्ञानाचे तत्त्वज्ञान मांडून रांकेच्या प्रत्यक्षदर्शी इतिहासलेखनपद्धतीत नव्या विचाराची भर घातली.

अठराव्या शतकात भौतिक शास्त्रांचा अभ्यास शास्त्रज्ञ मोठ्या प्रमाणावर करीत होते व शास्त्रीय पद्धतींचा वापर करून भौतिक जगातील व्यवहारांचे तोवर असलेले अज्ञान दूर करता येईल, नैसर्गिक शक्तींच्या संचलनाचे कोडे उलगडता येईल असा विश्वास विज्ञानाच्या जगात निर्माण झाला होता. शास्त्रीय अध्ययन पद्धतींचे महत्त्व विचारवंतांच्या मनावर बिंबले होते. याचा प्रभाव मानवी व्यवहारांचे अध्ययन करणाऱ्या त्वज्ञांवरही पडत होता. त्यापैकी एक ऑगस्ट कॉम्त हा होता. कॉम्त हा व्यवसायाने गणितज्ज्ञ असला तरी प्रसिद्ध फ्रेंच विचारवंत सेंट सीमॉ याच्या हाताखाली त्याचा सचिव म्हणून त्याने काम केले. त्या काळात शास्त्रीय ज्ञानाने प्रभावित होऊन तो मानवी जीवनाचा विचार करू लागला व त्यातून त्याच्या 'पॉझिटिविझम'चा उदय झाला.

### ब. ग्रंथलेखन

१८३० ते १८५४ च्या दरम्यान मानवाच्या विकासाचा सखोल अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करून कॉम्तने दोन प्रचंड ग्रंथ प्रकाशित केले. The C ourse of Positivist Philosophy हा सहा खण्डात व System of Positivist Politics हा चार खण्डात प्रकाशित झाले. ह्या ग्रंथातून त्याने आपल्या प्रत्यक्षज्ञानप्राप्ती संबंधीची उद्दिष्टे व मूलभूत तत्त्वे विशद केली.

### क. मानवाच्या बौद्धिक विकासाच्या तीन अवस्था

मानवाच्या बौद्धिक विकासाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केल्यास त्याच्या तीन अवस्था दिसून येतात.

१) पहिला टप्पा मानवाच्या रानटी अवस्थेचा असून त्याकाळात त्याच्या बुद्धीचा विकास झालेला नसल्यामुळे नैसर्गिक शक्तींच्या व्यवहारांचे, त्याच्या भोवतालच्या भौतिक परिस्थितीचे आकलन करून घेण्यास तो असमर्थ होता. त्यामुळे तो आधिदैविक शक्तीवर विश्वास ठेवीत होता. काही अतिमानवी अद्दश्य शक्ती भौतिक जगाचे संचालन करतात अशी त्याची धारणा होती. मात्र भोवतालचे जग जाणून घेण्याची जिज्ञासा त्याच्यात होती.

२. विकासाच्या दुसऱ्या अवस्थेला कॉम्त आध्यात्मिक भूमिकेचा टप्पा म्हणतो. ह्या काळात भोवतालचे विश्व तात्त्विक भूमिकेवरून समजून घेण्याचा प्रयत्न मानवाने केला. परंतु ह्या चिंतनपर भूमिकेतून विश्वाच्या संचलनाचे मर्म तो समजून घेऊ शकला नाही.

३. तिसरा टप्पा ही मानवाच्या बौद्धिक विकासाची परिणत अवस्था आहे. ह्या टप्प्यात संपूर्ण विश्वाचे, त्यातील मूलभूत तत्त्वांचे तात्त्विक भूमिकेवरून साकल्याने आकलन करण्याचा प्रयत्न बाजूला सारून, सृष्टीतील एकेका घटकाचे स्वतंत्रपणे शास्त्रीय पद्धतीने आकलन करून घेण्याचा, त्यांच्यातील आंतरिक अन्योन्यसंबंध उलगडून ते तर्कनिष्ठपणे समजून घेऊन, त्याच्यातील आंतरिक ऐक्याचे व नियमिततेचे सूत्र समजून घेण्याचा मानव प्रयत्न करतो. ही शास्त्रीय ज्ञानाची अनुभवसिद्ध प्रयोगांद्वारा मूलभूत सत्याचे आकलन करण्याची अवस्था आहे. ह्या पद्धतीने भौतिक जगाच्या व्यवहारामागील निश्चित नियम शोधून काढता येतात, हे जग निश्चित नियमानुसार चालत असल्याचे आढळून येते. व अशा नियमांचा शोध लागला की त्यांचा उपयोग मानवी समाजाच्या विकासासाठी करता येतो ही कॉम्तच्या 'पॉझिटिव' म्हणजे शास्त्रीय पद्धतीने चिरंतन सत्याचे आकलन करून घेण्याच्या तत्त्वज्ञानाची बैठक आहे.हीच भूमिका मानवी समाजाच्या अध्ययनाला लावता येते असे कॉम्त प्रतिपादन करतो.

### ड. 'सायन्य ऑफ सोशॉलॉजी'

शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ज्याप्रमाणे विश्वाच्या संचलनामागील कायम स्वरूपी नियम शोधून काढता येतात, त्याच पद्धतीचा वापर करून गतकालीन मानवी जीवनाचे अध्ययन करता येईल, आणि त्यासंबंधी सर्वसामान्य नियम शोधून काढता येतील; त्यासाठी गतकालीन घटनांचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून व त्यांच्यातील आंतरिक संबंध शोधून काढून मानवी जीवनाबाबत सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात, अशी त्याची ठाम भूमिका आहे. अशा अध्ययन पद्धतीचे नामकरण तो 'सायन्य ऑफ सोशॉलॉजी' असे करतो. हा शब्दप्रयोग करून तो इतिहास व समाजशास्त्र यांना एकमेकानजीक आणतो. इतिहासाच्या अभ्यासकाने केवळ गतकालीन सत्य घटनांचा शोध लावणे एवढेच इतिकर्तव्य न मानता, त्या घटनांमागील आंतरिक सूत्र शोधून काढावे, त्यातून सर्वसामान्य नियम शोधावेत, मानवी व्यवहारांचे नियमन करणाऱ्या मूलभूत सूत्रांचा शोध लागला तर त्या आधारे भविष्यात मानवी जीवनाला दिशा देता येईल, म्हणजे मानवी व्यवहाराविषयीचे शास्त्रीय ज्ञान मानवाच्या विकासासाठी पर्यायाने मानवी समाजाच्या प्रगतीसाठी उपकारक ठरेल अशी 'पॉझिटिविझम' ची तात्त्विक भूमिका आहे. कॉम्तच्या ह्या विचारप्रणालीचा तत्कालीन वैचारिक जगावर खोल परिणाम झाला. मानवी जीवनाशी निगडीत असलेल्या ज्ञानशाखांच्या अध्ययनपद्धतीला त्यामुळे नवी दिशा मिळाली. इतिहास व मानवी समाजाच्या शास्त्रीय अध्ययनाची उपयोगिता अधोरेखित झाली. ऑगस्ट कॉम्त याने समाजशास्त्राचा पाया घातला.

### इ. कॉम्तचा सिद्धांत

कॉम्तने समाजशास्त्रीय संकल्पनांच्या आधारे टीकात्मक पद्धतीने इतिहासाचा अन्वयार्थ (Interpretation) लावण्याचा प्रयत्न केला. त्याचा अन्वयार्थ प्रत्यक्ष ज्ञानावर अवलंबून असल्याने त्याच्या सिद्धांतोला प्रत्यक्षज्ञानवाद (Positivism) म्हणतात. तो वास्तबबादावर

आधारित असून दैवी शक्ती, साक्षात्कार वगैरे असत्य मानतो व सर्व घटना नैसर्गिक आहेत व निसर्गाचा अभ्यास केल्यानेच या घटनांची प्रचिती आपणास येऊ शकेल असे त्याला वाटत असे.

कॉम्तला निसर्गवादावर आधारित समाज निर्माण करावा असे वाटत असे. अशा निसर्गवादामुळे मानवाचा गतकाळातील वाढ, विकास आपल्याला कळू शकतील व त्याच्या आधारावर आपल्याला भविष्य वर्तवणे शक्य होईल अशी कॉम्तची धारणा होती. त्याला समाजामधील गतीच्या नियमांचा अभ्यास करून मानवाच्या नियंत्रणाची जी तत्त्वे आहेत त्याचा अभ्यास करावयाचा होता. या अभ्यासाच्या जोरावर समाजशास्त्राची त्याला उभारणी करावयाची होती. कोणत्याही ऐतिहासिक कालखंडामध्ये समाजाला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी जे काही घटक असतात त्यांचा अभ्यास करून स्वतंत्र तत्त्वज्ञान मांडावयाचे होते. त्याच्या तत्त्वज्ञानाचे आधार सामाजिक गतिशीलता (Social dynamies) व सामाजिक स्थितिशीलता (Social Statics) हे आहेत. प्रगती व व्यवस्था, बदल व स्थिरता हे त्याच्या प्रत्यक्षज्ञानवादाचे मुख्य आधार आहेत. ज्याप्रमाणे शास्त्रज्ञ निसर्गाचा अभ्यास करतात त्याचप्रमाणे समाजाचा, शास्त्रीय तत्त्वावर आधारित अभ्यास करावा असे कॉम्तचा सिद्धांत आपल्याला सांगतो. नैसर्गिक शास्त्रांनी ज्याप्रमाणे आपले नियम सिद्ध केले आहेत त्याप्रमाणे समाजशास्त्राने आपले नियम सिद्ध केले म्हणजे त्याला सामाजिक शास्त्राचा आकार (Form of a social Science) येईल असे कॉम्तला वाटते. निसर्गामधील घटनांमध्ये एक प्रकारची शिस्त असते, घटनाक्रम ठरलेला असतो, तशाच प्रकारच्या घटना व शिस्त मानवी समाजामध्ये असते, त्याचा अभ्यास करून, त्याच्या जोरावर इतिहासामधील घटनांचा अभ्यास केल्यास त्या विषयाला शास्त्रशुद्ध पाया लाभेल अशी कॉम्तची भूमिका आहे. शास्त्राचे महत्त्व सांगताना प्रो. लेविस व कोझर म्हणतात, "In the world of nature, Science had succeded in progressively contracting the realm of the apparently nonorderd, the fortuitons of the accidental. The stage was now set for a similar endeavour in the study of society." नव्या शास्त्रीय पद्धतीमध्ये, परंपरेवर आधारित न राहता, तर्कबुद्धी व निरीक्षणावर आधारित शास्त्राची उभारणी करण्याचा कॉम्तने प्रयत्न केला. समाजशास्त्राने निरीक्षण (Observation), प्रयोगात्मकता (Experimentation) व तुलना (Comparism) या तत्त्वांवर भर देण्याचे ठरविले. कॉम्तने प्रिपरेटरी थिअरी मांडली आहे. या सिद्धातांनुसार 'जोपर्यंत एखादी सामाजिक घटना दुसऱ्या सामाजिक घटनेशी जोडली जात नाही तोपर्यंत त्या सामाजिक घटनेला अर्थ राहत नाही. अशा वेळी सामाजिक गतिशीलता व स्थितिशीलता यांच्याशी निरीक्षणाचा संपर्क आला पाहिजे. प्रयोगात्मकता (Experimentation) ही सामाजिक शास्त्रामध्ये शक्य असतेच असे नाही. तथापि, शक्य असेल तेथे प्रयोगात्मकता समाजशास्त्रामध्ये अवलंबावी असे कॉम्त म्हणतो. तुलने च्या संदर्भात कॉम्त म्हणतो मानवी समाजाची, प्राणीमात्राशी तुलना करून सामाजिक संबंध प्रस्थापित करता येतात. या तीन तत्त्वांच्या जोडीलाच ऐतिहासिक पद्धतीचा वापर केला पाहिजे असे कॉम्त म्हणतो.

कॉम्तने मांडलेला विज्ञानवाद म्हणजेच त्याचा प्रत्यक्षज्ञानवाद होय. कॉम्तच्या विज्ञानवादामध्ये धार्मिक वा तात्त्विक अवस्था महत्त्वाची नसून वैज्ञानिक नियमन महत्त्वाचे

ठरते. विज्ञानवादात कल्पना, श्रद्धा यांना स्थान नसते; तर निरीक्षण, प्रयोगात्मकता, परीक्षण, वर्गीकरण, विश्लेषण असे सूत्रबद्ध व्यवस्थापन असते.

फ. कॉम्तच्या विज्ञानवादाची वैशिष्ट्ये

१. कॉम्तच्या विज्ञानवादाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

२. निसर्गनिर्मित घटनांचे विश्लेषण ज्या पद्धतीने केले जाते त्याच पद्धतीने म्हणजे शास्त्रीय पद्धतीने सामाजिक घटकांचे विश्लेषण केले जाते.

३. विज्ञानवादाचा वास्तवतेशी संबंध आहे. असत्य, काल्पनिक अवास्तव यांचा विचार विज्ञानवादामध्ये होत नाही.

४. कॉम्तचा विज्ञानवाद धार्मिक व तात्त्विक विचारापासून दूर राहून फक्त वास्तवाचा विचार करतो.

५. विज्ञानवादामध्ये कार्यकारणभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असतो.

६. प्रत्यक्षवाद कोणत्याही निरपेक्ष विचारांचा स्वीकार करीत नाही.

७. कॉम्तचा प्रत्यक्षवाद सर्वसमावेशक आहे.

८. विज्ञानवाद वा प्रत्यक्षवाद हा सामाजिक पुनर्रचनेचे साधन म्हणून ओळखण्यात येतो.

'थोडक्यात, प्रत्यक्षवादाचा संबंध सत्याशी आहे मनोरंजनाशी नाही. याचा संबंध उपयुक्त ज्ञानाशी आहे, सर्व ज्ञानाशी नाही. या वादाचा संबंध तंतोतंत ज्ञानाशी आहे. संदिग्ध ज्ञानाशी नाही. या वादाचा संबंध सतत होणाऱ्या बदलाशी आहे, स्थितिशीलतेशी नाही. या वादाचा संबंध संबंधित ज्ञानाशी आहे. प्रत्यक्षज्ञानवाद ही एक विचारपद्धती आहे. (Positivism is a mode of thought).

वरील विवेचनाचा मतितार्थ असा की एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नीबूर व रांके ह्या इतिहास अभ्यासकांनी तत्कालीन गूढवादी इतिहासलेखनपद्धती नाकारून ऐतिहासिक लेखनासाठी मूळ स्त्रोत साधनांच्या अभ्यासावर व शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ऐतिहासिक सत्याचा शोध घेण्यावर, आणि ते सत्य वस्तुनिष्ठ रीत्या मांडण्यावर भर दिला. तसेच ऐतिहासिक स्त्रोतातून सत्य शोधून काढण्याच्या शास्त्रीय पद्धती, प्रतिपादित केल्या. इतिहासाचा अभ्यास तेवढ्यापुरता सीमित असावा असे पॉझिटिव तत्त्वज्ञानाचा पुरस्कर्ता कॉम्त मानीत नाही; तर मानवी व्यवहाराच्या शास्त्रीय अध्ययनातून हाती आलेल्या सत्याच्या आधारे त्याबाबत काही सामान्य सिद्धांत शोधून काढता येतील असा ठाम निष्कर्ष त्याने काढला. ह्या त्याच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव मानव्य शास्त्रांच्या अध्ययनावर झाला. मानवी जीवनाच्या प्रवाहामागील मूलभूत सूत्रे शोधून काढण्याचा प्रयत्न अभ्यासक करू लागले. त्यात कार्ल मार्क्स, अर्नाल्ड टॉयन्बी यांचा अंतर्भाव होतो. अशाच प्रकारचे शास्त्रीय स्वरूपाचे अध्ययन औद्योगीकरण, हुकुमशाही, वसाहतवाद, साम्राज्यवाद इत्यादी विषयांचे होऊ लागले.

ऑगस्ट कॉम्त व त्याच्या अनुयायांना इतिहास हे मानव्य शास्त्र असल्यामुळे ते शंभर टक्के शास्त्र मानता येणार नाही, व भौतिक शास्त्रांच्या अध्ययनाची पूर्णतः शास्त्रीय पद्धती इतिहास अध्ययनाला लावता येणार नाही याची कल्पना होती. म्हणून ते इतिहासाला शास्त्र म्हणत नाहीत. परंतु निरीक्षण, चिकित्सक विश्लेषण, सत्यासत्याचा निर्णय ह्या पद्धती सर्व ज्ञानशाखांच्या इतिहासाच्या देखील, अध्ययनात वापरता येतात व त्या आधारे सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात अशी त्यांची भूमिका आहे. असे करून ते इतिहासाला समाजाच्या शास्त्राचा दर्जा देतात.

### ग. ऑगस्ट कॉम्तचा प्रत्यक्षज्ञानवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन

विसाव्या शतकातील के. आर. पॉपर सारख्या पॉझिटिविस्ट विचारवंतांनी गतकालीन घटनांच्या सत्यशोधनाचे, त्यासाठी शास्त्रीय पद्धतींचा वापर करण्याचे तत्त्व मान्य केले आहे. परंतु मानवी जीवन परिवर्तनीय आहे. त्यामुळे सर्व घटना समान नसतात, काल घडलेली घटना तशीच्या तशी आज घडणार नाही आणि म्हणून त्यातून सर्वसामान्य सिद्धांत शोधणे व मुख्यतः त्या आधारे भविष्याबाबत आडाखे बांधणे तर्काला पटण्याजोगे नाही, गतकालीन अनेक घटनांच्या अध्ययनातून फार तर काही सामान्य निष्कर्ष काढता येतील परंतु त्यांना चिरकालीन स्वरूपाचे मानणे व त्या आधारे भविष्याचा विचार करणे अशास्त्रीय व चुकीचे ठरेल अशी त्यांची भूमिका आहे.

विसाव्या शतकातील रॉबिन कोलिंगवूड व एडवर्ड कार ह्या व्यासंगी विचारवंतांनीही कॉम्तच्या पॉझिटिविस्ट भूमिकेतील उणिवा विशद केल्या आहेत. भौतिक बाबींचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रीय पद्धती मानवी जीवनाच्या अध्ययनासाठी वापरणे संयुक्तिक नाही, प्रत्येक घटना ही अनन्यसाधारण असते, त्याचा तपशील भिन्न असतो आणि म्हणून काही घटनावरून सर्वसामान्य निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल असे मत Idea of History ह्या ग्रंथात कोलिंगवूडने मांडले आहे. What is History? ह्या प्रसिद्ध ग्रंथात एडवर्ड कार यांनी ऐतिहासिक सत्य चिरकालीन स्वरूपाचे नसते, तसेच ते व्यक्तिसापेक्ष असते, सत्य हे बहुआयामी असते, ते सर्व आयाम प्रत्येक अभ्यासकाला दिसतात असे नाही आणि म्हणून सामान्य सिद्धांत काढणे किंवा संपूर्ण सत्याचे ज्ञान झाल्याचा दावा इतिहासकाराने करणे दिशाभूल करणारे आहे असे प्रतिपादन केले आहे; तसेच पूर्णतः वस्तुनिष्ठ लिखाण अशक्यप्राय असल्याचेही मत प्रदर्शित केले आहे.

### आपली प्रगती तपासा

१. ऑगस्ट कॉम्तच्या प्रत्यक्षज्ञानवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन करा.

## ४. हेन्री थॉमस बकल इ. स. १८२९ ते १८६२ (Henry Thomas Buckle)

### अ. बकलचा पूर्ववृत्तांत (Early Life of Buckle)

हेन्री थॉमस बकल यांचा जन्म २४ नोव्हेंबर, १८२१ रोजी इंग्लंडमधील केंट (Kent) परगण्यात झाला. बकलची शरीरप्रकृती अतिशय नाजूक असल्यामुळे त्यास नियमित शिक्षण मिळाले नाही. त्याने आपले शिक्षण अनेक ठिकाणी प्रवास करून व निवडक ग्रंथ वाचून मिळविले. १८४० ते १८४४ या काळात त्याने युरोपखंडात अनेकवेळा प्रवास केला.

प्रवासामध्ये त्याचे वाचन सतत चालू असे. १८६१ मध्ये त्याने इजिप्त, सिनाई, पेट्रा, हेब्रॉन, जेरूसलेम व नाझरेत या ठिकाणांना भेटी दिल्या. यापैकी नाझरेत येथे त्याला टॉयफाईड झाला व त्यामध्येच २९ मे, १८६२ रोजी वयाच्या अवघ्या एकोणचाळीसाव्या वर्षी अनपेक्षितपणे तो मरण पावला. बकलच्या पूर्वजीवनात सर्व जगाला आश्चर्यचकित केले जाईल असे काही वैशिष्ट्य नाही. त्याचे इतिहास लेखन मात्र वैचारिक क्रांतीच्या स्वरूपात आहे.

### ब. बकलचे इतिहास लेखन (Buckle's Historical Writing)

बकलने History of Civilization in England, France, Spain and Scotland हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात बकलचे काही महत्त्वपूर्ण असे विचार दिसून येतात. बकलने अभ्यासासाठी एखादी व्यक्ती गृहीत न धरता संस्कृती ही गृहीत धरून त्यानुसार चार देशांच्या संस्कृत्यांच्या अभ्यासावर आधारित हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्याने असा विचार मांडला आहे की, प्रत्येक संस्कृतीचा विकास काही विशिष्ट तत्त्वानुसार होत असतो व त्या तत्त्वाचे स्वरूप इतर भौतिक शास्त्रांतील तत्त्वांप्रमाणेच असते. तो पुढे असेही म्हणतो की, संस्कृती म्हणजे विकास व ज्यावेळी ज्ञानाचा विकास होतो तेव्हा निसर्गाचा प्रभाव कमी होतो. म्हणूनच युरोपमध्ये ज्ञानाचा विकास झालेला आहे व माणसे जास्त बुद्धिप्रामाण्यवादी झालेली आहेत.

ऑगस्ट कॉम्तच्या वैचारिक भूमिकेचा अंगिकार इतिहासलेखनाच्या क्षेत्रात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लिखाण करणाऱ्या हेन्री थॉमस बकल ह्या इंग्लिश इतिहासलेखकाने केला.

### क. बकलचा सिद्धांत (Buckle's Theory)

बकल हा ऑगस्त कॉम्त याचा जरी समकालीन असला तरी कॉम्तचा त्याच्या विचारसरणीवर प्रभाव पडलेला दिसून येतो. कॉम्तच्या प्रत्यक्षार्थवादी (Positivistic) विचारसरणीनुसार इतिहासाचा अन्वयार्थ लावणारा असा तो एक संशोधक होता. डार्विनने मानवाच्या बाबतीत जो उत्क्रांतीचा सिद्धांत लागू केला तो बकलने इतिहासामध्ये आणण्याचा प्रयत्न केला. बकलच्या लिखाणामध्ये विगमन (Inductive) पद्धतीने निष्कर्ष काढलेले आहेत. इतिहास लेखनामध्ये तर्काधिष्ठित निष्कर्ष काढले पाहिजेत असा त्याचा कटाक्ष असे. कार्लाईलच्या Hero Worship ला त्याचा पूर्ण विरोध आहे. त्याच्या मते, Hero Worship मुळे एखाद्या व्यक्तीचे महत्त्व विनाकारण वाढते व इतर साहाय्यभूत परिस्थितीचे महत्त्व कमी होते. म्हणून एखादी व्यक्ती गृहीत धरून संशोधन न करता समाजाचे एखादे वैशिष्ट्यपूर्ण अंग (Aspect) लक्षात घेऊन संशोधन केले पाहिजे. अशा संशोधनामध्ये संख्याशास्त्रीय (Statistical) अशी माहिती उपलब्ध असली पाहिजे. म्हणजे त्याच्यावरून आपल्याला गणिताच्या पद्धतीने निष्कर्ष काढता येतील. इतिहासामध्ये ही गोष्ट शक्य आहे. जर ऐतिहासिक घटनांचा अभ्यास गणिताप्रमाणे करता येत असेल तर त्यामध्ये निश्चितच नियम असले पाहिजेत. इतिहासात अशाप्रकारचे नियम असू शकतात. नैतिक मूल्ये ही प्रत्येक समाजात असतात. त्यामुळे समाजाच्या प्रगतीसाठी नैतिक मूल्ये हे कारण ठरू शकत नाही. बकलच्या मते, इतिहास हे शास्त्र आहे; परंतु या शास्त्रात नवीन तंत्र, नवे विचार याचा अवलंब झाला पाहिजे. इतिहासामध्येसुद्धा सामान्यीकरण

(Generalisation) करता येते. उदा. कोणत्याही राष्ट्रात घडणाऱ्या घटना या समान असतात. एखाद्या राष्ट्रातील गुन्हयांचे प्रमाण थोड्याफार फरकाने कायम असते. एखाद्या घटनेचे विशेषतः बलात्काराची प्रकरणे थोड्याफार फरकाने त्याच प्रमाणात चालू असतात. लग्नविधीसारखे प्रसंग प्रत्येक वर्षी आपल्याला गेल्या वर्षीपेक्षा जास्त प्रमाणात झाले असे वाटते; परंतु सरासरीने त्यांचे प्रमाण सारखेच असते. जी परिस्थिती एखाद्या देशाच्या बाबतीत असते तीच परिस्थिती इतर देशांच्या बाबतीतही असते. म्हणूनच काही घटनांचा बारकाईने अभ्यास करून आपल्याला नियम शोधता येतील व ऐतिहासिक भविष्य वर्तविणे शक्य होईल.

बकलने एखाद्या व्यक्तीवर लक्ष केंद्रित न करता संपूर्ण समाजाचा विचार करण्याची पद्धत कॉम्तप्रमाणे सुरू केली. तो म्हणतो, एखाद्या व्यक्तीचा उदय हा एक अपघात असतो. तो सर्वसाधारण नियम नव्हे. कारण, एखाद्या व्यक्तीचा उदय हा त्याच्या पुरताच मर्यादित असतो, याचे उदाहरण आपल्याला हिटलरच्या रूपाने देता येईल. हिटलर जरी झाला नसता तरी दुसऱ्या कोणीतरी हे कार्य केलेच असते. म्हणजेच थोर व्यक्तीचा उदय हा अपघात असून लोक त्या व्यक्तीकडे आश्चर्याने पाहतात. वस्तुतः तसे पाहण्याचे कारण नाही. इतिहासकारांना निष्कर्ष काढण्यामध्ये ज्या काही अडचणी येतात त्यांचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा पूर्वग्रह होय. इतिहासकारांनी निष्कर्ष काढत असताना भौगोलिक परिस्थिती, हवामान, साधनसंपत्ती, जमिनीची सुपिकता व सभोवतालचे वातावरण यांचा विचार केला पाहिजे. या तत्त्वाचे स्पष्टीकरण करीत असताना बकल म्हणतो की, ज्या ठिकाणी सतत भूकंप होतात तेथील लोक अंधश्रद्ध होतात, नद्यांच्या किनारी संस्कृतीचा उदय होतो. उदा. नाईलच्या काठी इजिप्त व सिंधूच्या काठी सिंधू संस्कृती. जर प्रदेश वैराण असेल तर तेथील लोक स्थलांतर करतात. उदा. अरबांनी केलेले स्थलांतर.ज्या ठिकाणची हवा अतिशय उष्ण आहे तेथील लोक आळशी बनतात. उदा. आफ्रिका व भारत, बकलच्या या काही निष्कर्षांना अपवाद असू शकतील, म्हणजे ते नियम नव्हेत. बकलच्या मते, इतिहास म्हणजे "Who is Who" नव्हे तर घटनांच्या मागे निश्चितच काही कारण असते.

बकलला कार्यकारणभाव मान्य आहे. तो म्हणतो की, कोणतीही घटना ही एखाद्या पूर्वी घडलेल्या घटनेमधूनच पडत असते. अकल्पितपणे घटना पडत नाहीत. प्रत्येक घटनेमध्ये कार्यकारणभाव हा असतोच व इतिहासकाराने तो प्रस्थापित केला पाहिजे,

### ड. बकलच्या सिद्धांतावरील टीका (Criticism on Buckle's Theory)

बकलचा वरील सिद्धांत हा युरोपियन विद्वानांत खळबळ माजविणारा होता. बकल हा प्रचलित विचारसरणीविरुद्ध बंड करणारा होता. त्याचे विचार अतिशय शास्त्रशुद्ध असल्याने काही लोकांना ते टीकास्पद वाटले. बकलने प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञान इतिहासामध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. अर्थातच या त्याच्या विचाराला अनेक लोकांनी विरोध केला. कार्लाईलचे तत्त्वज्ञान हे बकलच्या बरोबर विरुद्ध होते. लॉर्ड ॲक्टन यांच्या मते, बकलने इतिहासाचे खरे स्वरूप नष्ट केले व तो देवाच्या अस्तित्वालाच आव्हान करू लागला. ही त्याची प्रवृत्ती बरोबर नाही. लॉर्ड मेकॉले याचासुद्धा बकलला विरोध असे. बकलने असे एक विधान केले होते की, One glorious Principle of Undeviating Regularity, हे विधान तर अतिशय क्रांतिकारक ठरले. एकंदरीत बकलचा दृष्टिकोण युरोपीय तत्त्ववेत्त्यांना

समजला नाही. बकलच्या मते, इतिहासकारांनी व्यक्तीचा विचार न करता एखाद्या कालखंडातील विचारप्रवाहाचा विचार करावा. हा विचारच लोकांना पटला नाही. बकलला जे काही महत्त्व प्राप्त झाले ते त्याच्या मृत्यूनंतर होय.

बकलच्या मते, इतिहास हे संपूर्णपणे शास्त्रही नाही किंवा कलाही नाही. इतिहासामध्ये या दोन्हीही गोष्टींची फारकत करणे योग्य नाही असे त्याला वाटत असे. आधुनिक काळातील एक श्रेष्ठ प्रत्यक्षार्थवादी म्हणूनच बकलकडे पाहिले पाहिजे.

### इ. बकलच्या सिद्धांताचे मूल्यमापन

बकलच्या श्रेष्ठ कार्याचे मूल्यमापन करीत असताना प्रो. थॉम्पसन म्हणतात की, 'सूज्ञ टीकाकारांनी बकलच्या ग्रंथातील संस्कृतीच्या उदयाच्या मीमांसेतील निगामी (Deductive) पद्धतीबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. बकलने दिलेली माहिती अपूर्ण आहे. यामध्ये सूचना खूप आहेत. या सूचना नाकारता येत नाहीत. त्याच्या निष्कर्षामधून जी चेतना मिळाली तिचा परिणाम तरुण मनावरही झाला व तो नाकारता येत नाही. जरी त्याने स्वतः मोठा इतिहास ग्रंथ लिहिला नाही तरी इतर अनेकांनी इतिहास लिहिण्यास त्याच्यापासून स्फूर्ती घेतली. "

### आपली प्रगती तपासा

१. हेन्री थॉमस बकलच्या प्रत्यक्षज्ञानवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन करा .

## ४.४ सारांश

बुद्धिवाद हा सत्याशी निगडित असतो. तो सत्यालाच महत्त्व देतो. तर इतिहास सत्याचे कथन करतो. म्हणून बुद्धिवाद हा इतिहासाला सर्वात जवळचा वाटतो. स्वप्नसृष्टी व कल्पनाविश्वात रमणाऱ्या मानवाला बुद्धिवादाने जागे केले. आपल्या भोवतालच्या समाजसृष्टीचे सत्यज्ञान त्यांना करुन दिले. भूतकालीन घडामोडींचे त्याने वस्तूनिष्ठ दर्शन घडवले. विज्ञाना प्रमाणे इतिहासात सुध्दा वस्तुनिष्ठता असते असे स्पष्ट केले. तसेच इतिहासाला सुध्दा नियम असतात हे दाखवून दिले. त्यामुळे इतिहासाला "सामाजिक भौतिकशास्त्र" असा शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला. इतिहास आधिकाधिक पारदर्शक बनला.

हे सर्व आक्षेप ध्यानात घेऊनही रांके आणि कॉम्तच्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानाने इतिहासलेखनाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली, ऐतिहासिक सत्यावर भर दिल्याने इतिहासाला विश्वसनीयतेचा भक्कम आधार मिळाला, मूळ स्त्रोतांच्या अभ्यासाला, संकलनाला व प्रकाशनाला चालना मिळाली, त्यासाठी सहाय्यक शास्त्रांचा वापर होऊ लागला व त्या शास्त्रांच्या विकासालाही गती मिळाली आणि घटितामधील परस्परसंबंध उकलून दाखविण्यावर भर दिल्यामुळे इतिहासलेखनात सुसूत्रता व अर्थपूर्णता आली- हे सर्व इतिहासलेखनाला प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञानाचे मौलिक योगदान होते.

थोडक्यात स्वप्नसृष्टी व कल्पनाविश्वात रमणाऱ्या मानवाला प्रत्यक्षार्थवादाने जागे केले. आपल्या भोवतालच्या समाजसृष्टीचे सत्यज्ञान त्यांना करुन दिले. भूतकालीन डामोडींचे त्याने वस्तूनिष्ठ दर्शन घडवले. विज्ञाना प्रमाणे इतिहासात सुध्दा वस्तुनिष्ठता बसते असे

स्पष्ट केले. तसेच इतिहासाला सुध्दा नियम असतात. हे दाखवून दिले. त्यामुळे इतिहासाला “सामाजिक भौतिकशास्त्र" असा शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला. इतिहास आधिकाधिक पारदर्शक बनला.

## ४.५ प्रश्न

१) प्रबोधनकालीन इतिहास लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

२) जांवात्तीस्ता व्हिको ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार सांगा.

३) ऑगस्त कॉम्त ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार सांगा.

४) हेगेल, मार्क्स आणि रँके ह्यांचे बुद्धिवादी सिद्धांताविषयीचे विचार सांगा.

५) बुद्धिवादी सिद्धांतातील कार्यकारणभावाचे महत्व विशद करा.

६) प्रत्यक्षवादाचा अर्थ स्पष्ट करा.

७) प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये सांगा.

८) ऑगस्ट कॉम्तच्या प्रत्यक्षज्ञानवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन करा.

९) हेन्री थॉमस बकलच्या प्रत्यक्षज्ञानवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन करा.

## ४.६ संदर्भ

१) गायकवाड आर. डी. , सरदेसाई बी. म. इतिहासा लेखन शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.

२) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३) शेख गफूर, इतिहास लेखनशास्त्र, प्रितम पब्लिकेशन्स, जळगाव, २००७.

४) गाठाळ एस.एस., इतिहासाचे तत्त्वज्ञान, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५.

५) कोठेकर शांता, इतिहास: तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

६) सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई , १९६७.

७) वा.सी. बेंद्रे, साधनचिकित्सा, १९७६.

८) ग.ह. खरे, संशोधकाचा मित्र.

९) कोमेजर अनु कृ.ना. वळसंगकर, इतिहास स्वरूप व अभ्यास, १९६९.

१०) वि. का. राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना, १९२८.

११) एच. कार. अनुवादक प्रा.वि.गो. लेले, इतिहास म्हणजे काय ?, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१२) डॉ. गोविंदचंद्र पांडे, इतिहास : स्वरूप एवं सिद्धांत राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९८.

१३) डी. डी. कोसांबी, पुराणकथा व वास्तवता.

१४) द. वि. केतकर, इतिहासातील अंतःप्रवाह.

१५) ग. ह. खरे, साधना चिकित्सा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७६.

१६) वि. द. घाटे, इतिहासशास्त्र आणि कला, देशमुख प्रकाशन, पुणे.

१७) प्रभाकर देव, इतिहास : एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड.

❖❖❖❖

# ५

# इतिहासाचा मार्क्सवादी विचार - मार्क्स व एंजल्स

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ जीवन परिचय - कार्ल मार्क्स

५.३ कार्ल मार्क्सने मांडलेले विचार

५.४ कार्ल मार्क्सचे सिद्धांत

५.५ कार्ल मार्क्सची ग्रंथ-संपदा

५.६ फेड्रिक एंजल्स

५.७ एंजल्सची ग्रंथसंपदा

५.८ सारांश

५.९ प्रश्न

५.१० संदर्भ

## ५.० उद्दिष्टे

- कार्ल मार्क्स यांच्या जीवनाचा आढावा घेणे.
- कार्ल मार्क्सच्या विचारांचा आढावा घेणे.
- कार्ल मार्क्सचे भौतिकवादी तत्वज्ञान अभ्यासणे.
- एंजल्स याचे योगदान अभ्यासणे.
- कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाचा जगावरील पडलेला प्रभावचा आढावा घेणे.

## ५.१ प्रस्तावना

मानवी जीवनाच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करून त्यासंदर्भात काही मूलभूत सिद्धांत मांडणारे जे विद्वान एकोणिसाव्या शतकात उदयास आले, त्यामध्ये कार्ल मार्क्स यांना विशेष महत्व आहे. कार्ल मार्क्स याने शास्त्रीय पद्धतीने मानवी जीवनाच्या अनेक शतकांच्या प्रवाहाचा अभ्यास करून जे मूलभूत तत्वज्ञान मांडले, त्याला 'मार्क्सवाद' अशी संज्ञा दिली गेली. मार्क्सवादी तत्वज्ञानास द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवाद असे देखील म्हटले जाते. मार्क्स व एंजल्स यांनी भौतिकवादी तत्वज्ञानाची मांडणी केली. लेनिन व माओ या

क्रांतिकारकांनी या तत्वज्ञानाचे उत्कृष्ट पद्धतीने विश्लेषण केले. व त्याचा विकास केला. मार्क्सवादी तत्वज्ञानात जगामध्ये क्रांती घडवून आणण्याचे ध्येय आहे व ते ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक असणारा व्यवहार दिसून येतो.

कार्ल मार्क्सने राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक या सर्वच क्षेत्रात मोलाची भर घातली. त्याचे विचार, ते विचार मांडण्याची त्याची शैली, त्यामधून क्रांतीस चालना देणारे त्याचे विचार, जुनी प्रस्थापित व्यवस्था पूर्णपणे मोडून नवीन व्यवस्था उभे करण्यास त्याने दिलेले आव्हान यासर्वच गोष्टी आकर्षण निर्माण करणाऱ्या आहे.मार्क्सवाद हे क्रांतिकारक तत्वज्ञान असून यामध्ये अर्थव्यवस्थेमधील परिवर्तनाचा गांभीर्याने विचार केला आहे. भांडवलशाही नष्ट केल्याशिवाय कामगार वर्गांचे शोषण थांबणार नाही. त्यासाठी जागतिक कामगार वर्गाने संघटित होऊन क्रांती करावी, अशी हाक मार्क्सवादाने दिली.

## ५.२ जीवन परिचय - कार्ल मार्क्स

जर्मनीमध्ये ज्या काळात अनेक नवीन विचार उदयाला येत होते, त्या वैचारिक मंथनाच्या काळात कार्ल मार्क्स यांचा जन्म एका ज्यू कुटुंबात ५ मे १८१८ रोजी जर्मनीमधील ट्रेवेस या छोट्या खेड्यात झाला. त्याचे वडील हरशेल मार्क्स हे एक वकील होते तर आई हेनरिटा प्रेसबर्ग हि गृहिणी. १८२४ मध्ये मार्क्सच्या वडिलांनी ज्यू धर्माच्या जागी ख्रिश्चन धर्मातील प्रोटेस्टंट हा पंथ स्वीकारला. बालवयातच धर्मांतराचा झालेला हा सांस्कृतिक आघात यामुळे एकूणच धर्माबद्दल त्याच्या मनात तिरस्कार उत्पन्न झाला. म्हणूनच त्यांनी धर्माला अफूची गोळी असे संबोधले. त्याचे प्रारंभिक शिक्षण उदारवादीविचारवंत वैस्टफेलन यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. उच्च शिक्षणासाठी ते १८३५ मध्ये बॉन विद्यापीठात व १८३६ मध्ये बर्लिन विद्यापीठात त्यांनी तत्वज्ञान, इतिहास, साहित्य व कायदा या विविध विषयांचा सखोल अभ्यास केला. १८४१ मध्ये जेना विद्यापीठातून त्यांनी 'The Differences between the Natural Philosophy of Democritus and Epicurus' या विषयावर डॉक्टरेट हि पदवी मिळवली. त्यानंतर त्याच व इतर विद्यपीठात त्याने प्राध्यापक होण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या गैर पारंपरिक विचारामुळे विद्यापीठातील प्राध्यापक पद त्याला देण्यात आले नाही. पुढे ऑक्टम्बर १८४२ मध्ये 'रिनचे जितंगू' या वृत्तपत्राचे संपादक म्हणून काम करतांना त्यांच्या क्रांतिकारी विचारांमुळे ( धर्मावर टीका केल्याने ) सरकारने या वृत्तपत्रावर बंदी घातली.

१८४३ मध्ये वयाच्या २५ व्या वर्षी कार्ल मार्क्स याने आपले प्रारंभिक शिक्षक वैस्टफेलन यांची मुलगी जैनी वैस्टफेलन हिच्याशी विवाह केला. विवाह नंतर मार्क्स परिवार हे पेरीस मध्ये गेले व तिथे ते 'फ्रॅन्को जर्मन शब्दकोश' चा संपादक बनला. फ्रांस मध्ये असतांना पॅरिस येथे त्याला प्रसिद्ध विचारवंत प्रोधो लुई ब्लँक यांची भेट झाली त्यांच्या मदतीने त्याने फ्रेंच समाजवाद व फ्रेंच राजकीय अर्थशास्त्र याचा अभ्यास केला. परंतु त्याच्या क्रांतिकारी विचारणामुळे सुरवातीस त्याला जर्मनीतून - स्विझर्लंडमध्ये तेथून फ्रांस मध्ये व नंतर बेल्झिअममध्ये व पुढे इंग्लंड येथे स्थलांतर करावे लागले. इंग्लडमध्ये असतांना त्याची मैत्री हि उद्योगपती फेड्रिक एंजिल्सशी झाली, त्याची हि मैत्री शेवटपर्यंत टिकली. एंजल्स मुळे जर्मनीपुरता विचार करणारा मार्क्स इंग्लण्डच्या भांडवलशाहीच्या आधारावर संपूर्ण विश्वाचा अर्थ लावण्याचा आणि त्यासाठी पर्यायी कार्यक्रम व क्रांतीचा विचार मांडू लागला. फेब्रुवारी

१८४८ मध्ये त्याने कम्युनिस्ट लीगची स्थापना केली, व कम्युनिस्ट लीगच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी मार्क्सने एंजल्सच्या मदतीने साम्यवादाचा जाहीरनामा तयार करून साम्यवादाची तात्विक बैठक मांडली.आपल्या विचारांना व्यवहारिक रूप देण्याच्या हेतूने १८६४ मध्ये लंडन मध्ये आयोजित पहिल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेत जर्मनीच्या वतीने त्याने प्रतिनिधीत्व केले. व त्याद्वारे कामगारांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. एंजल्सच्या आर्थिक व ग्रंथ लेखनाच्या मदतीमुळे कार्ल मार्क्स याने दास कॅपिटल या ग्रंथाच्या पहिला खंड १८६७ मध्ये प्रकाशित केला. व काही वर्षांमध्येत्याने दुसरा खंड देखील लिहून तयार केला. मात्र पैशाच्या अभावामुळे त्याच्या जिवंतपणी हा खंड प्रकाशित होऊ शकला नाही. उत्पनाचे नियमित साधन हाताशी नसल्यामुळे त्याच्या कुटुंबाला सतत दारिद्र्याचा व विविध हालअपेष्टांचा सामना करावा लागला. दुर्दैवाने १८८१ मध्ये त्याच्या पत्नीचा मृत्यू व १८८३ मध्ये लाडक्या मुलीचा मृत्यू या दोन मोठया अपघातांमुळे कार्ल मार्क्सचा मृत्यू देखील १४ मार्च १८८३ मध्ये झाला.

कार्ल मार्क्सच्या विचारांवर हेगेल, रिकार्डो, इंग्लंड व फ्रांस मधील समाजवाद, वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य, वैयक्तिक आयुष्यातील दारिद्र्य, औदयोगिक क्रांती इ. चा प्रभाव दिसून येतो. या प्रभावातून त्याने आपले साम्यवादी विचार मांडले. कार्ल मार्क्सचा दास कॅपिटल हा ग्रंथ साम्यवादाचा बायबल म्हणून ओळखला जातो. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विचारांचा जगावर जबरदस्त प्रभाव पडलेला दिसून येतो. त्याच्या साम्यवादी विचारांवर १९१७ रशियात क्रांती झाली, त्यानंतर चीन व इतर देशात देखील अश्याच साम्यवादी क्रांती झालेल्या दिसून येतात. एकेकाळी मार्क्सच्या विचारांचा प्रभाव हा अर्ध्या जगावर पडलेला दिसून येतो. कार्ल मार्क्स सारखा प्रभावशाली विचारवंत जगाच्या इतिहास क्वचितच दिसून येतो.



(फोटो - कार्ल मार्क्स, स्रोत -
https://wallpaperaccess.com/full/1400983.jpg)

**आपली प्रगती तपासा.**

**१) कार्ल मार्क्सच्या जीवनाचा आढावा घ्या ?**

## ५.३ कार्ल मार्क्सने मांडलेले विचार

कार्ल मार्क्स याने आपले विचार ज्या काळात मांडले तो काळ समजून घेणे आवश्यक ठरतो. त्याकाळात जगात राजकीय व आर्थिक राष्ट्रवादाचा विचार प्रबळ झालेला होता. विज्ञानाचा वापर हा उत्पादनाच्या क्षेत्रात झाल्याने उत्पादनात प्रचंड वाढ झाली होती. ज्यामुळे उद्योग व व्यापार वाढला परिणामी वसाहतवाद देखील वाढला. वाढत्या वसाहतवादामुळे आर्थिक शोषणाचा मार्ग खुला झाला. कमी वेतन, कामाचे जास्त तास, कामगारांसाठी कोणतेही कायदे नसणे, स्त्रिया व मुले यांना कमी वेतन, अपुरी वैद्यकीय व्यवस्था इ. मुळे आर्थिक जीवनामध्ये श्रीमंत व गरीब यांच्यातील दरी वाढत होती.

कार्ल मार्क्सने नेमकीहीच सामाजिक व आर्थिक परिस्थिती ओळखून उत्पादनाच्या भांडवलशाही प्रक्रियेचा अभ्यास केला, केवळ तात्विक युक्तिवादाने किंव्हा उदास कल्पनाशक्तीने सामाजिक व राजकीय समस्या सुटणार नाही त्यासाठी वास्तविक परिस्थिती बदलली पाहिजे हे त्याच्या लक्षात आले. कामगारांना संघटित करून कामगार संघटनेचे सामर्थ्य जाणून एक नवीन विचारशैली त्याने मांडली.

**आपली प्रगती तपासा.**

**१. कार्ल मार्क्सच्या विचारांचा आढावा घ्या ?**

## ५.४ कार्ल मार्क्सचे सिद्धांत

मार्क्सवादाचे विवेचन असे कि, उत्पादन साधनांवर सामुदायिक मालकी निर्माण केल्याशिवाय साम्यवाद प्रस्थापित करता येणार नाही. समाजात भांडवलशाही व्यवस्थेपासून साम्यवादापर्यंत जात असतांना समाजाला कोण - कोणत्या अवस्थेमधून जावे लागेल यासंदर्भात मार्क्सवादात शास्त्रशुद्ध पद्धतीने विवेचन केले आहे. त्यासाठी मार्क्सवादातील पुढील सिद्धांताची चर्चा करावी लागेल.

**१) कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद**

कार्ल मार्क्सने 'समाजवादाचा जाहीरनामा' या ग्रंथात आपले द्वंद्वात्मक वादाबद्दलचे विचार मांडले आहे. मानवी समाजाच्या विकासाची अवस्था स्पष्ट करणारा द्वंद्वात्मक भौतिकवाद मार्क्सने हेगेल कडून जरी स्वीकारला असला तरी त्यातील आदर्शवादाचे तत्व मार्क्स नाकारतो. मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवादाचा सिद्धांत म्हणजे संघर्षात्मक परिवर्तनाचा सिद्धांत होय. थोडक्यात हा सिद्धांत म्हणजे, वैष्णव हे गतिमान असते. या गतिशीलतेला नियमितता असते. हे परिवर्तन ज्या नियमानुसार होते, तो नियम म्हणजे द्वंद्वात्मक किंव्हा संघर्षाचा नियम होय. अर्थात परिवर्तनाच्या मुळाशी संघर्षाची पार्श्वभूमी असते. या संघर्षाच्या परिवर्तनाच्या सिद्धान्तामध्ये तीन पायऱ्या किंव्हा अवस्था सांगितल्या आहे. १) वाद २) प्रतिवाद ३) संवाद हे होय. कार्ल मार्क्सच्या मते, मानवी जीवनात सतत परिवर्तन घडून

येत असते. विचार किंव्हा कल्पना ह्या परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य करत असतात. माणसाच्या मनात एखादा विचार येतो त्याला 'वाद' म्हटले जाते. कालांतराने या विचारात काही कमतरता निर्माण होतात म्हणून त्या विचारांच्या विरोधी काही काळानंतर दुसरा विचार निर्माण होतो त्याला 'प्रतिवाद' म्हणतात. व प्रतिवादात दोष शिरल्यानंतर जो नवीन विचार निर्माण होतो त्याला सवांद असे म्हणतात. संवांदात दोष निर्माण झाल्यानंतर त्याचे वादात रूपांतर होते. अशा प्रकारे वाद, प्रतिवाद व सवांद या मार्गाने मानवी जीवनात परिवर्तन होत असते. मार्क्स व एजल्स यांनी द्वंद्वात्मक स्पष्ट करण्यासाठी अनेक उदाहरण दिले आहे. उदा. जमिनीमध्ये गव्हाचे बी पेरणे हि अवस्था म्हणजे 'वाद' होय. त्या बी चे रोपट्यात परिवर्तन होणे म्हणजे 'प्रतिवाद' होय. रोप तयार झाल्यानंतर बी ही नष्ट होते म्हणजे प्रतिवाद नष्ट झाल्यानंतर वाद नष्ट होतो. रोपट्याचा गव्हाचे नवीन दाणे येणे ही अवस्था म्हणजे 'संवाद' होय. गव्हाचे दाणे पक्के झाल्यानंतर रोपटे सुकून जाणे म्हणजे संवाद होय. नवीन तयार झालेल्या गव्हाचे बी जमीनीत पेरल्यास सवांदाचे रूपांतर पुन्हा वादात होईल.

एन्जल्स सामाजिक संदर्भात दुसरे उदाहरण देतो. मानवाच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये संपूर्ण जमिनीवर समाजाची मालकी होती, या अवस्थेला वाद म्हणता येईल. यानंतर जमिनीवर वैयक्तिक मालकी निर्माण झाली हा प्रतिवाद होता. तर औदयोगिक क्रांतीमधून यंत्रयुगाचा अविष्कार झाला. जमीन कसण्यासाठी व यंत्र खरेदीकरण्यासाठी आवश्यक भांडवलाच्या अभावामुळे जमिनीवर समाजाची मालकी आणि कारखान्यांचे राष्ट्रीयकरण व्हावे असा समन्व्ययकारीविचार निर्माण झाला. त्याला संवाद म्हणता येईल. यामधून जुनी अर्थव्यवस्था नष्ट होऊन मानवी मूल्ये जोपासणारी, वर्ग आणि राज्य नसलेली समाजव्यवस्था निर्माण होईल. असे मत मांडले गेले. याच पद्धतीने जगाचा विकास होत असतो. व्यक्ती जन्माला येतो, विकसित होतो आणि मृत्यू पावतो.

थोडक्यात, मार्क्सने संघर्षात्मक परिवर्तनाच्या नियमाने विश्वातील परिवर्तने घडत असतात असे स्पष्ट केले.

**आपली प्रगती तपासा.**

१) कार्ल मार्क्सचाद्वंद्वात्मक भौतिकवाद स्पष्ट करा ?

## २) कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद किंवा इतिहासाची भौतिकवादी मीमांसा

कार्ल मार्क्सने हेगेलच्या भौतिकवादी सिद्धांताच्या आधारावर इतिहासाचे विश्लेषण करण्याचा प्रयन्त केला. मार्क्सने उत्पादनाची साधने व आर्थिक घटकाच्या आधारावर इतिहासाची नव्याने मांडणी केली. मार्क्सने या सिद्धान्तामध्ये मानवी इतिहासातहोणारी विविध परिवर्तने ही भौतिक किंव्हा आर्थिक कारणांमुळे घडून येतात. असे मत मांडल्यामुळे या सिद्धांतास इतिहासाची 'आर्थिक किंव्हा भौतिक मीमांसा' असे म्हटले जाते. कालांतराने काही विद्वानांनी या सिद्धांतास 'इतिहासाची आर्थिक व्याख्या' किंव्हा 'आर्थिक नियतवाद' असे देखील म्हटले आहे. मार्क्स समाजपरिवर्तनाचा मूळ आधार समाजातील उत्पादन पद्धती मानतो. उत्पादन पद्धतीत होणाऱ्या बदलांमुळे समाज रचनेत

देखील बदल घडून येतात. मार्क्स येथे बदलांची कारणे अर्थव्यवस्थेमध्ये शोधतो. मार्क्सने आर्थिक आधारावर इतिहासाचे सहा टप्पे मांडले ते पुढील प्रमाणे :

**१) प्राचीन साम्यवाद :**

हा काळ इतिहासाचा प्रारंभिक काळ होता. या काळात मानवाच्या गरजा अतिशय मर्यादित स्वरूपाच्या होत्या. या काळातील मानव हा शिकार, फळे, कंदमुळे खाऊन आपला उदरनिर्वाह करत असे. याकाळात खाजगी मालमत्तेची कल्पना नसल्यामुळे तुझे व माझे हा भेदभाव नव्हता व संघर्ष देखील नव्हता. परंतु ही व्यवस्था जास्त काळ टिकू शकली नाही.

**२) गुलामगिरीची अवस्था :**

व्यक्तिगत संपत्तीच्या उदयामुळे साम्यवादाचा अस्थ झाला व उत्पादन साधनांवर आधारित गुलामगिरीची अवस्था उदयास आली. मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी 'शेती' या उत्पादन साधनांचा शोध लावला. बुद्धिवान व शक्तिशाली व्यक्तींनी जमिनीची मालकी मिळवली. याउलट ज्याला जमीन मिळाली नाही तो मालकाच्या शेतीवर गुलाम म्हणून काम करू लागला. या टप्प्यात समाजात मालक व गुलाम हे दोन वर्ग निर्माण झाले. हे दोन्ही वर्ग आपल्या वैयक्तिक गरजांसाठी एकत्र आले असले तरी त्यांच्या मधील समनव्यय जास्त काळ टिकू शकला नाही. व कालांतराने या दोन्ही वर्गात संघर्ष निर्माण झाला.

**३) सामंतशाही :**

गुलामगिरी अवस्थेच्या समाप्तीनंतर मानवाने सामंतशाही युगात प्रवेश केला. या काळात मानवी जीवनाच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती हे होते. या काळात संपूर्ण जमीनीवर राजाचा अधिकार होता, त्या जमिनींचे राजाने जमीनदारांमध्ये वाटप केले होते. हे जमीनदार राजाला आवश्यक्य ती सर्व मदत करीत. जमीनदारांनी या जमिनीचे छोट्या - छोट्या शेतकऱ्यांमध्ये वाटप केले. त्यामुळे या शेतकऱ्यांवर जमीनदारांचे पूर्ण नियंत्रण होते. याच काळात शहरांमध्ये यंत्रावर आधारित उद्योग सुरु झाले. या उद्योगांवर काम करण्यासाठी कामगारांची आवश्यकता होती म्हणून व्यापाऱ्यांनी शेतमजुरांना जमीनदारांविरुद्ध भडकावण्यास मदत केल्यामुळे जमीनदारी नष्ट झाली.

**४) भांडवलशाही :**

औदयोगिक क्रांतीमुळे शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये बदल होऊन उद्योग व्यवस्थेवर आधारित अर्थव्यवस्था निर्माण झाली. याकाळात भांडवलदार अतिशय कमी वेतनामध्ये कामगारांकडून काम करून घेऊ लागले. परिणामी भांडवलदार अधिक श्रीमंत बनत गेले तर कामगार हा गरीब होत गेला. याच काळात समाज हा दोन वर्गांमध्ये विभागाला गेला. समाजात दोन वर्ग निर्माण झाल्यामुळे कामगारांनी भांडवलदारांविरुद्ध संघर्ष केला. या संघर्षामध्ये कामगारांचा विजय निश्चित आहे कारण भांडवलदारांपेक्षा कामगारांची संख्या हि जास्त असते.

### ५) कामगारांची हुकूमशाही :

कामगार व भांडवलदार यांच्या संघर्षात कामगारांचा विजय झाल्याने भांडवलदार कामगारांचे शोषण करण्यासाठी राजकीय संस्था म्हणजेच राज्याचा वापर करते. राजेशाही ऐवजी संसदीय लोकशाही स्थापन होऊन वास्तविक सत्ता भांडवलदारच्या किंव्हा धनिकांच्या हाती असल्याने शोषणाचे ते नवीन मार्ग शोधतात. म्हणून कामगारांनी राजकीय संस्थाताब्यात घेऊन कामगारांची हुकूमशाही निर्माण करावी, असे मार्क्स सुचवतो. राज्यकारभाराची सर्व सूत्रे कामगारांच्या हाती आल्यामुळे ते सत्तेचा वापर करून संपूर्ण भांडवलशाही नष्ट करतील व कारखाने आणि जमिनीची मालकी आपल्या ताब्यात घेतील. भांडवलदार वर्ग नष्ट करणे व समाजवादाची स्थापना करणे हे या अवस्थेचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

### ६) साम्यवाद :

भांडवलदार वर्ग नष्ट झाल्याने समाजात वर्गसंघर्ष नष्ट होऊन या अवस्थेत समाजात वर्ग विरहित समाज निर्माण होईल. या अवस्थेत शेती व उत्पादन साधनावर समाजाची मालकी प्रस्थापित झाल्याने प्रत्येक व्यक्ती आपल्या पात्रतेनुसार कार्य करेल. प्रत्येकाला त्याचा हिस्सा दिला गेल्याने कोणीही कोणाचे शोषण करणार नाही. यामुळे वर्गविरहित व राज्यविरहित अवस्था निर्माण होईल. कार्ल मार्क्स या अवस्थेला शेवटची अवस्था म्हणतो.

### आपली प्रगती तपासा.

१) कार्ल मार्क्सची इतिहासाची भौतिकवादी मीमांसा सांगा ?

### ३) कार्ल मार्क्सचा विरोध विकासवाद

कार्ल मार्क्सच्या मते, मानवी इतिहासाचा ओघ हा एखाद्या संथपणे वाहणाऱ्या नदी सारखा नाही. त्यात अनेक बदल हे घडून येत असतात. काही काळ एक प्रक्रिया चालते नंतर तिची प्रतिक्रियाहोते व नंतर त्या दोघांमधून एक समन्वय साधला जातो. इतिहासामध्ये देखील असेच घडते एकामागून एक वर्ग सत्तेवर येतात.प्रत्येक सत्त्तेत काही दोष असतात त्यामुळे त्यांची सत्तेवरून हकालपट्टी होते. व त्यांच्या नंतरचा सामर्थ्यशाली वर्ग हा सत्तेवर येतो. उदा. सरंजाम शाहीनंतर भांडवलशाही अस्तित्वात येणे. इथे कार्ल मार्क्स ने भौतिक दृष्ट्या इतिहासाचा अर्थ लावण्याचा प्रयन्त केलेला दिसून येतो, यामध्ये अन्य घटकांचा त्याने विचार केलेला दिसून येत नाही.

### प्रगती तपासा.

१) कार्ल मार्क्सचा विरोध विकासवाद स्पष्ट करा ?

### ४) कार्लमार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिद्धांत

कार्ल मार्क्स याने 'साम्यवादाचा जाहीरनामा' या ग्रंथात वर्गसंघर्षाचा सिद्धांत मांडला. मार्क्सच्या या वर्गसंघर्षाच्या सिद्धांतावर 'ऑगिन्स्टन थोरे' चा प्रभाव दिसतो. मार्क्सचा हा सिद्धांत तत्कालीन इंग्लडच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर आधारलेला होता.

मार्क्सच्या मते, 'मानवाचा ज्ञात इतिहास हा वर्गसंघर्षाचा आहे.' वर्गसंघर्ष या संकल्पनेत वर्ग म्हणजे, उत्पादन प्रक्रियेशी जोडला गेलेला समूह ज्यांचे आर्थिक हितसंबंधहे एकमेकांशी जोडले गेलेले असतात. तर संघर्ष या शब्दाचा अर्थ हा युद्ध असा नाही तर याचा व्यापक अर्थ हा रोष, असंतोष अथवा आंशिक असहयोग होय.आपल्या कम्युनिस्ट मॅनिफेस्टो (Communist Manifesto / साम्यवादाचा जाहीरनामा) या ग्रंथात 'मानवी समाज जीवनाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे' असे मार्क्स म्हणतो. कारण इतिहासातील प्रत्येक अवस्थेत आर्थिक हितसंबंधावरून संघर्ष घडलेला आहे. मार्क्सच्या मते, प्राचीन काळात समाजात वर्ग हे अस्तित्वात नव्हते. मानव हा समूह करून राहत असल्याने उत्पदनावर सर्वांची सामूहिक मालकी होती. आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी निसर्गातील सर्व वस्तूंचे समूहामध्ये समान वाटप केले जात. मानवाच्या बौद्धिक प्रगतीमधून अनेक प्रकारचे शोध लागलेआणि मानव स्वतः वस्तूंचे उत्पादन करू लागला.वस्तुंच्या वाटपामध्ये अंतर निर्माण झाले. व येथूनच वर्गभेदाची सुरवात झाली. ऐतिहासिक भौतिकवादानुसार समाजातील सहा अवस्थांमध्ये विकास होत असतांना वर्गसंघर्ष कसा निर्माण झाला याचे स्पष्टीकरण मार्क्सने दिले आहे. मार्क्सच्या मते, प्रारंभिक काळात (अशमयुगीन काळ) मानवाच्या गरजाया मर्यादित होत्या. मानव फळे, कंदमुळे खाऊन आपला उदरनिर्वाह करत. याकाळात खाजगी संपत्तीची कल्पना अस्तित्वात नसल्याने प्रत्येक वस्तूवर सर्वांचे सामान अधिकार होते. परंतु हि व्यवस्था जास्त काळ टिकू शकली नाही. गुलामगिरी या अवस्थेत शेती या उत्पादन साधनांचा शोध लागल्याने खाजगी मालमत्तेची कल्पना जन्माला आली. व उत्पादन साधनांवर शक्तिशाली व्यक्तींचा अधिकार आल्याने ते स्वामी किंव्हा श्रीमंत व्यक्ती या नावाने ओळखले जाऊ लागले. कमजोर व्यक्ती ( साधन नसलेलेव्यक्ती ) हे गुलाम म्हणून ओळखले गेले. याव्यस्थेमधूनच संपत्ती असणारा 'आहे रे' आणि संपत्ती नसणारा 'नाही रे' हे दोन वर्ग निर्माण झाले. हे दोन्ही वर्ग एकमेकांच्या गरजेपुरते एकत्र आले असले तरी त्यांचे हित परस्परविरोधी असल्याने या वर्गामध्ये संघर्ष निर्मण झाला. गुलामगिरी अवस्थेमध्ये मालक व गुलाम, सामंतशाहीत सामंत व शेतमजूर आणि भांडवलशाही अवस्थेमध्ये कारखानदार व कामगार हे वर्ग दिसून येतात. या वर्गात एक वर्ग हा शोषक व दुसरा वर्ग हा शोषितांचा असतो. या दोन्ही वर्गात प्रत्यक्ष किंव्हा अप्रत्यक्ष सतत संघर्ष दिसून येतो.या संघर्षात समाजरचनेत बदल होऊन एका वर्गाचे अस्तित्व नष्ट होऊन तर कधी दोन्ही वर्गाचा नाश होऊन आणखी दोन नवीन वर्ग निर्माण होतात. या वर्गाची नावेजरी बदलली असली तरी त्याचे स्वरूप हे पहिल्या सारखेच असते. आधुनिक काळात भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. अतिरिक्त श्रम मूल्याच्या सिद्धांता प्रमाणे भांडवलदार कामगारांची पिळवणूक करतो. यासाठी कामगार वर्गाने संघटित होऊन भांडवलशाही विरोधात व तिला संरक्षण देणाऱ्या सरकार विरोधात क्रांतीसाठी एकत्र यावे असे मार्क्सने प्रतिपादन केले. कार्ल मार्क्सच्या या सिद्धांतालाच वर्गसंघर्षाचा सिद्धांत असे म्हणतात.

या वर्ग संघर्षास मार्क्स 'आहि रे' वर्गास जबाबदार मानतो. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये उत्पादन साधनांचे विक्रेंद्रीकरण होत असल्यानेछोट्या उद्योग व्यवसाय करणाऱ्यांचा टिकाव न लागल्याने ते श्रमिक होतात. श्रमिकांच्या शोषणामुळे ते गरीब होतात, याउलट भांडवलदार अधिक श्रीमंत होतात. या संघर्षात भांडवलशाहीत अंतर्विरोधामुळे श्रमिक

वर्गाचा कधी ना कधी विजय हा निश्चित असतो. कारण भांडवलदारांपेक्षा कामगारांची किंव्हा श्रमिकांची संख्या हि जास्त असते. क्रांती झाल्यामुळे हुकूमशाही निर्माण होऊन समाजाची सर्व मालकी हि कामगारवर्गाकडे गेल्याने वर्गसंघर्ष हा होत नाही. व शेवटी वर्गविहिन 'व' राज्यविहिन 'समाजरचना निर्माण होते. कार्ल मार्क्सने' जागतिक कामगारांनो एकत्र या व क्रांती करा. क्रांतीत श्रमिकांना काहीही गमवायचे नाही. हे आवाहन करून तो कामगार क्रांती व वर्गविरहित समाजरचना निर्मितीची मांडणी करतो.

थोडक्यात, भांडवलशाही नष्ट करण्यासाठी सनदशीर मार्ग हा मार्क्सला योग्य वाटत नाही. त्यासाठी साम्यवादी क्रांतीची गरज मार्क्सने मांडली आहे. कम्युनिस्ट मॅनोफेस्टो या ग्रंथात मार्क्स म्हणतो कि ''भांडवलशाहीच्या विकासातच तिचे बीजे हि रोवली आहे." कारण भांडवलशाहीतील शोषणाची प्रवृत्ती कामगारांमध्ये वर्ग जाणिवेची भावना निर्माण करते. अर्थात, भांडवलशाहीत परिस्थितीच क्रांतीसाठी पोषक आहे.

**प्रगती तपासा.**

१) कार्ल मार्क्सचा वर्ग संघर्षाचा सिद्धांत सांगा ?

## ५) कार्ल मार्क्सचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत

कार्ल मार्क्सने 'दास कॅपिटल' या ग्रंथात अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत मांडला आहे. या सिद्धांतामध्ये त्याने भांडवलदार वर्गाकडून मजुरांवर होत असलेल्या शोषणावर प्रकाश टाकला. हा सिद्धांत सर्वप्रथम पेंटी याने इंग्लडमध्ये मांडला. त्यानंतर ऍडम स्मिथ व रिकार्डो यांनी हा सिद्धांत विकसित केला. हा सिद्धांत वस्तूच्या किंमती निर्धारित करणारा सिद्धांत नसून भांडवलशाही श्रमिकांच्या शोषणाचे विश्लेषण करणारा सिद्धांत आहे. मार्क्सने 'अतिरिक्त मूल्याचे' स्पष्टीकरण करण्यासाठी प्रत्येक वस्तूला दोन प्रकारचे मूल्य असतात असे म्हटले आहे. १) उपयोगिता मूल्य व २) विनिमय मूल्य

### १) उपयोगिता मूल्य :

ज्या वस्तूला मूल्य आहे पण त्या वस्तूवर श्रम खर्च झालेला नाही, त्याला उपोयोगीता मूल्य असे म्हणतात.उदा. हवा, पाणी

### २) विनिमय मूल्य :

वस्तू तयार करण्यासाठी श्रम खर्च होतो, व त्या श्रमानुसार वस्तूचे मूल्य ठरते त्यास विनिमय मूल्य असे म्हणतात.

कामगाराने केलेले प्रत्यक्ष काम व त्याच्या मोहबदल्यात त्याला मिळणारी मजुरी यामधील फरकाला मार्क्सने 'अतिरिक्त मूल्य' असे म्हटले आहे. मार्क्सच्या मते, कामगारांना श्रम करावे लागते. या श्रमातून उत्पादित वस्तूचे मूल्य हे ठरत जाते, म्हणूनच श्रमाला मूल्य आहे. मजूर हे श्रम करतात, त्या मोहबदल्यात त्यांची मूल्यशक्ती हि खर्च होत असते. त्यासाठी त्याला मजुरी हि मिळत असते. परंतु मार्क्सच्या मते, त्यांना जी मजुरी मिळत असते ती त्याच्या श्रमाच्या तुलनेने कमी असते. मजुराला मिळणाऱ्या श्रमाच्या

मोहबदल्यापेक्षा मजूर हे जास्तीचे श्रममूल्य निर्माण करत असतो, त्यास मार्क्स 'अतिरिक्त मूल्य' म्हणतो. मजूर जेवढे जास्त श्रममूल्य निर्माण करेल, तेवढा मालकाला जास्त फायदा होतो यामधूनच भांडवलदारांना नफा मिळतो.

उदा. एखादी वस्तू तयार करण्यासाठी जर कामगाराला १० तास लागत असतील तर त्याला १० तासाची मजुरी देणे आवश्यक्य आहे. पण भांडवलदार त्याला फक्त ८ तासाची मजुरी देतात. व उरलेल्या २ तासांची मजुरी तो स्वतः घेतो.

कार्ल मार्क्सच्या मते, वस्तूची किंमत हि पुढील सूत्राच्या आधारे ठरत असते. कच्चा माल + मजुरी = वस्तूची किंमत.

उदा. एखादा टेबल बनविण्यास पन्नास रुपयाचा कच्चा माल लागला व टेबल बनविणाऱ्या मजुरास वीस रुपये मजुरी दिली तर वरील सूत्रानुसार वस्तूची किंमत हि सत्तर रुपये ठरते. परंतु भांडवलदार ती वस्तू ( टेबल ) शंभर रुपयाला विकतो. यामध्ये तीस रुपये जे उरतात त्यास मार्क्स हा अतिरिक्त मूल्य असे म्हणतो.

वस्तूच्या किंमतीवर भांडवलदारांचा नफा अवलंवून असतो म्हणून भांडवलदार वस्तूची किंमत वाढवण्यासाठी वस्तूची कृत्रिम टंचाई निर्माण करतो किंव्हा अनेक युक्त्या करून वस्तूंची किंमत वाढवतो. कारण वस्तूची किंमत जेवढी वाढेल तेवढे त्याला अतिरिक्त उत्पादन मिळते. याच अतिरिक्त मूल्याच्या जोरावर भांडवलदार हा श्रीमंत होत जातो मात्र ती वस्तू बनवणारा कामगार हा गरीबच राहतो. म्हणूनच मार्क्सने वर्गविरहित समाजाचे तत्वज्ञान मांडले. मार्क्सने कामगारांना क्रांती करण्याचा सल्ला दिला, कामगारांनी जर भांडवलशाही विरुद्ध क्रांती केली तर भांडवलशाही नष्ट होऊन सर्व उदयोग हे समाजाच्या मालकीचे होतील. त्यामुळे कोणीही अतिरिक्त मूल्य घेणार नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१) कार्ल मार्क्सचा अतिरिक्त मूल्य हा सिद्धांत स्पष्ट करा ?

**६) कार्ल मार्क्सचे धर्मविषयक विचार**

मार्क्स हा भौतिकवादी विचारवंत असल्याने धार्मिक विचारांचे महत्व त्याने नाकारले आहे. त्याच्या मते, स्वर्ग - नर्क, पाप - पुण्य या कल्पनांना कुठलाही शास्त्रीय आधार नाही. मार्क्स हा धर्माला अफूची गोळी किंव्हा नशा मानतो. समाजातील भांडवलदार व धर्मगुरू लोक इतर शोषित वर्गाला धर्माची भीतीघालतात. व आपला स्वार्थ साधतात. म्हणून धर्म हि अफूची गोळी आहे असे मार्क्स मानतो. याचा अर्थ धर्माच्या मुख्य तत्वांना तो स्वीकारत नाही असा नसून अनेक शतके धर्माचा उपयोग ज्या अयोग्य प्रकारे केला जात होता. समाजची स्वतंत्र विचार शक्ती खच्ची केली जात होती, प्रस्थापित व्यवस्था कायम टिकवण्यासाठी धर्मसंस्था धर्माचा गैरवापर करीत होत्या, त्याला मार्क्सचा आक्षेप आहे.

कार्ल मार्क्सच्या मते, धर्माचा वापर करून भांडवलदार व धर्मगुरू कामगारांचे शोषण करतात. धर्मामध्ये कर्तृत्वापेक्ष्या नशिबात जास्त विश्वास ठेवत असल्याने धर्मामुळे कामगारांची कर्तृत्व शक्ती झाकली जाते. राज्यकर्ते व भांडवलदार दोषपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये

धर्माचा आधार घेऊन लोकांना आपली दुःख विसरण्यास व क्रांतीपासून त्यांना परावृत्त करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करतात. मानवात परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य असून धर्मसंथा विकासात अडथळेनिर्माण करते. व जैसे थे या परिस्थितीच राहण्याचे समाधान देते. म्हूून मार्क्सने धर्माचे महत्व नाकारले आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) कार्ल मार्क्सचे धर्मविषयक विचार सांगा ?

**७) कामगार वर्गाची हुकूमशाही किंव्हा समाजवादा संबधी कार्ल मार्क्सचे विचार**

भौतिकवादी शास्त्रीय विवेचनातून कार्ल मार्क्सने भविष्याबाबत जो सिद्धांत मांडला, त्यास समाजवादाच्या उद्याचा सिद्धांत म्हणतात. मजूर वर्ग भांडवलशीही विरुद्ध क्रांती करून उत्पादन पद्धतीचा शेवट करेल व उत्पादनाची साधने व प्रतिक्रिया आपल्या हाती घेईल व त्यावर मजूर वर्गाची हुकूमशाही स्थापन होईल. हि अवस्था अल्पकालीन असली तरी भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेकडून समाजवादी उत्पादन व्यवस्थेकडे जाण्याची अनिर्वाय संक्रमण अवस्था आहे. अल्पावधीत ती अवस्था संपून उत्पादन प्रक्रिया समाजाच्या मालकीची होईल. या व्यवस्थेत समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा पुरवल्या जातील. कामगारांची हुकूमशाही हि अल्पसंख्य भांडवलदारांसाठी हुकूमशाही असली तरी बहुसंख्य कामगारांसाठी लोकशाही आहे.

समाजामध्ये समाजवादी अवस्था निर्माण झाल्याने समाजात वर्ग राहणार नाही. त्यामुळे समाजात संघर्ष हि नसेल. परिणामी राज्याची हि गरज राहणार नाही. वर्गविहीन व राज्यविहीन समाजरचनेचा अंतिम उद्देश साध्य होईल. मार्क्स याच अवस्थेला साम्यवाद असे म्हणतो. तर मार्क्सच्या या विचारसरणीला ऍंगल्स शास्त्रीय समाजवाद म्हणतो.

## ५.५ कार्ल मार्क्सची ग्रंथ संपदा

कार्ल मार्क्सने आपल्या संपूर्ण जीवनात अनेक ग्रंथांची रचना केली. ज्यामध्ये कम्युनिस्ट मॅनोफेस्टो व दास कॅपिटल हे ग्रंथ महत्वाचे आहे. त्याच्या ग्रंथांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे

१) Communist Manifesto ( साम्यवादाचा जाहीरनामा )

२) Das Capital ( दास कॅपिटल)

३) The Poverty of Philosophy ( 1847)

४) The Critique of Political Economy (1859) (राजकीय अर्थव्यवस्थेवरील टीका)

५) Inaugural address to the International working Men Association (1864)

६) Value, Price and Profit (1865) ( मूल्य, किंमत आणि नफा)

७) The Civil war in France ( 1870 -71 ) ( फ्रान्समधील गृहयुद्ध)

८) The Gotha Programme (1875 ) ( गोथा कार्यक्रम)

९) Class Struggle in France ( 1848) ( फ्रान्समधील वर्ग संघर्ष)

१०) The Germane Ideology ( जर्मन विचारधारा)

११) The Holy Family

कार्ल मार्क्सच्या या संपूर्ण ग्रंथामध्ये साम्यवादाचा जाहीरनामा व दास कॅपिटल हे ग्रंथ फार महतवाचे आहे. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे

**१) साम्यवादाचा जाहीरनामा :**

कार्ल मार्क्स आणि फेड्रिक एंगेल्स या दोघांनी १८४८ मध्ये कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा (मॅनिफेस्टो ऑफ द कम्युनिस्ट पार्टी) प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्याने राजकीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात एक नवे युग निर्माण केले. ‘आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या सर्व समाजाचा इतिहास हा वर्गयुद्धांचा इतिहास आहे’, या वाक्याने कम्युनिस्ट जाहीरनाम्याची सुरवात झाली आहे आणि वर्गयुद्धाचे कारण असलेली वर्गीय समाजरचना नष्ट करून वर्गविहीन समाजरचना निर्माण करण्यासाठी, जगातील ‘सर्व कामगारांनो एक व्हा’ हा त्या प्रबंधात शेवटचा आदेश दिला आहे. मार्क्सच्या इतिहासविषयक आणि समाज क्रांतिसंबंधीच्या तत्त्वज्ञानाचे सर्व सार या जाहीरनाम्यात सामावलेले आहे. समाजाचा विकास, राज्यसंस्था, अर्थपद्धती, नैतिक कल्पना इ. बाबतींत कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील विचार क्रांतिकारक आहेत. सामाजिक व्यथांचे, विशेषतः सामाजिक शोषणाचे दिग्दर्शन आणि त्या नष्ट करण्यासाठी योजावयाचे क्रांतितंत्र, या दोन्हींची रूपरेषा या जाहीरनाम्यात सांगितली गेली आहे.

या जाहीरनाम्याची चार प्रकरणे आहेत:

(१) भांडवलशाही व कामगार

(२) कामगार व कम्युनिस्ट

(३) समाजवादी व साम्यवादी साहित्य

(४) अस्तित्वातील भिन्नभिन्न विरुद्ध पक्षांच्या संबंधांत साम्यवाद्यांचे स्थान.

पहिल्या प्रकरणात आधुनिक भांडवलशाहीचा उदय आणि उत्कर्ष कसा झाला,भांडवलदार वर्गाने कशी सामाजिक क्रांती केली,सरंजामशाही सत्ता व समाजपद्धती नष्ट करून तो कसा सत्ताधारी झाला,याचे विवेचन केलेले आहे. जाहीरनाम्याच्या दुसऱ्या प्रकरणात कामगारवर्ग, त्यांच्या संघटना आणि कम्युनिस्ट यांचे परस्परसंबंध दिग्दर्शित केले आहेत. निरनिराळ्या राष्ट्रांच्या दलित वर्गीय चळवळींत कम्युनिस्ट हे राष्ट्रीयत्वाची भावना बाजूस सारून जगातील सर्व दलितांच्या हितसंबंधास प्राधान्य देतात,असा एकनिष्कर्ष यात काढला आहे. कामगारांची संघटना करणे, भांडवलशाही उलथून पाडणे व कामगारवर्गाच्या हाती सत्ता केंद्रित करणे,हे कम्युनिस्टांचेतिरंगी ध्येय या प्रकरणात स्पष्ट केले आहे. जाहीरनाम्याच्या तिसऱ्या प्रकरणात यूटोपियन म्हणजे अस्थितादर्शवादी समाजवाद आणि तत्सम विचारांचे

खंडन केले आहे. चौथ्या प्रकरणात कम्युनिस्टांनी त्या काळी अस्तित्वात असलेल्या इतर विरोधी पक्षांशी कसे संबंध ठेवावे व त्याकरिता कार्यपद्धती कशी असावी,याचे विवेचन केलेआहे. प्रचलित समाजपद्धती क्रांतिकारक मार्गांनी उलथून पाडल्याशिवाय कामगारांना आपली ध्येये गाठता येणे शक्य नाही, असे सांगून असे करण्यात हा वर्ग स्वतःचे काहीही गमावणार नसून तो केवळ आपल्या श्रृंखला तेवढ्या गमावणार आहे; त्याच्यासमोर जिंकण्यासाठी सारे जग आहे; म्हणून जगातील ‘सर्व कामगारांनो एक व्हा’ असा आशापूर्ण संदेश या जाहीरनाम्याच्या शेवटीदिला आहे.

**२) दास कॅपिटल :**

कार्ल मार्क्सच्या संपूर्ण ग्रंथामध्ये दास कॅपिटल हा ग्रंथ एक अद्वितीय रचना आहे. या ग्रंथामध्ये मार्क्सवादाची संपूर्ण माहिती आढळते. इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन या संघटनेने कामगारांचा पवित्र ग्रंथ म्हणून या ग्रंथाचे वर्णन केलेले आहे. बर्लिन येथे १८६७ मध्ये हा ग्रंथ प्रथम प्रकाशित झाला आणि १८७३ मध्ये त्याची दुसरी आवृत्ती निघाली. मार्क्सने भाग दोन आणि तीन हेही लिहीले परंतू त्यांचे संपादन करून एंगेल्सने मार्क्सच्या मृत्यूनंतर १८८५ आणि १८९४ मध्ये क्रमाने हा ग्रंथ प्रसिद्ध केला. भांडवलशाही इतिहासामध्ये एक व्यवस्था म्हणून कशी उलगडत गेली- तिचा उगम कसा झाला, तिचं कामकाज कसं चालतं, आणि ती संभाव्यतः कुठल्या दिशेनं जात आहे, याचं विश्लेषण हा मार्क्सच्या या ग्रंथाच्या गाभा आहे. मार्क्सने इंग्लिश भांडवलशाहीचे अवलोकन केले, इंग्लिश अर्थशास्त्राच्या परिभाषेतच आपले अर्थशास्त्रीय विचार व्यक्त केले. भांडवलशाही समाजव्यवस्था ही प्रत्येक समाजरचनेसारखीच, जिवंत शरीरासारखी रचना आहे. तिचा विकास तिच्या अंतर्गत स्वभावनियमानेच होतो. नफा मिळविण्याची प्रवृत्ती अपयशी होऊ लागली, नफा कमी होऊ लागला म्हणजे संबंध समाजरचना डळमळते भांडवलशाहीचा नाश होतो आणि तिच्या ठिकाणी अधिक उच्च दर्जाच्या समाजसंस्थेची स्थापना होते. ब्रिटिश कामगारवर्गाचे दैन्य व दुर्दशा मार्क्सने पाहिली आणि मोजली आणि त्यावरून भविष्यवाद काढला, की या भांडवलशाहीच्या खाजगी संपत्तीवर खिळा ठोकला जात आहे आणि ज्यांनी लुटले ते लुटले जाणार आहेत. पीडीत जनतेला फार मोठा आशावादी दृष्टिकोन देण्यात मार्क्स हा यशस्वी झाला.

**आपली प्रगती तपासा.**

१) कार्ल मार्क्सने लिहलेल्या विविध ग्रंथाची माहिती सांगा ?

## ५.६ फेड्रिक एंजल्स

फेड्रिक एंजल्स हे एक जर्मन समाजशास्त्रीय विचारवंत होते. त्यांचा जन्म जर्मनीमधील बारमेन येथे २८ नोव्हेंबर १८२० मध्ये झाला. या शहरात त्यानीं प्राथमिक शिक्षण घेतले व पुढील उच्च माध्यमिक शिक्षण त्यांनी एल्बेरफेड येथून पूर्ण केले. त्याचे वडील एक कारखानदार होते व पुढे वडिलांच्या आग्रहामुळे १८३७ मध्ये त्यांना आपले शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागले आणि आपल्या वडिलांच्या मालकीच्या व्यापारी कंपनी मध्ये काम

सुरु केले. १८४२ मध्ये ते इंग्लंड मधील मँचेस्टर या शहारत एका मोठ्या कंपनीत काम करण्याच्या उद्देशानेगेले, त्या कंपनीमध्ये त्याच्या वडिलांची भागीदारी होती.१८४२ - १८४४ या कालखंडात एंजल्सने एक यशस्वी व्यावसायिक उद्योजक म्हणून काम केले. मँचेस्टर मध्ये काम करत असताना ब्रिटन मधील कामगारांच्या परिस्थितींचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी जेथे कामगारांचं वस्ती होत्या तिथे त्यांनी अनेक वेळा भेटी दिल्या. व त्यांच्या जगण्याची वास्तविकता व त्यांचे दारिद्र्य हे डोळ्यांनी पहिले. त्यांनी आपल्या भेटीमध्ये फक्त कामगारांच्या परिस्थितीचे निरीक्षणच केले नाही तर कामगारांच्या जीवनावर आधारित अनेक साहित्य व अनेक सरकारी कागदपत्रांचा अभ्यास केला.याच दरम्यान त्यांनी इंग्लडमधील काही जर्नलसाठी साम्यवादी लेख लिहले, इंग्लंडमधील आर्थिक आणि राजकीय परिस्थितीवर पुस्तके आणि संसदीय अहवाल वाचणे, कामगारांशी विविध विषयांवर चर्चा करणे, कट्टरपंथी नेत्यांना भेटणे इ. कार्य केले. कामगारांच्या दयनीय स्थितीवर १८४५ मध्ये त्यांनी 'The Condition of Working class in England' (इंग्लडमधील कामगारवर्गाची स्थिती) हे पुस्तक लिहले. यापुस्तकात इंग्लडमध्ये आयर्लंड मधून आलेल्या कामगारांच्या दयनीय स्थितीचे वर्णन केले आहे. हे पुस्तक त्याकाळातील कामगारांच्या शोचनीय जीवनावर प्रकाश टाकणारे महत्वाचे पुस्तक होते.१८४२मध्ये एंजल्सची भेट हि मोसे हेसलशी झाली त्याने एंजल्सशीविविध विषयांवर चर्चा करून हेगेलचे तत्वज्ञान आणि द्वंद्वात्मकतेचा तार्किक परिणाम म्हणजे साम्यवाद आहे हे पटवून दिले. त्यामुळे एंजल्स हा साम्यवादी विचारांकडे आकर्षित झाला.

१८४५ ते १८४८ या कालखंडात एंजल्स हे बसरेल्स व पॅरिस येथे वास्तव्याला होते. तिथे त्यांनी आपल्या विचारांनी कामगार वर्गाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. पॅरिस येथे असताना त्यांची ओळख कार्ल मार्क्सशी झाली. या ओळखीचे रूपांतर अल्पावधीतच गाढ मैत्रीत झाले. एंजल्सच्या रूपाने कार्ल मार्क्सला फक्त निष्ठावान मित्रच नाही तर एक वैचारिक सहकारी देखील लाभला. एंजल्सच्याच मैत्रीमुळे जर्मनीपुरता विचार करणारा मार्क्स इंग्लंडच्या भांडवलशाहीच्या आधारे संपूर्ण विश्वाचा अर्थ लावण्याचा आणि त्यासाठी पर्यायी कार्यक्रम व क्रांतीचे विचार मांडू लागला. याचकाळात एंजल्स व मार्क्स यांनी जर्मन कम्युनिस्टपार्टीच्या सभासदांशी संपर्क प्रस्थापित केले व लीगने त्यांना समाजवादाच्या मुख्य सिद्धांताची व्याख्या करण्याचे कार्य सोपवले त्याचा परिणाम म्हणजे १८४८ मध्ये या दोघांच्या प्रयत्नामुळे 'साम्यवादाचा जाहीरनामा' प्रसिद्ध झाला. नंतर एंजल्सने विविध संशोधन पूर्ण कार्य केले व दास कॅपिटल हा ग्रंथ लिहण्यासाठी मार्क्सला आर्थिक मदत केली. त्यामुळे मार्क्स एंजल्सला मिळाला नसता तर मार्क्स कोरा बुद्धिमान राहिला असता असे म्हटले जाते.१८६४ मध्ये मार्क्सने 'आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची' स्थापना केली. या संघटनेच्या स्थापनेत व प्रसारात एंजल्सची देखील महत्वाची भूमिका होती.

१४ मार्च १८८३ मध्ये कार्ल मार्क्सच्या मृत्यूनंतर एंजल्सने एक भाषण केले, हे भाषणाची आजही त्यांच्या गाढ मैत्रीची ओळख म्हणून इतिहासात नोंद आहे. या भाषणाचा केंद्रबिंदू हा कामगारांचा विकास हा होता. मार्क्सच्या मृत्यूनंतर एंजल्सने कार्ल मार्क्सच्या अपूर्ण हस्तलिखांचे व त्याच्या नोंदींच्या आधारे दास कॅपिटल या ग्रंथाचे दुसरा ( १८८५ ) व तिसरा खंड ( १८९४ ) प्रकाशित केला. मार्क्सच्या मृत्यूनंतर त्याने साम्यवादी विचार प्रसारित करण्यासाठी व कामगारांच्या स्थिती सुधारणा घडवून आण्यासाठी प्रयत्न केले. ६

ऑगस्ट १८९५ मध्ये एंजल्सचा हि मृत्यू झाला. कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी त्याने शेवटपर्यंत प्रयत्न केला.



(फोटो- फेड्रिकएंजल्स, स्रोत - https://cdn.britannica.com/47/101747-050-D9B72200 )

**आपली प्रगती तपासा.**

१. फेड्रिक एंजल्सच्या जीवनाचा आढावा घ्या ?

## ५.७ एंजल्सची ग्रंथसंपदा

### 1) The Holy Family (पवित्रकुटुंब- १८४४)

हे पुस्तक मार्क्स व एंजल्स यांनी नोव्हेंबर १८४४ मध्ये लिहले होते, ज्या मध्ये हेगेलच्या विचारांवर टीका केली होती.

### 2) The Condition of the Working Class in England (इंग्लडमधील कामगारवर्गाची स्थिती १८४५)

एंगेल्सच्या वैयक्तिक निरीक्षणांवर आधारित मँचेस्टर आणि सालफोर्डमधील कामगार वर्गाच्या वंचित परिस्थितीचा अभ्यास या पुस्तकामध्ये केला गेला आहे. या पुस्तकामध्ये समाजवादाची स्थिती आणि त्याच्या विकासाबद्दलचे मुख्य विचार आहेत. हे पुस्तक मूळतः जर्मन भाषेमध्ये प्रकाशित झाले व १८८७ मध्ये ते इंग्रजीमध्ये अनुवादित झाले, सुरुवातीला या पुस्तकाचा इंग्लंडमध्ये फारसा परिणाम दिसला नाही. तथापि, विसाव्या शतकात ब्रिटीश औद्योगिकीकरणाच्या इतिहासकारां मध्ये ते खूपच लोकप्रिय ठरले.

### 3) The Peasant War in Germany (जर्मनी मध्ये शेतकरी युद्ध १८५०)

या पुस्तकामध्ये १६ व्या शतकाच्या प्रारंभीचे जर्मनीमधील शेतकरी युद्ध व उठावाचे वर्णन जे जर्मन शेतकरी युद्ध म्हणून ओळखले जाते, त्याची युरोपमधील १८४८ - ४९ मधील क्रांतिकारी उठावांशी तुलना यामध्ये केली आहे.

### 4) Herr Eugen Dühring's Revolution in Science (हेर्र युजेन डोहरिंगची विज्ञानातील क्रांती (१८७८)

अँटी-डेहरिंग म्हणून ओळखले जाणारे हे पुस्तक जर्मन तत्त्वज्ञ आणि मार्क्सवादाचे समीक्षक यूजेडहरिंग यांच्या तत्त्वज्ञानाच्या विचारांवर सविस्तर टीका आहे. डहरिंगला उत्तर देताना, एंगल्स विज्ञान आणि गणितातील अलीकडील प्रगतीचा आढावा घेतात ज्याद्वारे द्वंद्वशास्त्राच्या संकल्पना नैसर्गिक घटनांवर लागू होतात.

### 5) Socialism: Utopian and Scientific (समाजवाद: युटोपियन आणि वैज्ञानिक, १८८०)

त्या काळातील सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या समाजवादी पुस्तकांपैकी एक हे पुस्तक होते. या पुस्तकात एंगल्सने चार्ल्स फूरियर आणि रॉबर्ट ओवेन सारख्या उल्लेखनीय यूटोपियन समाजवाद्यांच्या कल्पनांचे किंव्हा विचारांचे थोडक्यात वर्णन आणि विश्लेषण केले, त्यांच्या विचारातील त्यांचे मुख्य मुद्दे आणि कमतरता सांगितल्या आणि भांडवलशाही समजून घेण्यासाठी वैज्ञानिक समाजवादी चौकटीचे स्पष्टीकरण आणि प्रगतीची रूपरेषा प्रदान केली. ऐतिहासिक भौतिकवादाच्या दृष्टिकोनातून सामाजिक आणि आर्थिक विकासाचे विश्लेषण या पुस्तकात आढळते.

### 6) Dialectics of Nature (निसर्गाचे द्वंद्वशास्त्र, १८८३)

निसर्गाची द्वंद्वात्मकता हे एंगेल्सचे १८८३ चे अपूर्ण काम आहे जे मार्क्सवादी विचारांना, विशेषतः द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या विचार यामाध्ये आढळतात. हे पुस्तक पहिल्यांदा १९२५ मध्ये सोव्हिएत युनियनमध्ये प्रकाशित झाले.

### 7) The Origin of the Family, Private Property and the State (कुटुंब, खाजगी मालमत्ता आणि राज्याची उत्पत्ती, १८८४)

एंगेल्सने या पुस्तकात असा युक्तिवाद आहे की कुटुंब ही एक सतत बदलणारी संस्था आहे जी भांडवलशाहीने आकारली आहे. यात वर्ग, महिला आणि खाजगी मालमत्तेच्या समस्यांशी संबंधित कुटुंबाचा ऐतिहासिक दृष्टिकोन आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) फेड्रिक एंजल्सने लिहलेल्या विविध ग्रंथाचा आढावा घ्या

## ५.८ सारांश

आधुनिक राजकीय विचारवंत, साम्यवाद - मार्क्सवादाचा प्रणेता, आधुनिक इतिहासलेखनात स्वतंत्र अस्तित्व दर्शवणारा इतिहासकार, म्हणून कार्ल मार्क्सला ओळखले जाते. कार्ल मार्क्स व फेड्रिक एंजल्स यांनी प्रतिपादन केलेले मूळ स्वरूपातील तत्वज्ञान 'अभिजात मार्क्सवाद' म्हणून ओळखले जाते. कार्ल मार्क्सने राजकीय,

सामाजिक, आर्थिक, वैचारिक या सर्वच क्षेत्रात मोलाची भर घातली. त्याचे विचार, ते विचार मांडण्याची त्याची शैली, त्यामधून क्रांतीस चालना देणारे त्याचे विचार, जुनी प्रस्थापित व्यवस्था पूर्णपणे मोडून नवीन व्यवस्था उभे करण्यास त्याने दिलेले आव्हान यासर्वच गोष्टी आकर्षण निर्माण करणाऱ्या आहे.

मार्क्सवादाचे विवेचन असे कि, उत्पादन साधनांवर सामुदायिक मालकी निर्माण झाल्याशिवाय साम्यवाद प्रस्थपित करता येत नाही. समाजात भांडवलशाही व्यवस्थेपासून साम्यवादापर्यंत जात असताना समाजाला कोणकोणत्या अवस्थेतून जावे लागेल याविषयी मार्क्सवादात शास्त्रशुद्ध पद्धतीचे विवेचन केले आहे.

## ५.९ प्रश्न

१) कार्ल मार्क्सच्या जीवनाचा सविस्तर आढावा घेऊन त्याने मांडलेले सिद्धांत सांगा ?

२) कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद व ऐतिहासिक भौतिकवाद स्पष्ट करा ?

३) कार्ल मार्क्सचा वर्ग संघर्ष सिद्धांत व अतिरिक्त मूल्य सिद्धांत सांगा ?

४) फेड्रिक एंजल्स याच्या बद्दल थोडक्यात माहिती द्या?

५) मार्क्सवाद म्हणजे काय हे सांगून कार्ल मार्क्स याचे इतिहासातील योगदान स्पष्ट करा?

## ५.१० संदर्भ

१) राजदरेकर सुहास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८

२) व्लादिमिर लेनिन, कार्ल मार्क्स, फेड्रिक एंजल्स, प्रगती प्रकाशन, मास्को

३) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र व तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

४) ढोबळे डी. बी. राजकीय विचारप्रणाली, अरुणा प्रकाशन, लातूर, २०११

५) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११

६) सरदेसाई बी. एन. इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११

७) Shreedharan E, A Textbook of Historiography, 500 BC to AD 2000, Orient Longman, New Delhi, 2000

८) समकालीन राजनीतिक विचार एंव सिद्धांत, महर्षी दयानंद विश्वविद्यालय, ( Study Material ), रोहतक

९) पाश्चिमात्य राजकीय विचार, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, (Study Material), जळगांव

१०) गर्गे स.मा. - कम्युनिस्ट जाहीरनामा, लेख, मराठी विश्वकोश, (विकासपीडिया )

❖❖❖❖

# ६

## इतिहासाचा नव - मार्क्सवादी दृष्टिकोन - एरिक हॉब्सवन व इ. पी. थॉमसन

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ नवमार्क्सवाद व फ्रंकफ्रण्ट स्कूल

६.३ फ्रंकफ्रण्ट स्कूलचे उद्देश

६.४ नवमार्क्सवादी इतिहासलेखन

६.५ नवमार्क्सवादाचे वैशिष्ट्ये

६.६ मार्क्सवाद व नवं - मार्क्सवाद यामधील फरक

६.७ नवमार्क्सवादातील दोष

६.८ सारांश

६.९ प्रश्न

६.१० संदर्भ

### ६.० उद्दिष्टे

- नवं - मार्क्सवादाचा अर्थ समजून घेणे.
- फ्रंकफ्रण्ट स्कूलचा अभ्यास करणे.
- नवमार्क्सवादातील विद्वानांचा आढावा घेणे.
- मार्क्सवाद व नवमार्क्सवाद यातील फरक अभ्यासाने.
- नवमार्क्सवादाचे वैशिष्ट्ये जाणून घेणे.

### ६ .१ प्रस्तावना

कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानामधून आधुनिक साम्यवादी विचारसरणी आकाराला आली. प्राचीन काळात साम्यवादाचा सर्वप्रथम विचार प्लूटो याने केला होता, परंतु आधुनिक साम्यवादाचा जनक म्हणून कार्ल मार्क्सला ओळखले जाते. समाजवादाचा एक क्रांतिकारी मार्ग म्हणून साम्यवादी तत्वज्ञान विकसित झाले. कार्ल मार्क्सने शास्त्रीय पद्धतीने मानवी

जीवनाच्या अनेक शतकांच्या प्रवाहाचा अभ्यास करून जे मूलभूत तत्वज्ञान प्रतिपादित केले त्याला 'मार्क्सवाद' अशी संज्ञा देण्यात आली. कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञावर सर्वप्रथम लेनिन याने १९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती घडवून आणली. यानंतर माओ - स्ते - तुंग याने चीनमध्ये साम्यवादी क्रांती घडवून आणली. हा साम्यवादाचा प्रयोग रशिया व चीनमध्ये करताना लेनिन व माओ यांनी जशाच तसे मार्क्सवादी तत्वज्ञान न स्वीकारता रशिया व चीनच्या परिस्थिनुसार त्यात परिवर्तन करून ते तत्वज्ञान स्वीकारले. मार्क्सच्या विचारात परिवर्तन व संशोधन करण्याची निर्माण झालेली हि प्रवृत्ती 'नवमार्क्सवाद' या नावाने ओळखली गेली.

रशियात मार्क्सप्रणीत साम्यवाद हा चुकीच्या पद्धतीने राबवला गेल्याने मार्क्सच्या सिद्धांताचे नव्याने विश्लेषण करून मार्क्सच्या सिद्धांतातील दोष - उणिवा नव्याने मांडण्याचा प्रयन्त केला गेला व याचाच एक परिणाम म्हणजे नवं - 'मार्क्सवाद' हि विचारसरणी पुढे आली. नवमार्क्सवादी विचारवंतांना देश, काळ व परिस्थितीनुसार मार्क्सवादात बदल करण्याची गरज बोलून दाखवली. तसेच तत्व व व्यवहारात होणाऱ्या विसंगतीमुळे मार्क्सवाद हा टीकाकारांचे लक्ष्य बनत असल्याने मार्क्सवादाच्या संशोधन करण्याची एक नवीन चळवळ सुरु झाली. जी नवमार्क्सवाद या नावाने ओळखली गेली. लेनिन, स्टॅलिन व माओ यांच्या बरोबर जर्मनीतील फ्रँकफर्ट स्कूलने नवमार्क्सवादाला जन्म दिला.

या नव्या मार्क्सवादी विचारप्रवाहात मार्क्सवादातील दोष - उणिवा दूर करण्यासाठी लोकशाही, समाजवाद, मानवतावाद यावर विश्वास व्यक्त केला. या नवमार्क्सवादी विचारपरंपरेत अँटिनिओ ग्रामची, जॉर्ज लुकाक, थिओडोर अडोर्नो, योर्गन हेबर्मास, लुई अलथूजर, फेडरिक जेनसन, एडवर्ड थॉमसन इ. चा समावेश होता. भारतातही डॉ. बिपीनचंद्र यांनी नवमार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय समाजतल्या अंतर्विरोधांवर व विसंगतीवर प्रकाश टाकला.

## ६.२ नवमार्क्सवाद व फ्रंकफ्रण्ट स्कूल

कार्ल मार्क्सच्या मार्क्सवादी विचाराच्या मांडणीनंतर त्याच्या विचाराची समीक्षा करणाऱ्या विचारवंताचा उदय झाला. त्या विचारवंतांना 'विवेचात्मक सिद्धान्तकार' असे म्हटले गेले. त्यांनी मार्क्सवादी सिद्धांताला तत्कालीन समाजाच्या आवश्यकतेनुसार संशोधित करण्याचा प्रयत्न केला. या विचारवंतांची फळी जर्मनीमधील फ्रँकफर्ट स्कूल मधून उदयास आली. जर्मनीमधील फ्रंकफ्रण्ट या शहरात २३ फेब्रुवारी १९२३ मध्ये नवमार्क्सवादी विचारवंतांनी 'फ्रँकफर्ट इन्स्टिटयूट फॉर सोशल रिसर्च' संशोधन संस्थेची स्थापना केली. हि संशोधन संस्था नवमार्क्सवादी शास्त्रज्ञाचा समूह होता. मार्क्सच्या आर्थिक विचारांशी प्रामाणिक राहून या समूहाने एक समीक्षात्मक सिद्धांत प्रणाली विकसित केली. परंतु जर्मनीमध्ये हिटलची हुकूमशाही प्रस्थापित झाल्यानंतर या संस्थेच्या अभ्यासकांनी अमेरिकेत जाऊन आपल्या विचारांची मांडणी सुरु ठेवली, यालाच फ्रंकफ्रण्ट स्कूल असे म्हटले गेले.

फ्रंकफ्रण्ट स्कूलचा मुख्य उद्देश हा कार्ल मार्क्स यांच्या विचारांना चालना देणे हा जरी असला तरी मार्क्सच्या सिद्धांताचे नव्याने विश्लेषण करून मार्क्सवादाला एका नव्या

सुधारणावादी स्वरूपात पुढे आणणे हा होता.या संस्थेतील विद्वानांचा विश्वास होता कि, मार्क्सवादाला जर जिवंत ठेवायचे असेल तर त्यात संशोधन करणे गरजेचे आहे. व याच गरजेतून 'नवं - मार्क्सवादी' विचारसरणी हि उदयाला आली. १९३०च्या दशकात रशियात स्टॅलिनने घडवून आणलेली क्रांती हि डळमळीत झाली. तर दुसरीकडे औदयोगिक करणाचे परिणाम देखील दिसून येत होते. त्यामुळे नवं - मार्क्सवादी विचारवंतांनी सिद्धांत व व्यवहार यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.

नवमार्क्सवाद्यांच्या मते, रूढीवादी मार्क्सप्रणीत सिद्धांत आजच्या आधुनिक समाजाच्या विश्लेषणात बरोबर नाही. तसेच मार्क्सने मांडलेला इतिहासवाद हा चुकीचाआहे.म्हणून मार्क्सवादाचे विश्लेषण समाजाच्या नव्या संदर्भात करण्यासाठी हि विचारसरणी विकसित झाली. उदारमतवादाचा एक पर्याय म्हणून मार्क्सवादी विचारसरणीचा फार मोठा प्रभाव जगावर होता. मार्क्सवादात उदारमतवाद, लोकशाही, समाजवाद, राज्य मानवतावाद इ. बाबतीत घेण्यात आलेली टोकाची भूमिका तत्कालीन परिस्थितीशीविसंगत ठरू लागल्याने मार्क्सवादात अनेक दोष दिसू लागले होते, तेव्हा मार्क्सवादी विचार परंपरेत राहूनच मार्क्सवादाला परिस्थितीशी सुसंगत बनवण्याचा प्रयन्त झाला. व या प्रयत्नांमधूनच नवं मार्क्सवाद हि विचारसरणी उदयाला आली. फ्रंकफ्रण्ट स्कूलने या नवं मार्क्सवादी विचारसरणीला जन्म दिला.

फ्रँकफर्ट स्कूल मध्ये मार्क्स हायमर, औडोर्नो, मार्क्यूस, विटफोगेल, हबर्मस, एरीक फॉर्म इ. चा समावेश होता. हे सर्व विचारवंत कोणत्याही साम्यवादी पक्षाचे सदस्य नव्हते तेर ते स्वतःला कार्ल मार्क्सचे अनुयायी समजत.

**आपली प्रगती तपासा**

१) नवं मार्क्सवादातील फ्रंकफ्रण्ट स्कूल बद्दल माहिती द्या ?

## ६.३ फ्रंकफ्रण्ट स्कूलचे उद्देश

जर्मनीमधील फ्रंकफ्रण्ट या शहरात १९२३ मध्ये नवमार्क्सवादी विचारवंतांनी 'फ्रँकफर्ट इन्स्टिटयूट फॉर सोशल रिसर्च' संशोधन संस्थेची स्थापना केली. हि संशोधन संस्था नवमार्क्सवादी शास्त्रज्ञाचा समूह होता. यामधील मुख्य उद्देश हे पुढीलप्रमाणे सांगता येतील

१) कार्ल मार्क्सच्या विचारांचे विशेषतः निर्धारणवादाचे टीकात्मक परीक्षण करणे तसेच मार्क्सच्या विचाराचे नवशास्त्रीय स्वरूपाच्या आधारे खंडन करणे.

२) मार्क्सवादाचे नवीनीकरण करणे. मार्क्सला नवीन स्वरूपात प्रस्तुत करून मूळ मार्क्सवादी विचाराशी प्रामाणिक राहून आधुनिक समाजाशी सुसंगत अशी नव्याने मार्क्सवादाची मांडणी करणे.

३) समाजशास्त्रीय विश्लेषणात मार्क्सवादी सिद्धान्ता बरोबरच अन्य समाजशास्त्रीय सिद्धांताला सामावून घेणे.

४) विज्ञानवाद व प्रत्यक्ष्य वादाचे टीकात्मक परीक्षण करणे.

५) आर्थिक घटकांबरोबरच सांस्कृतिक घटक जे आधुनिक समाजात प्रभावी ठरतात त्यांचे समीक्षण करणे.

६) राजकीय घटक, धार्मिक घटक, प्रसार माध्यमे तसेच वैचारिक घटकांना मार्क्सवादी विश्लेषणात महत्व देणे.

थोडक्यात, या अभ्यासकांनी फक्त मार्क्सवादावर टीकाच केली नाही तर आधुनिक काळात मार्क्सवाद प्रभावी पद्धतीने कसा उपयोगी पडेल याचे विवेचन केले.

**आपली प्रगती तपासा**

१. नवं मार्क्सवादातील फ्रंकफ्रण्ट स्कूलचे मुख्य उद्दिष्टे सांगा ?

## ६.४ नवमार्क्सवादी इतिहासलेखन

मार्क्सवादाचे एक नवीन शाखा म्हणून नवं - मार्क्सवादी विचारांचा उदय झाला. त्यामुळेच नवं मार्क्सवादी विचारांमध्ये मार्क्सवादी विचारांचे वाढीव रूप आपल्याला बघायला मिळतात. नवं मार्क्सवादी विचारवंतांनी २०व्या शतकाच्या प्रारंभी मार्क्सवादाचा पुनर्विचार केला. व मूलभूत मार्क्सवादी विश्लेषण पद्धतीच्या साहाय्याने सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील संघर्षाचे स्वरूप विशद करण्याचा प्रयत्न केला.

### १) अँटिनिओ ग्रामची

अँटिनिओ ग्रामची हा नवमार्क्सवादाचा अग्रदूत मनाला जातो. ग्रामची हा एक मानवतावादी विचारवंत व फॅसिज्मचा कट्टर विरोधक म्हणून परिचित आहे. ग्रामची हा लोकशाहीचा पुरस्कर्ता असून कामगार चळवळी या लोकशाही पद्धतीने झाल्या पाहिजे, असा आग्रह त्याने धरला. ग्रामची हा १९१५ मध्ये इटालियन साम्यवादी पक्षाचा सदस्य बनला. पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान इटलीमध्ये फॅसिस्ट विचारसरणीचा उदय झाल्याने ग्रामची याने मुसोलिनीच्या विरुद्ध अनेक लेख लिहून त्याच्या शासनावर प्रहार केले. १९२६ मध्ये त्याला अटक करून वीस वर्षाची दीर्घ कारावासाची शिक्षा देण्यात आली. परंतु काही वर्षानंतर त्यांचा जेल मध्येच मृत्यू झाला. बंदिवासाच्या काळात त्याने काही लेख लिहले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर त्याचे हे लेख ग्रंथरूपात प्रसिद्ध झाले. या ग्रंथामध्ये प्रमुख ग्रंथ हे पुढीलप्रमाणे :

१)The Modern Prince and other Writings, 1959

२) Selections from Political Writings, 1971

३) Selections from Prison Notebooks.

४) The Revolution Against Capital, 1977

१९६० नंतर युरोपमध्ये जो नवं - मार्क्सवाद उदयाला आला त्यामागे ग्रामची याच्या लेखांची प्रेरणा होती.



**(फोटो - अँटिनिओ ग्रामची, स्रोत: https://upload.wikimedia.org/wikipedia/commons/e/e6/Gramsci.)**

**अँटिनिओ ग्रामची याचे नवमार्क्सवादी विचार :**

आधुनिक नवं - मार्क्सवादी विचारांवर ग्रामची यांच्या विचाराचा प्रभाव असलेला दिसून येतो. ग्रामचीच्या मते, आर्थिक सत्ताधारी वर्ग अंकित गटावर दमन व संमती या दोन मार्गानी आपली सत्ता लादतो. परंतु अंकित वर्गात एक सेंद्रिय बुद्धिवंतांचा वर्ग असतो. त्यांच्या नव्या विचारांचा व रूढ प्रस्थापित संघर्षातून क्रांतीला अनुकूल वातावरण निर्मण होते. ग्रामची यांनी कार्ल मार्क्सच्या, ऐतिहासिक भौतिकवादाचे खंडन केले. मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद हा आदिम मानवापासून ते साम्यवादापर्यंतचा परिवर्तनाचा इतिहास आहे. मार्क्सने समाजपरिवर्तन किंव्हा क्रांती यासाठी आर्थिक कारणांवर विशेष भर दिला. परंतु ग्रामचीच्या मते, ऐतिहासिक घडामोडी अथवा परिवर्तन हे एकाकी किंव्हा आपोआप घडून येत नाही परिवर्तन किंव्हा क्रांतीसाठी विचारसरणी महत्वाची ठरते. ग्रामचीच्या मते, क्रांतीसाठी समाजातील बौद्धिक वर्गाची भूमिका हि महत्वाची असते. क्रांती घडवून आणण्यासाठी सर्वप्रथम जनसामान्यांच्या मध्ये क्रांतीची विचारसरणी विकसित व्हाव्ही लागते.समाजातील बौद्धिक वर्ग अशा प्रकारच्या विचारांची मांडणी करू शकतो व जनसामान्य किंव्हा 'नाही रे' वर्ग त्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करू शकतो. जनसामान्यांना अथवा 'नाही रे' वर्गाला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव नसते. त्यावर्गाला स्व अस्तित्वाची जाणीव करून देणे व क्रांतीसाठी त्या वर्गाला प्रेरित करणे हे काम समाजातील बौद्धिक वर्गाचे असते.

ग्रामची यांनी आपल्या नवमार्क्सवादात, सांस्कृतिक प्रभुत्व स्पष्ट केले आहे. ग्रामचीच्या मते, सत्ताधारी वर्गाकडून केले जाणारे 'सांस्कृतिक नेतृत्व' म्हणजे केवळ पोलीस यंत्रणेच्या साहाय्याने सत्ता प्रस्थापित करणे नसून शासक अथवा 'आहि रे' वर्ग समाजावरील आपल्या नियंत्रणासाठी अथवा प्रभुत्वासाठी कुटुंब, धर्मसंस्था, शिक्षण संस्था, वृत्तपत्रे इ. सामाजिक संस्थांद्वारे आपले नियंत्रण अथवा वर्चस्व प्रस्थापित करतो. परंतु जेव्हा नागरिकांमध्ये असहमतीचा भाव जागृत होतो तेव्हा क्रांती हि होत असते. म्हणून ग्रामचीच्या मते, भांडवलशाहीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी संघर्षा ऐवजी त्यावर आधारित असलेल्या संरचनेमध्ये परिवर्तन करणे आवश्यक्य आहे. त्यामुळे तो भांडवलशाही विरुद्ध सांस्कृतिक, नैतिक, साहित्यिक, व्यवहारवादाच्या आधारावर संघर्ष कायम ठेवण्याचे सुचवितो.

थोडक्यात, ग्रामचीनेवर्तमानकाळातील परिस्थितीचे भान राखून मार्क्सवादाला नवी दिशा देण्याचे काम केले. कार्ल मार्क्सचा संघर्षांचा सिद्धांत मार्क्सला मान्य नाही, ग्रामचीच्या मते, भांडवलवादी समाज ज्या संरचनेवर आधारलेला आहे त्यात वैचारिक, सांस्कृतिक, व्यावहारिक आधारावर बदल करून हळूहळू साम्यवादाकडे वाटचाल करावी.

## २) युरेगन हेबरमास

प्रसिद्ध जर्मन नवमार्क्सवादी युरेगन हेबरमास हा फ्रँकफर्ट स्कूलचा एक महान नवं - मार्क्सवादी शास्त्रज्ञ आहे. हेबरमास हा मुळात मार्क्सवादी सिद्धान्तकार असून त्याने आपल्या नवं मार्क्सवादात अन्य समाजशात्रीय सिद्धांत परंपरा घेऊन मार्क्सच्या सिद्धांतावर समीक्षणात्मक सिद्धांतांची निर्मिती केली. हेबरमास या नवं - मार्क्सवादी विचारवंतावर फ्रँकफर्ट स्कूल मधील एडोर्नो, हरखेयर, हेगेल कांत इ. सारख्या विचारवंताचा प्रभाव होता. हेबरमास यांनी मार्क्सवादात नवीन संशोधन करून मार्क्सवादाला एक बौद्धिक शक्ती म्हणून सुधारात्मक स्वरूपात प्रस्तुत केले. युरेगन हेबरमास यांनी अत्यंत समृद्ध अशी ग्रंथसम्पदा निर्माण केली ज्यामध्ये :

१) Theory and Practice, 1963

२) Knowledgey and Human Interest, 1968

३) Toward a Rahonal Society, 1970

४) Communication and exolution of Society, 1979

५) The theory of Communicative Action, 1981

६) Post Metaphysical Thinking, 1992

हेबरमास यांनी फ्रँकफर्ट स्कूलला पुढे नेण्याचे कार्य केले. कार्ल मार्क्सकालीन सामाजिक व भंडलवशाहीची रचना आज अस्तित्वात नसल्याने मार्क्सच्या सिद्धांताचे नव्याने विश्लेषण करण्याची गरज हेबरमास याने व्यक्त केली. हेबरमास यांनी मार्क्सच्या श्रम सिद्धांतावर आक्षेप घेतला. त्यांच्या मते, मार्क्सने मानवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये हे श्रमातच बघितले मानवी विचार व मूल्यांना त्याने महत्व दिले नाही. तसेच श्रम या संकल्पनेचा सामाजिक

अर्थाने विचार न करता केवळ उद्दिष्टये पूर्तीचे एक साधन म्हणून श्रमाचा विचार केला. हेबरमास यांच्या मते, श्रम हे फक्त हेतू साध्य करण्याची प्रक्रिया नसून ती एक सामाजिक प्रक्रिया आहे ज्या द्वारे सामाजिक संघटन घडून येते.हेबरमसच्या मते, कार्ल मार्क्सचा उत्पादन पद्धती व उत्पादन संबंध हा सिद्धांत आधुनिक समाजात योग्य ठरत नाही. कार्लमार्क्सच्या काळात भांडवलवाद व राज्यसंस्था ह्या वेगवेगळ्या असल्याने राज्यसंस्था ह्या अर्थसंस्थेत ढवळा ढवळ करीत नसत. ज्यामुळे भांडवलदार श्रमिकांचे मोठया प्रमाणावर शोषण करत. परंतु आज राज्य संस्था आर्थिक नीती आर्थिक धोरण ठरवण्या बरोबरच सर्व प्रकारच्या आर्थिक नीतींमध्ये महत्वाची भूमिका ठरवते. उदा. पी. व्ही. नरसिंह राव यांनी १९९२ मध्ये आर्थिक उदरवाद, खाजगीकरण व उदारमतवाद आणण्या मध्ये महत्वाची भूमिका बजावली. किंव्हा राज्यांद्वारे वेळोवेळी कामगार कायदे करून कामगारांचे प्रश्न सोडवलेजातात व त्यांचे होणारे शोषण थांबवलेजाते. हेबरमास यांच्या मते, या सर्व गोष्टी मुळे विकसनशील राष्ट्रांमध्ये कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली, म्हणून आज क्रांतीची आवश्यकत्या नाही किंव्हा त्यामधून राज्यविहीन समाजची निर्मितीही प्रासंगिक ठरणार नाही.



(फोटो - युरेगन हेबरमास, स्त्रोत : https://cdn.britannica.com/71/201071-050-0BAABD52/Jurgen-Habermas.jpg )

१९६२ मध्ये हेबरमास याने 'The Structural transformation of the Public Sphere' हा ग्रंथ लिहला या ग्रंथात त्याने सार्वजनिक क्षेत्राचे विश्लेषण केले. सार्वजनिक क्षेत्र याचा अर्थ, 'समाजाच्या जीवनाचे क्षेत्र' यामध्ये लोक समाजाच्या समस्यांवर वाद-विवाद, चर्चा, विचार - विनिमय याद्वारे मार्ग काढतात. यामुळे दमण व शोषणाच्या शक्ती कमजोर होत असत. सार्वजनिक क्षेत्रात आप आपसातील विरोध दूर होऊन लोकांमध्ये सदभावना निर्माण होत होती. त्यामुळे शोषण दूर करण्यासाठी संघर्ष करण्याचा मार्क्सचा सिद्धांत हेबरमासला मान्य नाही. हेबरमासच्या मते, संघर्ष करण्याऐवजी सार्वजनिक क्षेत्राची निर्मिती करून वर्गीय सलोखा निर्माण केला जाऊ शकतो. हेबरमसच्या मते, समाजात परिवर्तन अथवा विकास फक्त उत्पादन पद्धती व संबंधांनीच झाला नाही तर त्यासाठी धर्म, विचार, मूल्ये, व अन्य सांस्कृतिक कारणेहीजबाबदार होती. प्रत्यक्षात उत्क्रांती अथवा विकास हि एक फारच व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. परंतु मार्क्सने

त्याकडे फारच संकुचित अर्थाने बघितले. हेबरमास याने खऱ्या अर्थाने मार्क्सच्या सामाजिक परिवर्तन किंव्हा मानव विकासाच्या सिद्धांताला आर्थिक निर्धानवादाच्या चौकटीतून बाहेर काढले व अभिव्यक्तीच्या क्षेत्रात आणले.

थोडक्यात हेबरमास याने मार्क्सच्या विचारांशी प्रामाणिक राहून मार्क्सवादाचा प्रासंगिक व सुसंगत बनवून नवं - मार्क्सवादाचे सिद्धांत मांडले.

### ३) जॉर्ज लुकाक

हंगेरियन नवं - मार्क्सवादी विचारवंत जॉर्ज लुकाक यांनी देखील ग्रामची, हेबरमास यांच्या प्रमाणे मार्क्सवादाचि मीमांसा केली. जॉर्ज लुकाक यांनी 'History of Class Consciousness' (वर्ग जाणिवेचा इतिहास )या आपल्या ग्रंथात मार्क्स व परंपरागत मार्क्सवादी विचारांवर प्रखर भाष्य करून पारंपरिक मार्क्सवादी विचारसरणीला एक प्रकारे वैचारिक आव्हान दिले. त्यामुळे याचा प्रभाव पारंपरिक मार्क्सवादाला बाजूला सारून त्यावर स्वतंत्रपणे भाष्य करणाऱ्या लेखकावर पडलेला आढळतो. लुकाक यांनी आपल्या नवमार्क्सवादात अलगीकरण, काल्पनिकवाद, सापेक्षवाद, वर्गजाणीव इ. संकल्पनांच्या साहाय्याने कार्ल मार्क्सच्या सिद्धांताचे टीकात्मक समीक्षण केले. लुकाक यांनी आपल्या ग्रंथात मार्क्सवादी सिद्धांताची सापेक्षतावादी बाजू मांडण्याचा प्रयन्त केला.

जॉर्ज लुकाक यांनी, मार्क्सच्या सिद्धांतातील वस्तूची निर्मिती हि कामगारांकडून होते व कामगारांच्या श्रमावरून त्या वस्तूचे मूल्य ठरत असते. यामताचे खंडन केले. भांडवलशाही समाजरचनेत व्यक्तीच्या अपरिचित वस्तूंच्या निर्मितीची प्रक्रिया हि सतत होत असते व तिचे मूल्य तिला मिळणाऱ्या बाजारपेठेवरून ठरत असते. त्यामुळे मार्क्सची वस्तुंबाबतची संकलपना हि काल्पनिक आहे. तसेच मार्क्सची हि संकल्पना फक्त आर्थिक घटकांपुरतीच मर्यादित होती. लुकाक यांनी संपूर्ण समाजव्यवस्थच्या संदर्भात त्याची मांडणी केली.



(फोटो - जॉर्ज लुकाक, स्रोत - https://images.gr-assets.com/authors/1295342420p8/4461334.jpg)

लुकाक यांच्या मते, पूर्वीच्या गुलामगिरी किंव्हा सरंजामशाही समाजरचनेत वर्ग जाणीव निर्माण होऊ शकली नाही. परंतु भांडवलशाही व्यवस्थेमध्ये आर्थिक संबंधावर निर्माण झालेल्या संबंधातून वर्ग जाणीव निर्माण होऊ लागली. कारण भांडवलशाही व्यवस्थेमध्ये भांडवलदार वर्गापेक्षा श्रमिक किंव्हा कामगार वर्गात वर्गचेतना मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. कारण या वर्गाकडे बौद्धिक आणि संघटित शक्ती असल्याने ते भांडवलदार वर्गाविरुद्ध संघर्ष निर्माण करू शकतात. थोडक्यात, मार्क्सने वर्गचेतनेला आर्थिक घटकांशी जोडले तर लुकाक यांनी वर्ग चेतनेचा संबंध विशिष्ट वर्गातील व्यक्तीच्या विचारांशी जोडला.

एकंदरीत, जॉर्ज लुकाक यांनी आपल्या नवं - मार्क्सवादी विचारांमध्ये परंपरागत मार्क्सवादाला एक नवीन चेहरा देण्याचा प्रयत्न केला.

### ४) एडवर्ड थॉमसन

एक मार्क्सवादी मूलगामी तत्वचिंतक म्हणून एडवर्ड थॉमसन हे ओळखले जातात. त्यांची वैचारिक भूमिका हि मार्क्सवादाचि असली तरी केवळ श्रमिकांच्या कार्यावर व इतिहासावर लक्ष केंद्रित न करता आजवर इतिहासकारांनी व उच्चवर्गीयांनी दुर्लक्षति केलेल्या समाजाच्या निन्म स्थरातील गटांचा अभ्यास केला. त्यांच्या मते, कायदा हा शासक वर्गाच्या हातातील शस्त्र असते, त्याचा उपयोग समाजातील भिन्न वर्गांना दडपून टाकण्यासाठी केला जातो. या दडवल्या गेलेल्या समाजगटांचे कार्य व त्यांची मानसिकता यांचे अभ्यासपूर्ण विवेचन त्यांनी केले. त्यांनी आपल्या लिखाणांमधून वर्गजाणिवा, वर्गनिर्मिती व वर्गसंघर्ष या संकल्पना स्पष्ट केल्या.



(फोटो - ई. पी. थॉमसन, स्रोत - https://cnduk.org/wp/wp-content/uploads/2018/04/EPT3_82_E-P-Thompson.jpg)

'The making of the English Working Class' (इंग्लंडमधील कामगार वर्गाची निर्मिती) या आपल्या ग्रंथात वर्गनिर्मितीची व्याख्या करतांना म्हटले कि, "समान सामूहिक अनुभवातून समान हितसंबंधांची जाणीव उदयाला येऊन तिचा शाब्दिक अविष्कार होणे आणि आपले हितसंबंध इतरांहून कसे भिन्नच नव्हे तर विरोधी आहे हि

जाणीव वर्गनिर्मिती मध्ये होते." (कोठेकर शांता, इतिहास : तंत्र व तत्वज्ञान, पृ. क्र. २३९) याच ग्रंथात त्यांनी औदयोगिक क्रांतीमुळे श्रमिकांच्या झालेल्या गुणात्मक हानीचे हि विवेचन केले आहे.त्यांनी 'History from Below' हि संकल्पना मांडली. त्यांची वैचारिक भूमिका हि मार्क्सवादाचि असली तरी त्यांनी केवळ श्रमिकांच्या कार्यावर व इतिहासावरच लक्ष केंद्रित न करता समाजातील अगदी शेवटच्या, दुर्लक्षित घटकांना व त्यांच्या योगदानास इतिहास लेखनात महत्वाचे स्थान दिले.

### ५) लुईस अल्थ्यूजर

लुईस अल्थ्यूजर प्रसिद्ध फ्रेंच समाज शास्त्रज्ञ होता. अल्थ्यूजर यांनी भाषाशास्त्राच्या आधारे मार्क्सच्या सिद्धांताचे नव्याने विश्लेषण केले.लुईस अल्थ्यूजर यांनी मार्क्सच्या भौतिकवादी सिद्धांताची नव्याने मांडणी केली व मार्क्सच्या आर्थिक निर्धारणवादाचा विरोध केला. रशियातील स्टॅलिनच्या भ्रष्ट साम्यवादाचा तो कट्टर विरोधक होता. अल्थ्यूजर हा मानवतावादी विचारवंत असून त्याने मार्क्सवादाची एक सामाजिक व ऐतिहासिक विज्ञानाप्रमाणे मांडणी केली.

अल्थ्यूजर यांना सरंचनात्मक मार्क्सवादाचा प्रणेता म्हणून ओळखले जाते. संरचनात्मक मार्क्सवाद म्हणजे अल्थ्यूजर यांनी मार्क्सच्या सिद्धांताची व्याख्या भाषाशास्त्राच्या आधारे केली. या सिद्धांतालाच संरचनात्मक मार्क्सवाद म्हणतात. शासक व शासित समाज यांच्या संबधाचे परीक्षण करताना ते म्हणतात कि, शासन दोन यंत्रणेमार्फत कार्य करतात, पहिला दमनाधारित यामध्ये कायदा, दंड व्यवस्था, लष्कर यांचा अंतःर्भाव होतो. तर दुसरा हा वैचारिक असतो. ज्यामध्ये धर्म, शिक्षण, कौटम्बिक कायदे, संस्था, प्रसार माध्यमे व संस्कृती याद्वारे आपल्या व्यवस्थेचे पद्धतशीरपणे वैचारिक दमण करते. उदा. नाझीवाद किंव्हा साम्यवादामध्ये या वैचारिक साधनांद्वारेच अन्य विचारांचे दमण करून आपल्या नाझीवाद व साम्यवादाचे वैचारिक समर्थन केले. याद्वारे समाजात व्यवस्था व सुसंवाद स्थापन स्थापन केला जातो व शासक व शोषित यांच्यातील संबंधाचे खरे शोषक स्वरूप लपवले जाते.

लुईस अल्थ्यूजर यांच्या मते, मार्क्सचा आर्थिक निर्धारणवाद कमजोर आहे. समाज हे आर्थिक व्यवस्था, राजकीय पद्धती व विचारांचे मिश्रण आहे. समाजात जे काही परिवर्तने होत असतात त्यासाठी फक्त आर्थिक कारण हेच जबाबदार नसते त्यासाठी अन्य कारणेहि कारणीभूत असतात. मार्क्सने मांडलेला मानव समाजाचा इतिहास चुकीचा आहे, एकरेषीय उत्क्रांती द्वारा निर्माण झालेली व्यवस्था व क्रांतीद्वारे एका व्यवस्थेची जागा दुसऱ्याने घेणे, त्याद्वारे भांडवलशाही व्यवस्था नष्ट होऊन साम्यवाद निर्माण होणे या मताशी अल्थ्यूजर हे सहमत नाही. लुईस अल्थ्यूजर यांच्या मते, 'इतिहासाच्या विकासाची प्रक्रिया हि मुक्त असते. ऐतिहासिक परिवर्तन समाजाच्या असाय्य प्रतिवाद आणि प्रतिरोधच्या प्रक्रियेने होत असते.'



**(**फोटो - लुईस अल्थझुर**,** स्रोत - https://literariness.org/wp-content/uploads/2016/04/althusser_ens.jpg)

मार्क्सने आपल्या भौतिकवादी सिद्धांतात मानवी अस्तित्व नाकारले एक प्रकारे मार्क्सचा भौतिकवाद हा सिद्धांत मानवतावाद विरोधी आहे. अल्थ्यूजर यांच्या मते, समाजशास्त्रीय विश्लेषणात व्यक्ती हि महत्वपूर्ण आहे. वर्ग, समुदाय व समाजापासून व्यक्तीला वेगळे पाहता काम नये, व्यक्ती हीच समाज निर्माण करते आणि म्हणूनच समाजात व्यक्तीच्या अस्तित्वाचा स्वीकार केला पाहिजे

**६) थिओडोर अडोर्नो**

उच्यवर्गीय ज्यू कुटुंबात जन्माला आलेल्या थिओडोर हे १९३०च्या दशकांत मार्क्सवादाच्या अभ्यासाकडे वळाले. आधुनिक काळाचा इतिहास हा पोटात वाढत जाणाऱ्या अन्यायाचा व दडपशाहीचा इतिहास आहे असा निराशावादी सूर त्याच्या लिखाणातून आढळतो. आधुनिक भांडवलशाही पद्धती व त्यातील कामगार वर्गाच्या स्थिती यांचे विश्लेषण करताना अडोर्नो म्हणतो कि, कामगार वर्गातील चेतना हि नष्ट झाली आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर कामगारांचे संगठन हि संकल्पनाच भ्रामक ठरली आहे. त्यामुळे प्रचलित परिस्थितीमध्ये कामगार वर्ग क्रांती करून भांडवलशाहीचा अंत करेल हा मार्क्सचा विचार अडोर्नोला मान्य नाही.

**७) एरिक हॉब्जबाम**

एरिक हॉब्जबाम यांनी औदयोगिक क्रांती व श्रमिक वर्गाची चळवळ हे आपले अभ्यास विषय ठरवले. औदयोगिक क्रांतीच्या कामगार वर्गांवरील परिणामांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी Primitive Rebels, Labouring Men, Captain Swing इ. ग्रंथ लिहले. Captain Swing या ग्रंथात त्यांनी इंग्लडमधील शेतकऱ्यांच्या उठावाचे समीक्षण केले.

**आपली प्रगती तपासा**

१) टिपा लिहा ?

अ) अँटिनियो ग्रामची ?

ब ) एडवर्ड थॉमसन ?

क ) जॉर्ज लुकाक ?

## ६.५ नवमार्क्सवादाची वैशिष्ट्ये

दुसऱ्या महायुद्धनंतर बदलत्या परिस्थिनुसार जागतिक विचार हे बदलत गेले. राज्य हा शोषणाला प्रोत्साहन देतो हे विचार बदलून मार्क्सवादातील अतिटोकाच्या भूमिकेला१९५०नंतर विरोध होऊ लागला.परिणामी मार्क्सवादात लेनिनवाद, स्टॅलिनवाद, माओवाद, युरो - कम्युनिसम, नवं - मार्क्सवाद इ. मतप्रवाह बनले. मार्क्सच्या विचारांवर या सर्व विचारधारांची श्रद्धा असून थोड्या फार फरकांनी त्यांनी मार्क्सचे सिद्धांत नव्याने मांडले. नवमार्क्सवाद्यांनी देखील मार्क्सवादात एक वेगळी भूमिका मांडली. त्याची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे

### १) आर्थिक घटकांबरोबर राजकीय घटक देखील महत्वाचा :

मार्क्सवादात आर्थिक घटक हेच सर्व गोष्टी निर्धारित करतात अशी 'आर्थिक नियतीवादीची' भूमिका आढळते. पण नवं मार्क्सवाद्यांनी त्याचा विरोध करून मानवी जीवनात जरी आर्थिक घटकाला महत्वाचे स्थान असले तरी तो मूलभूत घटक नाही, कारण त्याच्या बरोबर इतर घटक देखील तेवढेच महत्वाचे असतात. त्याच बरोबर राज्य हे परावलंबी असते हे नवमार्क्सवाद्यांनी अमान्य केले. त्यांच्या मते, राज्य आपले धोरण व कायद्याद्वारे नियोजनपूर्वक काही बदल घडवून आणू शकतो. म्हणून परिस्थिती बदलण्यात राज्य हे महत्वाची भूमिका बजावते.

### २) प्रभावाचे नवीन आयाम :

मार्क्सवादात आर्थिक घटकच महत्वाचे मानले होते. तसेच उदरामतवाद व्यवस्था व राज्य या दोन महत्वाच्या शक्ती भोवातलीच मार्क्सवादाचि मांडणी झाली होती. पण नवं मार्क्सवाद्यांनी या पलीकडे जाऊन अन्य गोष्टींचा देखील विचार केला. परिवर्तनाच्या प्रक्रियेत सगळी शक्ती आर्थिक घटकांवर केंद्रित करून चालत नाही त्यात सांस्कृतिक घटक देखील महत्वाचे असतात. म्हणून नवमार्क्सवादात परिवर्तनवाद्यांनी या सांस्कृतिक घटकांचे महत्व ओळखून त्याठिकाणी आपले वर्चस्व निर्माण केले पाहिजे.

### ३) लोकशाही शासन व्यवस्थेवरील विश्वास :

कार्ल मार्क्सने 'साम्यवादाचा जाहीरनामा' या आपल्या ग्रंथात पाश्चिमात्य लोकशाहीवर हल्ला करून हि लोकशाही कुचकामी व सामान्य लोकांची पिळवणूक करणारी आहे असे मत मांडले. थोडक्यात मार्क्सने लोकशाहीचा विरोध करून ज्या व्यवस्थेत कामगारांना

न्याय मिळेल अशा व्यवस्थेचे समर्थन केले. त्यासाठी मार्क्स क्रांतीनंतरच्या संक्रमण काळासाठी कामगारांच्या हुकूमशाहीची समर्थन करतो.

मार्क्सचे हे प्रतिपादन ग्रामची सारख्या नवं - मार्क्सवादयांना मान्य नाही. मार्क्सवाद्यांच्या मते, समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी लोकशाही शासनच आवश्यक आहे. आधुनिक लोकशाही राज्याला लोक कल्याणकारी स्वरूप प्राप्त झाल्याने सर्वच लोकशाही राज्यांनी शोषित, पीडित, कामगार, स्त्रिया, मुले या सर्वांच्या विकासावर भर दिला आहे. लोकशाही मार्गांनी समाजवाद आणता येतो हे नवं मार्क्सवादयांना कळल्याने मार्क्सने लोकशाहीचा केलेला विरोध मार्क्सवादयांना मान्य नाही.

**४) राज्याच्या स्वरूपाबाबत नवीन विचार**:

राज्य हे वर्गसंघर्षाच्या पार्शवभूमीवर निर्माण झालेलं असून वर्गीय हितसंबंध टिकवण्यासाठी ते अस्तित्वात आले. म्हणून राज्य वर्गीय हिताचे साधन आहे, धनिकांच्या हितांचे ते रक्षण करते, या मार्क्सच्या भूमिकेचा नवं - मार्क्सवाद्यांनी पुनर्विचार केला. नवमार्क्सवाद्यांच्या मते, राज्य हे केवळ एका वर्गाच्या हिताची काळजी घेते हि गोष्ट त्यांनी अमान्य केली. राज्य कमी अधिक प्रमाणात का होईना सर्वच लोंकाच्या हिताची काळजी घेते, म्हणून त्यांच्यावर बहिष्कार घालण्याची गरज नाही अशी भूमिका नवमार्क्सवाद्यांनी घेतली.

**५) राजकीय अनेकसत्तावादाचे समर्थन**

मार्क्सवादात कामगारांनी भांडवलदारांच्या विरुद्ध क्रांती करून कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करावी अशी भूमिका मांडली. क्रांतीमुळे कामगारांच्या राहणीमानात बदल होईल तसेच राज्याचे नियंत्रण व संचालन संपूर्णपणे कामगारांच्या हाती पर्यायाने साम्यवादी पक्षाच्या हाती येईल. नवमार्क्सवाद्यांनी खुली स्पर्धा, लोकशाही, विकेंद्रीकरण आणि राजकीय अनेकात्मवाद याला मान्यता दिली आहे. नवमार्क्सवाद्यांनी मुक्त लोकशाहीचा स्वीकार केल्याने त्यांना मार्क्सवादापेक्षा लोकशाही अधिनिक जवळची वाटते.

**६) राज्यविरहित समाज अनावश्यक**

मार्क्सवादातील राज्य विरोधाची भूमिका नवमार्क्सवाद्यना मान्य नव्हती. राज्याचा उदय हा खजगी मालमत्तेबरोबर येणारी स्पर्धा, संघर्ष, व पिळवणूक या पार्श्वभूमीवर झाला असून जो पर्यंत या गोष्टी टिकून आहेत तो पर्यंत राज्य टिकून राहील असे मार्क्सवाद्यांचे विवेचन होते. नवं - मार्क्सवाद्यांच्या मते, मुळात राज्य हि कोना एका वर्गासाठी निर्माण झालेली संघटना नसून ती सर्वांची भागीदारी असणारी संघटना आहे. व राज्य या संघटनेद्वारेच सर्वांच्या हिताची काळजी घेणे शक्य असल्याने इतिहासकाळात जसे राज्य होते तसे भविष्यात हि त्याची गरज आहे. म्हणून समाजवादी रचनेत हितसंबंधांची विविधता लक्ष्यात घेता राज्य आवश्यक आहे.

थोडक्यात, परिस्थिती व काळानुसार मार्क्सवादात संशोधन करण्याची भूमिका नवमार्क्सवाद्यांनी घेतली. मार्क्सवादातील तत्व आणि व्यवहारामध्ये समनव्यय निर्माण व्हावा यासाठी त्यांनी आपले नवीन विचार मांडले.

**आपली प्रगती तपासा**

**१)** नवमार्क्सवादाच्या वैशिष्ट्यांचा आढावा घ्या ?

## ६.६ मार्क्सवाद व नवं - मार्क्सवाद यामधील फरक

मार्क्सवाद व नवं - मार्क्सवाद या दोन्ही विचारसरणीचा पाया जरी एक असला तरी दोन्ही विचारधारेमध्ये काही सूक्ष्म फरक आहे तो पुढीलप्रमाणे

| मार्क्सवाद | नवमार्क्सवाद |
|---|---|
| १) मानवी जीवनात उत्पादन प्रक्रिया महत्वाची आहे उत्तापदं पद्धती बदलली कि, उत्पादनावर आधारित आर्थिक संबंधहि बदलतात. | १) मानवी जीवनात फक्त वस्तूंचे उत्पादन होत नाही तर कला, साहित्य, धर्म, संस्कृती यांचीही निर्मिती होत असते व मानवी जीवनात त्यांचेही महत्वाचे स्थान आहे. |
| २) मार्क्सप्रणीत वर्गसंघर्षाचा आधार हा आर्थिक आहे. | २) वर्गसंघर्ष केवळ आर्थिक व्यव्हारातच आढळतो असे नाही तर तो सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रातही दिसून येतो. |
| ३) मार्क्सच्या मते, आहि रे वर्ग, नाही रे वर्गाचे आर्थिक शोषण करतो यामधूच अतिरिक्त मूल्य हे तैयार होत असते. | ३) नवमार्क्सवादाच्या मते, मानवी समाजावर वर्चस्व गाजवणारा वर्ग केवळ आर्थिक दृष्ट्या नव्हे तर इतर अनेक अनेक मार्गांनी शोषण करतो. |
| ४) मार्क्सवादानुसारसमाजात भांडवलदार व श्रमिक किंव्हा शोषक व शोषित असे दोनच वर्ग असतात. | ४) नवमार्क्सवादानुसार संस्कृती, धर्म, लिंग याआधारे देखील शोषण चालू असते. |
| ५) मार्क्सवादी इतिहासाच्या अभ्यासात केवळ प्रभाव गटाचा विचार आहे. | ५) नवमार्क्सवादानुसार केवळ प्रभाव गटाचा विचार न करता सामान्यांचा सहभाग व त्यांचे इतिहासातीलयोगदान शोधण्यावर भर दिलेला आहे. |

(सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, पृ. क्र. २२५ -२२६ )

**आपली प्रगती तपासा**

१) मार्क्सवाद व नवमार्क्सवाद यामधील फरक सांगा?

## ६.७ नवमार्क्सवादातील दोष

स्थळ, काळ परिस्थितीनुसार मार्क्सवादात अनेक दोष निर्माण झाल्याने मार्क्सवादाला व्यवहाराच्या कसोटीत उतरवण्यासाठी नवमार्क्सवाद्यांनी जरी नवीन विचार मांडले असले तरी त्यामध्ये अनेक दोष होते. ते पुढीलप्रमाणे

१) नवमार्क्सवाद्यांनी मार्क्सवादातील तत्व आणि व्यवहारात समनव्यय साधत असताना जे संशोधन किंव्हा जे नवीन विचार मांडले त्यामुळे मार्क्सवादाचा ढाचाच बदलला.

२) नवमार्क्सवाद्यांनी मार्क्सवादात संशोधन करतांना एका बाजूला मार्क्सवादाच्या मुळावर घाव घातला तर दुसऱ्या बाजूने त्यांनी उदारमतवादी विचारांचे अप्रत्यक्षय रित्या समर्थन केले.

३) पिळवणूक जर संपवायची असेल तर संघर्ष करण्याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नाही. हे मार्क्सवाद्यांनी दाखवून दिले होते. पण नवमार्क्सवाद्यांनी क्रांती व संघर्षचा त्याग करून मार्क्सवादाच्या मुळावरच घाव घातला.

४) मार्क्सवादात वर्गसंघर्षाला महत्व असून या वर्गसंघर्षात भांडवलदार व कामगार यांच्यातील संघर्ष हा अटळ असून या संघर्षात राज्य हा भांडवलदारांची बाजू घेतो अशी भूमिका मांडली. परंतु नवमार्क्सवाद्यांनी सहजीवन व समन्व्ययाची भाषा करून भांडवलशाही बरोबर कामगारांची भागीदारी शक्य आहे. असा सिद्धांत मांडून मार्क्सवादाच्या मुख्य सिद्धांतच मोडला.

५) भांडवलशाहीच्या अमिषाला बळी पडलेल्या लोकांनीच मार्क्सवादात संशोधन करण्याचा प्रयत्न केला, अशी नवमार्क्सवाद्यांवर टीका केली जाते.

नवमार्क्सवाद्यांनी मार्क्सवादाच्या संदर्भात जी भूमिका घेतली त्या भूमिकेवर अनेक टीका झाली असली तरी नवमार्क्सवाद्यांचे महत्व नाकारता येत नाही. कारण मार्क्सवादाला परिस्थिती नुसार मार्क्सवादात संशोधन किंव्हा परिवर्तनाचा प्रयत्न नवमार्क्सवाद्यांनी केला.

**आपली प्रगती तपासा**

१) नवमार्क्सवादातील उणीवांचा / दोषांचा आढावा घ्या ?

## ६.८ सारांश

२०व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत मार्क्सवादातून नवं - मार्क्सवादाची शाखा उदयास आली. प्रारंभिक अवस्थेमधील मार्क्सवाद हीच नवमार्क्सवाद्यांची प्रेरणा असल्याने मार्क्सवादाप्रमाणेच तेही मार्क्सचेच अनुयायी समजले जातात. किंबहुना नवमार्क्सवाद हा मार्क्सवादाचाच वाढीव विस्तार होय. मार्क्सवादाच्या पारंपरिक, रूढ अर्थाला काही नव्या विचारवंतांनीआव्हान दिले व मूलभूत मार्क्सवादी विश्लेषण पद्धतीच्या साहाय्याने सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील संघर्षाचे स्वरूप विशद केले. अँटिनियो ग्रामची, जॉर्ज लुकाक व फ्रंकफ्रण्ट स्कूलच्या काही विचारवंतांनी मार्क्सवादाला नवीन आशय दिला. तर थिओडोर

अडोर्नो, वॉल्टर बेंजामिन, थॉमसन एडवर्ड व एरिक हॉबवस्वान यांनी मार्क्सने प्रतिपादित केलेली सामाजिक विश्लेषण पद्धती, सामाजिक सिद्धांत, मानवाच्या मनोव्यापाराचे विश्लेषण व अस्तित्ववाद यांचा समन्वय केला.

थोडक्यात, नवमार्क्सवादाने मार्क्सवादाच्या वेगवेगळ्या पैलूत सुधारणा करतांना भांडवलशाही व कामगार संबंध, वर्गसंघर्ष, राज्याचे भवितव्य याबाबत परिवर्तनवादी भूमिका घेतली. व आपले विचार मांडले. बदलत्या काळानुसार समाजापुढील प्रश्नाची नव्याने उत्तरे शोधण्याची प्रक्रिया चालू ठेवणे हे समाज जीवनाचे प्रतीक असते. त्यामुळे नवमार्क्सवादी विचारधारेचे स्वागतच केले पाहिजे.

## ६.९ प्रश्न

१) नवमार्क्सवादातील फ्रँकफर्ट स्कूलचे महत्व सांगा ?

२) अँटिनिओ ग्रामची यांचे नवमार्क्सवादातील योगदान स्पष्ट करा ?

३) युरेगन हेबरमास यांच्या नवं मार्क्सवादी विचारांचा आढावा घ्या ?

४) टिपा लिहा : अ) एडवर्ड थॉमसन व एरिक हॉब्जबाम

५) मार्क्सवाद व नवं मार्क्सवादातील फरक स्पष्ट करा ?

## ६.१० संदर्भ

१) वांबूरकर जास्वदीं ( संपादक ), इतिहासातील नवीन प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४

२) व्लादिमिर लेनिन, कार्ल मार्क्स, फेड्रिक एंजल्स, प्रगती प्रकाशन, मास्को

३) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र व तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

४) ढोबळे डी. बी. राजकीय विचारप्रणाली, अरुणा प्रकाशन, लातूर, २०११

५) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११

६) चौसाळकर अशोक, नवमार्क्सवाद - काही विचार ( संशोधन लेख ), परामर्श, खंड ६, अंक ३, नोव्हेंबर १९८४.

७) Shreedharan E, A Textbook of Historiography, 500 BC to AD 2000, Orient Longman, New Delhi, 2000

८) समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, (Study Material), जळगांव

❖❖❖❖

# ७

# सबाल्टर्न स्टडीज : संकल्पना आणि सबाल्टर्न स्टडीजचे योगदान

**घटक रचना**

७.० उद्दिष्टये

७.१ प्रस्तावना

७.२ सबाल्टर्न म्हणजे काय

७.३ अँटिनिओ ग्रामशी (१८९१-१९३७)

७.४ सबाल्टर्न इतिहास लेखन शास्त्राचे स्वरूप

७.५ सबाल्टर्न इतिहास लेखनशास्त्राची काही उदाहरणे

७.६ सबाल्टर्न इतिहासाची महत्वाची वैशिष्ट्ये

७.७ भारतातील सबाल्टर्न इतिहासकार

७.८ सबाल्टर्न इतिहास लेखनाच्या मर्यादा

७.९ सारांश

७.10 प्रश्न

७.११ संदर्भ

## ७.० उद्दिष्टये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

- सबाल्टर्न संकल्पनेचा अर्थ समजून घेता येईल.
- सबाल्टर्न स्टडीजच्या विविध संकल्पनांचे विश्लेषण करता येईल.
- सबाल्टर्न स्टडीजच्या उत्पत्तीचा आणि विकासाचा अभ्यास करतायेईल.
- सबाल्टर्न स्टडीजच्या विविध विद्वानांचे योगदान समजून घेतायेईल.
- सबाल्टर्न स्टडीजच्या समालोचनाचे विश्लेषण करतायेईल.

## ७.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात वसाहतीक भारतामध्ये शोषित-अंकित जनसमूहांच्या जाणिवांचा उदय व विकास झालेला दिसून येतो. या कालखंडामध्ये अनेक शेतकरी उठाव व आदिवासींचे बंड इंग्रज सरकारच्या व जमीनदारांच्या शोषणाच्या व दमणाच्या विरोधात पाहायला मिळतात. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ याच काळात सुरू होताना दिसते. तसेच दलित चळवळ व आदिवासींच्या चळवळी विस्तारित होताना दिसतात. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सबाल्टर्न जाणिवा त्यांच्या सामाजिक व आर्थिक चळवळी, राजकीय घडामोडी, आधुनिकतेकडे वाटचाल आणि राष्ट्र बनवण्याचा प्रक्रियेतून निर्माण झालेले दिसतात. परंतु अकादमिक दृष्टिकोनातून भारतीय उपखंडातील या शोषित-अंकित जनसमूहांच्या विविध चळवळीकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले गेले. या सामाजिक वर्गाच्या चळवळींचा उल्लेख आपणाला साम्राज्यवादी, राष्ट्रवादी आणि मार्क्सवादी इतिहास लेखनप्रवाहातून प्रतिबिंबित झालेला दिसून येत नाही. त्यामुळेच ही उणीव भरून काढण्यासाठी १९८०च्या दशकात सबाल्टर्न स्टडीजच्या माध्यमातून या सामाजिक वर्गाच्या व त्यांच्या चळवळीवर नवीन सिद्धांत, पद्धती व विश्लेषण यांचा वापर करून नवीन इतिहास लेखनप्रवाह सुरू करण्यात आला. सबाल्टर्न स्टडीजच्या लेखनप्रवाहातील काही अभ्यासकांनी तळागाळातील शोषित अंकित जनसमूहांच्या चळवळीवर लिखाण केले व त्यांचे जीवन, विचारविश्व व प्रतिकार अधोरेखित केले.

## ७.२ सबाल्टर्न म्हणजे काय?

सबाल्टर्न विचार प्रणाली अगदी अलिकडच्या विचारांतून विकसित झाली आहे. अँटिनिओ ग्रामशी या इटालियन साम्यवादी तत्त्ववेत्त्याने ही विचार प्रणाली स्थापन केली. त्यांनी इतिहासाकडे नव्या दृष्टीने पाहण्याचा आवश्यकतेवर भर दिला; त्यांचे लक्ष जीवन गरीब कष्टकरी वर्गाकडे वेधले गेले, समाजातील हा वर्ग दुर्लक्षित असतो. समाजातील तळाचा वंचित वर्ग म्हणजे सबाल्टर्न होय. या शब्दाचा तत्त्वज्ञानातील अर्थ एका विधानापेक्षा गुणात्मक रीतीने भिन्न असलेले विधान असा आहे. दोन विधानांतील फरक सकारात्मक आणि नकारात्मक असा दोन्ही प्रकारचा असू शकतो. विशेष सबाल्टर्नच्या संदर्भात जागतिक असाही त्याचा अर्थ आहे. सबाल्टर्न प्रजाती आणि जातींतील संबंध दर्शवतो. समाजातील खालचा वर्ग या अर्थाने ग्रामशी यांनी हा शब्द वापरला. समाजाच्या निवडक क्षेत्रातील अभिजन किंवा क्रिमी लेयर वर्गाच्या विरुद्धचा वर्ग म्हणजे सबाल्टर्न वर्ग होय. राजकीय सत्ता, सामाजिक वर्चस्व, आर्थिक बलस्थाने, धार्मिक अधिकार आणि बौद्धिक श्रेष्ठत्व यांच्या संबंधात सामान्यजन या अर्थाने हा शब्द वापरला जातो.

सबाल्टर्न (Subaltern) या संकल्पनेचा सर्वप्रथम वापर इटलीतील तत्वज्ञ आणि नवमार्क्सवादी विचारवंत अंतोनिओ ग्रामशी यांनी केला आहे. सबाल्टर्न म्हणजे निम्न वर्ग किंवा शोषित-अंकित जनसमूह. ग्रामशीने माक्र्सोत्तर विचारांची कोंडी फोडण्यासाठी केलेल्या चिंतनातून अनेक संज्ञा-संकल्पना जन्माला घातल्या. त्यात धुरीणत्व, सत्ता, जैविक बुद्धिजीवी, पारंपारिक बुद्धिजीवी, कॉमन सेन्स, प्रभुत्व, नागरी समाज याबाबत

चिंतन केले आहे. त्यांनी त्यांच्या ग्रंथात विविध संकल्पनांचा वापर सबाल्टर्न जनसमूहांच्या जाणिवा अभ्यासण्यासाठी केला आहे.

## ७.३ अँटिनिओ ग्रामशी (१८९१-१९३७)

अँटिनिओ ग्रामशी इटालियन साम्यवादी पक्षाचे संस्थापक होते. बर्नडोट क्रोचे या एकोणिसाव्या शतकातील इतिहासाच्या तत्त्ववेत्त्याचे ते शिष्य असले तरी क्रोचे यांची सर्वच मते त्यांना मान्य नव्हती. फिलॉसॉफी ऑफ बर्नार्ड कोच (Philosophy of Bernard Coache) या आपल्या ग्रंथामध्ये त्यांनी क्रोचे यांच्या सिद्धांतांतील उणिवा दाखवून दिल्या. मार्क्स आणि लेनिन यांच्या काही विचारांशी ते सहमत नव्हते. मार्क्सवादामुळे साम्यवादी पक्ष अभिजनवादी झाला असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले होते. मानवी विचार, भावना आणि वस्तुनिष्ठ सामाजिक प्रक्रियेची इच्छा यांच्यातील संबंधांचा त्यानी तात्वीक दृष्टीने विचार केला. विवेकी मानवी आचरण आणि मानवी कृती यांचा जागतिक इतिहासाच्या प्रक्रियेशी संबंध आहे असा युक्तीवाद त्यांनी केला होता. बुद्धीवाद्यांनी कामगार वर्गाच्या चाळवळींशी पूर्णत: एकरूप व्हावे असे त्यांचे मत होते. अशा बुद्धीवाद्यांना त्यांनी सेंद्रिय बुद्धीवादी हे नांव दिले. कामगारांच्या अनुभवाशी आणि विचारांशी एकरूप होणार नाहीत, अशा अभिजनांची कामगारांना गरज नाही. त्यांनी खुल्या मार्क्सवादाचा पुरस्कार केला. त्यामध्ये असंघटित आणि अबोध कामगार वर्गाला वर्गाची जाणीव करून दिली जाते. राजकीय सत्ता ग्रहण करण्यापूर्वी कामगारांनी आपले सांस्कृतीक वर्चस्व स्थापन करावे असे त्यांना वाटत असे.

ग्रामशीने इटलीत शोषित वंचित समूहांच्या मुक्तीचे लढे उभारताना साम्यवादी विचार प्रणालीचीदेखील मौलिक चिकित्सा केली आहे. वैचारिक धुरीणत्वाची संकल्पना मांडून मार्क्सवादी विचार नव्या दिशेने पुढे नेला. पारंपारिक मार्क्सवादाच्या मर्यादा स्पष्ट करताना भौतिकवादाचीही चिकित्सा केली. धर्म, संस्कृती, भाषा, इतिहास, तत्त्वज्ञान आदी बाबी शासन संस्थेच्या दृढीकरणला मदत करतात हे लक्षात घेऊन मार्क्सच्या भौतिकवादाची फेरमांडणी केली यामुळेच ग्रामशीला मार्क्सवादाचा भाष्यकार म्हणूनही ओळखले जाते.

## ७.४ सबाल्टर्न इतिहास लेखन शास्त्राचे स्वरूप

सबाल्टर्न इतिहास लेखनाच्या पद्धतीशास्त्रविषयाचे ग्रामशीचे विश्लेषण इतिहासलेखनाच्या नव्या प्रवाहाला जन्म देणारे ठरले. ग्रामशीने वापरलेल्या विविध संकल्पनांचा वापर करून अभ्यासक भारतातील प्रभुत्वशाली वर्गाचे विश्लेषण करतात. ग्रामशीचे हे विचार विश्व भारतीय अभ्यासकांना महत्त्वाचे वाटले याच सबाल्टर्न विचारप्रणालीच्या आधारे रणजित गुहा आणि त्यांचे सहकारी संशोधक व अभ्यासक भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन करतात. इ.स. १९८२ साली रणजीत गुहा आणि त्यांच्या सहकारी अभ्यासक व संशोधकांनी सबाल्टर्न स्टडीज चा पहिला खंड प्रकाशित केला. या खंडाच्या प्रस्तावनेत रणजीत गुहा यानी या नवीन इतिहास लेखन प्रवाहाविषयी आपली भूमिका व दृष्टिकोनाची मांडणी केली.

एकमेकांशी संबंध नसलेल्या विविध विषयापैकी एखाद्या विषयावरील निबंध असे सबाल्टर्न इतिहासाचे स्वरूप असते. हा विषय कनिष्ठ वर्गाच्या उठावाशी निगडित असतो. ग्रामशी यांनी आपल्या हस्तलिखित लेखांमध्ये हा शब्द वर्ग, जात, वय, लिंग आणि अधिकारपद इत्यादीमधील कनिष्ठ वर्ग या अर्थाने वापरला आहे. इतिहासलेखनशास्त्राने दुर्लक्ष केलेल्या कनिष्ठ वर्गाकडे सबाल्टर्न इतिहासकारांनी प्रथमच लक्ष दिले. मुघल काळापासून एकोणिसाव्या शतकातील सातव्या दशकापर्यंतच्या काळातील सांप्रदायिकता, औद्योगिक कामगार इत्यादी विषयांवर वर्णनात्मक आणि संकल्पनात्मक लेखन केले. सबाल्टर्न स्टडीज या नावाने प्रसिद्ध झालेल्या बारा खंडांमध्ये रणजित गुहा, पार्थ चॅटर्जी, गायत्री चक्रवर्ती - स्पिवाक, शाहिद अमीन, डेव्हिड हार्डीमन, डेव्हिड आर्नोल्ड, ग्यानेन्द्र पांडे, ग्यान प्रकाश, दीपेश चक्रवर्ती, गौतम भद्र, सुजी थारु, इशिता बॅनर्जी, कांचा इलाया इत्यादी अभ्यासक आधुनिक भारत व वसाहतोत्तर काळातील भारताची चिकित्सा करताना दिसतात तसेच शोषित अंकित जनसमूहांच्या विविध चळवळींचा अभ्यास करताना दिसतात. आधुनिक भारतामधील त्यांच्या विविध योगदानाचा आढावा या सर्व अभ्यासकांनी घेतलेला आहे जो आजपर्यंतच्या इतिहास लेखनामध्ये आलेला दिसून येत नाही. शेतकरी, कामगार, आदिवासी, दलित, भटके व स्त्रियांच्या चळवळीतील विविध व्यक्तींचे योगदान, त्यांनी केलेल्या चळवळी व यातून निर्माण झालेल्या त्यांच्या स्वतंत्र जाणिवा यांचा काही अभ्यास या इतिहास लेखन प्रवाहातील काही अभ्यासक करतात. यासाठी ते नवीन सैद्धांतिक मांडणी व पद्धतींचा अवलंब करतात. भारतामध्ये इतिहास लेखनाच्या विविध परंपरा दिसून येतात. त्यांनी केलेल्या इतिहास लेखनाची बाजू उच्चवर्गीय आणि उच्चवर्णीय राहिलेला आहे असे दिसून येते. साम्राज्यवादी व राष्ट्रवादी अभिजनवादी इतिहास प्रवाहाने शोषित-अंकित समूहांच्या समस्यांचा व जाणिवांचा उल्लेख केलेला नव्हता म्हणून सबाल्टर्न इतिहासकारांना नवीन इतिहास लेखनाची सुरुवात करावी लागली. फुले-आंबेडकरांच्या नंतर सबाल्टर्न प्रवाहानेच भारतीय समाजातील दुर्लक्षित घटकांचा विचार करून त्यांना इतिहास लेखनात स्थान द्यावयास सुरुवात केली. अभिजनवादी इतिहास लेखनाला विरोध करून दक्षिण आशियातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळीचा एक नवा ऐतिहासिक अन्वयार्थ या सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने मांडला. सबाल्टर्न प्रवाहाने वसाहतवादी (साम्राज्यवादी), राष्ट्रवादी व मार्क्सवादी या तिन्ही इतिहासलेखनाच्या प्रवाहावर टीका करून नवीन पद्धतीचे सिद्धांकन व अन्वेषण आपल्या लेखनाद्वारे मांडले. सबाल्टर्न इतिहासकारांनी अंतोनिओ ग्रामशी आणि ब्रिटिश मार्क्सवादी इतिहासकारांना प्रेरणादायी मानून 'हिस्टरी फ्रॉम बिलो' म्हणजेच तळागाळातील लोकांचा इतिहास (तळाकडून इतिहास) आपल्या लिखाणाद्वारे मांडला.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न १. इतिहासाची सबाल्टर्न विचार प्रणाली म्हणजे काय ?

## ७.५ सबाल्टर्न इतिहास लेखनशास्त्राची काही उदाहरणे

सबाल्टर्न इतिहासाच्या खंडावरून या इतिहासलेखनशास्त्राची कल्पना येते. १९१९-१९२४ या काळातील आंध्र प्रदेशातील गुडेम आणि राम्पा टेकड्यांच्या प्रदेशातील उठाव आणि अन्य दंग्यांच्या मालिकेचा वृत्तांतडेव्हिड अर्नोल्ड यांनी सादर केला आहे. (खंड १)

१८७६-१८७८ या काळातील मद्रास इलाख्यातील दुष्काळाच्या अभ्यासात त्यांनी शेतकऱ्यांची जाणीव आणि करवाईचा, दुष्काळासारख्या कठीण प्रसंगात जीवंत राहण्याच्या प्रयत्नांचा उल्लेख केला आहे. (खंड ३) भारतीय दुष्काळासंबंधीच्या विपूल वाङमयात मानवी अनुभवाचा काहीच उल्लेख आढळत नाही आणि शेतकऱ्यांना सहन कराव्या लागणाऱ्या हालअपेष्टांना, सरकारी धोरण आणि दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांच्या मानाने गौण स्थान देण्यात आल्याची तक्रार ते करतात. ग्यान पांडे १९१९-१९२२ या काळातील अवध प्रदेशातील शेतकऱ्यांचा उठाव आणि भारतीय राष्ट्रवादावरील त्याच्या प्रभावाचा वृत्तांत देतात. (खंड १) बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशातील १९४२ च्या चले जाव चळवळीत अभिजनांचा राष्ट्रीय उठाव आणि समाजातील वंचितांचा उठाव कसा एकत्र आला, त्याचा वृत्तांत स्टिफन हेनिहॅम यांनी दिला आहे. (खंड २) हे दोन्ही उठाव एकत्र आल्याने समाजातील सर्व वर्गांमध्ये उत्साह निर्माण होऊन त्यांनी या चळवळीत भाग घेतला होता. चलेजाव चळवळीचे नाट्य आणि तीव्रता लक्षात घेऊनही या उठावाकडे अभ्यासकांनी पुरेसे लक्ष दिले नाही कारण अभिजनवादी इतिहासलेखनशास्त्राच्या चौकटीतील संशोधकांना हा उठाव पचवणे अशक्य असल्याचा युक्तीवाद हेनिहॅम या संदर्भात करतात. १९४७-४८ या काळातील बिहार मधील कृषी परिवर्तन अभिजन पुरस्कृत जमीन सुधारणांनी झाल्याचा युक्तीवाद चुकीचा असल्याचे अरविंद दास स्पष्ट करतात. (खंड २) बरद्वान जिल्ह्यातील शेत मजूर या त्यांच्या निबंधात (खंड २) एन.के. चंद्र यांनी तेथील गरिब शेतकरी आणि बहुसंख्य शेत मजूरांच्या भयाण दारिद्र्याकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. रोजगार, उत्पन्न, छुपी बेरोजगारी आणि दारिद्र्य इत्यादींनी ते बेजार झाले होते. दिपेश चक्रवर्ती यानी १८९०-१९४० या काळातील कलकत्त्यातील ज्युट गिरण्यातील कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास केला आहे. १९२०-१९५० या काळातील ज्युट गिरण्यातील कामगारांच्या विषयीच्या एका अन्य निबंधात (खंड ३) चक्रवर्तीनी समाजवादी आणि साम्यवादी कार्यकर्त्यांमध्ये अभिजनवादी प्रवृत्ती कशा बळावत गेल्या त्याचा उहापोह केला आहे. कामगार म्हणजे आपली जमीनदारी असल्याचा ग्रह कामगारांच्या नेत्यांचा झाला होता. उभयतांतील संबंध बाबू आणि कुली या उतरंडीच्या संबंधांच्या पातळीपर्यंत खालावले होते. १९०५ मधील वंगभंगाची चळवळ तसेच १९२१-२२ मधील असहकार आणि खिलफतीच्या चळवळींनी बंगाली जनसामान्यांना फरसा उत्साह वाटत नसे. वंगभंगाची चळवळ हिंदू वरिष्ठ भद्रलोक वर्गापर्यंतच सिमीत होती, तर खिलाफत चळवळीने जनसामान्याच्या पुढाकाराने भयभित झालेल्या नेत्यांनी लवकरच चळवळ मागे घेतल्याचा युक्तीवाद सुमित सरकार यांनी एका निबंधात केला आहे. (खंड ३) वायव्य बंगालमधील १९२४-१९३२ या काळातील माल्दा जिल्ह्यातील जितू संथाळ सारख्या वन्य जमातीच्या नेत्यांनी केलेली चळवळ हा सबाल्टर्न इतिहासकारांचा आवडता विषय आहे. (खंड ४) १९२४ मध्ये माल्दा जिल्ह्यातील कुळांनी जमीनदारांच्या विरोधात चळवळ सुरू केली. जितू संथाळाच्या नेतृत्वाखालची ही चळवळ १९३२ पर्यंत चालली. १९३२ मध्ये जितू संथाळाचा वध करण्यात आला. अमृत बझार पत्रिकेसारख्या अभिजनवादी वृत्तपत्रालाही जितू संथाळाच्या उठावाविषयी आत्मियता वाटत असे. मात्र अभिजनवाद्यांच्या नेहमीच्या पद्धतीनुसार त्या उठावाचे श्रेय जितू सारख्या वन्य जमातीच्या नेत्याला देण्या ऐवजी अन्य भागातील स्वराज्य पक्षाच्या चळवळ्यांना दिले गेल्याचे तानिका सरकार यांनी स्पष्ट केले आहे.

गौतम भद्रा यांनी १८५७ च्या उठावातील चार बंडखोर या निबंधात (खंड ४) असे निरिक्षण नोंदवले आहे की, १८५७ च्या महान उठावाच्या सर्व प्रकारांच्या इतिहासात, मग तो एस.बी. चौधरी यांच्या सारख्याराष्ट्रवादी इतिहासकार असो किंवा प्रमोद दासगुप्ता किंवा दत्त यांच्या सारख्या जहाल साम्यवाद्यांचा असो, या सर्व इतिहासकारांनी, अभिजनवादी पूर्वग्रहामुळे १८५७ च्या उठावाचे चित्रण अभिजनवादी कृती अशा स्वरूपात केले आहे. साधारण बंडखोर, त्याची भूमिका आणि परकीय राजवटीचे आणि समकालीन पेचप्रसंगाचे त्याचे आकलन इत्यादी सर्व मुद्यांकडे त्या महान उठावाच्या इतिहासात दुर्लक्ष केले आहे. भद्रा यांच्या निबंधात शाह मल, देवी सिंग, गोनू आणि मौलवी अहमदुल्ला शाह या चार बंडखोरांच्या १८५७ च्या उठावातील पराक्रमचा आढावा घेऊन एक प्रकारे इतिहासात त्यांचे पुनर्वसन केले आहे. १८५७ च्या उठावात, ग्रामशी ज्याला जाणत्या नेतृत्वाचे अनेक अंश असे नांव देतो, त्यांचा परिचय या बंडखोरांच्या पराक्रमाने होतो.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न १. सबाल्टर्न इतिहासकारांचे इतिहासलेखनशास्त्रातील योगदान नमूद करा.

## ७.६ सबाल्टर्न इतिहासाची महत्वाची वैशिष्ट्ये

१. हा इतिहास सामान्यजनांची मानसिकता समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

२. सत्याग्रह, राष्ट्रीय चळवळ, सुधारणांच्या चळवळी, प्रतिकाराच्या चळवळी, बंडे आणि उठाव इत्यादी महत्त्वाच्या चळवळीत तसेच वारकरी चळवळी सारख्या धार्मिक चळवळीत सहभागी होणाऱ्या सामान्य लोकांच्या कार्यावर हा इतिहास आपले लक्ष केंद्रित करतो.

३. अभिजनवादी बोलघेवड्यांच्या वकृत्वापेक्षा सामान्यजनांच्या भावना आणि विचारांकडे हा इतिहास अधिक लक्ष देतो. साधारण असे अभिजनवादी अशा चळवळींचे नेतृत्व करत असतात. अभिजन वाचाळ असतात, ते वाद घालतात, या उलट सामान्यजन प्रत्यक्ष कृतीमध्ये सामील होतात आणि ते सामान्यतः हिंसक असतात. या संदर्भात, चीन मधील तायपिंग उठाव (१८६१), इटालीचे एकत्रीकरण (१८७०) आणि छोडो भारत चळवळ (१९४२) यांचे उदाहरण देता येते.

४. नाझी आणि साम्यवादी चळवळींच्या सारख्या अतिशय संघटित चळवळीकडे हा इतिहास फारसे लक्ष देत नाही. १८५७ मधील भारतीय उठावासारख्या असंघटित सामान्य जनांच्या उठावांच्या विषयी या इतिहासाला आत्मीयता असते.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न १. सबाल्टर्न इतिहासाची महत्त्वाची वौशिठ्ये कोणती आहेत?

## ७.७ भारतातील सबाल्टर्न इतिहासकार

१९८२ नंतर सबाल्टर्न विचारप्रवाह भारतामध्ये पोहोचल्यानंतर भारतातल्या समाजधुरीणांनी व अभ्यासकांनी सबाल्टर्न विचारप्रणाली म्हणून स्वीकारली आणि त्यावर अनेक अभ्यासकांनी या लेखन प्रवाहावर आपले विचार व्यक्त केलेले दिसतात. त्याचे प्रतिबिंब काही साहित्यामध्ये पडले. मानव्यविद्या, सामाजिक शास्त्रे विशेषतः करून इतिहास लेखनावर प्रतिबिंब पडले आणि त्याने एक स्वतंत्र प्रवाह म्हणून भारतामध्ये जम धरला. उत्तर भारत, दक्षिण भारत तसेच पूर्व भारत म्हणजेच प्रामुख्याने पश्चिम बंगाल आणि पश्चिम भारतामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये अनेक अभ्यासकांनी त्यावर आपले विचार मांडलेले दिसतात. तरीही पश्चिम बंगाल व महाराष्ट्रातील अभ्यासकांनी त्याचा विशेष विचार करून लेखन- संशोधन केल्याचे दिसते.

भारत स्वतंत्र झाल्यावर ग्रामशी यांचा प्रभाव अधिक वाढला. डाव्या मार्क्सवाद्यांना इतिहासाचे सबाल्टर्न तत्त्वज्ञान आत्मसात करून एका नव्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय चळवळीचे सत्य आणि वास्तव सादर करायचे होते. रणजित गुहा या पॅसिफिक अध्ययनाच्या अभ्यासकाने १९८२ मध्ये सबाल्टर्न स्टडीज (Subaltern Studies) हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथाच्या प्रेरणेने सुमित सरकारांनी हिस्ट्री ऑफ द पीपल ऑफ इंडिया (History of the People of India) हा ग्रंथ लिहिला. या दोन बंगाली इतिहासकारांनी वंगभंगाची चळवळ, गंगेचे खोरे आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उठाव इत्यादी चळवलीतील सामान्यजनांच्या भूमिकेवर अधिक भर दिला. त्यांनी १९४२च्या छोडो भारत चळवळीचा सबाल्टर्न कल्पनांच्या दृष्टीने उहापोह केला. रणजित गुहांनी भारतीय आणि इंग्लिश इतिहासकारांच्या भारताच्या इतिहासावर टिका केली. राष्ट्रीय चळवळीचा इतिहास त्यांनी अभिजनांच्या दृष्टीकोनातून लिहिला होता. राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांनी कामगार आणि शेतकरी वर्गाच्या आशाआकांक्षा पेक्षा सुशिक्षित अभिजन आणि मध्यम वर्गाच्या हितसंबंधांना अधिक महत्त्व दिले होते. तथापि, महात्मा गांधींसारखा नेता सामान्य जनांशी एकरूप झाला असल्याने त्यांना संकुचित विचाराचे अभिजन असे म्हणता येत नाही. भारतातील सबाल्टर्न इतिहास अद्याप बाल्यावस्थेमध्ये असल्याने त्याच्या विकासाची वाट पाहावी लागेल.

भारतीय सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने तळातून इतिहास लेखन करताना इतिहासातील उपेक्षित वर्गाचे रेखाटन केले परंतु जात व स्त्री या वर्गाकडे विशेष लक्ष दिले नाही. १९८२च्या नंतर महाराष्ट्रातील अनेक अभ्यासकांनी सबाल्टर्न स्टडीज लेखन प्रवाहाचा अभ्यास करून शोषित अंकित समूहांचे प्रश्न ऐरणीवर आणण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न केला आणि जातीय शोषणाच्या चौकटी विस्तृत केल्या. यामध्ये प्रामुख्याने शरद पाटील, अरविंद देशपांडे, शाम कायंदे, उमेश बगाडे, प्रवीण चव्हाण, किशोर गायकवाड, नारायण भोसले इत्यादींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. जात वर्ग लिंगभावावर आधारित नवीन मांडणी त्यांच्या अनेक ग्रंथातून व लेखांमधून आपणास पाहायला मिळते. महाराष्ट्रामध्ये सबाल्टर्न स्टडीजच्या लेखनाच्या मर्यादा अधोरेखित करून या व इतर अनेक इतिहासकारांनी संशोधकांनी व अभ्यासकांनी शोषित अंकित जनसमूहांच्या चळवळीवर लेखन करून काही आक्षेप घेत सबाल्टर्न लेखन प्रवाह विकसित करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील इतिहासकार, विचारवंत व कार्यकर्तेनी केलेल्या लेखनामुळे सबाल्टर्न स्टडीजच्या सहाव्या खंडानंतर जातीचा प्रश्न त्यांनी आपल्या लेखनामध्ये मांडलेला दिसून येतो. जातीचा प्रश्न घेण्यासाठी अभ्यासकांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते कारण महाराष्ट्रामध्ये चर्चेची सघन परंपरा आहे. भारतीय विचारवंत व कार्यकर्त्यांनी सबाल्टर्न प्रवाहावर आक्षेप नोंदवत दुरुस्त्या सुचवल्या आहेत विशेषतः त्या जातीय व लिंगभावाचा अन्वयार्थाच्या राहिलेल्या आहेत. भारतामध्ये सबाल्टर्न स्कूलला सक्षम प्रतिक्रिया देण्यामध्ये महाराष्ट्र अग्रेसर होता. सबाल्टर्न वर्गाच्या आकलनासाठी महाराष्ट्राने अकादमिक आणि चळवळीच्या पातळीवर एक चिकित्सेची फुले-आंबेडकरांकडून आलेली परंपरा विकसित करायचा प्रयत्न केलेला आहे. शरद पाटील यांनी महाराष्ट्रात फुले-आंबेडकर हे दर्शन आहे, तत्वज्ञान आहे हा मोठा वाद १९८०च्या दशकात उभा केला आणि फुले-आंबेडकर हे तत्वज्ञानी होते याची मांडणी करण्यासाठी त्यांनी सक्षमपणे ग्रामशी वापरला.

## ७.८ सबाल्टर्न इतिहास लेखनाच्या मर्यादा

तत्वज्ञान हे समाजाच्या गतीला समजून घेणारे असते म्हणून ते तत्त्वज्ञान बनतात व टिकतात हा विचार घेऊन महाराष्ट्रातल्या फुले-आंबेडकरी आणि आधुनिक मार्क्सवादी अभ्यासकांनी मार्क्सवादाचा विस्तार करण्यासाठी सबाल्टर्न विचार व ग्रामशी वापरला. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील जातिव्यवस्थेचा व्यूह भेदण्यासाठी वापर केला. त्यांनी ग्रामशीचे तत्वज्ञान भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात जोडून घेऊन उकल केलेली दिसून येते. सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहावर नंतरच्या काळातील अनेक अभ्यासकांनी व संशोधकांनी टिका केलेली दिसून येते. डॉ. गोपाल गुरु यांनी आपल्या 'सबाल्टर्नवादी दृष्टिकोण व दलित- एक समीक्षा' या लेखात सबाल्टर्न लेखन प्रवाहाचे योगदान स्पष्ट करून या प्रवाहाचे काही आक्षेपही मांडतात. त्यांच्या मते, "मुख्य प्रवाही इतिहासशास्त्राने 'सबाल्टर्नचे ऐतिहासिक स्थान हे मध्यवर्ती न आणता, त्याला कायम परिघावर ठेवले किंवा काही बाबतीत इतिहासातून हद्दपार केले. अशा बहिष्कृत मानखंडित सबाल्टर्न आवाजाला त्याच्या इतिहासाला विश्लेषणाच्या राजकारणाच्या इतिहासाच्या केंद्रस्थानी आणून त्याची क्रांतिकारी ओळख जगाला पटवून देण्याची महत्त्वाची कामगिरी या अन्वेषण पद्धतीने केली आहे. सबाल्टर्न समूहांनी केलेल्या, दमण-शोषणविरोधी विविध चळवळी, वेळोवेळी केलेल्या प्रतिकाराची नव्याने मांडणी या अन्वेषण पद्धतीने केली आहे.मुख्यप्रवाही इतिहासकारांनी ज्यांच्या स्वातंत्र्याची व अस्मितेच्या प्रतिकाराची दखल घेतली नाही, अशा दुर्लक्षितांच्या जाज्वल्य इतिहासाची मांडणी या दृष्टिकोनातून केली आहे.तळागाळातील दैनंदिन संघर्ष स्थानिक पातळीवरील शोषणाच्या सत्ताकेंद्रा विरोधी दैनंदिन प्रतिकार करणाऱ्या बांधावरच्या परीघावरच्या स्त्री-पुरुषांचे क्रांतिकारी डावपेच विचारव्यूह या सबाल्टर्न विचारपद्धतीने मुख्य परंपरेला विचारलेले प्रश्न या अतिशय क्लिष्ट पण महत्त्वाच्या जाणिवांच्या, विचारांचा व राजकारणाच्या पातळीवर होणाऱ्या सगळ्या घडामोडी उलगडून दाखवण्याची ताकद व निर्मळपणा या दृष्टिकोनात आहे." डॉ. गोपाळ गुरु यांनी सबाल्टर्न दृष्टिकोनाच्या मर्यादा सुद्धा अधोरेखित केल्या आहेत. त्यांच्या मते या दृष्टिकोनावर नंतरच्या काळात उत्तर संरचनावादाचा प्रभाव पडलेला दिसून येतो तसेच स्थानिक सत्ता केंद्राची व्यापक पातळीवर वावरणाऱ्या दमणाच्या प्रक्रियेशी गुंफण लक्षात घेत नाहीत असे आक्षेप

घेऊन सबाल्टर्न प्रवाहाला अनेक प्रश्न विचारतात. सबाल्टर्न स्टडीज इतिहास लेखनावर अनेक अभ्यासकांनी आक्षेप घेतलेले आहेत. सुमित सरकार, विनय भाल, विनय लाल, हिमानी बॅनर्जी इत्यादींनी आपल्या लिखाणातून सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाच्या मर्यादा दाखवून दिलेल्या आहेत. सुमित सरकार यांनी त्यांच्या पुस्तकात 'रायटिंग सोशल हिस्टरी' मध्ये 'द डिक्लाइन ऑफ द सबाल्टर्न' या लेखातून सबाल्टर्न लेखन प्रवाहाच्या मर्यादा स्पष्ट करतात. डॉ. उमेश बगाडे यांच्या मते सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने महात्मा फुले, रामस्वामी पेरियार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीकडे दुर्लक्ष केले तसेच या लेखन  प्रवाहाने नंतरच्या काळात उत्तर संरचनावाद व आधुनिकोत्तर काळातील विविध संकल्पनांचा वापर केल्यामुळे त्यांची मांडणी अधिक गुंतागुंतीची झालेली दिसून येते असे आक्षेप मांडले. सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने अनेक शोषित वंचित समूहांच्या चळवळीमधील दुवे अधोरेखित केलेले नाहीत किंवा दुर्लक्षित केलेले आहेत. रणजित गुहा, पार्थ चॅटर्जी, कांचा इलाया यांचे लिखाण जातीच्या प्रश्नाला हात घालणारे आहे पण या प्रवाहाने भारताच्या विविध भागात उदयास आलेल्या दलित चळवळीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. त्यांनीमहात्मा फुले व डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिदायी लढ्याच्या चळवळीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते .रणजीत गुहाच्या अगोदर महात्मा फुले व डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी सबाल्टर्न समूहांच्या चळवळीवर लेखन करून शोषित वंचित समूहांचे प्रश्न मांडलेले दिसून येतात .भारताच्या विविध भागात उदयास आलेल्या दलित आदिवासी शेतकरी कामगार व स्त्री वर्गाच्या चळवळीकडे विशेष लक्ष दिले नाही .सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने भारतातील ईशान्येकडील राज्याच्या आदिवासी समूहांच्या चळवळीचा पूर्णपणे विसर पडलेला दिसून येतो .त्यामुळे सबाल्टर्न इतिहास लेखनाचा मर्यादा ओळखून या समूहांच्या प्रश्नांची, समस्यांची व चळवळींची नव्याने मांडणी अनेक अभ्यासक करताना दिसतात .

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न १.सबाल्टर्न स्टडीजच्या मुख्य मर्यादा थोडक्यात स्पष्ट करा.

## ७.९ सारांश

सबाल्टर्न इतिहासलेखन प्रवाह विविध आक्षेपाला उत्तर देत, कधी कधी दुर्लक्ष करत आपले लेखन विस्तारित केले. सबाल्टर्न स्टडीज लेखन प्रवाहाच्या काही मर्यादा जरी असल्या तरी या सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने भारताच्या इतिहास लेखन शास्त्रामध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे हे नाकारता येणार नाही. नव्या युगातील संशोधकांनी याच दुर्लक्षित केलेल्या शोषित वंचित समूहांच्या चळवळी व त्यांचे अनुभव नव्या दृष्टिकोणातून अभ्यासणे गरजेचे आहे व त्या गोष्टी इतिहास लेखन शास्त्रांमध्ये मांडायचे राहून गेले आहेत त्या नव्याने मांडण्याची गरज आहे. जात, वर्ग व लिंग भावावर आधारित असलेली असमानता याचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून नव्याने अभ्यास करण्याची गरज आहे. वर्ग जात लिंगभाव व समाज यांचा आंतरसंबंध पद्धती, संरचना, अनुभव, राजकारण, प्रतिकार आणि संघर्ष हा ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडण्याची गरज आहे.

## ७.१० प्रश्न

प्रश्न १. इतिहासाची सबाल्टर्न विचार प्रणालीची चर्चा करा.

प्रश्न २. सबाल्टर्न इतिहासकारांचे इतिहासलेखनशास्त्रातील योगदान नमूद करा.

प्रश्न३. सबाल्टर्न स्टडीजच्या मुख्य संकल्पना तपशीलवार स्पष्ट करा.

प्रश्न४. सबाल्टर्न स्टडीजची उत्पत्ती आणि विकास यावर चर्चा करा.

प्रश्न५. सबाल्टर्न स्टडीजच्या इतिहासलेखनात विविध इतिहासकारांच्या योगदानाचे वर्णन करा.

प्रश्न६. सबाल्टर्न स्टडीजचे समीक्षक आणि भारतातील इतिहासलेखनात त्यांचे योगदान यांचे विश्लेषण करा.

## ७.११ संदर्भ


१. ग्रामशी, अँटिनिओ, सेलेक्शन्स फ्रॉम द प्रिझन्स नोटबुक ऑफ अँटिनिओ ग्रामशी, क्विनटीन होअर व जी. एन. स्मिथ (संपादन व अनुवादन), ओरियंट लॉन्गमन, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, १९९६

२. गायकवाड, किशोर, सबाल्टर्न इतिहास लेखन पद्धती: एक परिचय, युगांतर-अण्णाभाऊ साठे स्मृती विशेषांक, ३१ जुलै ते ६ ऑगस्ट, २००५

३. गायकवाड, आर. टी. व इतर, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, पुणे, १९९०

४. गुहा, रणजित व इतर (संपा.) सबाल्टर्न स्टडीजः रायटिंगस ऑन साऊथ एशियन हिस्टरी ॲण्ड सोसायटी, खंड १ ते १२, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली.

५. गुरू, गोपाळ, वर्चस्व आणि सामाजिक चिकित्सा, हरिती पब्लिकेशन्स, पुणे, २०१५

६. चतुर्वेदी विनायक (संपा.), मॅपिंग सबाल्टर्न स्टडीज ॲण्ड द पोस्टकलोनियल, रावत पब्लिकेशन्स, जयपुर, २०१५

७. बगाडे, उमेश, सबाल्टर्न स्टडीज व भारतीय इतिहास लेखनातील स्थित्यंतर, महेश गावस्कर (संपा.), इतिहास लेखन मीमांसा-निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड १, लोकवाङमय गृह, मुंबई, २०१०

८. भाल, विनय, रेलेवन्स आर इरेलेवन्स ऑफ सबाल्टर्न स्टडीज, डेव्हिड ल्यूडन, रिडींग सबाल्टर्न स्टडीज, ओरिएंट लॉन्गमन, दिल्ली, २००२

९. राजदेरकर, बी. एच., इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८

१०. रोझालिंड ओ' हॅनलन, रिक्वायरिंग द सब्जेक्ट - सबाल्टर्न स्टडीज अ‍ॅण्ड हिस्टरीस ऑफ रेजिस्टन्स इन कलोनियल इंडिया, मॉडर्न एशियन स्टडीज, खंड २२, क्र. १, १९८८

इतिहासाच्या उत्तर-आधुनिक दृष्टिकोनाचे आणखी एक प्रमुख सूत्र म्हणजे उच्चभ्रू संस्कृती आणि शैक्षणिक संस्कृती यांच्यातील सीमा आणि श्रेणीबद्ध भेदांचे डिकन्स्ट्रक्शन, डिमिस्टिफिकेशन आणि डीरेफरेन्शिअलायझेशन या नवीन संकल्पनांच्या द्वारे निर्मूलन करणे. उत्तर आधुनिकतावादाचा अर्थ असा आहे की अलिकडच्या दशकात पाश्चात्य समाज आधुनिकतेपासून उत्तर आधुनिक युगात मोठ्या प्रमाणात बदलला आहे. त्यामुळे प्रस्थापित भाषाप्रणाली किंवा विचारप्रणाली बदलून नवीन परीभाषेद्वारे हे स्पष्ट केले जावू शकते.

भाषेची संकल्पना आणि वास्तववादाचा नकार ही त्याची दोन प्रमुख वैशिष्ट्ये म्हणता येतील. त्यांनी असे म्हटले आहे की भाषेत किंवा प्रवचनात आपण जे प्रतिनिधित्व करतो त्यापेक्षा स्वतंत्र कोणतेही बाह्य भाषिक वास्तव नाही. ती भाषेला स्वतःला चिन्हांची एक प्रणाली मानते जी कधीही स्थिर अर्थापर्यंत पोहोचत नाही अशा अर्थाच्या अंतहीन प्रक्रियेमध्ये आंतरिकरित्या एकमेकांचा संदर्भ देते. उत्तर अधुनिकातावाद अशा प्रकारे वस्तुस्थिती आणि गोष्टींच्या स्वतंत्र जगाचा संदर्भ देण्यासाठी भाषेची किंवा प्रवचनाची क्षमता आणि मजकूराच्या अर्थाची दृढनिश्चय किंवा निर्णयक्षमता दोन्ही नाकारतो. इतिहासाच्या उत्तर-आधुनिकतावादी सिद्धांताचे प्रमुख पुरस्कर्ते आणि अभ्यासक म्हणूनजेनकिन्स असे ठामपणे सांगतात की पारंपारिक शैक्षणिक इतिहास किंवा हा फक्त बुर्जुआ विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतात. उत्तर-आधुनिकतावादी विचारसरणीचे समर्थक असे ठामपणे सांगतात की इतिहासलेखनाने राष्ट्र, वर्ग आणि धर्माभोवती उभारलेले इतिहासलेखन हे भव्य कथानक आहेत.

ऐतिहासिक संशोधन पद्धतींऐवजीउत्तर-आधुनिकतावाद्यांनी सत्य आणि वस्तुनिष्ठता यांसारख्या संकल्पनांवर त्यांचे युक्तिवाद तयार करून इतिहासकारांच्या गृहितकांवर आणि शिस्तीच्या ज्ञानशास्त्रीय पायावर प्रश्नचिन्ह उभे केले. दुसरीकडेआधुनिकइतिहासकारांनी उत्तरआधुनिक वादाचा जोराचा प्रतिकार करण्यासाठी त्यांच्या पद्धती स्पष्ट केल्या. त्यामुळे दोन्ही पक्षांनी एकमेकांना न्याय दिला नाही. पाश्चात्य इतिहासलेखनाच्या उत्तर-आधुनिक वळणाच्या त्याच्या समालोचनात,विंडशटल यांनी परंपरागत इतिहासलेखनाच्या अभ्यासावर उत्तर-आधुनिक समीक्षकांच्या हल्ल्याची रूपरेषा दिली आहे. अनुशासनाच्या उत्तर-आधुनिक समालोचनानुसार, (१) पारंपारिक इतिहासलेखन ही एक हुकूमशाही प्रथा आहे जी समकालीन पाश्चात्य समाजातील वंशकेंद्री आणि सांस्कृतिक अभिमान दर्शवते (म्हणजे गोरे, मध्यमवर्गीय, युरोपियन पुरुषांची मते आणि आवडी); (२) डावे, उजवे किंवा राजकीय दृष्ट्या यांमधील लेखक, त्रयस्थ व्यक्तीचा आवाज आणि सर्वज्ञ दृष्टिकोन गृहीत धरून वास्तवाच्या नावाखाली त्यांच्या वाचकांवर त्यांची सत्ता प्रस्थापित करतात; (३) इतिहासकार (अ) केवळ त्यांच्या काळातील विचारधारा व्यक्त करू शकतात (ब) त्यांच्या स्वत:च्या वर्ग, लिंग, नैतिकता किंवा सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या पलीकडे पाहण्याइतपत वस्तुनिष्ठ असू शकत नाहीत.

या समस्या दूर करण्यासाठी, उत्तर-आधुनिकतावादी ज्यांना सध्या त्यांचा स्वतःचा इतिहास लिहिण्याच्या संधीपासून वंचित आहे त्यांच्यासाठी आणि "विविध दृष्टिकोनातून आणि संश्लेषणाच्या प्रकारांमधून अनेक तितक्याच न्याय्य कथा सांगण्यासाठी इतिहासकारांना मोकळे करण्यासाठी" संधीदेण्यासाठी करण्यासाठी डिमिस्टिफिकेशनचा दृष्टिकोन अवलंबतो. ज्याप्रमाणे उत्तरआधुनिकतावाद्यांनी परंपरावाद्यांच्या गृहितकांवर

आणि ऐतिहासिक लेखनावर टीका केली आहे, त्याचप्रमाणे पारंपारिक इतिहासाचे अभ्यासकांनी इतिहासाच्या उत्तर-आधुनिक दृष्टिकोनावर टीका केली आहे.

विंडशटल काही अभ्यासक्रम विकासकांवर उत्तर आधुनिक प्रवचनाचे परिणाम स्पष्ट करतात. अमेरिकन हायस्कूलसाठी नवीन राष्ट्रीय इतिहास मानके तयार करणाऱ्या शिक्षणतज्ञांनी इतिहास लिहिणेइतिहासवादाच्या तत्त्वांशी सुसंगत असले पाहिजे आणि अनास्था आणि विचारधारेपेक्षा वरचे म्हणून ओळखले जावे या मताला कमी लेखले. त्यांच्या मतेभूतकाळाचे वर्णन, स्पष्टीकरण आणि व्याख्या करण्याचा असा दृष्टिकोन बौद्धिकदृष्ट्या अप्रचलित आणि राजकीयदृष्ट्या दूषित आहे. त्यांनी या युक्तिवादाचे समर्थन केले की इतिहासकारांना त्यांचे शैक्षणिक प्रशिक्षण, वृत्ती, वैचारिक स्वभाव आणि संस्कृतींपासून स्वतःला आणि त्यांच्या अभ्यासपूर्ण कार्यापासून दूर ठेवणे अशक्य आहे. गैर-राजकीय असणे अप्राप्य आहे या दाव्यावर विश्वास ठेवून, त्यांनी अमेरिकन इतिहासाच्या पारंपारिक खात्याच्या जागी भेदभाव, शोषण, शत्रुत्व आणि स्त्रिया, कृष्णवर्णीय आणि जातीय भेदभाव या संकल्पना समोर आणण्याचा प्रयत्न केला. परंतुरिपब्लिकन वर्चस्व असलेल्या यूएस सिनेटने पुढे जाऊन हा प्रयत्न नोव्हेंबर १९९४ मध्ये उच्च माध्यमिक शाळांमध्ये लागू होण्यापासून रोखला. झगोरिनच्या मतेबहुतेक उत्तर आधुनिकतावादी राजकीय सातत्याच्या डाव्या बाजूला उभे आहेत आणि त्यामुळे ते चळवळीचे समर्थक बनले आहेत. महिला आणि लिंग अभ्यास, आफ्रो-अमेरिकन अभ्यास, वांशिक अभ्यास आणि समलिंगी अभ्यासांसाठी विद्यापीठे. ते बहुसांस्कृतिकतेचे रक्षणकर्ते आणि सांस्कृतिक आणि उत्तर-औपनिवेशिक अभ्यासाचे प्रवर्तक आहेत.

आपल्याला खालील प्रश्नांची उत्तरे शोधून उत्तर आधुनिकतावादी आव्हानाशी इतिहासाचा सामना तपासण्याची गरज आहे. उत्तर-आधुनिकतावादाचा इतिहासाच्या शिस्तीवर किती प्रमाणात परिणाम झाला आहे? इतिहासकारांनी उत्तरआधुनिकतावादी कल्पना स्वीकारल्या आणि इतिहासाच्या उत्तर आधुनिक सिद्धांताचा अभ्यास केला? उत्तरआधुनिक विचार आणि टीका यांचा इतिहासलेखनाचा कधी फायदा झाला आहे का? उत्तर-आधुनिकतेच्या संदर्भात इतिहासकारांमध्ये विविध प्रकारचे मत आहेत. डॉ यिलमाझ यांनी उल्लेख केला आहे की आर. इव्हान्स सारख्या इतिहासकारांच्या अल्पसंख्याकांनी हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी किमान काही उत्तर आधुनिकतावादी युक्तिवाद स्वीकारले आहेत. बहुसंख्य इतिहासकारांनी उत्तरआधुनिकतावादी सिद्धांतांना विरोध केला आहे आणि उत्तरआधुनिकतावादाला चुकीची समजूतदार टीका म्हणून पाहिले आहे. जरी उत्तरआधुनिकतावादी आव्हानाचा ऐतिहासिक विचार आणि लेखनावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडलातरीही जुन्या संकल्पना आणि पद्धतींते नष्ट करू शकले नाही.डॉ यिलमाझ यांनी उल्लेख केला आहे की आर. इव्हान्स सारख्या इतिहासकारांच्या अल्पसंख्याकांनी हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी किमानपक्षी काही उत्तर आधुनिकतावादी युक्तिवाद स्वीकारले आहेत. बहुसंख्य इतिहासकारांनी उत्तरआधुनिकतावादी सिद्धांतांना विरोध केला आहे आणि उत्तरआधुनिकतावादाला चुकीची टीका म्हणून पाहिले आहेजरी उत्तरआधुनिकतावादी आव्हानाचा ऐतिहासिक विचार आणि लेखनावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडला, तरीही जुन्या संकल्पना आणि पद्धतींसह ते सातत्य नष्ट करू शकले नाही.

उत्तर आधुनिकता ही आता व्यावसायिक इतिहासकारांमध्ये एक विशिष्ट अल्पसंख्याक गात मानली जातो, ज्यांपैकी बहुतेकजण इतिहासाबद्दलचा त्याचा दृष्टिकोन बदलण्यास तयार नाहीत. कारण त्यांना त्यातील सिद्धांत त्यांच्या आकलनाच्या आणि ऐतिहासिक चौकशीच्या अनुभवाच्या विरुद्ध वाटतात. उत्तर-आधुनिकतावादाने स्पष्टीकरणव्याख्या आणि ज्ञानरचनावादाच्या समस्यांबद्दल चर्चा केली आहे. वर्णनाच्या मर्यादा इतक्या स्पष्टपणे उघड केल्याबद्दल काही उत्तर आधुनिकतावाद्यांना श्रेय देतात. इव्हान्स यांनी साक्ष दिली की १९७० आणि १९८० च्या दशकातील ऐतिहासिक लेखनाचे वैशिष्ट्य असलेल्या आर्थिक निश्चयवादाचा नाश करण्यात उत्तरआधुनिकतावादी महत्त्वपूर्ण होते.

**तुमची प्रगती तपासा:**

१) उत्तर आधुनिकतावादाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा

२) इतिहासासमोरील उत्तर आधुनिकतावादाचे आव्हान तपासा

## ९.५ उत्तर आधुनिक इतिहासलेखनाच्या प्रमुख संकल्पना

सर्वप्रथम उत्तर आधुनिकता म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. उत्तर-आधुनिकतावादाची अनेक रूपे आहेतपरंतु सर्वसाधारणपणेवस्तुनिष्ठ सत्य अस्तित्त्वात नाही आणि कोणत्याही वस्तुनिष्ठ अर्थाने वास्तव समजून घेणे मोठ्या प्रमाणात अशक्य आहे. तर उत्तर आधुनिक इतिहासलेखनाची मध्यवर्ती मते काय आहेत ते पाहूया. इतिहासलेखन म्हणजे इतिहासाचा अर्थ कसा लावला जातो याचा अभ्यास. उत्तर-आधुनिकतावादाचेमूळ मत असा आहे की भूतकाळात नेमके काय घडले हे जाणून घेणे अशक्य आहे. उत्तर-आधुनिक इतिहासकार विशेषत: अनेक सत्ये अस्तित्त्वात असल्याचे प्रतिपादन करतात आणि ते शिस्तीच्या व्यक्तिनिष्ठ स्वरूपावर जोर देतात.उदाहरणार्थअमेरिकन क्रांती घ्या. उत्तरआधुनिक इतिहासकारांच्या मतेप्रजासत्ताकवादामुळे त्याची सुरुवात झाली असावी. पण हे वर्ग संघर्षामुळे किंवा अंतर्निहित धार्मिक आवेशामुळे किंवा इतर अनेक कारणांमुळे सुरू झाले असावे. हे निश्चितपणे जाणून घेणे खूपच अशक्य आहे. सुलीवियानम्हणतात की आधुनिकोत्तर इतिहासलेखन रचनावाद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुसऱ्या इतिहासशास्त्रीय दृष्टिकोनाशी जवळून संबंधित आहे किंवा अनेकदा संरेखित आहे. संरचनावाद हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो की इतिहास हा अब्राहम लिंकनच्या मुक्ती घोषणेसारख्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या गंभीरनिर्णायक कृतींमुळे उलगडत नाहीतर व्यापक, अत्याधिक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हालचाली किंवा संरचनांमुळे घडतो. ॲडॉल्फ हिटलर सत्तेवर आला कारण तो वैयक्तिकरित्या करिश्माई होता म्हणून नव्हे तर जर्मन लोकांमधील सामाजिक वातावरण अशा नेत्यासाठी योग्य होते म्हणून.

## १०.६ सारांश

पोस्टमॉडर्निझम (उत्तर आधुनिकतावाद)ही एक व्यापक चळवळ आहे. २०व्या शतकाच्या मध्यापासून ते उत्तरार्धात इतिहास, तत्त्वज्ञान, कला आणि वास्तुकला यांमध्ये विकसित झाली आणि आधुनिकतावादापासून दूर जाण्याचे चिन्हांकित केले. आधुनिकता आणि या काळातील प्रवृत्तींचे अनुसरण करणाऱ्या ऐतिहासिक युगाचे वर्णन करण्यासाठी हा शब्द सामान्यतः लागू केला जातो. पोस्टमॉडर्न विचारवंत वारंवार ज्ञानाचे दावे आणि मूल्य

प्रणालींचे सामाजिक-कंडिशन म्हणून वर्णन करतात. ते त्यांना राजकीय, ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक प्रवचन आणि पदानुक्रमांचे उत्पादन मानतात. हे विचारवंत सहसा वैयक्तिक आणि आध्यात्मिक गरजा सामाजिक परिस्थिती सुधारून आणि अधिक प्रवाही प्रवचनांचा अवलंब करून उत्तम प्रकारे पूर्ण केल्या जातात असे मानतात, आधुनिकतावादाच्या विरूद्ध, जो जास्तीत जास्त प्रगती करण्यावर उच्च प्रमाणात भर देतो आणि जे सर्वसाधारणपणे वस्तुनिष्ठ सत्यांच्या प्रचाराला आदर्श स्वरूप मानतात. १९८० आणि १९९० च्या दशकात पोस्टमॉडर्न दृष्टिकोनांना लोकप्रियता मिळाली आणि इतिहास, सांस्कृतिक अभ्यास, विज्ञान, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र, स्थापत्य, स्त्रीवादी सिद्धांत आणि साहित्यिक टीका यासह विविध शैक्षणिक आणि सैद्धांतिक विषयांमध्ये ते स्वीकारले गेले.

## १०.७ प्रश्न

१) तुम्ही अभ्यासलेल्या मार्क्सवादी नंतरच्या संकल्पना आणि दृष्टिकोनांचे परीक्षण करा.

२) उत्तर आधुनिकता आणि इतिहास यांच्यातील संबंधांची चर्चा करा.

## १०.८ संदर्भ

१) काया यिलमाझ, पोस्टमोडर्निष्ट ॲप्रोच टू द डिसिप्लीन ऑफ हिष्ट्री, कोकाली युनिव्हर्सिटी सोसियाल बिलिमलर एन्स्टिट्यूस डर्गीसी (१४) २००७.

२) जेनकिन्स, के. (१९९१), री-थिंकिंग हिस्ट्री, रूटलेज: लंडन.

३) विंडशटल, के. (२००२), अक्रिटिक ऑफ पोस्टमॉडर्न टर्न,इन प्र. एडवर्ड वांग, आणि जी. इगर्स (एडी.), रोश्तर प्रेस, नेवयोर्क

४) झागोरीन, (१९९७), हिस्टोरिओग्राफि अंड पोस्टमोडर्निझम, रूटलेज

५) त्रोल्टेश अर्नेष्ट (१९२३) , क्रिश्चनथॉट, लंडन युनिवर्सिटी,

❖❖❖❖

# ११

## पौर्वात्यवादी इतिहासलेखन

**घटक रचना :**

११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ पौर्वात्यवादी इतिहासलेखन

११.३ पौर्वात्यवादाची पार्श्वभूमी

११.४ पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्टे

११.५ पौर्वात्यवादी इतिहासलेखन करणारे इतिहासकार

११.६ सारांश/मूल्यमापन

११.७ प्रश्न

११.८ संदर्भ

### ११.० उद्दिष्टे

- पौर्वात्यवादी इतिहासलेखनाचा आढावा घेणे.
- पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्टे अभ्यासणे.
- पौर्वात्यवादी इतिहासलेखन करणाऱ्या इतिहासकारांचा अभ्यास करणे.

### ११ .१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून भारतात विविध साहित्याची रचना झाली. काही प्रमाणात हे साहित्य जरी धार्मिक असले तरी त्यामधून आपल्याला प्राचीन इतिहासाची माहिती मिळते. इतिहास - पुराण, फारसी इतिहासलेखन परंपरा, अखबारात तसेच बखर लेखन परंपरा ह्या भारतात अस्तित्वात होत्या. आधुनिक भारतात इतिहासलेखनाची सुरवात व विकास हा विविध इतिहासकारांच्या विविध वैचारिकदृष्टिकोनातून झाला. इतिहासकारांचा बघण्याचा व वाचण्याचा दृष्टिकोन हा त्याच्या इतिहासविषयक आकलनावर प्रभाव टाकत असतो. त्यामुळेच ऐतिहासिक घटनांची कारणमीमांसा करतांना इतिहासकारांचा ऐतिहासिक दृष्टिकोन अतिशय महत्वाचा ठरतो.

आधुनिक भारताचा अभ्यास करतांना स्थूलमानाने तीन मुख्य परंपरा किंव्हा प्रवाह दिसून येतात. यामध्ये वासाहतिक इतिहासलेखन परंपरा, राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा व मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरा यांचा समावेश होतो.वसाहतिक इतिहासलेखनात

पौर्वात्यवादी इतिहासलेखन, साम्राज्यवादी इतिहासलेखन व केंब्रिज इतिहासलेखनाची समावेश होतो.

## ११ .२ पौर्वात्यवादी इतिहासलेखन

Orientalismया शब्दाला प्राच्यविचारवाद किंव्हा पौर्वात्यवाद हा पर्यायी शब्द वापरला जातो. Orient म्हणजे 'पूर्वेकडील जग' पूर्वेकडील किंव्हा पौर्वात्य जागविषयीचा विचार अथवा दृष्टिकोन असे पौर्वत्यवादाचे स्पष्टीकरण करता येईल. प्राचीन काळापासून पौर्वत्य जगाविषयीम्हणजेच पूर्वेकडील प्रदेशाबद्दल पाश्चिमात्य जगात कमालीचे कुतूहल किंव्हा आकर्षण होते. मध्ययुगात अरबांनी चालवलेला व्यापार हा पाश्च्यात व पौर्वत्य जगाला जोडणारा दुवा ठरला. पुढे धर्मयुद्धाच्या कालावधीत पाश्च्यात जगाला पौर्वत्य जगाची अधिक माहिती झाली. आशियात प्रवासकरून येणाऱ्या मार्को पोलो सारख्या पाश्च्यात प्रवाशांचे प्रवास वर्णने खिस्त्री मिशनरी यांच्याकडून युरोपात पूर्वेकडील देशांबद्दल थोडी फार माहिती मिळत असे. पुढे या प्रदेशात व्यापारासाठी आलेल्या पाश्च्यात व्यापाऱ्यांना या प्रदेशाची भौगोलिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक गोष्टींची माहिती करून घेण्याची आवश्यक्यता वाटू लागली. यामधूनच पौर्वात्यवादाचा किंव्हा पौर्वात्यविद्या अभ्यासाचा उगम झाला. पौर्वात्यवादाची संकल्पना कशी उदयास आली आणि त्यामध्ये काय अपेक्षित आहे, याचे चिकित्सक स्पष्टीकरण डॉ. एडवर्ड सैद यांनी आपल्या 'Orientation' ग्रंथात केले 'Orientation can be discussed and analysed as the corporate institution for dealing with the orient ' अशी ते ओरिएंटलीझमची व्याख्या करतात. ( कोठेकर शांता, इतिहास : तंत्र व तत्वज्ञान, पृ. क्र. १८८)

अठराव्या शतकाच्या मध्यावर भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापन झाल्यानंतर भारताविषयी निर्माण झालेल्या कुतूहलाने व जिज्ञेसेने प्रेरित झालेल्या विद्वानांनी प्राचीन भारताच्या इतिहासाच्या व संस्कृतीच्या संशोधनाचा नवीन प्रवाह सुरु केला. व यातूनच Indology हि विचारधारा उदयास आली.

**आपली प्रगती तपासा.**

१) पौर्वात्यवादी इतिहासलेखन हि संकल्पना स्पष्ट करा?

## ११ .३ पौर्वात्यवादाची पार्श्वभूमी

पोर्वात्यवादी दृष्टिकोनातून भारताबाबतचा विचार व अभ्यास अठराव्या शतकात सुरु झाला. प्राचीन भारतात मोठ्या प्रमाणावर वांङ्मय निर्मिती झालेली होती. परंतु प्राचीन भारताचा सर्वांगीण परिचय करून देणारे इतिहासग्रंथ मात्र उपलब्ध नव्हते. सुरवातीच्या काळात धर्मप्रसारासाठी आलेल्या ख्रिश्चन मिशनरी व व्यापारासाठी आलेले व्यापारी यांना भारताच्या ज्ञानाची आवश्यक्यता भासायची. प्राचीन भारतीय संस्कृतीचा शोध घेण्याचा प्रारंभिक प्रयत्न हा श्रीरामपूर येथील ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केला. कुठल्याही प्रदेशातील लोकांविषयी जर जाणून घेयाचे असेल तर त्यांच्या भाषेचे ज्ञान असणे आवश्यक्य असते. भारतातील प्राचीन साहित्य हे संस्कृत भाषेत रचले गेले असल्यामुळे त्या ग्रंथांचा अभ्यास तसेच त्यांचे

भाषांतर करण्यासाठी पौर्वात्यवादी विद्वानांनी संस्कृतचा अभ्यास केला. धर्माचा प्रचार करण्यासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान आवश्यक्य होते. म्हणूनच श्रीरामपूर येथील ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतातील स्थानिक भाषेचा अभ्यास केला. व पुढे अठराव्या शतकात बंगालमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाल्यानंतर प्राचीन भारताच्या अभ्यासाला चालना मिळाली.

**आपली प्रगती तपासा.**

१) पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची पृष्ठभूमी सांगा?

## ११ .४ पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्टे

भारतात ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाल्यानंतर भारताच्या इतिहासाचे ज्ञान कंपनीच्या अधिकाऱ्यांना आवश्यक्य वाटले. यामधूनच ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी भारताच्या इतिहासाचे अध्ययन करण्यास सुरवात केली व आधुनिक भारतीय इतिहासलेखनाची सुरवात अठराव्या शतकाच्या उत्तार्धारतात झाली. प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृती बद्दल जिज्ञासा आणि आकर्षण असलेला पौर्वात्यवादी इतिहासलेखन हा आधुनिक भारतीय इतिहासलेखनाचा पहिला प्रवाह आहे. पौर्वात्यवादी विद्वानांनी भारताविषयी चिकित्सक अभ्यास करून गतकाळाच्या इतिहासाची पुर्रचना करणे हे आपले उद्दिष्टे ठेवले.

१) धर्मप्रसार हा प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यामागे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे महत्वाचे उद्दिष्ट्ये होते. प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृतीचा शोध घेण्याचा प्रारंभिक प्रयत्न हा ख्रिस्ती मिशाऱ्यानीच केला. यासाठी त्यांनी संस्कृत भाषा व धर्मग्रंथ यांचा अभ्यास केला. तसेच अनेक हिंदू धर्म ग्रंथाचे इंग्रजी भाषेत अनुवाद हि केले. या सर्व प्रयत्नांमुळे प्राचीन भारतीय विद्येच्या अभ्यासाला सुरवात झाली.

२) ज्या देशात राज्य करायचे आहे, तेथील इतिहास, संस्कृती, धर्म, लोकजीवन याविषयी निर्माण झालेल्या जिज्ञेसे मधून प्राचीन भारताचा शोध घेण्यासाठी इतिहास संशोधन व लेखनाचे उद्दिष्टे समोर ठेवण्यात आले.

३) भारतीय समजावर राज्य करण्यासाठी येथील समाजव्यवस्था, रूढी, नीतिमूल्ये, साहित्य, शासन पद्धती याचे ज्ञान असल्यास येथे नवीन कायदे करणे सोपे होईल, तसेच कंपनीला स्थानिक लोकांचा विरोध होणार नाही. तसेच प्रतिष्ठित वर्गाचा विश्वास संपादन होऊन त्यांच्याशी संपर्क कायम राहील. हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून इंग्रजांनी शासन सुरळीत चालवण्यासाठी भारताचा इतिहास व संस्कृतीचा अभ्यास केला.

४) इंग्रज अधिकारी व विद्वानांना राज्य चालवण्यासाठी, प्रशासनासाठी स्थानिक लोकांवर अवलंवून राहावे लागे. म्हणून भारतीय भाषेचे विशेष करून संस्कृत व फारशी भाषेचे अध्ययन व भारतीय सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेचा अभ्यास हा अनिर्वाय होता. हि भूमिका भारताच्या इतिहासाच्या अभ्यासाला पूरक ठरली.

५) पाश्च्यात विचारवंत, अधिकारी, विद्वान यांचा भारतीय लोकांशी संपर्क आल्यानंतर त्यांनी प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीची ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला. या संस्कृतीचा अभ्यास करतांना ते प्रभावित झाले. त्यामुळेच शास्त्रीय पद्धतीने या संस्कृतीच्या इतिहास लेखांची गरज त्यांना भासली व ते उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून ते प्राचीन भारताचा अभ्यास करू लागले. या सर्व अभ्यासकांना 'ओरियंटलिस्ट' म्हणून ओळखले गेले.

**आपली प्रगती तपासा.**

१) पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्टे सांगा?

## ११.५ पौर्वात्यवादी इतिहासलेखन करणारे इतिहासकार

पौर्वात्यवादी इतिहासलेखन साधारणपणे इ.स. १७७० पासून सक्रिय झाल्याचे दिसून येते. या काळात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी संस्कृत व फारशी भाषेचा अभ्यास सुरु केला. यासाठी वॉरेन हेस्टिंग्ज याने १७८१ मध्ये कलकत्ता मदरसा तर जॉननाथ डंकन याने १७९१ मध्ये संस्कृत महाविद्यालय सुरु केले. तसेच लंडन येथील रॉयल एशियाटिक सोसाटीच्या धर्तीवर 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल'ची स्थापना केली. पौर्वात्यवादी इतिहासलेखनाचा अभ्यास करणारे इतिहासलेखक पुढील प्रामणे होते :

**१) सर विल्यम जोन्स :**

प्राचीन भारतीय संस्कृतीच्या पुनरुजीवनाचे खंदे पुरस्कर्ते आणि भारतातील प्राच्यविद्येचे जनक असल्याचा मान सर विल्यम जोन्स यांचा आहे. इ. स. १७८३ मध्ये कलकत्ताच्या न्यायालयाचे पहिले न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यांनी कालिदासाचे शाकुन्तलम, जयदेव कवीचे गीत गोविंद, आणि मनुस्मृती या ग्रंथाचा हा अनुवाद लिहला.

प्राचीन भारतीय इतिहासाचा अभ्यास व रचना करण्यास संस्कृत भाषेचा अभ्यास करणे अगत्याचे आहे असे प्रामाणिक मत विल्यम जोन्स यांनी मांडले. भारतीय संस्कृती हि संपन्नशील आहे, मात्र तिची सलग माहिती उपलब्ध नसल्याने प्राचीन साहित्याच्या अध्ययनातून ती उभी करावी लागेल असे जोन्स यांचे मत होते. विल्यम जोन्स यांनी संस्कृत, फारशी आणि प्राचीन युरोपियन भाषेंचा अभ्यास करून त्यामधील सदृश्य दाखवून दिले व त्याआधारे या सर्व भाषांचे प्राचीनकाळी एकाच उगमस्थान असावे असा सिद्धांत मांडला. याला 'जोन्सचा समान भाषा जननी सिद्धांत' म्हणतात.विल्यम जोन्स यांनी ग्रीक इतिहास आणि प्राचीन भारतीय वाङमय यांचा तौलनिक अभ्यास करून चंद्रगुप्त मौर्य यांचा काळ इ.स. पूर्व ३२५ निश्चित केला. त्यामुळे भारतीय इतिहासाची कालनिश्चिता करणे सोपे झाले.

**२) जेम्स प्रिन्सेप्स :**

जेम्स प्रिन्सेप्स हा ईस्ट इंडिया कंपनीच्या टाकसाळीत अधिकारी म्हणून नियुक्त होता. जेम्स प्रिन्सेप्स याने प्राचीन ब्राह्मि लिपीतील अक्षरांचा अर्थ लावण्याचा यशस्वी प्रयन्त केला. ज्यामुळे अशोक व बौद्ध काळातील माहिती मिळाली. प्रिन्सेप्स याने स्तंभ, शीला व

भिंतीवरील कोरलेले लेख गोळा करून त्याचा अर्थ लावून प्राचीन भारतीय इतिहासावर लेखन केले. त्याने ब्राह्मी व खरोष्टी लिपीचे वाचन केले तसेच अलाहाबाद, दिल्ली, गिरनार इ. ठिकाणच्या शिलालेखांचे वाचन करून गुप्त राजा समुद्रगुप्त याविषयी महत्वाची माहिती गोळा केली.

### ३) हेनरी कोलब्रुक :

पौर्वात्यवादी व प्राचीन भारतीय वाङमयाचा प्रशंसक म्हणून कोलब्रुकला ओळखले जाते. तो संस्कृतचा गाढा अभ्यासक होता व हिंदू संस्कृती तत्वज्ञानाने तो प्रभावित झाला होता. त्याने विज्ञानेश्वराचे मिताक्षर आणि जीमूत वहनाच्या 'दायभाग' या हिंदू कायदेविषयक ग्रंथाचे इंग्रजी मध्ये भाषांतर केले. वेदांचा अभ्यास करून त्याने वेदकालीन समाजाचे वर्णन केले. त्याने जैन व बौद्ध धर्मावरस्वतंत्र ग्रंथ लिहले. व प्राचीन भारताच्या इतिहासातील महत्वाच्या घटनांचा कालानुक्रम निश्चित करण्याचा प्रयत्न केला. Lilavati, Beejganeet, Digest of Hindu Law, Hindu Philosophy हे त्याचे काही महत्वाचे ग्रंथ होते. कोलब्रुक यांच्या संस्कृत भाषेच्या गाढ्या अभ्यासामुळे त्यांना 'संस्कृतचा युरोपमधील पहिला महान विद्वान' म्हणून ओळखले जाते.

### ४) विलिअम रॉबर्टसन :

विलिअम रॉबर्टसन हा सर विलिअम जोन्सचा समकालीन ब्रिटिश विद्वान होता. त्याने भारतीय संस्कृतीचे मोठेपणा मान्य करून हि संस्कृती पुराणमतावादी असल्याचे म्हटले. भारतीय संस्कृती हि उच्च दर्जाची असून तिचे जतन व जोपासना करणे आवश्यक्य आहे असा सल्ला त्यांनी इंग्रज शासकांना दिला. त्याने भारतीय संस्कृती व ग्रीक संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास करून भारतीय संस्कृती हि श्रेष्ठ आहे असे मत मांडले. रॉबर्टसन याने भगवदगीता व शाकुंतल या ग्रंथाचा इंग्रजी मध्ये अनुवाद केला.

### ५) होरेस विल्सन :

१८०८ मध्ये भारतात आलेला होरेस विल्सन हा व्यवसायाने डॉक्टर होता. विलिअम जोन्स पासून त्याने प्रेरणा घेऊन त्याने प्राचीन संस्कृत वाङमयाचा अभ्यास केला. त्याने मेघदूताचा इंग्रजीमध्ये अनुवाद केला. कल्हणच्या राजतरांगणी वर भाष्य करत काश्मीरच्या इतिहासाचा कालानुक्रम निश्चित केला, विष्णू पुराणावर संशोधन केले, भारतीय नाणकशास्त्रावर संशोधनपर लेख लिहले. त्याचे सर्वात महत्वाचे योगदान इंग्रजी - संस्कृत शब्दकोशाची निर्मिती होय. जेम्स मिलने लिहलेल्या भारतीय इतिहासातील खोडसाळ व पक्षपाती विधानांवर त्याने आक्षेप घेतला.

### ६) अलेक्सान्डर कनिंगहॅम :

पुरातत्त्वाच्या साहाय्याने भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणाऱ्या श्रेष्ठ संशोधकात कनिंगहॅमचे योगदान मोठे आहे. कनिंगहॅम यांनी सारनाथ, संकसा आणि सांची येथे पुरातत्वीय उत्खनन केले. पुरातात्विय अवशेषांच्या आधारावर बौद्ध धर्माचा इतिहास त्यांनी आपल्या 'The Bhilsa Topes' या ग्रंथातून मांडला. तसेच त्यांनी प्राचीन भारतातील

ऐतिहासिक स्थळांची भौगोलिक माहिती देणारा ग्रंथ 'Ancient Geography of India' प्रकाशित केला. तक्षशिला, श्रावस्ती, कोशंबी, वैशाली आणि नालंदा इ. प्राचीन स्थळांचे स्थान निश्चित करण्याचे श्रेय कनिंगहॅम यांना जाते. कनिंगहॅम यांच्या पुरातत्वीय संशोधन ज्ञानामुळे Archaeological survey of India या संस्थेचे पहिले संचालक म्हणून त्यांची १७८१ मध्ये नियुक्ती झाली. Coins of Ashoka, Inscriptions of Ashoka, Stupa of Barhut हे त्यांचे प्रसिद्ध लिखाण होय.

**७) फेड्रिच मॅक्समुल्लर :**

मॅक्समुल्लर हे ऑक्सफर्ड विद्यपीठात तौलनिक तत्वज्ञानाचे अध्यापक होते. संस्कृतचे त्यांना चांगले ज्ञान होते त्यांनी पौर्वात्य जगाचा तौलनिक अभ्यास केला. पूर्वेकडील सुमारे ५० धार्मिक ग्रंथांचा त्याने इंगजीत अनुवाद केला जो The Sacred Books of the East या नावाने प्रसिद्ध आहे. आर्य हे बाहेरून भारतात आले हा सिद्धांत त्यांनी उचलून धरला. त्यांची प्रेरणा घेऊन अनेक जर्मन अभ्यासक प्राचीन भारतीय विद्येच्या अभ्यासाकडे वळाले.

**आपली प्रगती तपासा.**

१) पौर्वत्यवादी इतिहासाचे लेखन करणाऱ्या इतिहासकारांचा आढावा घ्या ?

## ११ .६ सारांश/ मूल्यमापन

पौर्वात्य जगाविषयीच्या आकर्षणाने आणि कुतुहलामुळे प्रेरित विद्वानांच्या संशोधनामुळे बऱ्याच प्रमाणात अज्ञात असलेल्या भारतीय इतिहासाचा आणि संस्कृतीच्या अभ्यासाला गती मिळाली. लंडन येथील रॉयल सोसायटीच्या धर्तीवर भारतात संशोधन संस्था सुरु करून शास्त्रीय संशोधनाला संस्थात्मक आधार दिला. प्राचीन भारतीय साहित्याचे इंगजीमध्ये भाषांतर झाल्याने युरोपियन जगाला भारताचा नव्याने परिचय झाला. पौर्वत्यवादी इतिहासाच्या संशोधनामुळे ब्राह्मी, खरोष्टी यासारख्या लिपींचा उलगडा होऊन प्राचीन भारताच्या इतिहासात नवे द्वार उघडे झाले. तसेच या अभ्यासकांनी कालगणनेचे शास्त्र विकसित केल्याने ऐतिहासिक घटनांची मांडणी करणे शक्य झाले. पुरातत्वीय शोधांमुळे प्राचीन इमारती, स्तूप, गुहाशिल्प, चित्रकला यामधील प्राचीन इतिहासाची संपन्नता जगापुढे आली. पौर्वत्यवादी इतिहासाच्या संशोधनामुळे भारतीय अभ्यासकांना आपला इतिहास, साहित्य, संस्कृती यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे अनेक भारतीय संशोधक प्राच्यविद्या अध्ययनाकडे वळाले.

पौर्वत्यवादी इतिहासलेखनाचे जसे काही लाभदायक गोष्टी होत्या तश्याच काही नकारात्मक गोष्टी देखील घडून आल्या. उदा. वैदिक संस्कृती हि आर्यांची संस्कृती आहे व आर्य लोक बाहेरून भारतात आले हा सिद्धांत, ओरिस्टोटल वर भारताचा प्रभाव होता, न्यूटनच्या सिद्धांताची बीजे वैदिक साहित्यात आढळतात अशी विधाने करण्यात आली परंतु हे सिद्ध करण्यासाठी भक्कम पुरावे दिले गेले नाही.

## ११ .७ प्रश्न

१) पौर्वात्यवादी इतिहासलेखन म्हणजे काय हे सांगून त्याची उद्दिष्टे स्पष्ट करा ?

२) पौर्वात्यवादी इतिहासलेखनची पार्श्वभूमी सांगून पौर्वात्यवादी इतिहासकारांचा आढावा घ्या?

## ११.८ संदर्भ


१) देव प्रभाकर, इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नाशिक, २००७

२) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

३) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर, औरंगाबाद, २०११

४) वाम्बूरकर जास्वंदी (संपादक), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४

५) इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड १, लोकवाङ्मय गृह, २०१०

६) सरदेसाई बी. एन, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

७) इतिहास लेखनपरंपरा (स्टडी मटेरियल) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8) Sreedharan E, A Textbook of Histography, 500 BC to A.D. 2000, Orient Blackswan, 2004

9) Shaikhali B, History: Its Theory and Methods, Macmillam, 1978


❖❖❖❖

# १२

## साम्राज्यवादी इतिहासलेखन

**घटक रचना**

१२.० उद्दिष्टे

१२.१ प्रस्तावना

१२.२ साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे उद्दिष्टे

१२.३ साम्रज्यावादी इतिहासलेखनातील विविध प्रवाह

१२.४ साम्रज्यावादी दृष्टिकोतून लिखाण करणारे इतिहासकार

१२.५ साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे वैशिष्ट्ये व परिणाम

१२.६ प्रश्न

१२.७ संदर्भ

### १२.० उद्दिष्टे

- साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा अभ्यास करणे.
- साम्रज्यावादी इतिहासलेखनातील विविध प्रवाह अभ्यासणे.
- साम्रज्यावादी इतिहासकारांचा आढावा घेणे.

### १२.१ प्रस्तावना

१८ - १९ व्या शतकात युरोपियन राजवटी आशियात स्थिर झाल्यानंतर साम्राज्यवादी दृष्टिकोनातून इतिहासाचा अभ्यास सुरु झाला. अठराव्या शतकाच्या अखेरीस भारताच्या बहुतांश भागात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता भारतात स्थापन झाल्यामुळे इतिहासलेखनाचा पौरात्यवादी दृष्टिकोन मागे पडला व ब्रिटिश हितसंबधांना पूरक इतिहास लेखनाची गरज ब्रिटिश राज्यकर्त्यांना वाटू लागली, यामधूनच भारतात साम्राज्यवादी इतिहास लेखन परंपरा निर्माण झाली. शस्त्राच्या बळावर भारतात दीर्घकालीन सत्ता टिकून ठेवणे अवघड आहे याची जाणीव ब्रिटिशांना असल्याने भारतावरील इंग्रजांच्या सत्तेला तार्किक आधार देणे त्यांना गरजेचे वाटले. यामधूनच इंग्रजांना भारतीयांच्या तुलनेने श्रेष्ठ ठरवत भारतीयांवर सत्ता गाजवण्याचा नैतिक अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले व साम्राज्यवादाचे समर्थन केले. याव्यतिरिक्त संपूर्ण भारतावर राजकीय नियंत्रण मिळवण्यासाठी बुद्धिवंत, इतिहास अभ्यासक, प्रशासकांनी इतिहासलेखनाच्या माध्यमातून तात्विक आधार निर्माण केला व साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा पाया मजबूत केला.

## १२.२ साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे उद्दिष्टे

जेरोमी बेंन्थेमचा उपयुक्तवाद, इव्हेंजेलिकल्स अर्थात शुभवर्तमानवादी ख्रिस्ती धर्मसंप्रदायाचा प्रभाव, चार्ल्स डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांतावर आधारित सामाजिक डार्विनवाद आणि गौरवर्णीयांच्या श्रेष्ठत्वाच्या वंशवादी सिद्धांत अशा विविध वैचारिक दृष्टिकोनामधून इंग्रजांच्या भारतावरील सत्तेला तात्विक आकार आला. साम्रज्यवादाचा हा तात्विक आधार पाच गृहीतकांवर आधारित होता.

१) भारतीय संस्कृती, समाज हा मागासलेला, अप्रगत व हीन दर्जाचा आहे हे दाखवणे.

२) बौद्धिक, शास्त्रीय व भौतिक प्रगतीमुळे ब्रिटिशांचे शासनहे प्रगत आहे हे दाखवणे.

३) भारतीय लोकांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण करणे.

४) भारतीय समाज हा दुबळा व मागासलेला असल्याने तो स्वशासनास लायक नाही असे दर्शवणे.

५) ब्रिटिश शासन भारतात कायमस्वरूपी राहिली पाहिजे यासाठी सर्व ते प्रयन्त करणे.

अशा प्रकारच्या गृहीतकांच्या आधारे भारतीयांना इंगजांच्या तुलनेने कनिष्ठ ठरवून, इंगजांच्या श्रेष्ठत्वाच्या आधारावर त्यांच्या भारतावरील सत्तेला नैतिक अधिष्ठान देण्याचे कार्य साम्रज्यावादी इतिहासलेखकांनी केले.

**आपली प्रगती तपासा.**

१) साम्राज्यवादी इतिहासलेखाचे उद्दिष्टे सांगा ?

## १२.३ साम्रज्यावादी इतिहासलेखनातील विविध प्रवाह

अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीचीसत्ता भारतात दृढमल झालेली होती. १८५७ चा उठाव दडपून टाकल्यानंतर हा साम्रज्यवाद आणखीनच कट्टर झाला. ब्रिटिशांनी वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या साम्रज्यावादी दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाचे लिखाण केले, ते पुढीलप्रमाणे :

१) पहिला प्रवाह हा जेम्स मिल व त्याच्या उपयुक्तवादी धोरणांचा पुरस्कार करण्याऱ्या इतिहास लेखकांचा होता. भारतीय समाज पूर्णपणे बदलायचा झाल्यास त्यावर 'उपकारक' हुकूमशाही शासनाची गरज आहे. त्यासाठी कायदा व भक्कम प्रशासन हेच योग्य मार्ग आहे, असे या प्रवाहाचे मत होते.

२) दुसरा प्रवाह हा भारतीयांच्या बद्दल अनुकूल दृष्टिकोन ठेवून लिखाण करणाऱ्या इतिहासकारांचा होता. यामध्ये सर विल्यम जोन्स, लॉर्ड कनिगहॅम, टॉमस मुनरो, माल्कम व माऊंट स्तुवर्ट एल्फिन्स्टन यांचा होता. या सर्व इतिहासकारांना भारतीय समाजरचना, संस्कृती, भारतीय जीवन पद्धती याविषयी आदरयुक्त सहानभूती होती. यामुळे ते याच दृष्टिकोनातून परिवर्तन करण्याचा आग्रह करीत.

३) सर जॉन शोअर व ग्रँड डफ यासारखे इतिहास लेखक धर्म चळवळी अथवा मिशनरी दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाचे लेखन करतात. हे प्रशासकीय अधिकारी शिक्षण व धर्मप्रसाराच्या माध्यमातून प्रशासनाकडे पाहतात. त्यांना ब्रिटिशांची सत्ता हि ईश्वरी संकेत व परमेश्वराची इच्छा वाटते. त्यामुळे त्यांना भारतीयांच्या परिवर्तनासाठी धर्मांतर हा एकाच मार्ग दिसतो.

४) चोथा प्रवाह हा आल्फ्रेड लॉयल, हेनरी मेन व विल्यम हंटर यासारखे विद्वान पूर्व व पश्चिम विचारसरणीचा सयोंग भारतात पाहतात. त्याच भूमिकेतून त्यांनी भारतातील आचार - विचार, संस्थांचा मोठ्या आत्मीयतेने अभ्यास केला.

५) आधुनिक पद्धतीने व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्या विद्वानांचा गट हा पाचव्या प्रवाहा मध्ये मोडतो. यामध्ये पी. ई. रॉबर्ट्स, पर्सीव्हल स्पियर, सी. एच. फिलिप्स, हॉल्डेन फार्बर, बॉल हाचेत व इतर राँके पद्धतीने साधनसामुग्रीचा सखोल तपासणी करून त्यावर आधारित वस्तुनिष्ठ इतिहास लेखनाचा आग्रह करतात.

**आपली प्रगती तपासा.**

१) साम्राज्यवादी इतिहासलेखनातील विविध प्रवाहांचा आढावा घ्या ?

## १२.४ साम्रज्यावादी दृष्टिकोतून लिखाण करणारे इतिहासकार

साम्राज्यवादीदृष्टिकोनातून लिखाण करणाऱ्या इतिहासकारांमध्ये खालील इतिहासकारांचा समावेश होता.

### १) जेम्स मिल

जेम्स मिल हा साम्राज्यवादी इतिहास लेखनाचा जनक मानलाजातो. ज्या भारत देशाचा इतिहास त्याने लिहला त्या देशाला त्याने कधीही भेट दिली नव्हती.लंडन मध्ये ईस्ट इंडिया कंपनीमध्ये पत्रव्यवहार तपासनीस म्हणून काम करणाऱ्या जेम्स मिल याने ईस्ट इंडिया कंपनीची कागदपत्रे, भारताशी झालेला पत्रव्यवहार व ब्रिटन मध्ये झालेले भारतीयांविषयीचे लेखन यांचा अभ्यास करून जेम्स मिल याने 'History of British India' हा ग्रंथ १८१८ मध्ये लिहून प्रकाशितकेला. या ग्रंथाने फार मोठा वाद निर्माण केला पण या ग्रंथाचा प्रभावही प्रचंड होता.

जेम्स मिलचे लिखाण हे पूर्वग्रह दूषित होते. त्याने भारताच्या इतिहासाचे विभाजन हिंदू काळ, मुस्लिम काळ व ब्रिटिश काळ अशा धार्मिक आधारावर केले. तसेच 'हिंदू संस्कृती पेक्षा मुसलमानांची संस्कृती हि श्रेष्ठ दर्जाची आहे' अशी दुही निर्माण करणारी विधाने करून भारताच्या जमातवादी इतिहास लेखनाला सुरवात केली. जेम्स मिल याने प्राचीन भारतीय समाजाचे स्वरूप, शासन पद्धती, चालीरीती, पुराणग्रंथ इ. बद्दल तुच्छतेने लिहले. मध्ययुगीन परंपरा, सनातनी वृत्ती, रूढी प्रथा, धर्म सत्तेचा प्रभाव या संदर्भात त्याने भारताच्या मागासलेपणावर टीका केली. भारतामधील ब्रिटिश राज्यकर्त्यांना व अधिकाऱ्यांना जसा भारत दिसला तसात्यांनी तो कागदपत्रांमधून नोंदवला. तसाच भारत हा जेम्स मिल याला दिसला, व त्याच आधारावर जेम्स मिल याने आपली इतिहासविषयक

मते नोंदवली, त्यामुळे त्याचे संपूर्ण लिखाण हे पूर्वग्रह दूषित होते. जेम्स मिल याचे लिखाण एकांगी, पूर्वग्रह दूषित, वंशवादी, भारतीयांना सर्वच बाबतीत हीन लेखणारे असले तरी तत्कालीन अधिकाऱ्यांसाठी त्याचे लिखाण हे मार्गदर्शक ठरले. मिलच्याच लेखनाचा आधारघेऊन नंतरच्या इतिहासकारांनी भारता संबधीचे लिखाण केले.

### २) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन :

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने समन्वयवादी दृष्टिकोनातून भारताचा इतिहास लिहला. एल्फिन्स्टन याने ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी व मुंबई प्रांताचा गव्हर्नर म्हणून काम केले होते. प्रत्यक्ष भारतात काम करून मिळालेला अनुभव आणि पौर्वत्यवादी इतिहासकारांच्या ग्रंथांचा अभ्यास केल्यामुळे जेम्स मिलच्या मताशी एल्फिन्स्टनचे मतभेद होते. मिलचे लिखाण हे वस्तुनिष्ठ नसून त्याने भारताचा इतिहास लिहताना योग्य मूल्यमापन केले नाही, अशी टीका एल्फिन्स्टनने केली.

१८४१ मध्ये एल्फिन्स्टनने 'History of Hindu and Muhammadan India' हा ग्रंथ प्रकशित केला. या ग्रंथात राजकीय इतिहासापेक्षा सांस्कृतिक बाबींवर अधिक भर दिला. एल्फिन्स्टनची कालगणना, शासनव्यवस्थे बद्दल माहिती, धर्म, साहित्य, तत्वज्ञान, परदेशी, सागरी व्यापार इ. ची माहिती हि त्याच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहे. त्याच्या मृत्यू नंतर १८५७ मध्ये त्याचा 'The Rise of the British power in the East' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्याच्या मते, ‘‘इतिहासाचे लेखन करत असतांना ज्या प्रदेशावर राज्य करायचे आहे त्यांना समजून घेतेले पाहिजे " भारताचा इतिहास लिहत असतांना एल्फिन्स्टन याने उदारमतवादी दृह्ष्टीने जरी बाळगळला असला तरी भारतावर ब्रिटिश शासनाची आवश्यक्यता असल्याचे प्रतिपादन त्याने केले.

### ३) ग्रँट डफ :

ग्रँट डफ याचे संपूर्ण नाव जेम्स कनिगहॅम ग्रँट डफ असे होते. सुरवातीस ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात सैनिक नंतर कंपनीच्या लष्करातील कप्तान, पुढे सातारा छत्रपती प्रतापसिंहच्या दरबारातील वकील व नंतर साताऱ्याचा पहिला कलेक्टर म्हणून त्याने काम पहिले. साताऱ्यातील मुक्क्मात त्यास मराठा इतिहास लेखनाचा विचार सुचला व त्यानंतर त्यास माऊंट एल्फिन्स्टन याने प्रोत्साहन दिले. डफ याने ' History of Maratha’s ' हा ग्रंथ लिहला. या ग्रंथासाठी त्याने मराठी, संस्कृत, फारसी कागदपत्रे व अन्य साधनांचा अभ्यास केला. ग्रँट डफ याने ‘‘या ग्रंथात भौगोलिक परिस्थिती, सामाजिक, राजकीय, तत्कालीन परिस्थिती, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, मोहिमा इ. उल्लेख केला. डफच्या लेखनामुळे मराठ्यांच्या हालचाली, मोहिमांची सविस्तर अशी माहिती प्रथमच पाश्च्यात अभ्यासकांसाठी उपलब्ध झाली.

### ४) विल्यम हंटर :

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी साम्राज्यवादी लेखकांत विल्यम हंटर याचे महत्वाचे स्थान आहे. 'History of British India' या ग्रंथात त्याने ब्रिटिशांनी प्रगतीच्या जोरावर भारतावर विजय मिळवला. भारतावरील अधिकार हा इंग्लडचा राष्ट्रीय विजय आहे, असे

म्हटले आहे. 'Rulers of India' या ग्रंथात अठ्ठावीस भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांची धडाडी, परिश्रम, मुत्सद्देगिरी, शासन कौशल्य इ. विविध गुणांची प्रशंसा केली आहे. 'The Annals of rural Bengal' या ग्रंथात बंगाल मधील अनाचार, व अनागोंदीच्या कारभारामुळे सामान्य लोक त्रस्त होते. ब्रिटिशांनीच तेथे कायद्याचे राज्य आणून सुव्यवस्था घडवून आणल्याचे मत मांडले. 'The Indian Musalaman' या ग्रंथात हिंदू - मुस्लिम हे एकमेकांपासून भिन्न आहे. मुस्लिम समाजाकडे इंग्रजांनी विशेष लक्ष पुरवावे असे साम्राज्यवादी व भेदभावपूर्ण लिखाणकेले.

### ५) हेनरी एलियट :

ईस्ट इंडिया कंपनीमध्ये नोकरीस असलेल्या एलियटने फारशी भाषेचा अभ्यास करून मुस्लिम शासनकाळातील इतिहासाच्या ग्रंथाची हस्तलिखिते एकत्र करून 'History of India as Told by its own Historians' या शीर्षकाखाली आठ खंडात ती प्रकाशित केली. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याने भारतातील मुस्लिम शासकांना जुलमी, अत्याचारी ठरवले. तसेच त्यांना कायदयाच्या राज्याची संकल्पना माहित नसल्याचे प्रतिपादन एलियट याने केले. भारताला पहिल्यांदाच न्यायप्रिय निःपक्षपाती शासक इंग्रजांच्या रूपात लाभले असून ते भारतात कायदयाचे राज्य निर्माण करतील असा निष्कर्ष एलियट याने काढला.

### ६) अल्फ्रेड लायल :

आल्फ्रेड लायल हा एक उदारमतवादी लेखक होता. तो भारतावर टीका करत नाही, पण ब्रिटिश प्रशासनाची तो प्रशंसा करतो. भारतात कोणतीच राजकीय अथवा शासकीय व्यवस्था रूढ झाली नाही, समाज हा दुभांगलेला राहिला, व्यक्तिगत एकतंत्री शासनाची परंपरा येथे निदर्शास येते. व ब्रिटिश साम्राज्याचे समर्थन करतो. भारतात ब्रिटिश साम्राज्य स्थापित करण्याची कोणतीही निश्चित योजना नव्हती, ते अपघाताने घडले यासारखे विचार त्याने आपल्या 'The Rise and Expansion of the British Dominion in India' या ग्रंथात मांडले.

**आपली प्रगती तपासा.**

१) साम्रज्यावादी इतिहासलेखकांची माहिती द्या?

## १२ .५ साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे वैशिष्ट्ये व परिणाम

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर साम्राज्यवादी भूमिकेतून त्यांनी भारतीय इतिहासाचे लिखाणकेले. साम्राज्यवादी दृष्टिकोनामुळे ब्रिटिश शासकांची मनोवृत्तीही तसेच बनली. या साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होते.

१) भारतावरील ब्रिटिश सत्ता दीर्घकाळासाठी दृढमल करण्यासाठी ब्रिटिश साम्राज्यवादाचे तात्वीक समर्थन करण्याच्या प्रक्रियेतून साम्रज्यावादी इतिहासलेखन परंपरा विकसित झाली. या साम्रज्यावादी लेखनाचे तीन प्रमुख उद्दिष्टे होते.

अ ) भारतीयांच्या मनात न्यूनगंड निर्माण करणे व ब्रिटिश शासनाची महती पटवून त्यांना दिपवून व दडपून टाकणे.

ब ) भारतीय लोकांमध्ये फूट पाडून ते स्वशासनला लायक नाहीत हे त्यांच्या मनावर बिंबवणे.

क ) भारतीय हे अप्रगत व हीन दर्जाचे आहेत हे इंग्लंड मधील बुद्धिजीवी व सामान्य वर्गाला दाखवून भारतावरील ब्रिटिश शासन कायम टिकवण्याची गरज त्यांना पटवून दाखवणे.

२) या लेखनप्रवाहातील बहुतेक लोक हे भारतातील ब्रिटिश नोकरशाहीचे प्रतिनिधी आहेत. त्यामुळे या सर्व लेखकांनी भारताबद्दल पूर्वग्रह बाळगूनच लिखाण केले.

३) साम्रज्यावादी इतिहासलेखकांनी भारतीय इतिहासाचे प्रथमच हिंदू, मुस्लिम व ब्रिटिश अशी विभागणी केली. अशा प्रकारच्या मांडणीमुळे हिंदू - मुस्लिम बीजे पेरली गेली.

४) साम्राज्यवादी लेखकांनी मूळ साधनांच्या व पुराव्याच्या आधारे इतिहास ग्रंथ लिहले असले तरी त्यात वस्तुनिष्ठतेचा अभाव जाणवतो.

५) या लेखकांनी प्राचीन व मध्ययुगीन भारतीय इतिहासातील दोषस्थळे व त्रुटी अवास्तव स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला. भारतीय संस्कृती, राजकीय इतिहासातील चांगल्या घटना व प्रशासकीय घटनांकडे त्यांनी दुर्लक्ष केले.

६) आर्य वंशांच्या श्रेष्ठत्वाचा दंभ ह्या लेखनात स्पष्टपणे जाणवतो. इंग्लडच्या श्वेतवर्णी व कृष्णवर्णी वसाहतींच्या बाबत पक्षपात करण्यामागे हा विचार होता.

अशा प्रकारे साम्राज्यवादी इतिहासलेखनात अनेक दोष जरी असले तरी या प्रवाहाने भारतीय इतिहास लेखनाला एक नवीन दिशा दिली.

## १२.६ प्रश्न

१) साम्राज्यवादी इतिहासलेखन म्हणजे काय ते सांगा ?

२) साम्राज्यवादी इतिहासलेखनाची उद्दिष्टे सांगून या इतिहासलेखनातील विविध प्रवाह सांगा ?

३) साम्रज्यावादी दृष्टिकोनातून लिखाण करणाऱ्या इतिहासकारांचा आढावा घ्या ?

## १२.७ संदर्भ

१) देव प्रभाकर, इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नाशिक, २००७

२) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

३) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर, औरंगाबाद, २०११

४) वाम्बूरकर जास्वंदी (संपादक), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४

५) इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड १, लोकवाङ्ग्मय गृह, २०१०

६) सरदेसाई बी. एन, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

७) इतिहास लेखनपरंपरा (स्टडी मटेरियल) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8) Sreedharan E, A Textbook of Histography, 500 BC to A.D. 2000, Orient Blackswan, 2004

9) Shaikhali B, History: Its Theory and Methods, Macmillam, 1978

❖❖❖❖

# १३

## केंब्रिज इतिहासलेखन

**घटक रचना**

१३.० उद्दिष्टे

१३.१ प्रस्तवना

१३.२ केंब्रिज इतिहासलेखनाची सुरवात

१३.३ केंब्रिज परंपरेतील प्रमुख इतिहासकार

१३.४ केंब्रिज इतिहासलेखनाचे मूल्यमापन

१३.५ सारांश

१३.६ प्रश्न

१३.७ संदर्भ

### १३.० उद्दिष्टे

- केंब्रिज परंपरेचा अभ्यास करणे.
- केंब्रिज इतिहासलेखनातील प्रमुख इतिहासकारांचा आढावा घेणे.
- केंब्रिज इतिहासाच्या परिणामांचा मागोवा घेणे.

### १३.१ प्रस्तावना

आधुनिक भारताच्या राष्ट्रवादी इतिहासलेखनामध्ये, वसाहतिक कालखंडामध्ये ब्रिटिशांकडून भारतीयांचे सर्वांगीण शोषणझाल्यामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादी भावना निर्माण होऊन भारतीयांचा राष्टवाद व ब्रिटिशांचा साम्राज्यवाद अशी मांडणी केली गेली. मात्र भारतीयांमधील ब्रिटिश शासन हे भारतीयांना उपकारक ठरले, ब्रिटिशांच्या एकछत्री अंमलामुळे भारतात केंद्रीयीकृत शासन व्यवस्था स्थापित झाली, स्थानिक प्रशासनात ब्रिटिशांनी भारतीयांना संधी दिली. ब्रिटिशांनी केलेल्या या गोष्टींमुळे भारतीय लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. भारताचा स्वतंत्र लढा हा ब्रिटिशांच्या विरोधातील संघर्ष नसून भारतीय अभिजनांनी स्वतःच्या हितसंबधाचे रक्षण आणि सत्तेत वाटामिळवण्यासाठी चालवलेली चळवळ होती. अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य लढ्याची, भारतीय राष्ट्रवादाची आणि भारतीय राजकारणाची पुर्नव्याख्या करणाऱ्या केंब्रिज मधील इतिहासकारांच्या समूहाला ‘ केंब्रिज इतिहास लेखन परंपरा’ असे म्हणतात.

अशा प्रकारच्या इतिहासाची मांडणी करणाऱ्या इतिहासकारांचे लेख 'Province and National essays on India politics' यामध्ये १८७० ते १९४० मध्ये केंब्रिज मधील इतिहासकारांनी लिहले. हे संपूर्ण लेख जॉन गेलेघर, गोर्डेन जॉनसोन व अनिल सील यांनी संपादित केले, अशा प्रकारची मांडणी करणाऱ्या इतिहासकारांचे लेख आणि ग्रंथ केम्ब्रिज विद्यापीठाच्या प्रकाशनाद्वारे आणि मॉडर्न एशियन स्टडीज या संशोधन पत्रिकेत प्रकशित होत असत. यामुळे त्यांना 'केम्ब्रिज परंपरा' म्हणून ओळखले जाऊ लागले. भारतातील मार्क्सवादी व उदारमतवादी इतिहासकारांनी या विचारधारेचा विरोध केला. नव - साम्राज्यवादाचा प्रभाव असलेली हि परंपरा १९६० च्या दशकापासून ते १९९० च्या दशकांपर्यंत प्रभावी होती. या इतिहास लेखन परंपरेने भारतीय इतिहास लेखनावर निश्चितच एक वेगळा प्रभाव पाडला.

## १३.२ केंब्रिज इतिहासलेखनाची सुरवात

केंब्रिज परंपरेची पाळेमुळे हि आफ्रिकेच्या फाळणीसंबंधाचे लिखाण व ब्रिटिश साम्राज्याच्या आर्थिक इतिहासविषयाच्या लिखाणात सापडतात. ऑक्सफर्ड येथील जॉन गेलेघर व रोनाल्ड राबिन्सन यांनी आफ्रिकेमधील साम्राज्यवादावर १९५३ मध्ये 'इकॉनॉमिक हिस्टरी रिव्यू' मध्ये 'दि इम्पिरिअलिसम ऑफ फ्री ट्रेड' या नावाच्या लेखात स्थानिक समुदाय व वसाहतवादविरोधी राष्ट्वादी चळवळींमधील परस्पर हितकारक यांची माहिती मांडली. व आफ्रिकेतील साम्रज्यवाद हा काही स्थानिक गटांनी वसाहतिक शक्तींना सहकार्य केल्याने व त्यातून त्यांना वैयक्तिक व सामूहिक फायदा झाल्यामुळे उदयास आला, असे लिखाण केले.

गेलेघर यांचा अभ्यास विषय हा आफ्रिका खंड जरी असला तरी ऑक्सफर्ड विद्यपीठात ते अनिल सील व ख्रिस्तोफर बेली यांचे संशोधक मार्गदर्शक होते. सील यांनी गेलेघर यांचे विचारांना भारताच्या दृष्टोकणातून लागू केले व १९७१ साली 'दि पोलिटिकल अर्थेमेटिक ऑफ दि प्रेसिडेन्सीज' व 'दि रिवॉर्ड ऑफ एज्युकेशन' यापुस्तकात मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतातील आंग्लशिक्षित व एतद्देशीय लोकांनी ब्रिटिश सरकारला केलेले सहकार्य, ब्रिटिशांनी केलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय सुधारणांमुळे उपलब्ध झालेल्या नोकरीच्या नवीन संधी व काही मूठभर आंग्लशिक्षित व्यक्तींच्या चरित्राभोवती आपले संपूर्ण कथानक रचले. सील हे ट्रिनिटी कॉलेजमध्ये इतिहासाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यानंतर त्यांनी ब्रिटिश साम्रज्यावादी वृत्तीला सहकार्य देण्याचे धोरण स्वीकारलेव त्यांच्या भोवती जमा झालेल्या विद्यार्थी हे ' केंब्रिज स्कूल' चे पाईक बनले. या विचारधारेचा प्रभाव हा फक्त केंब्रिज विद्यपीठापुरता मर्यादित न राहता तो जगातील इतर प्रमुख विद्यापीठात देखील प्रसारित झाला.

**आपली प्रगती तपासा.**

१) केंब्रिज इतिहासलेखनाची परंपरा सांगून या इतिहासलेखनाची सुरवात कधी झाली ते स्पष्ट करा ?

## १३.३ केंब्रिज परंपरेतील प्रमुख इतिहासकार

केंब्रिज विद्यपीठातील अनेक प्राध्यापक व विद्यार्थी हे या इतिहास परंपरेशी जोडले गेले आहे. यामध्ये अनिल सील यांच्या व्यतिरिक्त गॉर्डन जॉन्सन, रिचर्ड गॉर्डन, डेव्हिड वॉशब्रुक, ख्रिस्तोफर जॉन बेकर, ज्युडिथ एम. ब्राउन, फ्रान्सिस रॉबिन्सन, बी. आर. टॉमिल्सन, ख्रिस्तोफर बेली यांचा समावेश होतो.

### १) अनिल सील :

केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केलेले अनिल सील हे केंब्रिज इतिहास परंपरेचे अत्यंत महत्वाचे इतिहासकार मानले जातात. 'The Emergence of Indian Nationalism: Competition and Collaboration in nineteen Century' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथात आणि 'Imperialism and Nationalism in India' या ग्रंथात सील यांनी भारतीय राष्ट्रवाद हि बहुसंख्य भारतीयांच्या हित संबंधासाठी चालवलेली एक चळवळ होती, या मांडणीवर प्रश्नचिन्ह उभे करतात. अनिल सील यांनी आपल्या लेखनात दोन मुख्य युक्तिवाद पुढे केले आहे. एक 'भारतीय राजकारण म्हणजे अनेक स्तरांवर कार्यान्वित अशी एक आंतरसंबंधित व्यवस्था होती आणि या स्थरांना जोडण्यात ब्रिटिश सरकारची भूमिका हि महत्वाची होती' व दोन 'साम्राज्यवादाने स्थानिकता, प्रदेश आणि राष्ट्र यांच्या आंतरसंबंधात रोवलेली राज्यव्यवस्था आस्तित्वात आणली'

अनिल सील यांच्या मते, आधुनिक भारताची जडणघडण हि ब्रिटिश साम्राज्यवादाच्या प्रभावामुळे झाली. ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या वसाहतिक सत्तेमधील प्रशासकीय - राजकीय चौकटीत भारतीय राष्ट्रवादी चळवळीची वाढ झाली. भारतीय स्वतंत्र चळवळीतील राजकारण हे छोट्या - छोट्या गटांमधील चळवळी पुरते मर्यादित होते व त्यामुळे भारतीय हे विभाजित राहिले. एका मर्यादेपर्यंत ब्रिटिशांनी फोडा व राज्य करा हे धोरण अवलंबवले. मात्र ब्रिटिश हे दुफळी माजवण्यासाठी राज्य करत होते असे म्हणता येणार नाही. अश्या प्रकारची मांडणी अनिल सील यांनी केली.

### २) ख्रिस्तोफर बेली :

केंब्रिज विद्यापीठातील ख्यातनाम व भारताच्या इतिहासाचे ख्यातनाम प्राध्यापक म्हणून ख्रिस्तोफर बेली हे ओळखले जातात. स्थानिकतेचा भाग म्हणून बेली यांनी शहरांचा अभ्यास केला. 'Patrons and political in northern India' हा लेख व त्यांचे नंतर प्रसिद्ध झालेले पुस्तक 'The local roots of Indian politic' यामध्ये त्यांनी अलाहाबाद शहराचा इतिहास, त्याचा परिसर, येथील पारंपरिक अभिजन वर्ग, मूल्यव्यस्था व रितीरिवाजांचे सूक्ष्म विश्लेषण केले. त्यांच्या मते, ब्रिटिश सत्तेमध्ये उदयायला येणारी राजकीय व्यवस्था हि विभिन्न अराजकीय घडामोडीना समावून घेण्यास सक्षम होती. राजकीय आर्थिक व धार्मिक हित संबधामधील सरमिसळ हे तत्कालीन उत्तर भारताचे वैशिष्ट्ये असल्याची मांडणी बेली यांनी केली.

**३) गॉर्डन जॉन्सन :**

केंब्रिज विद्यापीठात प्राध्यापक असलेले गॉर्डन जॉन्सन यांनी भारतीय राष्ट्रवादी चळवळीतील प्रादेशिक व राष्ट्रीय स्थरावरील चढाओढ हि केवळ वैयक्तिक हेवेदाव्यांतून निर्माण झाल्याची मांडणी आपल्या संशोधनातून केली. त्यांनी 'Provisional Politics and Indian Nationalism' हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहला. त्यांच्या मते, भारतीय नेतृत्व हे मुळात स्थानिक मुद्यांभोवतीच घुटमळत असत आणि ब्रिटिशांच्या सौजन्यामुळेच ते राष्ट्रीय स्तरावर क्रियाशील झाले. असे मत मांडले. त्यांच्याच शब्दात, 'राष्ट्रीय चळवळ ब्रिटिश सरकारने अवलंबविल्या राष्ट्रीय कार्यक्रमांच्या अनुषंगानेच सक्रिय व निष्क्रिय होत असे.' 'निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड १, इतिहासलेखन मीमांसा, पृ. क्र. ११३ )

गॉर्डन जॉन्सन यांनी प्रादेशिक स्तरावरील पुढारी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व यांच्या मधील तणाव आपल्या संशोधन लेखात मांडला. जॉन्सन यांच्या मते, पश्चिम बंगालमधील हिंदूंनी १९०५ च्या बंगाल फाळणीला मुस्लिमबहुल पूर्व बंगालमधील रोजगार संधींना मुकावे लागेल या भीती मधून त्यास विरोध केला. तसेच १९२० मधील निवडणुकांमध्ये बहिष्कार टाकण्यास गांधी कशे यशस्वी ठरले यांचे विश्लेषण करतांना तत्कालीन पुढारी हे राष्ट्रीय प्रेरणेमधून नवे तर प्रादेशिक मुद्द्यावरून त्यात सहभागी झाले होते असे विचार मांडले.

**४) डेव्हिड वॉशब्रूक :**

वॉशब्रूकयांनी दक्षिण भारतातील राजकारणावर अनेक लेख लिहले. दक्षिण भारतातील राजकारणावर ते लिहतात कि, 'प्रादेशिक स्तरावरील राजकीय लढे हे ब्रिटिशांपुढे कोणत्या मागण्या ठेवाव्यात यासंबंधी नसून या प्रतिनिधींपैकी कोणाला पैसा व प्रतिष्ठा मिळणार आहे याबाबत होते.' वॉशब्रूक हे भारतीय राष्ट्रवादाच्या उद्याचा स्थानिक शेती परिस्थितीच्यासंदर्भात लिहतात कि, भारतीय स्वतंत्र चळवळीला मद्रास प्रांतातील शुष्क प्रदेशापेक्षा ओलसर प्रदेशात अधिक लवकर व व्यापक प्रतिसाद मिळाला, म्हणजेच स्थानिक आर्थिक वैशिष्ट्ये हि मद्रास प्रांतातील सामाजिक - राजकीय घडामोडी निर्धारित करीत होती. वॉशब्रूक यांनी एनी बेझेन्ट यांच्यावर टीका केली. त्यांनी थिऑसॉफील धर्म सोडून आपल्या स्वार्थासाठी व प्रसिद्धी साठी काँग्रेस पक्ष स्वीकारला असे मत त्यांनी मांडले.

**५) फ्रान्सिस रॉबिन्सन :**

फ्रान्सिस रॉबिन्सन यांनी भारतातील मुस्लिम जमातवादाचा अभ्यास करून भारतात वाढलेल्या जमातवादी विचारांना काही मुस्लिम नेत्यांनीच खतपाणी घातल्याचे मत मांडले. त्यांच्या मते, १८८० - १९१० याकाळात सयुंक्त प्रांतातील मुसलमानांना मुबई व बंगाल यासारख्या प्रांतात हिंदूंशी एकजूट प्रस्तापित करणे शक्य होते परंतु सयुंक्त प्रांतातील सर्वात प्रभावशाली मुस्लिम नेता सर सय्यद अहमद खान यांच्या हिंदू विरुद्ध मुस्लिम राजकारणामुळे हिंदू - मुस्लिम यांच्यात तेढ वाढला व ब्रिटिशांपेक्षा जमातवादाच्या उदयास मुस्लिम नेते जास्त जबाबदार असल्याचे मत त्यांनी मांडले. फ्रान्सिस रॉबिन्सन यांच्या मते,

निवडणुकीचे राजकारण जसे वाढत गेले तशी हि स्पर्धा फक्त शासकीय पदे अथवा आर्थिक साहाय्य मिळवण्यापुरतीच मर्यादित न राहता नंतरच्या काळात 'इस्लाम खतरे में' हा नारा देऊन हिंदू - मुस्लिम यांच्यात मतभेद आणखी वाढले.

**६) बी. आर. टॉमिल्सन :**

टॉमिल्सन यांनी आपल्या लेखात काँग्रेसचे चळवळीतून पक्षामध्ये रूपांतर होत असतांना काँग्रेस मध्ये पदे व अधिकारांसाठी कशी रस्सीखेच उदयास आली याचे वर्णन केले आहे. काँग्रेसचे प्रमुख नेते हे स्वहिताने प्रेरित होते व स्वतःचा प्रभाव वाढविण्यासाठी ते प्रयन्त करत असे. तसेच १९३४ ते १९३९ या काळातील स्थानिक व प्रांतिक राजकारण हे काँग्रेस मधल्या गटांभोवती फिरत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले. टॉमिल्सन यांनी काँग्रेस नेत्यांना सहन कराव्या लागणाऱ्या यातनांची कुठेच दाखल घेतली नाही, (धरपकड, छळ, लाठीमार, तुरुंगवास इ.) त्यांचे लिखाण हे एकतर्फी होते.

**७) ज्युडिथ ब्राउन :**

ब्राउन हे त्यांच्या इतर केंब्रिज सहकारांपेक्षा कमी कर्मठ होते त्यांनी भारतातील काही प्रमुख नेत्यांचे चित्रण रेखाटले. ब्राऊन यांनी महात्मा गांधीं वर दोन पुस्तके लिहली. 'Gandhi – A Prisoner of Hope' या पुस्तकात त्यांनी 'स्वराज्य मिळाल्यावर पृथ्वीवर रामराज्य अवतरेल असे भाष्य करणारे गांधी एक हिंदू महात्मा व काँग्रेसचे पुढारी बनले' असे मत मांडले. गांधींचे सत्याग्रहाचे तंत्र भारतीय राष्ट्रीय चळवळीला मोठे योगदान होते हे त्यांनी मान्य केले. तसेच खिलाफत चळवळीला हिंदूंचा पांठिबा मिळवून देण्यात ते यशस्वी ठरल्याचे विधान त्यांनी केले. ब्राउन यांनी केंब्रिज इतिहासकारांच्या प्रमुख विचारांचा विरोध केलेला दिसून येतो, केंब्रिज इतिहासकारांनी राष्ट्रीय चळवळ हि ब्रिटिशांच्या ध्येय - धोरणांची फलनिष्पत्ती होते हे मत मांडले होते, परंतु ब्राउन यांनी भारतीय स्वतंत्र चळवळ हि भारतीयांचा स्वतःचा अजेंडा होता असे मत मांडले.

## १३.४ केंब्रिज इतिहासलेखनाचे मूल्यमापन

ब्रिटिश साम्राज्यवादाचे समर्थन करणाऱ्या केंब्रिज इतिहासलेखन परंपरेच्या इतिहासकारांवर अनेक इतिहासकारांनी टीका केली. तरी देखील केंब्रिज इतिहासकारांचे भारताच्या इतिहासलेखनात सकारात्मक योगदान मिळाल्याचे मान्य करावे लागेल. केम्ब्रिज परंपरेच्या इतिहासकारांनी आधुनिक भारताच्या इतिहासासमोर काही नवीन प्रश्न उभे केले आहे. ज्यामध्ये भारतात बहुजिनसी राजकारणाचा उदय कसा झाला? स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय राजकीय संघटनांमध्ये संपर्क कसा विकसित झाला? पारंपरिक स्थानिक अभिजनांकडे सत्ता कशी परिवर्तित झाली? या प्रश्नांच्या व्यतिरिक्त केम्ब्रिज परंपरेने संख्यात्मक व परिस्थितीकी विश्लेषणात्मक, राजकीय समाजशास्त्र आणि राजकीय चरित्रलेखनासारखी अनेक तंत्र उपलब्ध करून दिले.

**परंतु दुसरीकडे या इतिहास लेखनात अनेक मर्यादा देखील दिसून येतात.**

१) केम्ब्रिज इतिहासलेखकांनी त्यांच्या संशोधन पद्धतीत समाजवैज्ञानिक धारणांना व्यापक बैठक दिली नाही. त्यांनी भारतातील राजकीय बहुविधतेतेची, स्वातंत्र्य चळवळीची किंव्हा पक्षबांधणीची जगातील इतर प्रदेशातील इतर परिस्थितीतील इतर घडामोडींशी तुलना केली नाही. त्यामुळे भारतीय नेतृत्वाने केलेल्या तडजोडी व स्वहीतरक्षणार्थ घेतलेल्या निर्यणाबाबत त्यांची टीका अवाजवी वाटते. तसेच भारताच्या विशाल बहुविविधेतील एका चळवळीत जोडून घेण्यातील कॉंग्रेसच्या यशापयशाची ते चर्चा करत नाही.

२) केम्ब्रिज इतिहासकारांनी भारतीय भाषांमधील साधनांचा पूर्णपणे वापर न केल्यामुळे त्यांना एखाद्या विशिष्ट घटनेची भारतीयांची बाजू जाणून घेता आली नाही. त्यामुळे एका ठराविक घटनेला लोकांनी काय व का प्रतिसाद दिला हे त्यांना समजू शकले नाही.

उदा. रिपोर्ट ऑन द नेटिव्ह पेपर्स यामध्ये उल्लेख केलेल्या वृत्तांपेक्षा केसरीचा जनमतांवर मोठा प्रभाव होता. तसेच काही वेळा ते शासकीय माहिती जशीच्या तशी ग्राह्य धरतात, पण अशी माहिती देखील पूर्वग्रह दूषित असण्याची शक्यता असते.

३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा वेगवेगळ्या अंगानी अभ्यास करतांना केम्ब्रिज इतिहासकारांनी भारतीयांमध्ये राजकीय जागृती आणण्याचे श्रेय हे ब्रिटिशांना दिले. तसेच मुंबई, मद्रास, दिल्ली, कोलकत्ता याव्यतिरिक्त पुणे, अहमदाबाद, अलाहाबाद हि देखील स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख केंद्र होती याकडे त्यांनी दुर्लक्ष केले.

४) केम्ब्रिज इतिहासकारांनी आर्थिक स्वार्थ स्वातंत्र्य चळवळीमागील मुख्य प्रेरणा होती असा संकुचित अर्थ लावला. सयुंक्त प्रांतातील व बंगाल मधील मुस्लिम जमातवाद किंव्हा दक्षिण भारतातील धार्मिक व जातीय दंगली ह्या सर्व घडामोडी आर्थिक हितसंबधामधून निपजल्याचे दाखवले.

५) भारतीय स्वातंत्र्याची चळवळ हि पूर्णपणे स्वार्थाने प्रेरित होती असे केम्ब्रिज इतिहासकारांनी ठरवून टाकल्यामुळे त्यांच्या लिखाणात अंत्यत अभिनिवेश व नैतिक अहंगंड जाणवतो.

## १३ .५ सारांश

१९७० च्या दशकाच्या सुरुवातीस, जॉन गॅलाधर, अनिल सील आणि गार्डन जॉन्सन यांच्याभोवती संशोधकांचा एक नवीन गट तयार झाला. (गार्डन जॉन्सन मॉडर्न एशियन स्टडीजचे संपादक होते आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर संशोधन करणारे अनिल सील यांचे ते विद्यार्थी होते, त्यांचे संशोधन अनिल सील आणि ज्युडिथ ब्राऊन यांच्यासारखेच आहे). हा गट केंब्रिज संप्रदाय म्हणून ओळखला जाऊ लागला. या गटाने आधीच अस्तित्वात असलेल्या अभिजात सिद्धांतापासून स्वतःला वेगळे केले आणि चालू वादाच्या प्रश्नांना नवीन उत्तरे दिली. भारताचा स्वतंत्र लढा हा ब्रिटिशांच्या विरोधातील संघर्ष नसून भारतीय अभिजनांनी स्वतःच्या हितसंबधाचे रक्षण आणि सत्तेत वाटामिळवण्यासाठी चालवलेली चळवळ होती. अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य लढ्याची, भारतीय राष्ट्रवादाची

आणि भारतीय राजकारणाची पुर्नव्याख्या करणाऱ्या केंब्रिज मधील इतिहासकारांच्या समूहाला ‘ केंब्रिज इतिहास लेखन परंपरा’ असे म्हणतात.

परंतु आता भारतीय राष्ट्रीय चळवळ हा त्यांच्या अभ्यासाचाच विषय राहिला नाही. बेली यांनी १८व्या आणि १९व्या शतकातील उत्तर भारतातील शहरीकरण आणि शहरी अभिजनावर काम केले, ज्युडिथ ब्राउन यांनी महात्मा गांधींवर काम केले तसेच शहरी हिंदूंची धार्मिक परिस्थितीही सांभाळली. टॉमिल्सन यांनी विसाव्या शतकातील युरोपियन उद्योग समूहांवर लक्ष केंद्रित केले, तर वॉशब्रुक हे आंध्रवार काम करत आहेत. अशा प्रकारे केम्ब्रिज इतिहासकारांनी वेगवेगळ्या मार्गांनी वाटचाल केली आहे.

## १३.६ प्रश्न

१) केंब्रिज इतिहासलेखन परंपरेचा आढावा घेऊन या प्रवाहाची सुरवात कधी झाली ते सांगा ?

२) केंब्रिज इतिहासलेखनातील प्रमुख इतिहासकारांचा आढावा घेऊन या प्रवाहाचा भारतावर काय प्रभाव पडला ते स्पष्ट करा ?

## १३.७ संदर्भ


१) देव प्रभाकर, इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नाशिक, २००७

२) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

३) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर, औरंगाबाद, २०११

४) वाम्बूरकर जास्वंदी, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४

५) इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड १, लोकवाङ्ग्मय गृह, २०१०

६) सरदेसाई बी. एन, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

७) इतिहास लेखनपरंपरा (स्टडी मटेरियल) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8) Sreedharan E, A Textbook of Histography, 500 BC to A.D. 2000, Orient Blackswan, 2004

9) Shaikhali B, History: Its Theory and Methods, Macmillam, 1978


❖❖❖❖

# १४

## राष्ट्रवादी इतिहासलेखन प्रवाह

**घटक रचना**

१४.० उद्दिष्टे

१४.१ प्रस्तावना

१४.२ राष्ट्रवादाचा अर्थ

१४.३ राष्टवादी इतिहास लेखनातील विविध प्रवाह

१४.४ राष्ट्रवादी इतिहासलेखनातील प्रमुख इतिहासकार

१४.५ राष्ट्रवादी इतिहासलेखनाचे महत्व

१४.६ सारांश

१४.७ प्रश्न

१४.८ संदर्भ

### १४.० उद्दिष्टे

- राष्ट्रवादी इतिहासलेखन म्हणजे काय हे समजून घेणे.
- राष्ट्रवादी इतिहास लेखनातील विविध प्रवाहांचा आढावा घेणे.
- राष्ट्रवादी इतिहास लेखनातील प्रमुख इतिहासकारांचा अभ्यास करणे.

### १४.१ प्रस्तावना

इतिहास लेखनात आलेली राष्ट्रवादी भावना किंव्हा प्रवाह हा साम्राज्यवादी इतिहास लेखनाच्या प्रवाहाविरुद्धची प्रतिक्रिया होती. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश इतिहासकारांनी भारताचा इतिहास हा शास्त्रीय पद्धतीने लिहला असला तरी तो लिहत असतानाब्रिटिश संशोधकांनी पक्षपाती दृष्टिकोनातून पूर्वग्रह दूषित वृत्तीने तो इतिहास लिहला. एकोणिसाव्या शतकात वसाहतिक सत्तेखाली भारतात आधूनिक शिक्षण आणि नोकऱ्यांच्या संधीमुळे मध्यमवर्गाचा उदय झाला. या मध्यम वर्गावर पाश्च्यात वैचारिक प्रभावातून राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली. वसाहतिक इतिहासलेखनात भारताच्या इतिहासाच्या मांडणीला प्रतिक्रिया म्हणून राष्ट्रवादी दृष्टोकोनातून भारतीय इतिहास लेखनाची परंपरा निर्माण झाली.

राष्ट्रवादी इतिहास लेखन परंपरा हि अत्यंत्य व्यापक होती. एकोणिसाव्या शतकात तिचा उगम होऊन विविध उपप्रवाहांच्या स्वरूपात आणि विविध टप्प्यात हि लेखन परंपरा प्रभावी ठरली. राष्ट्रवादी इतिहास लेखन परंपरेमुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादी भावना वाढीस लागून

भारतीय लोकांमध्ये आत्मसन्मान, आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य या इतिहास लेखन परंपरे मुळेझाले.

## १४.२ राष्ट्रवादाचा अर्थ

राष्ट्रवादकिंव्हा Nationalism हा शब्द Nation या लॅटिन शब्दापासून बनला आहे. Nation म्हणजे जन्म अथवा वंश होय. राष्टवाद यात जन्म, वंश हे तत्व अभिप्रेत आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात देशभक्ती, राष्टनिष्ठा या अर्थाने 'राष्टवाद' हा शब्द वापरण्यात आला.

'राष्ट' हि भावना अथवा दृष्टिकोन पाश्च्यात आहे. भारतीय लोकांनी तिचा आधुनिक काळात स्वीकार केला. भारतात ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध अनेक धर्म, जाती - जमाती, पंथ व इतर गट असलेल्या परंतु त्याचे स्वरूप अत्यंत विस्कळीत असतांना जनतेने बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध एकत्र येऊन जो ऐतिहासिकलढा दिला. तो भारतीय राष्टवाद होय.

**आपली प्रगती तपासा.**

१) राष्ट्रवाद हि संकल्पना स्पष्ट करा?

## १४.३ राष्टवादी इतिहास लेखनातील विविध प्रवाह

राष्ट्रवादी इतिहास लेखन परंपरा हि अत्यंत व्यापक होती. एकोणिसाव्या शतकात तिचा उगम होऊन विविध टप्प्यात आणि विविध उपप्रवाहांच्या स्वरूपात विसाव्या शतकात ती प्रभावी बनली. राष्टवादी इतिहास लेखनातील विविध प्रवाह हे पुढील प्रमाणे होते :

### १) प्राचीन संस्कृती आणि हिंदू धर्मावरील आरोपांचे खंडन करणारा 'राष्ट्रीय प्रवाह':

पहिल्या पिढीतील राष्टवादी इतिहासकारांनी प्राचीन संस्कृती व हिंदू धर्मावरील ब्रिटिशांच्या आरोपांचे खंडन केले. प्राचीन भारतात सभा, समिती या लोकशाहीसारख्या काम करणाऱ्या संस्था होत्या. प्राचीन भारतात अनेक गणराज्ये अस्तित्वात होती. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा होता. या काळात भारतात गणित, खगोलशास्त्र, शरीरशास्त्र व औषधीशास्त्र हि विकसित होते. हे दाखवून देऊन भारतीयांना भौतिक व शास्त्रीय विकासाचे ज्ञान होते हे त्यांनी दाखवून दिले. प्राचीन संस्कृती व हिंदू धर्मावरील खंडन करणाऱ्यांमध्ये काशीप्रसाद जयस्वाल, राधाकुमूद मुखर्जी यांची नावे विशेष उल्लखनीय होती.

### २) वस्तुनिष्ठ - राष्टीय प्रवाह :

या प्रवाहातील इतिहासकारांनी प्राचीन धर्म व संस्कृतीवर ब्रिटिशांनी केलेले चुकीचे आरोप खोडून काढण्याचा प्रयन्त केला. ऐतिहासिक साधनांच्या चिकित्सक विश्लेषणातून जे सत्य हाती येईल, त्याची पुराव्यासह शास्त्रीय पद्धतीने मांडणी करणे, अशी त्यांची ऐतिहासिक सत्यशोधनाची वस्तुनिष्ठ भूमिका व दृष्टिकोन होता. इतिहास विषयाच्या शात्रशुद्ध अभ्यासासाठी इतिहासकारांनी ऐतिहासिक साधनांचा, लिखित साहित्याचा, पुरातत्वीय साधनांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला गेला. त्यांच्या या लेखांत कुठेही अभिनिवेश आढळत

नाही, तर विषयाची वस्तुनिष्ठ मांडणी आढळते. अशा वस्तुनिष्ठ इतिहास संशोधकांमध्ये डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, डॉ. आळतेकर, वि. का. राजवाडे, डॉ. यदुनाथ सरकार, डॉ. रमेशचंद्र मजुमदार इ. समावेश होता.

**३) आर्थिक - राष्ट्रीय प्रवाह :**

या मतप्रवाहाच्या राष्ट्रीय इतिहास लेखकांची भूमिका प्रारंभीच्या इतिहास लेखकांप्रमाणे ब्रिटिश प्रणित आरोपांचे खंडन करण्यात व वस्तुनिष्ठ लिखाणाने भारतीय इतिहास दर्शन घडवण्याची नव्हती. या प्रवाहातील इतिहास लेखकांची भूमिका ब्रिटिश इतिहास लेखनाला आव्हान देणारी व आक्रमक अशी होती. अठराव्या शतकात ब्रिटिशांनी भारतावर आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करून आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक लूट हि त्यांची आर्थिक प्रेरणा होती. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांमुळे स्वयंपूर्ण असणारी भारतीय अर्थव्यवस्था मोडकळीस आली. दारिद्र्य व बेकारी यामुळे भारतीय जनता त्रस्तझाली त्यामुळे हा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस दादाभाई नौरोजी, न्या. महादेव गोविंद रानडे, रमेश चंद्र दत्त, यांनी ब्रिटिश वसाहतवादाचे आणि ब्रिटिशांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाचे स्वरूप सांगितले.

**४) ब्रिटिशांचा दुप्पटीपणा व कुटील राजनीतीवर प्रकाश टाकणारा 'राष्टवादी इतिहास प्रवाह'**

या प्रवाहातील राष्टवादी इतिहासलेखकांनी ब्रिटिशांच्या शासन व्यवस्थेमागील उद्दिष्ट्ये, त्यांची धोरणे, त्यांच्या राजकीय व लष्करी हालचाली यांचा चिकित्सक अभ्यास केला. ईस्ट इंडिया कंपनीने सुरवातीच्या लढाया लष्करी बळावर किंव्हा श्रेष्ठत्वाने जिंकल्यानाही फ़ंदफ़ितुरी व भारतीयांमध्ये फूट पाडूनत्या जिकल्या. तसेच भारतात जमातवादाचे बीज ब्रिटिशांनी पेरून भारतातील मुख्य दोन धर्मामध्ये फूट पाडण्याचे काम ब्रिटिश शासन व्यवस्था करत आहे हे त्यांनी पुराव्या द्वारे स्पष्ट केले. तसेच सिराज उद्दोला, मीर कासीम, नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई निर्भीडपणे परकीय सत्तेला आव्हान दिले, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या प्रवाहातील इतिहासलेखकांमध्ये मेजर बी.डी. बसु, पंडित सुंदरलाल, वि.डी. सावरकर यांचा समावेश होता.

**५) प्रादेशिक - राष्ट्रीय प्रवाह :**

भारतात निरनिराळ्या प्रदेशांचे ब्रिटिशांनी केलेले लिखाण अपूर्ण व सदोष होते. मूळदेशी ऐतिहासिक साधनांचा चिकित्सक अभ्यास करणे, भाषेच्या अडचणीमुळे त्यांना कठीण होते. त्यामुळे त्यांच्या लिखाणात अनेक त्रुटी होत्या, शिवाय त्यांची भूमिका हि विजेत्यांची होती. त्यामुळे भारतातील विविध प्रदेशातील लोकांनी भारतीय भूमिकेतून इतिहास लिहण्यास सुरवात केली. यामध्ये महाराष्ट, गुजरात, राजस्थान, दक्षिण भारत, उत्तर भारत, बंगाल इ. प्रदेशांचे लिहलेले इतिहास होय. उदा. मराठा सत्तेचा इतिहास हा ग्रंथ ग्रँड डफ याने १८२६ मध्ये लिहला, त्यावर नीलकंठ जनार्दन यांनी टीका करून व त्यांचा

चुका दाखवून नवीन लिखाण केले. तसेच दक्षिण भारताचा इतिहास प्रकाशात आणण्याचे मोलाचे कार्य कृष्णस्वामी अय्यंगार, डॉ. नीलकंठ शास्त्री यांनी केले.

वरील उल्लेख केलेल्या वेगवेगळे उपप्रवाह मिळून राष्टवादी इतिहासलेखनाचा प्रवाह हा रुंदावत गेला. व हा प्रवाह व्यापक बनला.

**आपली प्रगती तपासा.**

१) राष्ट्रवादी इतिहासलेखनातील विविध प्रवाहांचा आढावा घ्या?

## १४.४ राष्ट्रवादी इतिहासलेखनातील प्रमुख इतिहासकार

भारतात राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा प्रारंभ हा एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासूनच झाला. विसाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळात हे इतिहास लेखन अधिक परिपक्व्व बनले. राष्ट्रवादी इतिहास लेखन हे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडाप्रमाणे लिहले गेले. त्यांच्या कालखंड निहाय लिखाणाविषयीची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येते.

### अ ) प्राचीन भारतातील राष्ट्रवादी इतिहासलेखक

### १) काशीप्रसाद जयस्वाल :

विसाव्या शतकातील प्रमुख राष्ट्रवादी इतिहासकारांमध्ये काशीप्रसाद जयस्वाल यांचे नाव विशेष उल्लेखनीय आहे. संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवून धर्मशास्त्रीय ग्रंथाचा, कोरीव लेखांचा, प्राचीन नाण्यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी 'बिहार अँड उडीसा रिसर्च सोसायटीच्या' माध्यमातून प्राचीन भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करून जेम्स मिल व विसेंट स्मिथ यासारख्या साम्राज्यवादी इतिहासकारांचे पूर्वग्रह युक्त मतांचे खंडन केले. व प्राचीन भारतीय संस्कृती श्रेष्ठ असल्याचे मत मांडले.

काशीप्रसाद जयस्वाल यांनी 'Hindu Polity' आणि 'History of India (150-350 AD) हे दोन मौलिक ग्रंथ लिहले. साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारतात प्राचीनकाळी फक्त निरूंकश राजसत्ता होती, कोणत्याही प्रकारच्या प्रातिनिधिक संस्था या अस्तित्वात नव्हत्या. अशी मांडणी केली. त्यांनी वैदिक काळातील सभा व समिती, बौद्ध संघातील लोकशाहीचे तत्त्व, गणराज्य - सोळा महाजनपदे इ. संस्थांचे प्राचीन भारतातही अस्तित्व सिद्ध करून साम्राज्यवादी इतिहासकारांची मते खोडून काढली. 'History of India' या ग्रंथात त्यांनी नागांनी शक व कुशाण आक्रमणाचा शौर्याने प्रतिकार केला असे वर्णन केले. जयस्वाल यांच्या निष्कर्षावर यु.एन. घोषाल व ए.एस. आळतेकर इ. अनेक विद्वानांनी प्रश्न चिन्ह निर्माण केले. के. पी. जयस्वाल यांच्या लिखाणातील काही त्रुटी सोडल्यास त्यांच्या लिखाणातून प्रखर राष्ट्रवाद आणि प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभिमान दृष्टीस पडतो.

### २) डॉ. रामकृषण गोपाळ भांडारकर

आधुनिक भारतातील पहिले स्वदेशी इतिहासकार म्हणून डॉ. आर. जी. भांडारकर यांना ओळखले जाते. संस्कृत, प्राकृत व इंगजी भाषेवर प्रभुत्व, तत्वज्ञान आणि धर्मशास्त्राचा

त्यांचा सखोल अभ्यास होता. राजकीय इतिहासाच्या अभ्यासात त्यांनी 'The Early History of Deccan ' व' A peep into the early History of India 'हे दोन महत्वाचे ग्रंथ लिहले. या ग्रंथात त्यांनी प्राचीन काळापासून ते मुस्लिम आक्रमणापर्यन्तचा इतिहास रेखाटला. तसेच या ग्रंथात राजकीय घडामोडीं बरोबर आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थितीचे वर्णनही आढळते.

डॉ. आर. जी. भांडारकर हे प्रखर राष्टवादी होते, परंतु त्यांची भूमिका हि ब्रिटिश विरोधी लेखांची नव्हती. प्राच्यविद्येतील संशोधनासाठी सुप्रसिद्ध भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट हि संस्था त्यांच्या कार्याचे प्रतीक आहे.

### ३) राधाकुमूद मुखर्जी

राष्ट्रवादी इतिहासलेखन आग्रहीपणे करणारे आर. के. मुखर्जी हे पहिल्या पिढीतील राष्ट्रवादी इतिहासकार होते. त्यांनी हिंदू धर्म व संस्कृतीवरील आरोपांचे खंडन केले.भारतीयांनी कोणतीही भौतिक व शास्त्रीय प्रगती केली नसल्याचे साम्राज्यवादी इतिहासकारांचे मत राधा कुमुद मुखर्जी यांनी आपल्या विविध ग्रंथातून खोडून काढले. १९१२ मध्ये त्यांनी प्राचीन भारतावरील एक महत्वाचे पुस्तक 'The History of Indian shipping and Maritime activity from earliest times' लिहले. या ग्रंथात त्यांनी प्राचीन काळापासून मुघल काळापर्यंतच्या नाविक हालचाली, सागरी व्यापार व ऍफ्रोक व मलाया बेटा पर्यंत भारतीय नौका जात होत्या हे भिन्न भाषेतील साहित्य व पुरावशेष तसेच नाण्यांच्या आधारे सिद्ध केले. या ग्रंथाची लॉर्ड कर्झन व व्हिन्सेंट स्मिथ यासारख्या सुप्रसिद्ध इंग्रज लेखकांनी प्रशंसा केली. 'Ancient Indian Education' या आपल्या ग्रंथात त्यांनी प्राचीन काळातील ब्राम्हण व बौद्ध शिक्षण व्यवस्थेचा विकास व प्रगतीचा आढावा घेतला. 'The Gupta Empire' हा एक मोनोग्राफ आहे (एका विशिष्ट विषयावर लिहलेला प्रबंध) यामध्ये त्यांनी गुप्त काळातील साहित्य, कला, नृत्य, गायन, शिल्प व स्थापत्य इ. क्षेत्रातील प्रगती दाखवून दिली. 'The Fundamental Unity of India' या ग्रंथात भारताची भौगोलिक स्थिती, राजकीय विचार व समान संस्कृती यामध्ये भारताच्या ऐक्याची बीजे स्पष्ट निदर्शनात येतात. असे मत व्यक्त केले. या व्यतिरिक्त त्यांनी 'Local self-government in Ancient India', 'Hindu Civilization ', ' Men and thought in Ancient India' इ. सारखे ग्रंथ लिहले.

### ४) डॉ. अनंत सदाशिव आळतेकर

प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृती यांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने लिखाण करणाऱ्या इतिहासकारांमध्ये डॉ. आळतेकर यांची गणना केली जाते. बनारस विद्यपीठात आणि पटना विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक असलेल्या डॉ. आल्तेकारानी शिलालेख, ताम्रपट, पुरावशेष, नाणी यांचा अभ्यास केला. 'The Position of women in Hindu civilization ' या ग्रंथात त्यांनी प्राचीन काळातील स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करून प्राचीन काळी स्त्रियांना समाजात वरचा दर्जा होता मात्र मध्ययुगात धार्मिक रूढी आणि कर्मकांड वाढल्यामुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा घसरत गेला, असे त्यांनी प्रतिपादन

केले. 'Education in Ancient India' या आपल्या ग्रंथात त्यांनी प्राचीन भारत हा शैक्षणिक दृष्ट्या विकसित असल्याचे स्पष्ट केले. ‘State and government in ancient India’ मनुस्मृती, शुक्रनीतिसार, कामंदकीय नीतिशास्त्र, कौटिल्याचे अर्थशास्त्र आणि बौद्ध वाङ्मयीन परंपरेचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. डॉ. अल्टेकरांनी प्राचीन भारतीय गणराज्यांचे स्वरूप स्पष्ट केले. गुप्त - वाकाटक कालखंडावरील त्यांच्या ग्रंथातून महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाचा आलेख रेखाटण्यात आला. गुप्त सुवर्ण नाण्यांचा एक कॅटलॉग देखील त्यांनी प्रसिद्ध केला. डॉ. अल्टेकरानी वसाहतवाद, साम्राज्यवादी दृष्टीने पसरविले अनेक गैरसमज दूर करणारे इतिहासलेखन करून भारतीय इतिहासलेखन परंपरेत महत्वाची भर घातली.

## ब ) मध्ययुगीन भारतातील राष्टवादी इतिहासलेखक

### १) डॉ. मोहम्मद हबीब

ऑक्सफर्ड विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या मोहम्मद हबीब यांनी अलिगढ विद्यापीठात प्राध्यापकाची नोकरी केली. वस्तुनिष्ठ आणि निधर्मी दृष्टिकोनातून भारतातील मुस्लिम शासकांच्या अभ्यास करणारे पहिले इतिहासकार म्हणून डॉ. मोहहम्द हबीब यांना ओळखले जाते. मोहम्मद गझनीच्या इतिहासाचे संशोधन करून त्यांच्या स्वाऱ्या या मुळात लूटमार आणि सत्तेकरित्या झाल्या होत्या आणि त्यामागे धर्माचा आधार नव्हता, असे मत हबीब यांनी मांडले. हबीब यांनी दिल्लीच्या सुलतानशाही काळातील समाजाबद्दल संशोधन करून कामगार आणि शेतकरी यांच्या जाचातून मुक्त झाल्याने त्याकाळी शहरी आणि ग्रामीण समाजात क्रांती घडून आली व त्यामुळेच मंगोल आक्रमणे परतवून लावणे दिल्लीच्या शासकांना शक्य झाले. असे मत हबीब यांनी मांडले. मुसलमानांनी राष्ट्रवादी वृत्तीने साम्राज्यवादा विरुद्ध असलेल्या लढ्यात शामिल व्हावे असे मत मांडले. आपल्या संशोधनाने हबीब यांनी मध्ययुगीन भारताच्या इतिहासाकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी दिली.

### २) के.एम. अश्रफ :

के.एम. अश्रफ हे मध्ययुगीन भारताच्या विशेषतः सुल्तानशाहीच्या इतिहासाचे अभ्यासक होते. 'Life and conditions of the people of Hindustan (1200 – 1500 AD)' हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. सल्तनत काळातील भारतीय समज जीवनाचा निधर्मी वृत्तीने अभ्यास करणारे ते प्रमुख राष्ट्रवादी इतिहासकार होते. मुस्लिम राज्यकर्ते असल्यामुळे भारतीयांच्या दैनदिन जीवनात कोणताही मूलभूत बदल घडून आला नाही. हिंदू व मुसलमान यांच्या मध्ये कुठलाही संघर्ष झाला नसून सांस्कृतीक समन्वय साधला गेला, अशी भूमिका के.एम. अश्रफ यांनी मांडली. मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर ब्रिटिशांनी केलेल्या विविध आरोपांचे खंडन के.एम. अश्रफ यांनी करून आपली राष्ट्रवादी भूमिका स्पष्ट केली.

### ३) सर जदुनाथ सरकार :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे वस्तुनिष्ठ आणि मूलगामी संशोधनाचे श्रेय सर जदुनाथ सरकार यांना दिले जाते.मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील विभिन्न भाषेतील ऐतिहासिक साधनांचे त्यांनी अध्ययन केले. सरकार यांनी 'History of Aurangzeb' हा ग्रंथ पाच खंडात आणि 'Fall of the Mughal Empire' हा चार खंडात लिहला. हे दोन्ही ग्रंथ मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील संशोधनातील अत्यंत महत्वाचे मानले जातात. जदुनाथ सरकार यांनी 'Shivaji and His time ' व 'House of Shivaji' या सारखा मराठा इतिहाससंबंधी ग्रंथ देखील लिहला. जदुनाथ सरकार यांनी आपली मत हि परखडपणे मांडल्यामुळे काही मंडळी नाराज झाली. मात्र भारतीय दृष्टिकोनातून मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे चित्रण करण्याचा प्रयत्न म्हणून जदुनाथ सरकार यांचे कार्य मोलाचे ठरते.

### क) आधुनिक भारतातील राष्ट्रवादी इतिहासलेखक

### १) डॉ. रमेशचंद्र दत्त

राष्ट्रवादी विचारांच्या रमेशचंद्र दत्त यांनी भारताच्या आर्थिक स्थितीच्या अभ्यासाकडे लक्ष देत 'Economic History of India' हा ग्रंथ लिहला. भारताचे ब्रिटिश शासक विभिन्न मार्गांनी भारताचे आर्थिक शोषण करत आहे आणि त्यामुळे भारताचे आर्थिक दारिद्र्य वाढत आहे अशी मांडणी त्यांनी ब्रिटिश पार्लमेंटची कागदपत्रे, शासकीय कागदपत्रे आणि अहवाल यांच्या आधारे केली. रमेशचंद्र दत्त यांनी मांडलेल्या अनोऔद्योगिक करणाचा सिद्धांत आज हि भारताच्या आर्थिक इतिहासात एक सशक्त सिद्धांत म्हणून ओळखला जातो.

### २) डॉ. ताराचंद

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवर संशोधन करणाऱ्या दिग्गज इतिहासकारांमध्ये डॉ. ताराचंद यांचे महत्वाचे स्थान आहे. डॉ. ताराचंद यांचा 'History of Indian freedom Movement' हा चार खंडातील ग्रंथ विशेष गाजला. या ग्रंथात ब्रिटिश सत्ता स्थापन होण्यापूर्वीची भारताची आर्थिक स्थिती, स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था, पारंपरिक उद्योग व व्यापार यांची माहिती देऊन ब्रिटिशांच्या सत्ता स्थापनेनंतर भारतीयांची दुर्दशा ताराचंद यांनी मांडली. ब्रिटिशांची कूटनीती व फोडा व राज्य करा हे धोरण भारताच्या फाळणीस जबाबदार ठरले अशी त्यांनी मांडणी केली. या डॉ. ताराचंद यांनी 'The influence of Islam on Indian culture' या ग्रंथात भारतीय संस्कृती हि केवळ हिंदू संस्कृती नसून, हिंदू आणि इस्लामी संस्कृतीच्या समन्वयातून उत्कट झालेली एक संप्पन संस्कृती आहे, अशी मांडणी केली.

### ३) डॉ. रमेशचंद्र मजुमदार :

शास्त्रशुद्ध व चिकित्सक इतिहासलेखन पद्धतीचा वापर करून लेखन करणारे इतिहासकार म्हणून डॉ. रमेशचंद्र मजुमदार हे प्रसिद्ध आहे. डॉ. मजुमदार यांनी Corporate life in Ancient India, Outline of Ancient Indian history and civilization, Ancient

India colonies in the far east, The sepoy Mutiny and the revolt of 1857, History of the freedom movement इ. शीर्षकांचे विविध काळ आणि विषयाच्या संदर्भात संशोधन पूर्ण ग्रंथ लिहले. डॉ. मजुमदार यांच्या मते, 'हिंदू व मुसलमान गटातील फूट वाढविण्यास ब्रिटिश शासकांचा सिहांचा वाटा होता. या दोन्ही गटातील लोकांना एकाच राष्ट्रीय व्यासपीठावर न आणण्याचे ब्रिटिशांचे प्रयत्न यशस्वी ठरले.' डॉ. मजुमदार यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. मात्र धर्म आणि राजकारण यांची गल्लत केल्याबद्दल त्यांनी गांधींना दोष देखील दिला.

**आपली प्रगती तपासा.**

१) राष्ट्रवादी इतिहासकारांचा आढावा घ्या?

## १४.५ राष्ट्रवादी इतिहासलेखनाचे महत्व

इतिहास लेखनाच्या क्षेत्रात राष्ट्रवादी इतिहास लेखनाचे वेगळे महत्व आहे. या इतिहास प्रवाहाने ब्रिटिशांनी मांडलेल्या धारणा व विचार खोडून काढण्याचे कार्य केले.

१) राष्टवादी इतिहासकारांनी पाश्च्यात व भारतीय समाज व संस्कृतीचा तौलनिक अभ्यास करून राष्ट्रीय जाणिवेचे बीज रुजवले. राष्टवादी इतिहासलेखनामुळे भारतीयांमध्ये आत्मसन्मान निर्माण झाला.

२) राष्टवादी इतिहासकारांनी नवीन आव्हाने स्वीकारून संशोधनाला चालना दिली. या प्रवाहामुळे ऐतिहासिक मूळ साधनांसोबतच शोध घेणारी संशोधकांची पिढी तयार झाली.

३) राष्टवादी इतिहासकारांनी फक्त राजकीय इतिहासच नाही तर आर्थिक व सामाजिक पैलूंची देखील दखल घेतली. प्राचीन व मध्ययुगीन संस्कृतीचा व सामाजिक स्थितीचा त्यांनी अभ्यास केला. ब्रिटिशकालीन शासनाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले दुष्परिणाम विशद करण्यात आले, यामधून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला नवीन आशय भेटला.

४) ब्रिटिशांनी भारतीयांचे केलेले आर्थिक शोषण त्यांचे फोडा व झोडाचे राजकारण इ. बाबींची ऐतिहासिक मांडणी करून राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीयांच्या राष्टवादी भावनेला वैचारिक आधार दिला.

५) सामाज्यवादी इतिहास लेखकांच्या मांडणीचे खंडन करत असतांना काही वेळा राष्ट्रवादी इतिहासकारांचे वस्तुनिष्ठतेचे भान सुटल्याचे आढळते. काही वेळा अतिरंजित अतियोशक्तीपूर्ण विधाने त्यांनी केली. आत्यंतिक राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे यातील काही इतिहासलेखनाला प्रचारकी स्वरूप आले. मध्ययुगीन वीर पुरुषांच्या कार्याचा गुण गौरव करतांना नकळत जमातवादाची बीजे रोवली गेली.

## १४.६ सारांश

काही दोष सोडले तर राष्ट्रवादी इतिहासलेखनाने इतिहासलेखनाचे क्षेत्र समृद्ध केले. डॉ. रोमिला थापर यांच्या मते, 'भारताचा इतिहास उभा करण्यात राष्ट्रवादी इतिहासकारांनी मौलिक योगदान दिले.'

## १४.७ प्रश्न

१) राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा अर्थ सांगून हा लेखन प्रवाह स्पष्ट करा ?

२) राष्ट्रवादी इतिहासलेखातील विविध प्रवाहांचा आढावा घेऊन त्याचे मुल्याकंन करा ?

३) राष्ट्रवादी इतिहासलेखनातील प्रमुख इतिहासकारांचा आढावा घ्या ?

## १४.८ संदर्भ

१) देव प्रभाकर, इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नाशिक, २००७

२) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

३) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर, औरंगाबाद, २०११

४) वाम्बूरकर जास्वंदी (संपादक), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४

५) इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड १, लोकवाङ्ग्य गृह, २०१०

६) सरदेसाई बी. एन, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

७)इतिहास लेखनपरंपरा (स्टडी मटेरियल) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8) Sreedharan E, A Textbook of Histography, 500 BC to A.D. 2000, Orient Blackswan, 2004

9) Shaikhali B, History: Its Theory and Methods, Macmillam, 1978

❖❖❖❖

# १५

## मार्क्सवादी इतिहासलेखन

**घटक रचना**

१५.० उद्दिष्टे

१५.१ प्रस्तावना

१५.२ मार्क्सवादी इतिहासलेखनाचे स्वरूप

१५.३ मार्क्सवादी इतिहासलेखनाची सुरवात

१५.४ मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाचे लेखन

१५.५ मार्क्सवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये

१५.६ प्रश्न

१५.७ संदर्भ

### १५.० उद्दिष्टे

- मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय हे समजून घेणे.
- मार्क्सवादी इतिहासकारांचा अभ्यास करणे.
- मार्क्सवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

### १५.१ प्रस्तावना

भारतात मार्क्सवादी इतिहासलेखन प्रवाह स्थूलमानाने विसाव्या शतकाच्या मध्यात सुरु झाला असला तरी अल्पावधीतच तो एक समृद्ध प्रवाह बनला. अनेक तत्वनिष्ठ परंतु स्वतंत्र बुद्धीच्या विचारवंतांनी या प्रवाहाला व्यापक व सखोल बनवले आहे. कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी विचारप्रणालीने प्रभावित झालेले काही भारतीय इतिहासकार मार्क्सच्या सिद्धांताच्या आधारे भारतीय इतिहासाचा अभ्यास करू लागले. व कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधाराने भारतीय इतिहासाचे आकलन करण्याची परंपरा सुरु झाली. या परंपरेलाच ‘मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरा’ असे म्हणतात.

### १५.२ मार्क्सवादी इतिहासलेखनाचे स्वरूप

मार्क्सवादी इतिहासकारांनी इतिहासाची संपूर्णतः चौकट हि कार्ल मार्क्सच्या विचारधारेवर आधारित तयार केली. उदा. कार्ल मार्क्सची इतिहासाची व्याख्या आज पर्यंतचा इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही असून केवळ वर्गसंघर्ष होय या त्याच्या विचारधारेवर आधारित आहे. ‘आहे रे’ ‘नाही रे’ वर्ग व त्यांचा संघर्ष, त्यांची आर्थिक बाब जी सर्व बाबींच्या

मुळाशी असते. या विचारधारेतून संपूर्ण इतिहासाची आखणी करणे. यात मार्क्सवाद समाविष्ट होतो.

मार्क्सवादी इतिहासलेखनाने मुळात इतिहासलेखनाची व आकलनाची पद्धत बदलली. या लेखन प्रवाहाने इतिहासावर असलेला राजकीय घडामोडींचा प्रभाव बाजूला सारून आर्थिक व सामाजिक घटकांच्या अध्ययनाचे महत्व रेखाटले. घटना अगर व्यक्ती ऐवजी दुर्लक्षित समाज गट, भिन्न सामाजिक व आर्थिक व्यवस्थांच्या मूलगामी अभ्यास या प्रवाहाला अपेक्षित आहे. या प्रवाहातील इतिहासकारांनी शेती, ग्रामीण व्यवस्था, वर्णव्यवस्था यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला. वैदिक काळ, जैन व बौद्ध धर्म यासारख्या विषयांचा देखील भौतिकवादी दृष्टिकोनातून नवा अन्वयार्थ मार्क्सवादी इतिहासलेखकांनी लावला. मार्क्सवादी इतिहासलेखनाचे स्वरूप हे निवेदनामतक अगर वर्णनात्मक नसून विश्लेषणात्मक व चिकित्सक आहे. ऐतिहासिक साधनसामुग्री बरोबरच भाषाशास्त्र, समाजशात्र, लोकवाङ्मय, अभिजात साहित्य, पुरातत्त्वशास्त्र, अर्थशास्त्र इ. विविध ज्ञानशाखांचा वापर मार्क्सवादी इतिहासकारांनी केलेला आढळतो.

**आपली प्रगती तपासा.**

१) मार्क्सवादी इतिहासलेखनाचे स्वरूप स्पष्ट करा?

## १५.३ मार्क्सवादी इतिहासलेखनाची सुरवात

विसाव्या शतकाच्या मध्यात ग्रेट ब्रिटन मध्ये कम्युनिस्ट पार्टीचे एक सक्रिय सदस्य व इतिहासकार ई. पी. थॉमसन यांनी ‘मार्क्सवादी हिस्टोरियन ग्रुप’ ची स्थापना केली. त्यांच्या या कार्याला ख्रिस्तोफर हिल, एरीक हॅब्सबाम आणि आर. हिल्टन इ. मदत केली. आपल्या विचारांच्या प्रचारासाठी त्यांनी 'Past and Present' या पत्रिकेची सुरवात केली. या विचारवंतांचा व पत्रिकेचा प्रभाव भारतीय इतिहासकारांवर देखील पडला. यामधूनच स्वातंत्र्यानंतर भारतात मार्क्सवादी इतिहासलेखनाला विशेष चालना मिळाली.

भारतात मार्क्सवादी इतिहासलेखांचे प्रारंभिक विचार हे बी. एन, दत्त यांच्या ‘Dialectical of land ownership in India’ व ‘Cast and class in ancient India’ पुस्तकात आढळतात. भारतातील प्रमुख मार्क्सवादी विचारवंत श्रीपाद अमृत डांगे यांचा 'India from primitive communism to slavery' हा मार्क्सवादी दृष्टिकोनातून लिहलेला ग्रंथ मनाला जातो. खऱ्या अर्थाने भारतात मार्क्सवादी इतिहासलेखनाची सुरवात रजनी पाम दत्त यांच्या 'India Today' व ए. आर. देसाई यांच्या 'Social Background of Indian Nationalis' या ग्रंथामधून झाली. नंतरच्या काळात मार्क्सवादी इतिहासलेखनामध्ये डी. डी. कोशंबी, डॉ. नुरुल हसन, डॉ. रामशरण शर्मा, डॉ. रोमिला थापर, डॉ. हरबन्स मुखिया, डॉ. मोहम्मद हबीब, डॉ. इरफान हबीब, डॉ. बिपीन चंद्र यांची नावे विशेष उल्लेखनीय आहे.

## १५.४ मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाचे लेखन

### १) डॉ. धर्मानंद कोसंबी :

प्राचीन भारताच्या इतिहासाबद्दल लिखाण करणाऱ्या इतिहासकारांमध्ये दामोदर धर्मानंद कोसंबी यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासाला कोसंबीच्या लिखाणामुळे एक नवी दिशा मिळाली. गणित, संख्याशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंश शास्त्र, नाणकशास्त्र इ. विविध शस्त्रांचा आणि संस्कृत व प्राकृत भाषेचा अभ्यास असलेले डी. डी. कोसंबी हे विख्यात मार्क्सवादी इतिहासकार म्हणून ओळखले जातात.

डी. डी. कोसंबी यांनी ४ ग्रंथाचे लेख, ५ ग्रंथाचे संपादन व १२७ संशोधन लेखांचे लिखाण केले. त्या ग्रंथांपैकी 'Introduction to the study of India' (1956), 'The culture and civilization of ancient India in historical outline' हे दोन ग्रंथ भारतीय इतिहासलेखनात क्रांती आणली. डी. डी. कोसंबी यांनी कार्ल मार्क्सच्या इतिहास विषयक प्रमयेला जसेच्या तसे न स्वीकारता भारतीय इतिहासाच्या अनुषंगाने त्यात बदल करून डी. डी. कोसंबी यांनी भारतीय इतिहासाची मांडणी केली. इतिहासात मानवी व्यापाराची हालचालींची सर्व प्रक्रिया ह्या उलगडून दाखविता आल्या पाहिजेत. घटना या अलग - अलग न मांडता घटनांमध्ये सुसंगताई ठेवली पाहिजे, असे मत डी. डी. कोसंबी यांनी मांडले.

डी. डी. कोसंबी यांच्या मते, 'इतिहा म्हणजे उत्पादन साधने आणि उत्पादन प्रक्रियेतील भिन्न घटकांच्या परस्पर संबंधात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास होय.' कोसंबी यांनी प्राचीन समाज, सिंधू संस्कृती, आर्य आक्रमण, जातीव्यवस्था, लोहयुग, बौद्ध धर्म उदय, मौर्य व कृषी अर्थव्यवस्था, मौर्य सत्तेचाह्रास व दक्षिणी सत्तेचा उदय इ. विस्तृत विवरण केले. प्राचीनभारताचे मार्क्सवादी व वस्तुनिष्ठ लिखाणामुळे ड्लरीपे हे कोसम्बीचा उल्लेख 'Father of scientific Indian History' असा करतात.

### २) डॉ. रामशरण शर्मा :

कार्ल मार्क्सच्या भौतिकवादी सिद्धांताच्या आधारे प्राचीन भारतीय सामाजिक आणि आर्थिक इतिहासाचे चिकित्सकपणे संशोधन करणारे इतिहासकार म्हणून डॉ. आर. एस. शर्मा हे ओळखले जातात. 'Shudras in Ancient India' या आपल्या ग्रंथात त्यांनी वर्णव्यवस्था आणि जाती व्यवस्थेच्या उगमाची आणि धर्मशास्त्रांनी त्यांना दिलेल्या अभिमान्यतेची भौतिकवादी कारणमिमांसा केली. या ग्रंथात डॉ. आर. एस. शर्मा यांनी वर्णव्यवस्थेच्या उगमापासून गुप्त काळापर्यंत वर्णव्यवस्थेत आणि शूद्रांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थळांत झालेल्या बदलांची मांडणी केली. 'Indian Feudalism' या ग्रंथात त्यांनी भारतातील सामंतशाही व्यवस्थेच्या उदयाचे मूल्यांकन केले. जमीन महसूल व्यवस्थेवर आधारित प्रशासक पद्धती व भूदान व्यवस्था यामधून सरंजमशाहीचा उदय झाला. गुप्त काळातील शहरांच्या ह्रासास गुप्त काळातील सरंमजामशाही व्यवस्था कारणीभूत असल्याचे मत त्यांनी मांडले.

'Material culture and social formation in ancient India' या ग्रंथात त्यांनी प्राचीन भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेवरील भौतिकवादी भाष्य केले. 'Urban decay in India' प्राचीन भारतातील नगरांच्या ह्रासाची आणि स्वयंपूर्ण ग्रामव्यववस्थेच्या वाढीचे मार्क्सवादी दृष्टिकोनातून करणमिमांसा करण्यात आली.

**३) रोमिला थापर :**

दिल्ली येथील जवाहरलालनेहरू विद्यापीठातील इतिहासाच्या प्राध्यापिका म्हणून कार्य केलेल्या डॉ. रोमिला थापर यांच्या विचारांवर मार्क्स वेबर यांच्या विचारांचा प्रभाव आहे. आंतर्विद्या शाखीय दृष्टिकोनातून इतिहासाकडे पाहणाऱ्या लेखिका हि त्यांची ओळख आहे. राजकीय घडामोडी ऐवजी त्यांनी इतिहास लेखनाला आर्थिक, सामाजिक आणि वैचारिक आयाम आहे, याची जाणीव त्यांच्या लिखाणातून होते. 'Ashoka and decline of the Maurya's' या ग्रंथात त्यांनी मौर्य सम्राटअशोकाने मांडलेली धम्माची संकल्पना स्पष्ट केली. व अशोकाने बौद्ध धर्माचा केलेला पुरस्कार हा धर्मनिष्ठ अथवा नैतिक भूमिकेतून केलेला नसून तत्कालीन राजकीय व सामाजिक गरजेच्या जाणिवेतून केल्याचे मत मांडले. 'History of India' या ग्रंथात राजकीय घडामोडींपेक्षा शेती, उद्योग, व्यापार, ग्रामीण व नागरी जीवन, सागरी हालचाली या विषयांवर भर देऊन भिन्न कालखंडाचे चित्रण केले.

Ancient Indian social history – some interpretations, Problems of Historical writing in India, Ideology and interpretation of early Indian history, from lineage to state, इ. ग्रंथातून प्राचीन भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, तंत्रज्ञान इ. विविध पैलूंवर मार्क्सवादी दृष्टिकोनातून मांडणी केली.

**४) डॉ. इरफान हबीब :**

मध्ययुगीन भारताचा मार्क्सवादी परंपरेने विचार करणारे एक अग्रगण्य इतिहासकार म्हणून इरफान हबीब यांना ओळखले जाते. मध्ययुगीन भारताचा आर्थिक इतिहास हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय असून मध्ययुगीन भारताच्या इतिहासाच्या संशोधनात ते मूलभूत मानले जातात. 'Agrarian system to Mughal India' या ग्रंथात त्यांनी मुघल काळातील कृषि व्यवस्थेवरील संकट हे मुघल सत्तेच्या ह्रासाचे महत्वपूर्ण कारण ठरले. औरंगजेब याच्या काळात झालेले उठाव हे धार्मिक कारणांमुळे न होता त्यामागे आर्थिक शोषण हे मुख्य कारण होते अशी त्यांनी मांडणी केली. 'Interpreting Indian History' या ग्रंथात हबीब यांनी मध्ययुगीन भारताच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाचे विवेचन केले. तसेच मोहम्मद घोरीच्या भारतावरील आक्रमणाच्या वेळी भारताच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण केले. 'Cast and money in Indian History' या ग्रंथात त्यांनी जातिव्यवस्थेच्या उदयामागील आर्थिक कारणांचा उहापोह केला. 'The atlas of Mughal empire' आणि 'Economic map of India' या ग्रंथातूनत्यांनी भौगोलिक माहिती सोबतच आर्थिक मांडणी देणाऱ्या मध्ययुगीन भारताचे एकूण बत्तीस नकाशे प्रकशित केले. डॉ. इरफान हबीब यांनी आपल्या इतिहासलेखनाद्वारे आपले वेगळेपण सिद्ध केले व अनके दुर्लक्षति घटकांवर आपल्या लिखाणाद्वारे प्रकाश टाकला.

### ५) डॉ. बिपीन चंद्र :

भारतीय राष्टीय चळवळीचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून विश्लेषण करणारे एक प्रमुख इतिहासकार म्हणून डॉ. बिपीन चंद्र यांना ओळखले जाते. केम्ब्रिज इतिहासलेखन परंपरेने प्रतिपादित केलेली भारतीय स्वातंत्र चळवळीशी संबंधित प्रमेयांचे डॉ. बिपीन चंद्र यांनी खंडन केले. भारतीय स्वातंत्र चळवळ हि जनसामान्यांची चळवळ होती, त्याला वैचारिक नेतृत्व सुशिक्षित मध्यमवर्गातील लोकांनी दिले असले तरी मूलभूत प्रश्न आणि संघर्ष हा जनसामन्यांचाच होता, असे प्रतिपादन बिपीन चंद्र यांनी 'India's struggle for independence' या सुप्रसिद्ध ग्रंथात केले. 'Communism in India' या ग्रंथात जमातवादाच्या उदयामागील कारणांचा चिकित्सक अभ्यास करून जमातवाद हा ब्रिटिश वसाहतवादाचे आपत्य असल्याची मांडणी केली. 'The rise and growth of economic Nationalism' आणि 'Nationalism and colonialism in India' या ग्रंथामध्ये भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि विकासाचे आर्थिक पैलू, वसाहतिक शोषणाचे आर्थिक धोरण आणि भारतीय भांडवलदारांची स्वातंत्र चळवळीतील भूमिका यांचे विश्लेषण केले.

मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे जनआंदोलन म्हणून अधिक व्यापक स्वरूप उजागर करणारे इतिहासकार म्हणून बिपीन चंद्र यांना ओळखले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

१) मार्क्सवादी इतिहासलेखकांचा आढावा घ्या?

## १५.५ मार्क्सवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये

मार्क्सवादी इतिहासलेखनाने भारतीय इतिहासलेखनाला समृद्ध केले. एका नवीन दृष्टिकोतून त्यांनी इतिहासाची मांडणी करून इतिहासलेखनाला एक नवीन आयाम दिला. मार्क्सवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये हे पुढीलप्रमाणे होते :

१) राजकीय घडामोडींवर इतिहास लेखनातील भर हा या प्रवाहाने बाजूला सारून आर्थिक व सामाजिक घटकांचे अध्ययनाचे महत्व अधोरेखित केले.

२) या प्रवाहातील इतिहासकारांनी शेती, ग्रामीण व्यवस्था, वर्णव्यवस्था यांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला. एखादी ऐतिहासिक घटना अगर व्यक्ती या ऐवजी दुर्लक्षित समाजगट, भिन्न सामाजिक व आर्थिक व्यवस्थांचा मूलगामी अभ्यास या प्रवाहाला अपेक्षित आहे.

३) वैदिक काळ, जैन व बौद्ध धर्म यासारख्या विषयांचा भौतिकवादी दृष्टिकोनातून एक नवीन अर्थ मार्क्सवादी इतिहासकारांनी लावला.

४) मार्क्सवादी इतिहासकारांनी आपल्या ऐतिहासिक संशोधनात भाषाशास्त्र, समाजशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र व अर्थशास्त्र इ. ज्ञानशाखांचा वापर करून आपल्या संशोधनास आंतरविद्याशाखीय स्वरूप दिले.

५) इतिहासाचा आवाका, इतिहासाची मांडणी, मांडणीचे तंत्र, विश्लेषण पद्धती, तार्किक निष्कर्ष अशा अनेक बाबतीत मार्क्सवादी इतिहासलेखन महत्वपूर्ण ठरते. या प्रवाहातील स्वातंत्र बुद्धीच्या इतिहासकारांनी या प्रवाहाला व्यापक व सखोल बनवले.

## १५.६ प्रश्न

१) मार्क्सवादी इतिहासलेखनाचे स्वरूप स्पष्ट करून या इतिहासलेखनाची सुरवात कधी झाली ते स्पष्ट करा ?

२) मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाचे लेखन करणाऱ्या इतिहासकारांचा आढावा घ्या?

३) मार्क्सवादी इतिहासलेखनाचे वैशिष्ट्ये सांगा?

## १५.७ संदर्भ


१) देव प्रभाकर, इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नाशिक, २००७

२) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

३) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर, औरंगाबाद, २०११

४) वाम्बूरकर जास्वंदी (संपादक), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४

५) इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड १, लोकवाङ्मय गृह, २०१०

६) सरदेसाई बी. एन, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

७) इतिहास लेखनपरंपरा (स्टडी मटेरियल) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8) Sreedharan E, A Textbook of Histography, 500 BC to A.D. 2000, Orient Blackswan, 2004

9) Shaikhali B, History: Its Theory and Methods, Macmillam, 1978


❖❖❖❖

# १६

# अपारंपरिक साधने आणि अलीकडील पद्धती

**घटक रचना**

१६.० उद्दिष्टे

१६.१ प्रस्तावना

१६.२ इतिहासलेखनातील पारंपरिक साधने

१६.३ इतिहासलेखनातील अपारंपरिक स्त्रोत व आधुनिक पद्धती

१६.४ सारांश

१६.५ प्रश्न

१६.६ संदर्भ

## १६.० उद्दिष्टे

- इतिहाससंशोधनातील पारंपरिक व अपारंपरिक साधनांची माहिती घेणे.
- इतिहासलेखनातील अपारंपरिक स्त्रोत व आधुनिक पद्धती यांचा आढावा घेणे.

## १६.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत उपलब्ध पुराव्यांवरून त्या त्या काळातील मानवी प्रयत्न, सामाजिक जीवनातील घडामोडी व परिस्थिती यांविषयी स्थळ, काळ व व्यक्ती यांच्या निर्देशांसह जे लेखन केले जाते, त्यास इतिहासलेखन म्हणतात. प्रत्येक काळात इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. वेगवेगळ्या कालखंडात इतिहासकारांनी इतिहासाचे सुसंगतवार लिखाण केले नसले तरी हा इतिहास जाणून घेण्यासाठी अनेक साधने निर्माण केली आहे. इतिहासाचे लिखाण करत असतांना साधनांना विशेष महत्व असते. काळानुसार या साधनांमध्ये बदल होत गेला.

२०व्या शतकाच्या सुरवातीपासूनच इतिहासाच्या साधनांमध्ये बदल झालेला दिसून येतो. छायाचित्रण व चलचित्रण तंत्र उपल्बध झाल्याने या साधनांमध्ये आमूलाग्र बदल झाला. छापखान्यामुळे घडणाऱ्या घटनांच्या नोंदी वृत्तपत्रात आढळू लागल्या. २०व्या शतकाच्या मध्यावर विडिओ कॅमेरामुळे आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांमुळे प्रत्येक घटनेचे जिवंत चित्रण होऊ लागले. २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञान युगामुळे इंटरनेट, व वेबसाईट यासारखी नवनवीन साधने हाती आली आहेत. ध्वनिफीत, चलचित्रफिती, हि इतिहासाची नवीन विश्वसनीय साधने पुराभिलेख साधनांचे नवीन रूप आहेत. हि सर्व साधने अपारंपरिक किंव्हा आधुनिक साधने म्हणून ओळखली जातात.ज्याचा वापर हा इतिहासलेखनात होत असतो.

## १६.२ इतिहासलेखनातील पारंपरिक साधने

'साधने' हा कोणत्याही शास्त्राचा आधार असतो, तसा तो इतिहासलेखनाचा देखील आहे. इतिहासाच्या लेखनाला आकार प्राप्त करून देण्यासाठी साधनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक्य आहे. इतिहासाच्या पारंपरिक साधनांमध्ये लिखित व अलिखित साधनांचा समावेश होतो. इतिहासाचा अभ्यास करतांना साधारणपणे इतिहासाची दोन साधनांमध्ये वर्गीकरण केले जाते. १) प्राथमिक साधने २) दुय्यम साधने.

**१) प्राथमिक साधने** : ऐतिहासिक साधनांमध्ये प्राथमिक साधनांना 'मूळ साधने' म्हणून देखील ओळखले जाते. ज्यावेळी घटना घडत असते तेव्हा एखाद्या व्यक्तीने ती घटना जर स्वतःच्या डोळ्यांनी पहिली असेल, तर त्यापासून निर्मण होणाऱ्या साधनाला 'प्राथमिक साधने' म्हणतात. उदा. बाणभट्टचे हर्षचरित्र, अबुल फजलचा अकबरनामा, अशोकाचे शिलालेख, अलाहाबादचा गुप्तकालीन लेख, इमारती, स्थापत्य, मंदिरे, पुरावशेष, मूर्ती, नाणी, समकालीन प्रशासकीय कागदपत्रे. याव्यतिरिक्त आधुनिक काळात वर्तमानपत्रे, छायाचित्रे, बातमीपत्रे, चलचित्रे, चित्रफिती, ध्वनिफिती, तसेच प्रत्यक्ष घटनांचे चित्रीकरण हे प्राथमिक साधनांच्या अंतर्गत येते.

**२) दुय्यम साधने :**दुय्यम या शब्दावरून अशा प्रकारच्या साधनांचे स्वरूप मुळात दुय्यम असते. एखादी घटना घडून गेल्यानंतर काही काळाने जेव्हा ती घटना कागदावर उतरून ठेवली जाते तेव्हा अशा साधनांना दुय्यम साधने असे म्हणतात. या साधनांचे वैशिष्ट्ये असे कि, घटना घडून गेल्यानंतर काही काळाने या साधनांची नोंद केली जाते. या दुय्यम साधनांच्या अंतर्गत मूळ साधनांच्या आधारे लिहण्यात येणारे संशोधन पर ग्रंथ, बखरी, शकावल्या, पोवाडे इ. साधनांचा समावेश होतो. दुय्यम साधने हि देखील इतिहासकाराला प्राथमिक साधना इतकीच महत्वाची असतात.

**आपली प्रगती तपासा.**

**१)** इतिहासलेखनातील पारंपरिक साधनांचा आढावा घ्या ?

## १६.३ इतिहासलेखनातील अपारंपरिक स्रोत व आधुनिक पद्धती

इतिहासाचे लेखन करत असतांना जिथे पारंपरिक साधने उपलब्ध होत नसतात अश्या ठिकाणी अपारंपरिक साधनांचा वापर केला जातो. आजच्या आधुनिक युगात अनेक नवीन तंत्रज्ञानावर आधारित साधने आहेत जी संशोधकाला किंव्हा एखाद्या अभ्यासकाला संशोधनासाठी उपयुक्त ठरू शकतात, ती साधने पुढील प्रमाणे:

### १) मौखिक साधने

मौखिक साधने किंव्हा मौखिक इतिहास म्हणजे इतिहासाच्या लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तिगत, कौटम्बिक, समूहसंबधी, दैनंदिन जीवनासंबंधी, महत्वपूर्ण घटनासंबंधी मौखिक स्वरूपातील माहितीचा ध्वनिमुद्रण म्हणजेच साऊंड रेडकॉर्डिंग, किंव्हा मुलाखतीची ट्रांसस्क्रिप्ट इ. माध्यमातून संग्रह आणि अभ्यास होय.थोडक्यात,

ऐतिहासिक घटनांमधील साक्षीदारांकडून त्यांच्या स्मृतींवर आधारित माहिती गोळा करणे व त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे मौखिक इतिहास होय. ही क्रिया एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने जात असते. ज्या संशोधनात लिखित साधनांचा अभाव असतो तिथे मौखिक साधने काळजीपूर्वक उपयोगात आणता येतात. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षित-सर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासपद्धतीचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी देखील केला गेला. तसेच पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षित - सर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासाचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी देखीलउपयुक्त ठरला. तसेच पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला. १९४० मध्ये ध्वनीमुद्रणाच्या साह्याने मौखिक इतिहास लिहला गेला; मात्र एकविसाव्या शतकात त्यासाठी डिजिटल ध्वनीमुद्रणाचा वापर होत आहे. मुलाखतिचे दस्तावेज किंवा मौखिक इतिहासाचे ध्वनीमुद्रणाचे लिप्यंतरण, सारांशित वा अनुक्रमित केले जाऊन ते संग्रहालय किंवा ग्रंथालयात ठेवले जातात. या ध्वनीमुद्रीत मौखिक इतिहासाचा उपयोग संशोधन, प्रकाशन, माहितीपट, प्रदर्शन, नाटक वा सादरीकरणाच्या इतर प्रकारात केला जाऊ शकतो.

मौखिक इतिहासाचा मुळ उद्देश अशा व्यक्तिची मुलाखत घेण्याचा असतो की, ज्याला इतिहासातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे एखादा महत्त्वपूर्ण अलिखित इतिहास उलगडण्यासाठी लोकांचा दबलेला आवाज पुढे आणण्याचे, लोकांना व्यक्त करण्याचे मौखिक इतिहास हे एक साधन आहे. स्त्रिया, कामगार, अल्पसंख्याक इत्यादी लोकांची माहिती आणि त्यांवर भूतकाळात झालेले अन्याय-अत्याचार मौखिक इतिहासामुळे कोणत्या ना कोणत्या व्यक्तीच्या माध्यमातून पुढे येऊ शकते. त्यामुळे मौखिक इतिहास हे ऐतिहासिक संशोधनासाठी सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वाचे पूरक असे साधन मानले जाते. त्याचप्रमाणे मौखिक इतिहास हे भूतकाळ व वर्तमानकाळ यांना जोडण्याचे काम करते. या पद्धतीमुळे लोक समाजाला व स्वत:ला कसे सादर करतात, हे समजण्यास मदत होते.

**२) रेडिओ व टेलिव्हिजन :**

आधुनिक काळात इतिहासाचे साधन म्हणून रेडिओ व टेलिव्हिजन यांना ओळखले जाते. रेडिओ वाटली बातम्या, वृत्तविशेष, घटनांचे समालोचन हि सर्व समाजप्रबोधनाचे साधन आहे. रेडिओ मधील एखाद्या व्यक्तीची मुलाखत किंव्हा एखादे भाषण व एखादीघटना हि ऐतिहासिक साधन म्हणून त्याचा वापर केला जाऊ शकतो. उदा. इंदिरा गांधींनी रेडिओवरील आणीबाणीची केलेली घोषणा. टेलिव्हिजन ने आधुनिक जगात क्रांती घडवून आणली. जगात एखादी घटना घडत असतांना टेलिव्हिजनच्या माध्यमातून ती घटना आपणास कळू शकते. उदा. तालिबान्यांनी अफगाणिस्तानवर केलेला कब्जा किंव्हा कोरोना

काळात जगातील सर्व देशांच्या आरोग्य व्यवस्थेची मिळालेली माहिती. रेडिओ व टेलिव्हिजन द्वारे मिळणाऱ्या माहिती हि एखाद्या संशोधकांसाठी किंव्हा विद्यार्थ्यांसाठी संशोधनात उपयुक्त ठरू शकते.

### ३) डिजिटल स्रोत

आज आपण डिजिटल जगात वावरत आहोत. एकविसाव्या शतकाला डिजिटायझेशनचे शतक म्हणता येईल कारण बहुतेक स्त्रोतांचे डिजिटायझेशन झाले आहे आणि ते संशोधकाला डिजिटायझेशन स्वरूपात उपलब्ध आहेत. डिजिटायझेशनमुळे अनेक ग्रंथालये, संग्रह, संग्रहालये इत्यादींमध्ये उपलब्ध असलेले समृद्ध स्रोत संशोधकाला माउसच्या एका क्लिकवर उपलब्ध होतात. आजकाल, संशोधक डिजिटेशन्समुळे दूरच्या टोकावर बसून डेटाबेस तसेच लायब्ररी, आर्काइव्ह इत्यादी संग्रहांमध्ये प्रवेश करू शकतात. महामारी आणि लॉकडाऊनसारख्या विलक्षण काळात संशोधक त्यांचे संशोधन कार्य संबंधित ग्रंथालयात न जाता किंवा भौतिकरित्या संग्रहित न करता करू शकतात.

### या डिजिटल स्त्रोतामध्ये विविध साधने आहेत ती पुढीलप्रमाणे :

### I) डिजिटल अर्काइव्ह (संग्रहण):

२१व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर हा वाढलेला दिसतो. इंटरनेटमुळे जगभरातील सर्व्हर आणि संगणक एकमेकांशी जोडले गेले आहे. डिजिटल अर्काइव्ह स्थापन करण्यामागे दोन मुख्य उद्देश असतात. एक, मौल्यवान डिजिटल माहितीचा कोणत्याही प्रकारे ह्रास न होऊ देता पुढील पिढ्यांसाठी ती माहिती संग्रहित करणे. दोन व्यवस्थितरीत्या निर्माण केलेल्या डिजिटल अर्काइव्ह मध्ये कोणत्याही पद्धतीचा तांत्रिक दोष होऊ नये यासाठी उपाययोजना करणे. डिजिटल अर्काइव्ह मध्ये पुराभिलेखाप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे छायाचित्रण अथवा स्कॅनिंग करून त्यांचे डिजिटल माहितीत रूपांतर केले जाते. याद्वारे ऐतिहासिक कागदपत्रांचे व ऐतिहासिक वस्तूंचे डिजिटल माहितीच्या स्वरूपात जतन करता येते. डिजिटल अर्काइव्ह जतन केलेली माहिती हि संशोधकाला ऑफलाईन अथवा ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून दिली जाते.

डिजिटल अर्काइव्ह हे प्रामुख्याने तीन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह हे शासकीय पुराभिलेखागार, ग्रंथालये, विदयापीठे, संग्रालये, शासकीय संस्था, इतिहासविषयक व सांस्कृतिक मंडळ इ. द्वारे चालवले जाते. या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह संशोधकांना वापरण्यासाठी मोफत किंव्हा नाममात्रशुल्कात संशोधकांना उपलब्ध करून दिले जाते.उदा. भारत सरकारचे नॅशनल अर्काइव्ह व पुणे येथील भांडारकर रिसर्च इन्स्टिटयूट. दुसऱ्या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह हे कोणत्याही एका व्यक्तीद्वारे, लोकांच्या छोट्या समूहाद्वारे, अथवा स्वयंसेवी संस्थांद्वारे तयार केले जाते. उदा. महाराष्ट्रातील धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळ. तिसऱ्या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह मध्ये प्रकाशक अथवा व्यावसायिक संस्थांच्याद्वारे संशोधकांना, विद्यापीठांना आणि ग्रंथालयांना सशुल्क उपलब्ध करून दिले जातात.

## II) इंटरनेट संग्रहण:

इंटरनेट आर्काइव्हज हा लाखो पुस्तके, चित्रपट, सॉफ्टवेअर, वेबसाइट इत्यादींमध्ये प्रवेश देण्यासाठी हाती घेतलेला एक मोठा प्रकल्प आहे. हा एक स्वतंत्र ना-नफा प्रकल्प आहे.इंटरनेट आर्काइव्हज हे एक स्वतंत्र ना-नफा ग्रंथालय आहे जे मोफत पुस्तके, सॉफ्टवेअर्स, वेबसाइट्स इत्यादींना विनामूल्य प्रवेश देण्यासाठी तयार केले गेले आहे. इंटरनेट आर्काइव्हज देणगीच्या मदतीने चालवले जाते आणि व्यवस्थापित केले जाते. ते स्वतःची प्रणाली विकसित करते आणि ते त्याच्या सामग्रीमध्ये विनामूल्य प्रवेश देते, वापरकर्त्यांची माहिती विकत नाही आणि जाहिराती देखील चालवत नाही. आधी सांगितल्याप्रमाणे इंटरनेट आर्काइव्हज संशोधक आणि इतिहासकारांना त्यातील सामग्री विनामूल्य प्रवेश प्रदान करते.

१९९६ पासून याने इंटरनेट जतन करणे किंवा संग्रहित करणे सुरू केले. सध्या त्याच्या संग्रहात पंचवीस वर्षांपेक्षा जास्त वेब इतिहास आहे. ज्याने लाखो पुस्तके आणि मजकूर, वेब पृष्ठे, दूरदर्शनवरील बातम्यांचे कार्यक्रम, प्रतिमा, ऑडिओ रेकॉर्डिंग आणि सॉफ्टवेअर प्रोग्राम हे जतन केले आहेत.ऐतिहासिक संशोधनासाठी वेब अभिलेखागार हे इतिहासकारांसाठी, विशेषतः सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासकारांसाठी उपलब्ध असलेले आणखी एक डिजिटल व्यासपीठ आहे. या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध माहिती आणि डेटामध्ये प्रवेश करून एखाद्याच्या ऐतिहासिक संशोधनाला चालना मिळू शकते. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे यात करोडो वेबपेजेस आहेत ज्यात वैयक्तिक होम पेज तसेच व्यावसायिक आणि शैक्षणिक वेबसाइट्सचा समावेश आहे. या स्त्रोतावरून मिळालेली माहिती इतिहासकारांना एखाद्या विशिष्ट गोष्टीच्या किंवा क्षेत्राच्या इतिहासाची पुनर्रचना करण्यात नक्कीच मदत करेल. या अनोख्या प्रकल्पाची उद्दिष्टे म्हणजे ऐतिहासिक संसाधन म्हणून वेबबद्दल जागरूकता निर्माण करणे, इतिहासकारांना या नवीन माध्यमाशी जोडणे आणि डिजिटल मेमरी आणि रेकॉर्डबद्दल जागरूकता निर्माण करणे. इतिहासकारांना अलीकडील भूतकाळातील डिजिटल प्राथमिक स्त्रोतांपर्यंत पोहोचण्यास मदत करणे हा देखील त्याचा उद्देश आहे. इतकेच नाही तर ते या स्त्रोतांचा अर्थ लावण्याचा आणि क्यूरेट करण्याचाही प्रयत्न करते.

## III) गुगल पुस्तके:

गुगल बुक्सना आधी गुगल बुक सर्च आणि गुगल प्रिंट आणि त्याचे कोडनेम प्रोजेक्ट ओशन असे संबोधले जात असे. ही गूगल Inc. द्वारे वाचक आणि संशोधकांसाठी उपलब्ध करून दिलेली हि मोफत सेवा आहे. Google Books चे वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्ण-पाठ्य पुस्तके आणि मासिकांमध्ये प्रवेश देते. ती पुस्तके आणि मासिके उपलब्ध आहेत ज्या Google Inc द्वारे मजकूरात रूपांतरित केलेल्या स्कॅन केलेल्या प्रती आहेत. मजकुरात रूपांतर करण्यासाठी ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन (OCR) वापरला जातो. Google Books वर उपलब्ध असलेली पुस्तके ही Google Books Partner Program या कार्यक्रमांतर्गत लेखक किंवा प्रकाशकांकडून मिळवली जातात. गुगलच्या लायब्ररी पार्टनर्सकडूनही पुस्तके मिळवली जातात आणि त्यासाठी गुगलच्या लायब्ररी प्रोजेक्टचा खूप उपयोग होतो. या आधी उल्लेख केलेली मासिके गुगल बुक्स वर उपलब्ध करून दिली आहेत. Google वर

उपलब्ध डेटाबेस, ई-संसाधने आणि एकूण माहिती. संशोधक आणि इतिहासकारांना पुस्तकांचा नक्कीच उपयोग होतो. माहिती गोळा करण्यासाठी किंवा गोळा करण्यासाठी आणि ऐतिहासिक संशोधनाला चालना देण्यासाठी हे नवीन युगाचे साधन किंवा स्त्रोत म्हणून योग्यरित्या वर्णन केले जाऊ शकते.

**IV) ब्रिटिश संग्रहालय:**

ब्रिटिश म्युझियम अथवा संग्रहालय ही सार्वजनिक संस्था आहे, जी मानवी इतिहास, कला आणि संस्कृतीला वाहिलेली आहे. हे युनायटेड किंगडमची राजधानी लंडनमधील ब्लूम्सबरी भागात आहे. ब्रिटीश म्युझियममध्ये जगातील प्राचीन संस्कृतींशी संबंधित महान संग्रह आहे. उदा. इजिप्शियन संस्कृती. प्राचीन संस्कृतींची वेबसाइट जगातील प्राचीन संस्कृतींची माहिती देते. त्याच्या नवीन ऑफर देखील प्राचीन भारताशी संबंधित अनिमेशन, 3D मॉडेल्स इत्यादी स्वरूपात आहेत. ब्रिटीश म्युझियमच्या वेबसाइटवर आणि इतर साधनांवर उपलब्ध असलेल्या माहितीमुळे संशोधक आणि इतिहासकार समृद्ध होऊ शकतात. इतिहासकारांना या स्त्रोतांच्या प्रकाशात इतिहासाची पुनर्बांधणी आणि अर्थ लावण्यास नक्कीच मदत होईल. २१व्या शतकातील इतिहासाच्या नवीन साधनांमध्ये याचे विशेष महत्व आहे.

**V) चित्रपट किंव्हा सिनेमा:**

चित्रपट हे एक मनोरंजनाचे साधन आहे , पण त्याचबरोबर ते आपल्याला काही संदेशही देतात. सध्याच्या या युगात मनोरंजनाची माध्यमे आणि संदेश देण्याचे व्यासपीठ याशिवाय, चित्रपट ऐतिहासिक संशोधनाचा स्त्रोत ठरत आहेत. चित्रपट किमान ऐतिहासिक संशोधनाला मदत करत आहेत असे सोयीस्करपणे म्हणता येईल. जेव्हा आपण म्हणतो की, चित्रपट हा ऐतिहासिक साहित्याचा एक चांगला स्त्रोत असू शकतो, तेव्हा एखाद्याने हे पहावे की निर्मात्याने पटकथा लिहिण्यापूर्वी सखोल संशोधन केले आहे आणि कथा ऐतिहासिक घटनेवर आधारित आहे. काही चित्रपट दिग्दर्शक आणि लेखक सखोल संशोधन करतात आणि चित्रपट लिहिण्यासाठी अस्सल आणि विश्वासार्ह स्त्रोतांचा संदर्भ घेतात, असे चित्रपट केवळ वास्तविक ऐतिहासिक तथ्ये सांगत नाहीत, तर चित्रपटाच्या स्क्रिप्टिंगसाठी संदर्भित केलेल्या दर्शकांना संदर्भ देखील देतात. समाजातील काही लोकांच्या ऐतिहासिक सामाजिक आणि आर्थिक शोषणावर आधारित आणि त्यावर प्रकाश टाकणारे हिंदीसह विविध भाषांमध्ये भारतात अनेक चित्रपट तयार झाले आहेत.

अलीकडच्या काळात अनेक ऐतिहासिक विषयांवर असंख्य चित्रपट बनवले गेले आहे ज्यमुळे एखाद्या ऐतिहासिक विषयाची माहिती त्या चित्रपटांमधून मिळते. उदा. बाजीराव - मस्तानी या चित्रपटात पेशवा बाजीराव याचे चित्रण रेखाटले आहे. तर सरदार उधम या चित्रपटात उधम सिंग यांच्या क्रातींकारी जीवनाचा आढावा घेतला आहे. परंतु अशा चित्रपटातून अनेक वेळा ऐतिहासिक ह्या तोडून - मोडून दाखवल्या जातात. त्यामुळे त्यांच्या विश्वासतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतात.

**VI) वर्ल्डकॅट:** ओहायो कॉलेज लायब्ररी सेंटर (OCLC) ची स्थापना १९६७ च्या आसपास झाली आणि नंतर ते ऑनलाइन कॉम्प्युटर लायब्ररी सेंटर म्हणून ओळखले जाऊ

लागले आणि नंतर त्याचे नाव OCLC Inc असे बदलले गेले. OCLC आणि इतर लायब्ररींनी वर्ल्डकॅट विकसित केले आहे. वर्ल्डकॅट हा सर्वात मोठा ऑनलाइन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग (OPAC) मानला जातो. वर्ल्डकॅटचा संग्रह संशोधकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्याच्या भांडारात बरेच लेख आहेत. संदर्भग्रंथांशी संबंधित माहिती तसेच गोषवारा मिळू शकतात. हे वाचकांना पूर्ण-मजकूर माहिती देखील प्रदान करते. वर्ल्डकॅट जगभरातील हजारो लायब्ररींच्या सामग्रीमध्ये प्रवेश देते आणि सामग्रीमध्ये डीव्हीडी आणि सीडी देखील समाविष्ट आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

**१)** इतिहासलेखनातील अपारंपरिक व आधुनिक पद्धतींचा आढावा घ्या?

## १६.४ सारांश

ऐतिहासिक प्रक्रियांचे वर्णन करणारी आणि भूतकाळातील मानवी समाजाची वाढ आणि विकास जाणून घेण्यास आणि अभ्यास करण्यास मदत करणारी कोणतीही सामग्री इतिहासाचा स्त्रोत मानली जाऊ शकते. फक्त एक गोष्ट म्हणजे संबंधित सामग्री प्रामाणिक आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे आपण असे म्हणू शकतो की ऐतिहासिक स्त्रोत म्हणजे काहीही नसून सांस्कृतिक आणि भौतिक वस्तूंच्या रूपात राहते आणि भूतकाळात मानवाने तयार केलेल्या लिखित नोंदी देखील असतात. हे स्त्रोत आपल्याला भाषा, चालीरीती, चालीरीती आणि भूतकाळातील मानवी जीवनाच्या सर्व पद्धतींबद्दल माहितीची पुनर्रचना करण्यास मदत करतात. जोपर्यंत लिखित स्त्रोतांचा संबंध आहे तोपर्यंत ते खडकांवरील लेखन, बर्च झाडाची साल, कागद इत्यादी विविध स्वरूपात आढळतात. आणि लिखित स्त्रोतांनी पुस्तके, मासिके, लेख, वृत्तपत्रे इत्यादी स्वरूपात छापलेली सामग्री देखील समाविष्ट केली आहे. लिखित स्रोत हे इतिहासातील सर्वात मोठे स्त्रोत साहित्य बनवतात. लिखित स्रोत अफाट आहेत आणि ते सरकारी अभिलेखागार, पितृसंस्था, कारखाने, कौटुंबिक संग्रह, संस्थांचे संग्रह इत्यादींमध्ये आढळतात. लिखित दस्तऐवज किंवा स्रोत आर्थिक, सांख्यिकीय, न्यायिक, प्रशासकीय, वैधानिक, राजनैतिक अशा विविध प्रकारची माहिती देतात., लष्करी इ. समकालीन काळात डिजिटल आणि इंटरनेट आधारित स्त्रोत मुबलक आणि सोयीस्करपणे उपलब्ध आहेत ज्यामुळे ऐतिहासिक संशोधन तुलनेने सोपे झाले आहे.

## १६.५ प्रश्न

१) इतिहास लेखनातील पारंपरिक व अपारंपरिक साधनांचा आढाव घ्या ?

२) इतिहास लेखनातील आधुनिक साधने कोणती माहिती द्या ?

३) डिजिटल अर्काइव्ह ( संग्रहण ) बद्दल सविस्तर माहिती द्या ?

## १६.६ संदर्भ

१) कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

२) सरदेसाई बी. एन, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

3) Deshpande Anirudh, Films as Historical Sources or Alternate History, Economic and Political Weekly, Vol. 39, No. 40 (Oct. 2-8, 2004), Published by Economic and Political Weekly

4) Barber S. &Penistone-Bird, History Beyond the Text: A Student's Guide to Approaching Alternative Sources, New York.

५) शेळके नागेश, मौखिक इतिहास, विकासपीडिया, ७/८/२०२०

६) इतिहास लेखनातील नवे प्रवाह, (स्टडी मटेरियल ) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

❖❖❖❖